# पत्री



साने गुरुजी

# पत्री

ई कविता संग्रह

साने गुरुजी

नेटभारी : ई साहित्य चळवळ

**पत्री : ई कविता संग्रह**

**लेखक : साने गुरुजी**

● साने गुरुजी लिखित साहित्य हे प्रताधिकार मुक्त आहे. हे वाचनासाठी विनामूल्य आहे. त्यावर सर्वांचा कायदेशीर हक्क आहे. हे पुस्तक वितरणासाठी तसेच वाचनासाठी विनामूल्य उपलब्ध आहे. हे पुस्तक आपण जास्तीत जास्त लोकांना वाचनासाठी फॉरवर्ड करू शकता.

साभार : www.saneguruji.net

मुखचित्र : गुगल साभार

ई प्रकाशन : नेटभारी : ई साहित्य चळवळ

प्रकाशन दिनांक : २६ जानेवारी २०१७
( भारतीय प्रजासत्ताक दिन )


नेटभारी प्रकाशन क्रमांक - ४९
( नेटभारी अंक ३६+ दिवाळी अंक २+ ई पुस्तके ११ = ४९ )


© NETBHAARI E SAHITYA CHALAVAL ® २०१७


● हे ई पुस्तक वाचनासाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे.... हे पुस्तक वाचून झाल्यावर आपण आपल्या मित्रांना फॉरवर्ड करू शकता... पण त्याचे वाचनाव्यतिरिक्त दुसरा वापर किंवा वेबसाईट, ब्लॉगवर ठेवण्यापूर्वी नेटभारी ई प्रकाशनाची पानवानगी घेणे आवश्यक आहे...

## साने गुरुजी ग्रंथ मालिका

## नेटभारी प्रकाशित साने गुरुजींची ई पुस्तके





## आगामी साने गुरुजी लिखित पुस्तके

१. गीता हृदय

२. राष्ट्रीय हिंदूधर्म

## पांडुरंग सदाशिव साने (साने गुरुजी)

(डिसेंबर २४, इ.स.१८९९ - जून ११. इ.स. १९५० )




पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ साने गुरुजी (डिसेंबर २४, इ.स. १८९९ - जून ११, इ.स. १९५०) हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक होते. साधी, सरळ, ओघवती भाषा, भावपूर्ण संस्कारक्षम निवेदनशैली हे त्यांच्या लेखणाचे विशेष गुण होते. 'श्यामची आई', 'नवा प्रयोग', 'सुंदर पत्रे', 'हिमालयाची शिखरे', 'क्रांती', 'समाजधर्म', 'आपण सारे भाऊ' इत्यादी त्यांचे विपूल साहित्य प्रसिद्ध आहे.

साने गुरुजींचा जन्म कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड या गावी झाला. त्या ठिकाणी खोताचे काम ते करीत असत. खोताचे घराणे साधारणत: वैभवसंपन्न व श्रीमंत समजले जाते व त्यांच्या आजोबांच्या वेळची परिस्थिती तशी होती ही.

पण सदाशिवरावांच्या वेळेपासून मात्र घराण्याची आर्थिक स्थिती घसरत गेली. ती इतकी की, सदाशिवरावांचे घरदारही जप्तीत नाहीसे झाले. अशा रितीने बडे घर पण पोकळ वासा झालेल्या या घराण्यात २४ डिसेंबर, इ.स. १८९९ रोजी पांडुरंग सदाशिवांचा जन्म झाला. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यानी इंग्रजी साहित्यामध्ये एम. ए. ही उच्च पदवी मिळवली होती.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे (१९२४ ते १९३०) नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला.

इ.स. १९२८ साली त्यांनी ‘विद्यार्थी’ हे मासिक सुरू केले. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत असत. इ.स. १९३० साली त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी ‘काँग्रेस’ नावाचे साप्ताहिक काढणे, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न करणे, जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन (१९३६) यशस्वी होण्यासाठी कार्य करणे, इ.स. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार या माध्यमांतून त्यांनी राजकीय कार्य केले. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचरसरणीस अनुसरून त्यांनी 'मैला वाहणे' व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली. त्यानी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. ‘पत्री’ या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून त्यांनी देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील बलसागर भारत होवो सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या.

**बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो।।**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले। मी सिद्ध मराया हो ।।**

–साने गुरुजीकृत काव्यपंक्ती

समाजातील जातिभेद, अस्पृश्यता यांसारख्या अनिष्ट रूढी व परंपरांना साने गुरुजींनी नेहमी विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी १९४६ च्या दरम्यान महाराष्ट्राचा दौरा केला, या भूमिकेला पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला. अखेर त्यांनी या मुद्यावर उपोषणाचा मार्ग अवलंबला व त्यांना यश मिळाले. 'एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले,' असे त्या वेळी म्हटले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या मार्गाने त्यांनी भारत जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असे या चळवळीत अभिप्रेत होते. ते स्वतः तमिळ, बंगाली आदी भाषा शिकले होते. १९४८ मध्ये त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लेख, निबंध, चरित्रे, कविता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो. मानवतावाद, सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसतात. त्यांनी एकूण ७३ पुस्तके लिहिली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. आचार्य विनोबा भावे-रचित 'गीता प्रवचनेसुद्धा विनोबा भावे यांनी धुळे येथील तुरुंगात (१९३२) सांगितली व साने गुरुजींनी लिहिली. याच धुळ्यातील तुरुंगात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल सुमारे १५ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. तसेच पुढे बंगलोर येथील तुरुंगात असताना त्यांनी तिरुवल्लिवर नावाच्या कवीच्या 'कुरल' नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठीत भाषांतर केले. नंतर फ्रेंच भाषेतील Les Misérables या कादंबरीचे 'दु:खी' या नावाने मराठीत अनुवादन केले. डॉ. हेन्री थॉमस या जगप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञाच्या The story of human race या

पुस्तकाचे मराठीत 'मानवजातीचा इतिहास' असे भाषांतर केले. 'करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' हे गुरुजींच्या जीवनाचे सार होते. मनोरंजनातून मुलांवर सुसंस्कार करण्यासाठी गुरुजींनी अनेक पुस्तके लिहिली. साने गुरुजींचे भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्मावर निरतिशय प्रेम होते. त्यानी भारतीय संस्कृती हा ग्रंथ लिहिला. तसेच भारतीय संस्कृतीतील अनेक महापुरुषांची चरित्रे लिहिली. त्यांचे 'मोरी गाय' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. मातृह्दयी गुरुजींनी आई वडिलांच्या प्रेमावर 'मोलकरीण' नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली ज्यावर पुढे जाऊन मराठी चित्रपट निघाला. गुरुजींनी लिहिलेली 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही कविता :-

**जगी जे हीन अतिपतित, जगी जे दीन पददलित**
**तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे**
**जयांना ना कोणी जगती सदा ते अंतरी रडती**
**तया जाऊन सुखवावे, जगाला प्रेम अर्पावे**
**समस्तां धीर तो द्यावा, सुखाचा शब्द बोलावा**
**अनाथा साह्य ते द्यावे, जगाला प्रेम अर्पावे**
**सदा जे आर्त अतिविकल, जयांना गांजती सकल**
**तया जाऊन हसवावे, जगाला प्रेम अर्पावे**
**कुणा ना व्यर्थ शिणवावे, कुणा ना व्यर्थ हिणवावे**
**समस्तां बंधु मानावे, जगाला प्रेम अर्पावे**
**प्रभूची लेकरे सारी तयाला सर्वही प्यारी**
**कुणा ना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे**
**असे जे आपणापाशी असे, जे वित्त वा विद्या**
**सदा ते देतची जावे, जगाला प्रेम अर्पावे**
**भरावा मोद विश्वात असावे सौख्य जगतात**
**सदा हे ध्येय पूजावे, जगाला प्रेम अर्पावे**
**असे हे सार धर्माचे असे हे सार सत्याचे**
**परार्थी प्राणही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे**
**जयाला धर्म तो प्यारा, जयाला देव तो प्यारा**
**त्याने प्रेममय व्हावे, जगाला प्रेम अर्पावे**

ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे. त्यांनी आपल्या प्रेमळ व्यक्तित्वाने पुढील पिढीतील अनेक थोर व्यक्तित्वे घडविली. उदा. - एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, मधु दंडवते, ग. प्र. प्रधान, प्रकाशभाई मोहाडीकर, प्रा. प्र. द. पुराणिक, वा. रा. सोनार, सी. एन. वाणी, शांतीलाल पटणी, यदुनाथ थत्ते, राजा मंगळवेढेकर, रा. ग. जाधव, दादा गुजर इ.

**आंतरभारती**

१९३० मध्ये साने गुरुजी त्रिचनापल्लीच्या तुरुंगात होते. त्यावेळी दक्षिणेकडच्या अनेक भाषातज्ज्ञांशी त्यांच्या संबंध आला होता. अनेक भाषांचे वैभव आपल्याला अज्ञात असल्याचे त्यांना जाणवले. आपण भारतात राहत असूनही इथल्या वेगवेगळ्या प्रांतांत बोलल्या जाणाऱ्या भाषांची माहिती आपल्याला नसते; या भाषा शिकायच्या असल्यास तशी संस्थाही आपल्याकडे नाही याची खंत नेहमी साने गुरुजींना वाटायची. यातूनच 'आंतरभारती'ची संकल्पना त्यांना सुचली.

प्रांतीयता या भारतीयाच्या एकत्वाला बाधक ठरणार असे त्यांना वाटू लागल्यामुळे त्यांनी प्रांताप्रांतांतील द्वेष नाहीसा होऊन सर्व बंधुत्वाचे वातावरण वाढावे, यासाठी निरनिराळ्या प्रांतातील लोकांना परस्परांच्या भाषा शिकाव्यात, चालीरीती समजून घ्याव्यात यासाठी आंतरभारतीचा प्रयोग करून पाहण्याचे ठरविले. त्यासाठी पैसा जमवून निरनिराळ्या प्रांतीय भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनाप्रमाणे काही सोय करावी, ही मनीषा त्यांनी महाराष्ट्र साहित्य संमेलनामध्ये याच ठरावावर बोलताना व्यक्त केली होती[ संदर्भ हवा ]. त्यासाठी त्यांनी काही पैसाही गोळा केला होता. पण हे कार्य अपुरे असतानाच ११ जून, इ.स. १९५० रोजी त्यानी आत्महत्या केली.

**माणगावचे आणि पुण्याचे सानेगुरुजी स्मारक**

साने गुरुजींच्या स्मरणार्थ 'सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारक' या नावाची संस्था महाराष्ट्रातल्या रायगड जिल्ह्यातल्या माणगाव नजीकच्या वडघर या निसर्गरम्य गावात आहे. १९९९मध्ये ३६ एकर जागेवर या संस्थेच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे.. यामध्ये विद्यार्थांच्या शिबिरासाठी दोन डॉरमेट्री आणि कॅम्पिंग साइट बांधण्यात

आल्या होत्या. साडेतीनशे विद्यार्थी मावतील इतकी या डॉरमेट्रीची क्षमता आहे. युवा श्रमसंस्कार छावणी, मित्रमेळावा, साहित्यसंवाद, भाषा अनुवाद कार्यशाळा असे अनेक उपक्रम या संस्थेत नियमित होत असतात. शाळांच्या अनेक उपक्रमांसाठीही या डॉरमेट्री उपलब्ध करून दिल्या जातात.

या संस्थेने आता (२००९ साली) प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम हाती घेतले आहे. या दुसऱ्या टप्प्यात 'सानेगुरुजी भवन' आणि 'आंतरभारती अनुवाद केंद' अशा दोन प्रकल्पांची योजना आखली आहे. साने गुरुजींच्या कार्याचा आढावा घेणारे कायमस्वरूपी प्रदर्शन 'सानेगुरुजी भवना'मध्ये होणार आहे. सानेगुरुजींचे स्मारक उभारणे हा या भवनामागचा उद्देश आहे. तसेच 'आंतरभारती अनुवाद केंद्र' हे साने गुरुजींनी पाहिलेल्या स्वप्नांची प्रतिकृती असेल. हे केंद कॉँप्युटर, इंटरनेट, ऑडियो-व्हिज्युअल रूम अशा सोयीसुविधांनी सज्ज असेल. इथे सुसज्ज लायब्ररीही सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. या लायब्ररीमध्ये लेखक, अभ्यासक, साहित्यिक शांतपणे संशोधन, अभ्यास करू शकतील, अशी संस्थेची योजना आहे. सानेगुरुजींचे आंतरभारतीचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी ही संस्था झटत आहे.

पुण्यातही साने गुरुजींचे स्मारक आहे. प्रायोगिक रंगभूमीच्या विविध विषयांवरील नाटकांच्या सादरीकरणासाठी या स्मारकाजवळ बॅ.नाथ पै रंगमंच या छोट्या नाट्यगृहाची उभारणी करण्यात आली आहे.

**साहित्य**

गुरुजींनी विपुल साहित्य लिहिले. कादंबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद इत्यादी साहित्यांच्या विविध क्षेत्रात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांची एकूण ७३ पुस्तके आहेत. वरदा प्रकाशनाने ती ३६ खंडांत पुन:प्रकाशित केली आहेत. त्यांच्या साहित्यातून कळकळ, स्नेह, प्रेम गोष्टींवर भर आढळतो. त्यांची साधीसुधी भाषा लोकांना आवडली. त्यांच्या मनात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक विषयासंबंधी जे विचारांचे, भावनांचे कल्लोळ उठले, ते ते सर्व त्यांनी आपल्या लेखणीद्वारे प्रकट केले. किती तरी घरगुती साधे प्रसंग

त्यांनी हृद्य रितीने वर्णन केले आहेत. कुमारांच्यासाठी ध्येय दर्शविणारे मार्गदर्शकपर साहित्य, चरित्रे आदी लिहिली, प्रौढांसाठी लेख, निबंध लिहिले, माता भगिनींना स्त्री जीवन व पत्री अर्पण केली.त्यांची ’श्यामची आई' व 'श्याम' ही पुस्तके विशेषत्वाने गाजली.

**साने गुरुजी यांचे प्रकाशित साहित्य**

- अमोल गोष्टी (हे पुस्तक बोलके पुस्तक-Audio book म्हणून पण मिळते)
- आपण सारे भाऊ भाऊ
- आस्तिक
- इस्लामी संस्कृति
- कर्तव्याची हाक
- कला आणि इतर निबंध
- कला म्हणजे काय?
- कल्की अर्थात संस्कृतीचे भविष्य
- 'कुरल' नावाच्या तमिळ महाकाव्याचे मराठी भाषांतर
- क्रांति
- गीताहृदय
- गुरुजींच्या गोष्टी
- गोड गोष्टी (कथामाला), भाग १ ते १०
    - भाग १ - खरा मित्र
    - भाग २ - घामाची फुले
    - भाग ३ – मनूबाबा
    - भाग ४ - फुलाचा प्रयोग
    - भाग ५ – दु:खी
    - भाग ६ - सोराब आणि रुस्तुम
    - भाग ७ - बेबी सरोजा
    - भाग ८ – करुणादेवी

    - भाग ९ - यती की पती
    - भाग १० - चित्रा नि चारू
- गोड निबंध भाग १, २
- गोड शेवट
- गोष्टीरूप विनोबाजी
- जीवनप्रकाश
- तीन मुले
- ते आपले घर
- त्रिवेणी
- दिल्ली डायरी
- देशबंधु दास
- धडपडणारी मुले
- नवा प्रयोग
- पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर
- पत्री
- भगवान श्रीकृष्ण व इतर चरित्रे
- भारतीय संस्कृती (मराठीसह इंग्रजी आणि अन्य भारतीय भाषांत)
- मानवजातीचा इतिहास
- मोरी गाय
- मृगाजिन
- रामाचा शेला
- राष्ट्रीय हिंदुधर्म. (भगिनी निवेदिता यांच्या मूळ पुस्तकाचा अनुवाद)
- विनोबाजी भावे
- विश्राम
- श्याम खंड १, २ (हे पुस्तकही बोलके पुस्तक म्हणून मिळते.)

- श्यामची आई
- श्यामची पत्रे
- सती
- संध्या
- समाजधर्म. (लेखक : भगिनी निवेदिता व साने गुरुजी)
- साधना (साप्ताहिक)(संस्थापक, संपादक)
- सुंदर पत्रे
- सोनसाखळी व इतर कथा
- सोन्या मारुती
- स्त्री जीवन
- स्वप्न आणि सत्य
- स्वर्गातील माळ
- हिमालयाची शिखरे व इतर चरित्रे

◘◘◘

**साभार : मराठी विकिपीडिया**

## अनुक्रमणिका

१. पत्री समर्पण श्रीराम
२. हृदय मदीय तव सिंहासन होवो
३. मजवर कृपा करावी
४. एक किरण
५. माझी बुडत आज होडी
६. अति आनंद हृदयी भरला
७. मम जीवन हरिमय होऊ दे!
८. मजला तुझ्यावीण जगी नाही कोणी
९. तव अल्प हातून होई न सेवा
१०. सदयहृदय तू प्रभु मम माता
११. दिसतात सुखी तात! सारेच लोक
१२. देवा! धाव धाव धाव
१३. दु:ख मला जे मला ठावे
१४. नयनी मुळी नीरच नाही
१५. वेल
१६. जीवनतरू
१७. मज माहेराला नेई
१८. येतो का तो दुरून
१९. पूजा मी करु रे कैशी?
२०. कर्ममय पूजा
२१. मजूर
२२. श्रमाची महती
२३. मन माझे सुंदर होवो
२४. मी केवळ मरुनी जावे
२५. असो तुला देवा! माझा सदा नमस्कार
२६. वेणु
२७. मनमोहना
२८. मनोमंदिर-राम
२९. हृदयाकाशी मेघराशी
३०. देवा! झुरतो तव हा दास
३१. प्रभु! सतत मदंतर हासू दे
३२. जागृत हो माझ्या रामा!
३३. हे नाथ! येईन तव नित्य कामी
३४. हे तात! दे हात करुणासमुद्रा
३५. तुजवीण अधार मज कोणि नाही
३६. काही कळेना, काही वळेना
३७. आईचा मार
३८. दिव्य आनंद
३९. कैसे लावियले मी दार
४०. हस रे माझ्या मुला!
४१. झुरतो मी रात्रंदिवस
४२. काय सांगू देवा, कोणा सांगू?
४३. नमस्कार
४४. गाडी धीरे धीरे हाक
४५. आशानिराशा
४६. ये रे मला तार
४७. निराधार
४८. दाखव मज अपुले चरण
४९. येवो वसंतवारा
५०. माझे ध्येय
५१. तुझ्या हातातला
५२. रडण्याचे ध्येय
५३. द्विविध अनुभव
५४. हे सुंदरा अनंता!

५५. रडायाचा लागलासे देवा एक छंद
५६. रामवेडा
५७. आई, दार उघड
५८. देवाजवळ
५९. जीवननाथ
६०. सुखामृताची मग नित्य धार
६१. तुला देतो मी जमिन ही लिहून
६२. आशा
६३. सोन्याचा दिवस
६४. प्रेम का करावे?
६५. प्रार्थना
६६. प्रसन्नता
६७. प्रकाश केव्हा भवनी भरेल?
६८. हृदयाचे बोल
६९. जीवनार्पण
७०. जीवनात माझ्या सदा राम गुंफिन
७१. तुजसाठि जीव हा उरलाकरुणाष्टक
७२. जीवनबाग
७३. भाग्याचे अश्रु
७४. तळमळतो रे तुझा तान्हा
७५. निर्वाणीचे सांगणे
७६. कधि येशिल हृदयि रघुराया
७७. का मजला देता प्रेम?
७८. अश्रु
७९. माझा देव
८०. प्रभु मम हृदयि आज येणार!
८१. फुलाची आत्मकथा
८२. मयसभा राहिली भरुन
८३. खरा धर्म
८४. कशासाठी जगावे?
८५. जीवनातील दिव्यता
८६. मित्रांसाठी प्रार्थना
८७. संत
८८. मेघासारखे जीवन
८९. वंदन
९०. मदीय त्या नमस्कृती
९१. नवीन संन्यास
९२. विपत्ति दे तीहि हवी विकासा
९३. दु:ख आनंदरुप
९४. प्रेमधर्म
९५. परी बाळाला सकळ ती समान
९६. ग्रंथमहिमा
९७. गुढीपाडवा
९८. नागपंचमी
९९. दसरा
१००. संक्रांत
१०१. लहान मित्राबद्दल!
१०२. लहानपणची आठवण
१०३. मृत्युमित्र
१०४. शांति कोण आणते?
१०५. गायीची करुण कहाणी
१०६. जीवनमित्रास!
१०७. कसे तरी मग जग दिसते?
१०८. प्रेमाचे गाणे
१०९. आत्मा ओत रे ओत
११०. निरोप

## देशभक्तीपर कविता

१११. भारतमाता

११२. मनमोहन मूर्ति तुझी माते
११३. माझी एकच इच्छा
११४. प्रभु! भारतिचे वैभव कोठे गेले?
११५. स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई!
११६. आमचे कार्य
११७. देशभक्त किति ते मरती
११८. भारतसेवा
११९. जा रे पुढे व्हा रे पुढे!
१२०. बलसागर भारत होवो!
१२१. हा देश वैभवी न्यावा!
१२२. भूषण जगताला!
१२३. भारतजननी सुखखनि साजो
१२४. हृदय जणु तुम्हां ते नसे!
१२५. माझा महाराष्ट्र भाग्ये सजो
१२६. भारतमाता माझी लावण्याची खाण!
१२७. मरणही ये तरी वरिन मोदे
१२८. दिव्य मी स्वर्ग निर्मीन
१२९. देशासाठी मरु!
१३०. तेव्हा घडे उन्नती!
१३१. तुफान झालो!
१३२. प्रिय भारता सुंदरा!
१३३. दुबळी मम भारतमाता!
१३४. देशभक्ताची विनवणी!
१३५. मातृभूमिगान
१३६. गाऊ मी कसले गाणे?
१३७. स्वातंत्र्य
१३८. स्वातंत्र्यदेवीचे शुभ आगमन
१३९. स्वातंत्र्यानंदाचे गाणे
१४०. भारतास!
१४१. भारता ऊठ!
१४२. वंदे मातरम्!
१४३. भारतजननी तव शरणम्!
१४४. सुसंस्कृत कोण?
१४५. खरा हुतात्मा!
१४६. ऊठ झुगारुन देई बेडी
१४७. प्रभु-प्रार्थना!
१४८. राष्ट्राचे उद्यान
१४९. राष्ट्रपताका
१५०. झेंडागीत
१५१. नवयुवक
१५२. बाल-वृद्ध संवाद
१५३. एकच वेड
१५४. स्वातंत्र दिव्यदर्शन!
१५५. भारतातील मुले
१५६. महाराष्ट्रास!
१५७. राणा प्रताप
१५८. महात्माजींस
१५९. खरे सनातनी
१६०. खंडकाव्य
१६१. माझी पत्री
१६२. विद्वानांचे अभिप्राय

## पत्री समर्पण
## श्रीराम

अनंत आई झगडे मनात
उसंत ना संतत चालतात
किती निराश किति थोर आशा
किती मनी चालतसे तमाशा।।

कसे तुला दावु समस्त माते
अशक्य ते या दुबळ्या मुलाते
परी कळावी तुज मन्मनाची
स्थिती, अशी आस तुझ्या मुलाची।।

म्हणून जो हा ह्रदयात सिंधु
उचंबळे, त्यातिल एक बिंदु
समर्पितो ठेवून नाम पत्री
तुझ्या महोदर पदी पवित्री।।

◘ ◘ ◘

**-पुणे, २८-२-२५**

# हृदय मदीय तव सिंहासन होवो

हृदय मदीय तव सिंहासन होवो।।
अभिनवतम रमणीया गुणनिधान
मूर्ति तुझी विलसत राहो।।हृदय....।।।

दंभ दर्प काम क्रोध
बहु करिती विरोध
उपजे न ज्ञानबोध
तिमिर सकल जावो।।हृदय....।।।

भक्तिभाव-गंधाची
सद्विचार-सुमनांची
मंगलमय-गानांची
पूजा तुज पावो।।हृदय....।।।
◘ ◘ ◘
**-अमळनेर, १९२६**

# मजवर कृपा करावी

प्रभुवर मजवर कृपा करावी
मतिमलिनता हरावी माझी।। मजवर....।।

भरो प्रेम अंतरंगी
जडो जीव संतसंगी
मम अहंता गळावी सारी ।। मजवर....।।

नुरो तम अता समीप
जळो हृदयी ज्ञानदीप
मति तव पदी जडावी माझी।। मजवर....।।

◘ ◘ ◘

**-धुळे तुरुंग, मे १९३४**

# एक किरण

एक किरण मज देई
केवळ एक किरण मज देई॥

कोटी रवि-शशि
तू पेटविशी
विश्वमंदिरी पाही
परि मम हृदयी
तिमिर सदाही
श्रमुनी जीव मम जाई॥ एक....॥

किती कृमि-कीटक
रोगोत्पादक
बुजबुजाटा जणू होई
दे सौभाग्या
दे आरोग्या
तम मम विलया नेई॥ एक....॥

मी धडपडतो
मी ओरडतो
कोणि न धावो भाई
आस तुझी मम
हरि झडकारि तम
मुळी न सुचे मज काही॥ एक....॥

एक किरण ना
मागे फार
एक किरण शुभ
देऊन तार
प्रणति तुझ्या शुभ पायी

तेज:सिंधो!
प्रकाशबिंदु
दे, होईन उतराई।। एक....।।

◙ ◙ ◙
**-पुणे, सप्टेंबर १९३४**

## माझी बुडत आज होडी

माझी बुडत आज होडी
मज कर धरून काढी।। माझी....।।

तुफान झाला सागर सारा
मज सभोती वेढी।। माझी....।।

लोटितील मज भीषण लाटा
खचित मृत्यु-तोंडी।। माझी....।।

शांत करी रे तुफान दर्या
काळमुखी न वाढी।। माझी....।।

अपराध तुझे रचिले कोटी
परि धरी न आढी।। माझी....।।

पुनरपि माते राहीन जपूनी
करीन कधी न खोडी।। माझी....।।

रागावली जरी माय मुलावरी
संकटी न सोडी।। माझी....।।

ये करुणाकर ये मुरलीधर
हात धरुनी ओढी।। माझी....।।

किती झाले तरी मूल तुझे मी
प्रेम कधी न तोडी।। माझी....।।

इतर कुणी ते धावान येतील
आस अशी न थोडी।। माझी....।।

**बाळ तुझा हा होऊन हतमद**
**हाक तुजसि फोडी॥ माझी....॥**

**आजपासुनी तव करि राया**
**सोपवीन होडी॥ माझी....॥**

**मुरली वाजव सागर शांतव**
**वादळास मोडी॥ माझी....॥**

**मुरली वाजव, वादळ लाजव**
**दाव गीतगोडी॥ माझी....॥**

**जीवन तव पदी वाहून बालक**
**हात तात! जोडी॥ माझी....॥**

◙ ◙ ◙
**-पुणे, ऑक्टोबर १९३४**

## अति आनंद ह्दयी भरला

अति आनंद ह्दयी भरला
प्रियकर प्रभु मम ह्दयी आला
शोक पळाला
खेद गळाला
पापताप दूरी झाला॥अति....॥

मम तनमनधन
मम हे जीवन
अर्पिन पदकमला॥अति....॥

चिंता सरली
भीती नुरली
त्रास सकळ सरला॥अति....॥

प्रेमरज्जुने
प्रभुला धरणे
जाईन मग कुठला॥अति....॥

◙ ◙ ◙
-धुळे तुरुंग, मे १९३२

## मम जीवन हरिमय होऊ दे!

मम जीवन हरिमय होऊ दे
हरिमय होवो
प्रभुमय होवो
हरिशी मिळून मज जाऊ दे॥ मम....॥

रुसेन हरिशी
हसेन हरिशी
हरिभजनी मज रंगू दे॥ मम....॥

गाईन हरिला
ध्याइन हरिला
भवसागर मज लंघू दे॥ मम....॥

हरिनामाचा
पावक साचा
अघवन घन मम जळू दे॥ मम....॥

हेत हरीचे
बेत हरीचे
सकल कृतींतून दावू दे॥ मम....॥

वेड सुखाचे
लागो हरिचे
हरिशी मिळून मज जाऊ दे॥ मम....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, जून १९३४

## मजला तुझ्यावीण जगी नाही कोणी

**मजला तुझ्यावीण जगी नाही कोणी।।**
**अगतिक निशिदीन**
**मजलागि वाटे**
**सदा दीन या लोचनी येई पाणी।। मजला....।।**

**मम कार्य जगी काय**
**न कळे मला हाय**
**स्थिती तात ही होत केविलवाणी।। मजला....।।**

**असेल जिणे भार**
**वाटे मला फार**
**जणू देई पाठीवरी कोणी गोणी।। मजला....।।**

**देवा दयाळा**
**हतदीन बाळा**
**घेऊन जा ठेवि निज पूज्य चरणी।। मजला....।।**

**◘ ◘ ◘**
**-पुणे, ऑक्टोबर १९३४**

## तव अल्प हातून होई न सेवा

तव अल्प हातून होई न सेवा
मम कंठ दाटे
किती खंत वाटे
हुरहूर वाटे अहोरात्र जीवा।। तव....।।

सेवा करावी
सेवा वरावी
मानी नित्य बोले असे फक्त देवा।। तव....।।

किती दु:ख लोकी
किती लोक शोकी
परि काही ये ना करायास देवा।। तव....।।

दिसता समोर
किती सानथोर
झटती, मला वाटतो नित्य हेवा।। तव....।।

हृदयात सेवा
वदनात सेवा
उतरे न हातात करु काय देवा।। तव....।।

खाणेपिणे झोप
मज वाटते पाप
वाटे सदा तात! की जीव द्यावा।। तव....।।

◘ ◘ ◘
-पुणे, ऑक्टोबर १९३४

# सदयहृदय तू प्रभु मम माता

सदयहृदय तू प्रभु मम माता
घेई कडेवर हासव आता॥सदय....॥

अगतिक बालक
कुणी ना पालक
त्रिभुवनचालक तू दे हाता॥सदय....॥

काही कराया
येई न राया
लाजविती मज मारिती लाथा॥सदय....॥

धावत येऊन
जा घरी घेऊन
वाचव मज तू नाथ अनाथा॥सदय....॥

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३२

# दिसतात सुखी तात! सारेच लोक

दिसतात सुखी तात! सारेच लोक
हसतात जगी तात! सारेच लोक॥
मम अंतरंगात
परि ही निराशा
भरतात डोळे जळे, जाळि शोक॥दिसतात....॥

खाणे पिणे गान
जग सर्व बेभान
असे फक्त माझ्याच हृदयात दु:ख॥दिसतात....॥

फुलतात पुष्पे
गातात पक्षी
रडे एक मच्चित्त हे नित्य देख॥दिसतात....॥

जनमोददुग्धी
मिठाचा खडा मी
कशाला? तुझे जाई घेऊन तोक॥दिसतात....॥

◘ ◘ ◘

-पुणे, ऑक्टोबर १९३४

## देवा! धाव धाव धाव

देवा! धाव धाव धाव
या कठिणसमयी पाव॥देवा....॥

अगणित रस्ते दिसती येथे
पंथ मजसि दाव॥देवा....॥

अपार गोंधळ बघुनी विकळ
देई चरणी ठाव॥देवा....॥

हा मज ओढी तो मज ओढी
करिती कावकाव॥देवा....॥

कुणी मज रडवी कुणी मज चढवी
म्हणू कुणास साव॥देवा....॥

घेऊनी जा मज प्रभु चरणी निज
नुरली कसली हाव॥देवा....॥

◙ ◙ ◙
-पुणे, ऑक्टोबर १९३४

## दु:ख मला जे मला ठावे

दु:ख मला जे मला ठावे
मदश्रुचा ना
अर्थ कळे त्या
आत जळून मी सदा जावे॥ दु:ख....॥

'असे भुकेला
हा कीर्तीला'
ऐकून, भरुनी मला यावे॥ दु:ख....॥

'एकांती बसे
अभिमान असे'
वदति असे ते मला चावे॥ दु:ख....॥

'या घरच्यांची
चिंता साची'
ऐकून, खेद न मनी मावे॥ दु:ख....॥

नाना तर्क
काढित लोक
नयनी सदा या झरा धावे॥ दु:ख....॥

तू एक मला
आधार मुला
बसून तुझ्याशी विलापावे॥ दु:ख....॥

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, ऑक्टोबर १९३२

# नयनी मुळी नीरच नाही

नयनी मुळी नीरच नाही
करपून किती मम अंतर जाई॥ नयनी....॥

रडूनी रडूनी सरले पाणी
वदुनी वदुनी शिणली वाणी
आत जळत परि निशिदिन पाही॥ नयनी....॥

रडता मी ना आता दिसतो
लोक सकळही परि हा फसतो
अश्रुविणे रडणे अति दाही॥ नयनी....॥

खाई किडा तो आता कळीस
भ्रमर आत पोखरी काष्ठास
शोक तसा हृदयास सदाही॥ नयनी....॥

अमृतधारा ये घेऊन तव
शोकानळ हा प्रभु झणि विझव
आस उरे तव केवळ आई॥ नयनी....॥

◘ ◘ ◘
-पुणे, ऑक्टोबर १९३४

## वेल

मी प्रभुराया! त्वदंगणांतील वेल
काळजी का न घेशील॥

मी एका या बाजुस पडलो आहे
वाट त्वत्कृपेची पाहे
त्वत्करुणेचे जल थोडे तरि मिळु दे
मज येथे जीव धरू दे
तू लक्ष जरा मधुनमधुन तरि देई
येईल धीर मम हृदयी
मज अंकुर मग फुटतील
मज पल्लव शुभ येतील
मम जीवन हे हासेल
ती येऊ दे मम भाग्याची वेळ
काळजी का न घेशील॥ मी....॥

हे बघ किति रे! माझ्याभवती गवत
ते मजसि वाढु ना देत
मज झाकोळी गुदमरवी ते सतत
शिर वरि मुळि करू ना देत
हे खाऊनिया मारून टाकिल माते
उपटशिल जरी ना हाते
हे उपट विषारी गवत
जे मदंकुरा अडवीत
दे मला विकासा पंथ
ये सखया तू, मरण जरि न येशील
काळजी का न घेशील॥ मी....॥

मज घालावे निज हातांनी पुरण
मग भरभर मी वाढेन
कधि खत घाली थोडे तरि तू राया

येईल भरारुन काया
कुणी काळजि ना आजवरी मम केली
म्हणून ही विकलता आली
परि पोशिल जरि कुणी मजला
प्रकटेल कला मम विमला
प्रकटेल दिव्यता सकला
मी त्वदंगणी म्हणूनिच झालो वेल
काळजी का न घेशील॥ मी....॥

मग फुटतिल रे दिव्य धुमारे माते
मांडवी चढव निज हाते
दे छोटासा मंडप मज घालून
त्यावर प्रभुजि! पसरेन
कधि येतील ती फुले फळे मधु
मजला
लागेल ध्यान मन्मतिला
होईन अतिच उत्कंठ
कळि हळुच होइल प्रकट
तू होशिल बघुनी हष्ट
मग सुंदरशी कितिक फुले फुलतील
काळजी का न घेशील॥ मी....॥

जरि सकळ फुले सखया! ना फळतील
झडतील काहि गळतील
ती काहि तशी वांझ प्रभु! निघतील
कितिकांस किडी खातील
कितिकांस फळे धरतिल परि सडतील
वाढ ना नीट होईल
परि एक दोन तरि दिव्य
रसभरित मधुर तुज सेव्य
येतील फळे प्रभु भव्य
तव पद=-पूजा-कामी ती येतील

काळजी का न घेशील॥ मी....॥

यापरि देवा! त्वदंगणी विकसू दे
बहरू दे, मुदे पसरू दे
मजमाजी जे आहे ते वाढवुन
त्वच्चरणकमळि वाहीन
परि वाढाया आहे करुणा-शरण
वाढेन सदय जरि चरण
मद्विकास त्वत्पूजार्थ
ना इतर हेतु ह्रदयात
हा एकच सखया हेत
फलपुष्पी हा वेल तवार्चन करिल
काळजी का न घेशील॥ मी....॥

◙ ◙ ◙
-नाशिक तुरुंग, सप्टेंबर १९३२

## जीवनतरू

प्रभु! जन्म सफल हा व्हावा
मम जीवनतरु फुलवावा॥ प्रभु....॥
सत्संगतिसलिला देई
सद्विचार रविकर देई
वैराग्य बंधना लावी
हे रोप वाढिला लावा॥ मम....॥

तू विकार वादळि पाळी
मोहाचे कृमि तू जाळी
श्रद्धेचे खत तू घाली
टवटवित हरित शोभावा॥ मम....॥

धैर्याचा गाभा भरु दे
प्रेमाचे पल्लव फुटु दे
सत्कर्मसुमांनी नटु दे
सच्छील-सुरभि पसरावा॥ मम....॥

गुंगोत भक्तिचे भृंग
नांदोत ज्ञान-विहंग
कूजना करुत नवरंग
शांतिच्या फळी बहरावा॥ मम....॥

बंधूंस सावली देवो
बंधूंस सौख्यरस देवो
सेवेत सुकोनी जावो
हा हेतु विमल पुरवावा॥ मम....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, मे १९३२

## मज माहेराला नेई

येइ ग आई
मज माहेराला नेई।।

तगमग करितो माझा जीव
तडफड करितो माझा जीव
जेवि जळाविण ते राजीव
सुकुनी जाई।। मज....।।

वृक्ष जसा तो मूळावीण
फूल जसे ते वृंतावीण
मीन जसा तो नीरावीण
तसे मज होई।। मज....।।

सदैव येते तव आठवण
भरुन येती दोन्ही नयन
तगमग करिते अंत:करण
सुचेना काही।। मज....।।

शतजन्मांचा मी उपवासी
एक कणहि ना माझ्यापाशी
तू तर औदार्याची राशी
कृपेने पाही।। मज....।।

तुझ्याजवळ मी सदा बसावे
त्वन्मुखकमला सदा बघावे
भक्तिप्रेमे उचंबळावे
हेतु हा राही।। मज....।।

वात्सल्याने मज कवटाळ

**तप्त असे मम चुंबी भाळ**
**प्रेमसुधा सुकल्या मुखि घाल**
**जवळी घेई॥ मज....॥**

◘ ◘ ◘
**-धुळे तुरुंग, मे १९३४**

# येतो का तो दुरून

येतो का तो दुरून
बघा तरि, येतो का तो दुरून॥

येतो का मम जीवनराजा
येतो का मम अंतरराजा
कंठ येइ गहिवरून॥ बघा तरि....॥

केवळ त्याच्यासाठी जगलो
केवळ त्याच्यासाठी उरलो
हृदय येतसे भरून॥ बघा तरि....॥

वाट बघोनी त्याची सतत
रडुनी रडुनी निशिदिन अविरत
डोळे गेले सुजून॥ बघा तरि....॥

येईल केव्हा माझा जिवलग
मम हृदयाची होई तगमग
जीव जातसे झुरून॥ बघा तरि....॥

येतांची मम जीवन राणा
ओवाळून मी पंचप्राणा
टाकिन त्याचेवरून॥ बघा तरि....॥

जीवनवल्लभ पडता दृष्टी
धावत जाउन घालिन दृढ मिठी
जाइन तत्पदि मरून॥ बघा तरि....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, एप्रिल १९३२

# पूजा मी करु रे कैशी?

पूजा मी करु रे कैशी?
येशी परि, पूजा मी करु रे कैशी?॥

पडके हे घर माझे
कैसा बोलवू? हृषिकेशी!॥ पूजा....॥

अश्रूंचा माझ्या हार
घालू का तो तव कंठासी?॥ पूजा....॥

सुटतात जे सुसकारे
तेची संगीत, देवा! तुजसी॥ पूजा....॥

जमले अपयश माझे
त्याच्या दाविन नैवेद्यासी॥ पूजा....॥

द्याया तुजलागि योग्य
नाही काहिच माझ्यापाशी॥ पूजा....॥

गोळा मी केल्या चिंध्या
कैशा दावू त्या मी तुजसी!॥ पूजा....॥

मोती फेकुन देवा!
जमवित बसलो मी मातीसी॥ पूजा....॥

त्वत्स्पर्श परि दिव्य होता
मृत्कण होतिल माणिकराशी॥ पूजा....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, मे १९३२

## कर्ममय पूजा

पूजा करिते तव हे, प्रभुवर!
अखिल चराचर, कर्म करोनी॥ पूजा....॥

रवि, शशि, तारे
सतत अंबरि तळपून
तिमिर समस्त हरोनि॥ पूजा....॥

सागर उसळति
धावती द्रुतगति तटिनी
ध्येय उदात्त धरोनी॥ पूजा....॥

वारे वाहति
डोलति तरुतति कितितरी
फलपुष्पानि भरोनी॥ पूजा....॥

जीवन हे मम
तेवि स्वकर्मि रमोनी
जाउ झिजून झिजूनी॥ पूजा....॥

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३२

## मजूर

आम्ही देवाचे मजूर
आम्ही देशाचे मजूर
कष्ट करू भरपूर॥ आम्ही....॥

बाहेरिल ही शेती करुन
धनधान्याने तिला नटवुन
फुलाफळांनी तिला हसवुन
दुष्काळा करु दूर॥ आम्ही....॥

हृदयातिलही शेती करुन
स्नेहदयेचे मळे पिकवुन
समानता स्नेहाला निर्मुन
सौख्य आण पूर॥ आम्ही....॥

रोगराइला करुनी दूर
घाण सकळही करुनी दूर
स्वर्ग निर्मु तो या पृथ्वीवर
बदलू सारा नूर॥ आम्ही....॥

दिवसभर असे कष्ट करून
जाउ घामाघूम होउन
रात्री भजनी जाऊ रमुन
भक्तीचा धरु सूर॥ आम्ही....॥

कर्मामध्ये दिव्यानंद
सेवेमध्ये दिव्यानंद
नाही अन्य फळांचा छंद
नाही काहि जरूर॥ आम्ही....॥

◙ ◙ ◙
-धुळे तुरुंग, मे १९३२

## श्रमाची महती

जरि वाटे भेटावे
प्रभुला डोळ्यांनी देखावे॥ जरि....॥

श्रम निशिदिन तरि बापा!
सत्कर्मी अनलस रंगावे॥ जरि....॥

प्रभु रात्रंदिन श्रमतो
विश्रांतीसुख त्या नच ठावे॥ जरि....॥

प्रभुला श्रम आवडतो
जरि तू श्रमशिल तरि तो पावे॥ जरि....॥

पळहि न दवडी व्यर्थ
क्षण सोन्याचा कण समजावे॥ जरि....॥

सत्कर्मांची सुमने
जमवुन प्रभुपद तू पुजावे॥ जरि....॥

रवि, शशि, तारे, वारे
सागर, सरिता, श्रमति बघावे॥ जरि....॥

सेवेची महती जाणी
कष्टांची महती जाणी
कष्टुनिया प्रभुपद गाठावे॥ जरि....॥

◙ ◙ ◙
-धुळे तुरुंग, मे १९३२

# मन माझे सुंदर होवो

मन माझे सुंदर होवो
वरी जावो
हरी गावो
प्रभुपदकमली रत राहो॥ मन....॥

द्वेषमत्सरा न मिळो अवसर
कामक्रोधा न मिळो अवसर
निष्पाप होउनी जावो॥ मन....॥

प्रेमपूर हृदयात भरू दे
भूतदया हृदयात भरू दे
शम, समता, सरिता वाहो॥ मन....॥

पावित्र्याचे वातावरण
चित्ताभोवति राहो भरून
कुविचार-धूलि ना येवो॥ मन....॥

आपपर असा न उरो भाव
रंक असो अथवा तो राव
परमात्मा सकळी पाहो॥ मन....॥

धैर्य धरू दे, त्यागा वरु दे
कष्टसंकटां मिठी मारु दे
आलस्य लयाला जावो॥ मन....॥

अशेचा शुभ दीप जळू दे
नैराश्याचे घन तम पळू दे
मनि श्रद्धा अविचल राहो॥ मन....॥

सत्याची मज सेवा करु दे
सत्यास्तव मज केवळ जगु दे
सत्यात स्वर्ग मम राहो॥ मन....॥

करुनी अहर्निश आटाआटी
ध्येयदेव गाठायासाठी
हे प्राण धावुनी जावो॥ मन....॥

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, जून १९३२

## मी केवळ मरुनी जावे

काय करावे?
मी केवळ मरुनी जावे
सदैव चाले ओढाताण
हृदयावरती पडतो ताण
उरले अल्पही न मला त्राण
कुणा सांगावे॥ मी....॥

क्षणभर निर्मळ गगनी उडतो
दुस-याच क्षणी दरीत पडतो
खालीवर करुनी मी रडतो
किति रडावे?॥ मी....॥

सदभाव मनी क्षण डोकावति
धरू जावे तो अदृश्य होती
केवळ हाती येते माती॥ मी....॥
मृण्मय व्हावे

कोणावरती विश्वासावे
कोणाला मी शरण रिघावे
कोणा हाती जीवन द्यावे
कुणाला ध्यावे॥ मी....॥

देवाचा न मज आधार
देवाचा न मज आधार
कोण पुशिल मल्लोचन-धार
तिने वाळावे॥ मी....॥

मम जीवनि मज न दिसे राम
जगुनि न आता काही काम
अविलंबे मी मदीय नाम
पुसुन टाकावे॥ मी....॥

◙ ◙ ◙

-धुळे तुरुंग, जून १९३२

## असो तुला देवा! माझा सदा नमस्कार

असो तुला देवा! माझा सदा नमस्कार
तुझ्या दयादातृत्वाला अंत नाहि पार॥ असो....॥

तुझ्या कृपेने रे होतिल फुले फत्तराची
तुझ्या कृपेने रे होतिल मोति मृत्तिकेची
तुझ्या कृपेने रे होतिल सर्प रम्य हार
असो तुला देवा! माझा सदा नमस्कार॥

तुझ्या कृपेने रे होइल उषा त्या निशेची
तुझ्या कृपेने रे होइल सुधा त्या विषाची
तुझ्या कृपेने रे होइल पंगु सिंधुपार
असो तुला देवा! माझा सदा नमस्कार॥

तुझ्या कृपासिंधूमधला बिंदु जरि मिळेल
तरि प्रभो! शतजन्मांची मत्तृषा शमेल
तुझे म्हणुनि आलो राया! बघत बघत दार
असो तुला देवा! माझा सदा नमस्कार॥

-धुळे तुरुंग, मे १९३२

प्रभो! काय सांगू तुला मी वदोनी

प्रभो! काय सांगू तुला मी वदोनी॥धृ॥

तुझी गोड येता स्मृती, आसवानी
पहा नेत्र येतात दोन्ही भरोनी॥ प्रभो....॥

कृपेची तुझ्या कल्पना चित्ति येताच
पाषाण जातील रे पाझरोनी॥ प्रभो....॥

अनंता! तुझ्या वैभवाला विलोकून
जाई अहंभाव सारा गळोनी॥ प्रभो....॥

उदारा! दयाळा! तुझ्या देणग्यांचा
सदा दिव्य वर्षाव होई वरुनी।। प्रभो....।।

कृपेचा तुझ्या गोड मेवा मिळाया
सुखे जन्म घेईन मी फिरफिरोनी।। प्रभो....।।

जसे नीर मीनास तेवी तुझी रे
स्मृति जीवनाधार राहो बनोनी।। प्रभो....।।

जसा श्वास प्राणास तेवी तुझी रे
स्मृति जीवनाधार राहो बनोनी।। प्रभो....।।

तुझे प्रेम राया! तुझी भक्ति राया!
सदा रोमारोमांत राहो भरोनी।। प्रभो....।।

तुझे गीत ओठी तुझे प्रेम पोटी
तुला एक जोडीन जगि या जगोनी।। प्रभो....।।

◙ ◙ ◙

-धुळे तुरुंग, मे १९३४

# वेणु

**हृदयंगम वाजत वेणू**
**स्वैर न विचरति इंद्रियधेनू॥ हृदयं....॥**

**जीवन-गोकुळि ये वनमाळी**
**अमित सुखाची सृष्टी भरली**
**शिरि धरिन तदीय पदांबुज-रेणू॥ हृदयं....॥**

**प्रेमळ गोपी या मम वृत्ती**
**वेडावुन प्रभुरूपी जाती**
**प्रभुविण वदति की काहिच नेणू॥ हृदयं....॥**

◙ ◙ ◙

**-नाशिक तुरुंग (गोकुळाष्टमी), ऑगस्ट १९३२**

## मनमोहना

**मनमोहना! भवमोचना!**
**भूक लागली**
**तव चरणांची**
**किति तरि साची**
**मम लोचना।। मन....।।**

**सकलकारी**
**तुजला बघु दे**
**तन्मय होउ दे**
**प्रियदर्शना।। मन....।।**

**शतजन्मावधि**
**मूर्ति न दिसली**
**मज अंतरली**
**अंतरमणा।। मन....।।**

**सोडि कठोरा!**
**निष्ठुरता तव**
**धीर न मज लव**
**मम जीवना!।। मन....।।**

◙ ◙ ◙

**-नाशिक तुरुंग, सप्टेंबर १९३२**

## मनोमंदिर-राम

बाल्यापासुन
हृदयात बसुन
गोष्टी सांगे गोड
पुरवि माझे कोड
सोडुन गेला परि तो आज माझे धाम
कोठे गेला सांगा रुसुन माझा श्याम
कोठे गेला माझा मनो-मंदिर राम
हाय मी काय करू॥

सुख ओसरे
हास्य दूर सरे
खेळ संपले
बोल थांबले
माझ्या घरामधले दिवे मालवून
माझी होती नव्हती दौलत चोरून
गेला कैसा केव्हा हच्चोर पळून
हाय मी काय करू॥

आता उंदिर घुशी
येथे दिवानिशी
करितिल खडबड
करितिल गडबड
पोखरून टाकतिल माझे हृदय-राउळ
कामक्रोधा आयते मिळेल वारुळ
आत चिंतेचे शिरेल वटवाघुळ
हाय मी काय करू॥

◙ ◙ ◙
-त्रिचनापल्ली तुरुंग, नोव्हेंबर १९३०

# हृदयाकाशी मेघराशी

हृदयाकाशी मेघराशी
आल्या का जमून
हृदयाकाश त्यांच्या भारे
सारे गेले नमून॥

येणार आहे स्वामि माझा
येणार आहे राजा माझा
त्याच्यासाठी म्हणून
मनोमंदिर धुवून टाकिन
निर्मळ ठेविन करून॥ हृदया....॥

कामक्रोधांच्या वटवाघळांनी
नाना वासनांच्या उंदिरघुशींनी
घाण ठेवली करून
धुवायाला मेघधारा
आल्या भरभरून॥ हृदया....॥

अंतर्बाह्य होवो वृष्टी
भरो हृदय भरो दृष्टी
मळ जावो झडून
काने कोपरे शुद्ध होवो
मळ न राहो दडून॥ हृदया....॥

हृदय निर्मळ शरीर निर्मळ
बुद्धि निर्मळ दृष्टी निर्मळ
जीवन निर्मळ बघून
प्रसन्न होइल प्राणसखा
हृदयिं ठेविल धरून॥ हृदया....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, जून १९३२

# देवा! झुरतो तव हा दास

देवा! झुरतो तव हा दास
करितो जरि सायास॥ देवा....॥

वापीजवळी बाळ जाउन
आत पाहतो डोकावून
माता येई हळूच मागुन
प्रेमे उचली त्यास॥ देवा....॥

मोहाजवळी देवा जाता
का न पकडशी माझ्या हाता
असुनी सकल जगाची माता
का मजशीच उदास॥ देवा....॥

धी- बलवैभव माते नलगे
जनगौरव- यश माते नलगे
एक मागणे तुजला मागे
दे निर्मळ हृदयास॥ देवा....॥

लहानसा दंवबिंदु साठवी
विमल निजांतरि तेजोमय रवि
तेवि तुला मी निर्मल हृदयी
ऐशी मजला आस॥ देवा....॥

◙ ◙ ◙
-धुळे तुरुंग, मे १९३४

# प्रभु! सतत मदंतर हासू दे

प्रभु! सतत मदंतर हासू दे॥
तुझ्या कृपेचा वसंतवारा
जीवनवनि मम नाचू दे॥ प्रभु....॥

विश्वग्रंथी पानोपानी
दृष्टि तुजचि मम वाचू दे॥ प्रभु....॥

ठायी ठायी तुजला पाहुन
उचंबळुन मन जाउ दे॥ प्रभु....॥

◙ ◙ ◙

-धुळे तुरुंग, मे १९३२

## जागृत हो माझ्या रामा!

जागृत हो माझ्या रामा!
हे हृदयस्था! सुखधामा!॥ जागृत....॥

तू भक्तजना आधार
तू ब्रह्मांडा आधार
हरि सकल मोहअंधार
जलदश्यामा!॥ जागृत....॥

करि मन्मति निर्मळ पूत
भरि भक्ती ओतप्रोत
त्वद्ध्यान लागु दिनरात्र
सद्विश्रामा!॥ जागृत....॥

लाविले तुजकडे डोळे
शतवार जाहले ओले
हे हृदय किती गहिवरले
घेता नामा॥ जागृत....॥

मज नको मान धन कीर्ती
मज लौकिकाचि ना प्रीती
निज दाखव मंगल मूर्ती
पुरवी कामा॥ जागृत....॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

# हे नाथ! येईन तव नित्य कामी

हे नाथ! येईन तव नित्य कामी॥
भवदीय इच्छा
प्रकटीन कर्मी
अश्रांत अत्यंत करिन श्रमा मी॥ हे....॥

सुखवीन हे लोक
हरुनी मन:शोक
झिदवीन काया प्रमोदे सदा मी॥ हे....॥

अश्रू पुसावे
जन हासवावे
याहून नाही जगी काहि नामी॥ हे....॥

वितळून जाईन
जशि मेणबत्ती
देईन अल्प प्रकाशा तरी मी॥ हे....॥

चित्ता शिवो स्वार्थ
न कधीहि देवा
न जडो कधी जीव मणि-भूमि-हेमी॥ हे....॥

स्मरुनी सदा मी
तुज चित्ति वागेन
तुजवीण नाही कुणी अन्य स्वामी॥ हे....॥

निरपेक्ष सेवा
खरि तीच पूजा
अर्पीन ती त्वत्पदाला सदा मी॥ हे....॥

इच्छा असे हीच
पुरवून ती तूच
ने दास अंती तुझ्या दिव्य धामी॥ हे....॥

◘ ◘ ◘
-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

## हे तात! दे हात करुणासमुद्रा

हे तात! दे हात करुणासमुद्रा॥
निज मग्न कर्मात
जग सर्व हे नित्य
पाहील कुणि ना मम म्लान मुद्रा॥ हे तात....॥

होई सुधासिंधु
होई दयाइंदु
होई मला गोड माहेर रुद्रा!॥ हे तात....॥

शिवो ना अमांगल्य
मजला शिवेशा!
अभद्र धरो जीव हा ना, सु-भद्रा!॥ हे तात....॥

प्रभु! जे खरे थोर
देती सदा धीर
सांभाळिती ते हता दीनक्षुद्रा॥ हे तात....॥

◘ ◘ ◘
-पुणे, सप्टेंबर १९३४

## तुजवीण अधार मज कोणि नाही

**तुजवीण अधार मज कोणि नाही॥**
**पथ कोण दावील**
**कर कोण घेईल**
**नेईल सांभाळुनी कोण, आई!॥ तुजवीण....॥**

**बघतो तुझी वाट**
**नयनांतानी पाट**
**गळा दाटतो सांगु तुजलागि कायी॥ तुजवीण....॥**

**हसतात सारे**
**न दया कुणा रे**
**दिशा शून्य राया! तुझ्यावीण दाही॥ तुजवीण....॥**

**पथि मी उभा रे**
**हसतात सारे**
**मला होटिती, मी रडे धायिधायी॥ तुजवीण....॥**

**जग मत्त हे जात**
**नत मी उभा तात!**
**ये हात धरुनी मला नीट नेई॥ तुजवीण....॥**

**कधिही तुझ्यावीण**
**पद मी न टाकीन**
**जावो जरी जन्म हा सर्व जाई॥ तुजवीण....॥**

**◘ ◘ ◘**
**-पुणे, सप्टेंबर १९३४**

## काही कळेना, काही वळेना

काही कळेना, काही वळेना॥
निरभ्रशा अकाशात
कुठूनशी अभ्रे येत
झणी सूर्य झाकोळीत
तेज ते पडेना॥ काही....॥

जरा वरी येई मोड
कुठूनशी तो ये कीड
खाइ अंकुराला गोड
वाढ ती घडेना॥ काही....॥

पतंग जो वरती जाई
तोच उलट वारा येई
क्षणामध्ये गोता खाई
तो वरी चढेना॥ काही....॥

मला गमे तोची आला
उठे मिठी मारायला
परी भास सारा ठरला
तो कधी मिळेना॥ काही....॥

अशी निराशा ही फार
जीव होइ हा बेजार
लोचनीचि अश्रूधार
ही कधी सुकेना॥ काही....॥

◙ ◙ ◙

-धुळे तुरुंग, एप्रिल १९३४

## आईचा मार

आई! आई! तू मज मार मार॥

मारुन मारुन मजला रडवी
चाबुक उडवुन रक्ता उडवी
लावी मन्नयनांस धार॥ आई....॥

लाल तुझ्या परि दृष्टीखाली
प्रेमसुधेची गंगा भरली
दिसते गे अपरंपार॥ आई....॥

मारुन मारुन तूची रडशिल
जवळी ओढुन मजला घेशिल
तुज दु:ख होईल फार॥ आई....॥

माडीवरती मज बसवशिल
हनुवट धरुनी मज हसवशिल
घेशिल मुके वारंवार॥ आई....॥

प्रेमे तुजला मी बिलगेन
तव अश्रूंचे मजला स्नान
हरपेल मम दु:खभार॥ आई....॥

आई! तुझा मज रुचतो मार
त्याहुन नाहि दुजे मज प्यार
मारुन मारुन तार
मारुन करि उद्धार॥ आई....॥

◙ ◙ ◙
-धुळे तुरुंग, मे १९३२

# दिव्य आनंद

दिव्य आनंद
मन्मना एक गोविंद॥

विषयवासना मम मावळली
सकल अहंता माझी गळली
वृत्ती प्रभोरूपोन्मुख वळली
न दुजा छंद॥ मन्मना....॥

ख-या सुखाचा झरा मिळाला
भेदभाव तो सकल निमाला
आज तपस्या येइ फळाला
तुटले बंध॥ मन्मना....॥

भावभक्तिची गंगा भरली
ज्ञानपंकजे सुंदर फुलली
अपार शांती ह्रदयी जमली
सुटला गंध॥ मन्मना....॥

सम मम आता डोळे उभय
सम मम आता प्रेमळ ह्रदय
परम सुखाया झाला उदय
मी निष्पंद॥ मन्मना....॥

शांत समीरण, शांत अंबर
शांत धरित्री, शांत मदंतर
रहावया येतसे निरंतर
गोड मुकुंद॥ मन्मना....॥

अता जगाची सेवा करित

**दीनदु:खितां हृदयी धरित**
**नेइन जीवन हे उर्वरित**
**मी स्वच्छंद॥ मन्मना....॥**

**अशांत अस्थिर लोकां पाहुन**
**तळमळती हे माझे प्राण**
**त्यांना आता नेउन देइन**
**सच्चित्कंद॥ मन्मना....॥**

◘◘◘
**-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३०**

# कैसे लावियले मी दार

पडला हा अंधार
कैसे लावियले मी दार
सौंदर्याने सृष्टी सजली
संगीताने सृष्टी भरली
दृष्टी परी मी माझी मिटिली
दिसले मजला ना सार॥ कैसे....॥

तरु डोलती वेल नाचती
उत्साहाच्या अखंड मूर्ती
आनंदाची जगी निर्मिती
सतत हो करणार॥ कैसे....॥

निर्मल सुंदर पुष्पे फुलती
परिमल देती लघु जरि दिसती
प्रकाश धरणीवरी उधळिती
सदैव ती हसणार॥ कैसे....॥

पहा पाखरे मूर्तानंद
किती त्यांचे ते सुंदर रंग
किलबिल ऐकुन किती तरंग
सहृदय-मनि उठणार॥ कैसे....॥

नभी तारका सदा चमकती
सागरावरी लहरी हसती
डोळे अमुचे जरि हे बघती
वृत्ति उचंबळणार॥ कैसे....॥

सुंदर साधे चिमणे गवत
वसुंधरेला ते नटवीत

दृष्टी जगाची ते निववीत
हिरवे हिरवे गार।। कैसे....।।

विश्वामधला प्रत्येक कण
जगात फेकी प्रकाशकिरण
प्रकाशमोदे कोंदे त्रिभुवन
घेइ न तोचि भिकार।। कैसे....।।

कृतज्ञतेचा सद्भावाचा
स्नेहाचा नि:स्वार्थ प्रीतिचा
भक्तीचा निष्पाप अश्रुचा
प्रकाश अपरंपार।। कैसे....।।

जगात भरले रमणीयत्व
जगात भरले असे शिवत्व
जगात भरलेसे सत्यत्व
कोण परी बघणार।। कैसे....।।

मनुज-मानसी डोकावून
खोल असे जो सदंश बघुन
झालो केव्हाहि न तल्लीन
केला मी धिक्कार।। कैसे....।।

वृत्ति करोनी निज अनुदार
रागावोनी सकळ जगावर
काय साधले अहा खरोखर
झालो मी भूभार।। कैसे....।।

पायांपाशी माणिकमोती
प्रकाशसिंधू सदा सभोती
भिकार तिमिरी केली वस्ती
आणि अता रडणार।। कैसे....।।

अश्रूंचे बांधिले बंगले
तिमिराचे गालिचे पसरिले
नैराश्याचे गाणे रचिले
केला हाहा:कार॥ कैसे....॥

जगापासुनी गेलो दूर
मोदा सोडुन गेलो दूर
प्रकाश सोडुन गेलो दूर
आणि पुन्हा झुरणार॥ कैसे....॥

शोके आता भरतो ऊर
जिवास आता सदैव हुरहुर
कशांस आता करु मी कुरकुर
झाले जे होणार॥ कैसे....॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टों. १९३०

## हस रे माझ्या मुला!

वारा वदे
कानामधे
गीत गाइन तुला
ताप हरिन
शांति देइन
हस रे माझ्या मुला।।

चिमणी येउन
नाचून बागडून
काय म्हणे मला
चिवचिव करिन
चिंता हरिन
हस रे माझ्या मुला।।

हिरवे हिरवे
डोले बरवे
झाड बोले मला
छाया देइन
फळफूल येइन
हस रे माझ्या मुला।।

सुमन वदे
मोठ्या मोदे
प्रेम देइन तुला
गंध देइन रंग दाविन
हस रे माझ्या मुला।।

रवी शशी
ताराराशी
दिव्य दाविन तुला
देईन प्रकाश
बोले आकाश
हस रे माझ्या मुला।।

पाऊस पडेल
पृथ्वि फुलेल
मेघ म्हणे मला
नद्यानाले
बघशील भरले
हस रे माझ्या मुला॥

हिरवे हिरवे
कोमल रवे
तृण म्हणे मला
माझ्यावरी
शयन करी
हस रे माझ्या मुला॥

जेथे जाइन
जेथे पाहिन
ऐकू ये मला
रडू नको
रुसू नको
हस रे माझ्या मुला॥

पदोपदी
अश्रु काढी
कुणि न बोलला
सृष्टी सारी
मंत्र उच्चरी
हस रे माझ्या मुला॥

माझ्या अश्रुंनो
माझ्या मित्रांनो
खोलिमध्ये चला
दार घेऊ लावुन
या तुम्हि धावून
तुम्हिच हसवाल मला॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१

## झुरतो मी रात्रंदिवस

होतो मी कासावीस। झुरतो मी रात्रंदिवस॥
श्रद्धेच्या दुबळ्या हाती। त्वत्प्रकाश धरण्या बघतो
बाळ जसा भूमीवरुनी। चंद्राला धरण्या धजतो
अंधारामधुनी देवा। त्वन्निकट यावया झटतो
मूल मी कळेना काही
कावराबावरा होई
डोळ्यांना पाणी येई
अंतरी तुझा मज ध्यास॥ झुरतो....॥

त्वत्प्रसाद मज लाभेल। होती मम हृदयी आशा
तू प्रेम मला देशील। होती मम हृदयी आशा
तू पोटाशी धरशील। होती मम हृदयी आशा
परि माय माउली रुसली
या बाळावर रागवली
ती येईना मुळि जवळी
ये माझ्याजवळी बैस॥ झुरतो....॥

रात्रीच्या समयी शांत। सळसळती तरुची पाने
मी खिडकीपाशी जात। सोत्कंठ बघे नयनाने
प्रभु माझा बहुधा येतो। घेतली धाव का त्याने
बाहेर खिडकीच्या हात
धरण्याला त्याचा हात
मी काढितसे सोत्कंठ
ठरला परि केवळ भास॥ झुरतो....॥

आकाशी बघुनी तारे। गहिवरते माझे हृदय
हे थोर थोर पुण्यात्मे। का करिति प्रभुस न सदय
दिसती न तयांना काय। अश्रू मन्नेत्रि जे उभय
हे मंगल निर्मळ तारे

कथितिल प्रभुला सारे
हृदयातिल माझे वारे
बाळगितो ही मनि आस।। झुरतो....।।

प्रभु आला ऐसे वाटे। तो दिसे निबिड अंधार
हृदयात जरा आनंद। तोच येइ शोका पूर
सुमनांचा वाटे हार। तो करित भुजंग फुत्कार
रडकुंडिस येई जीव
कोमेजे हृद्राजीव
करितो न प्रभुजी कींव
प्राशावे वाटे वीष।। झुरतो....।।

पंकांतुन यावे वरती। रमणीय सुगंधी कमळे
भूमीतुन यावे वरती। अंकुरे मृदुल तेजाळे
दु:खनिराशेतुन तेवी। उघडी मम आशा डोळे
परि हिमे कमळ नासावे
अंकुरा किडीने खावे
आशेने अस्ता जावे
दु:खाची देउन रास।। झुरतो....।।

आसनिराशेचा खेळ। खेळुनी खेळुनी दमलो
वंचना पाहुनी माझी। सतत मी प्रभुजी श्रमलो
हुंदके देउन देवा! ढसाढसा कितिकदा रडलो
तुज पाझर देवा फुटु दे
त्वन्मूर्ति मजसि भेटू दे
त्वच्चरण मजसि भिजवू दे
हसवी हा रडका दास।। झुरतो....।।

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

# काय सांगू देवा, कोणा सांगू?

काय सांगू देवा, कोणा सांगू?॥

माझ्या चित्ता आता नाही मुळी धीर
रात्रंदिन वाहे डोळ्यांतून नीर
तुजला वाटे काय माझी चीरचीर॥ काय....॥

धूळीमध्ये गेले तनमन मळून
तूझ्या अमृतहाते टाकी रे धुवून
तूझ्या पायाजवळी ठेवी मग निजवून॥ काय....॥

कुविकारांची थंडी टाकी गारठवून
नाही नाही काही मजला संरक्षण
तूझा शेला देवा घाली पांघरूण॥ काय....॥

मेघावीण कैसा नाचेल रे मोर
चंद्रावीण कैसा हासेल चकोर
आईवीण सांग कोठे जाइल पोर॥ काय....॥

तूझा एक देवा! अनाथा आधार
भक्तांचा तू सतत चालवितोसि भार
म्हणुनी आलो तूझे शोधित शोधित दार॥ काय....॥

माते! मंगलमूर्ते! उघडी आता दार
माझ्या शोका नाही, आई! अंत पार
तूझ्या बाळा आता तार किंवा मार॥ काय....॥

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३२

## नमस्कार

असो तुला देवा माझा सदा नमस्कार
कसा होउ उतराई मी काय बोलु फार॥ असो....॥

दिले निळे आकाश तसे चंद्र सूर्य तारे
दिले जीवनाधार असे दिवारात्र वारे
सरसरित्सागर दिधले कितिक तू उदार॥ असो....॥

वसुंधरा सुंदर दिधली श्रमामूर्ति माय
हिरवि हिरवि सृष्टी दिधली दृष्टि तृप्त होय
फुले फळे धान्ये देउन चालविशि भार॥ असो....॥

माय बाप बंधू भगिनी आप्त सखे स्नेही
दिले प्रेम त्यांचे म्हणुनी सकळ सह्य होई
कृतज्ञता मैत्री प्रीती तू दिलीस थोर॥ असो....॥

तसा देह अव्यंग दिला हृदयी दिलेस
बुद्धिची दिली देणगि रे केवि वर्णु तीस
अशा साधनांनी तरि ते दिसो तुझे दार॥ असो....॥

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३२

## गाडी धीरे धीरे हाक

गाडी धीरे धीरे हाक।
बाबा धीरे धीरे हाक
धीरे धीरे हाक।। गाडी....।।

बैलांना तू फार न मारी
प्रेमे त्यांना तू चुचकारी
प्रेमाची जी बळकट दोरी
तीने त्यांना राख।। गाडी....।।

हाती परि तद्दती असावी
म्हणुनी वेसण ती घालावी
त्यामना परि ती कळू न द्यावी
टोचावे हळु नाक।। गाडी....।।

ठेवी अपुले प्रसन्न बैल
घाली पाठीवरती झूल
केवळ सोडी परी न सैल
वाटू दे तव धाक।। गाडी....।।

गाडी बाबा मजबुत ठेवी
उत्साहाचे ओंगण देई
मार्गी ती ना मोडुन जावी
धैर्ये पुढती ठाक।। गाडी....।।

सावध राहुन पंथा पाही
असतिल खळगे ठायीठायी
गाडी जाइल खाली पाही
करि न डोळेझाक।। गाडी....।।

अंधारी ना मार्ग दिसेल
गाडी पुढती तुझी घुसेल
असेल दलदल तिथे फसेल
रुतेल बाबा चाक।। गाडी....।।

चाक रुते तरि खांदा देई
निराश मुळि ना चित्ती होई
हृदयी भगवंताला ध्याई
करुणा त्याची भाक॥ गाडी....॥

चोरहि येतिल व्याघ्रहि येतिल
बैल बुजोनी तूही भीशिल
भिऊ नको तो स्वामी येइल
मारी त्याला हाक॥ गाडी....॥

पथि कंटाळा जरि कधि येई
गोड प्रभुची गाणी गाई
भूक लागली तरि तू खाई
भक्तीचा मधुपाक॥ गाडी....॥

संतजनांच्या उपदेशाचा
भगवंताच्या मधु नामाचा
चारा बैला देई साचा
दिसतिल तेजे झाक॥ गाडी....॥

मार्ग क्रमिता ऐसा बापा
पावशील ना पापातापा
प्रवास सुखकर होइल सोपा
चिंता सारी टाक॥ गाडी....॥

इष्टस्थाना मग तू जाशिल
प्राप्तव्य तुझे तुला मिळेल
सौख्याने मन वोसंडेल
दिव्यानंदा चाख॥ गाडी....॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## आशानिराशा

पतीत खिन्न अति दु:खी उदासीन
तळमळे जीव जैसा जळावीण मीन॥
कोठे जाऊ कोणा पाहू निराधार बाळ
अश्रूंनी ओले झाले माझे दोन्ही गाल

मदीय हृदयात निराशेचा सूर
अंधार सभोवती भरलासे भेसूर
मनोरथमुकुलांचा माझ्या झाला नाश
तिळभर उरलि नाही मला मुळि आस

आकांक्षा स्वप्ने जणू माझी स्वार्थमूल
म्हणून काय आज पडली खात धूळ
भिकारि जरि केली इतकी मी वणवण
रिकामि झोळी माझी जवळ नाही कण

लाजेने मरतो मी दावु कुणा मुख
या जन्मि नाहि जणु मजलागि सुख
कशाला मी राहु जगि फेकु दे हे प्राण
मनी म्हणे असे तोचि ऐकु येइ गान

अनंत सिंधुमध्ये मिळावा फलक
अपार अंधारात दिसावी झलक
तान्हेल्याला लाभावी पाण्याची चुळुक
घामाघूम झालेल्याला वा-याची झुळुक

तसा मला ऐकु आला शब्द मोठा गोड
दाखवु लागला मला माझ्या सौभाग्याचा मोड
'विकारांची वासनांची तुझ्या झाली राख
आकांक्षा मनोरथ जे जे झाले खाक

त्यातून तो बघ दिसतो येत आहे वर
आशेचा प्रकाशाचा अंकुर सुंदर
भविष्य बघ तुझा सुंदर उज्ज्वल
निराश नको होऊ सोस थोडी कळ

प्रेमाचे पावित्र्याचे पल्लव फुटतील
सेवेची त्यागाची फुले फुलतील
प्रशांत शांतिची फळे लागतील
तुझ्या मनोवृत्ति मुला मोदे डोलतील

पूस पूस अश्रू सारे हास रे बाळा हास
तुझ्या भविष्याचा बघ येतो गोड वास'
कुणि तरि ह्रदयात बोले असा सूर
'हुरहुर नको करु बाळा! जाईल दैन्य दूर'

निराशेतून असे येति आशेचे किरण
आशा जाउन पुन्हा घेरि निराशा भीषण
आशानिराशांच्या अशा लाटांवर मीन
खाली वर होइ तुझा, देवा! दास दीन।। पतीत...

◙ ◙ ◙
-त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१

# ये रे मला तार

ध्येयहीन
कर्महीन
शक्तिहिन दीन
घृतहीन
मतिहीन
पदोपदि शीण॥

मतिमंद
निरानंद
हृदयि दुर्गंध
नाना बंध
नाना छंद
नाही सुखकंद॥

नाही मान
नाही स्थान
मनावर ताण
मनी घाण
जाई प्राण
होई ओढाताण॥

निराधार
हतसार
झालो भूमिभार
डोळ्यां धार
अनिवार
ये रे मला तार॥

◘ ◘ ◘
-त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१

# निराधार

फुलापरी
दंवापरी
हळु मदीय मन
विजेपरी
विषापरी
कठोर सारे जन॥

तृषा मला
क्षुधा मला
मदीय कंठ प्राण
कण न मिळे
जळ न मिळे
मजसि मारित बाण॥

नयन झरे
हृदय भरे
कुणाचे पाहु दार
दार लाविती
हाकलुन देती
कुणि न मज आधार॥

अंधार पडे
गगन रडे
वणवण मी करित बाळ
तुझ्या दारी
आलो तारी
करि तू तरि सांभाळ॥

अंगावरुन

**हात फिरवून**
**घे मला जवळ**
**डोळे पुशी**
**बोले मशी**
**प्रेमे दे कवळ॥**

**अंकि निजव**
**गीते रिझव**
**ताप मम सरो**
**तूहि निष्ठुर**
**होशि जरि दूर**
**तरि हा दारी मरो॥**

**◙ ◙ ◙**
**-त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१**

## दाखव मज अपुले चरण

हे शरणागतजन-करुण! दाखव मज अपुले चरण॥
मी पतंग सूत्रावीण
मी पाखरु पंखावीण
मी मीन जीवनावीण
मज फारच होई शीण॥ दाखव....॥

हे प्रबळ वासनावारे
खेळणे करिति मज बा रे
उडविती भ्रमविती जोरे
सांभाळिल तुजविण कोण॥ दाखव....॥

मी पापपंकरत कीट
दुर्गंधि मनी ये वीट
होईल हृदय कधि नीट
मज बरवे वाटे मरण॥ दाखव....॥

वेढितो घोर अंधार
मजसि ना दिसतसे पार
कोण रे असे आधार
कासाविस होती प्राण॥ दाखव....॥

मी तुझी बघतसे वाट
डोळ्यांत अश्रुचे लोट
हृदयात शोक घनदाट
तू माय बाप गुरु जाण॥ दाखव....॥

ये करे मला कुरवाळी
मी मूल मला प्रतिपाळी
मी फूल होइ तू माळी

**ये येइ करी उद्धरण॥ दाखव....॥**

**घे मांडीवर निज बाळ**
**प्रेमानं चुंबी गाल**
**ही इडापिडा तू टाळ**
**तू मंगल तू अघहरण॥ दाखव....॥**

**हे जीवन होवो सफळ**
**करि पूर्ण हेतु मम विमल**
**मम निश्चय राहो अचळ**
**आदर्श असो आचरण॥ दाखव....॥**

◘ ◘ ◘

**-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३०**

## येवो वसंतवारा

नवजीवन-प्रदाता। चैतन्य ओतणारा
सुकल्यास हासवीता। आला वसंतवारा

आला वसंतवारा। वनदैन्य हारणारा
सुटला सुगंध गोड। भरला दिगंत सारा

रानीवनी बहार। आला फुलांफळास
समृद्धि पाहुनीया। आनंद पाखरांस

वेली तरू रसाने। जातात भरभरोनी
डुलतात नाचतात। नवतेज संचरोनी

फुटतो मुक्या पिकाला। तो कंठ गोड गोड
सजते सुपल्लवांनी। ते शुष्क वृक्ष-खोड

सोत्कंठ गायनाने। पिक नादवीत रान
परिसून ते सहृदय। विसरून जाइ भान

सृष्टीत सर्व येतो। जणु जोम तो नवीन
जे जे वठून गेले। ते ते उठे नटून

सृष्टीत मोद नांदे। सृष्टीत हास्य नांदे
संगात गोड गोड। सृष्टीत सर्व कोंदे

सृष्टीत ये वसंता। परि मन्मनी शिशीर
मम जीवनी वसंत। येण्यास का उशीर

का अंतरी अजून। नैराश्य घोर आहे
का लोचनांमधून। ही अश्रुधार वाहे

अंधार अंतरंगी। भरला असो अलोट
काही सुचे रुचे ना। डोळ्यांत अश्रुलोट

उत्साह लेश नाही। उल्हास अल्प नाही
इवलीहि ना उमेद। झालो हताश पाही

सत्स्फूर्तिचा स्फुलिंग। ना एक जीवनात
मेल्यापरी पडे मी। रडतो सदा मनात

हतशुष्क जीवनाचा। निस्सार जीवनाचा
जरि वीट येइ तरिही। न सुटेच मोह त्याचा

ओसाड जीवनाची। भूमी सदा बघून
वणवेच पेटतात। मनि, जात मी जळून

ओसाड जीवनाचे। पाहून वाळवंट
करपून जीव जाई। येई भरुन कंठ

पाहून जीवनाचा। सारा उजाड भाग
मज येइ भडभडोनी। मज ये मदीय राग

कर्मे अनंत पडली। दिसतात लोचनांते
परि एकही कराया। राया! न शक्ति माते

संसार मायभूचा। सारा धुळीत आज
काही करावयाला। येई मला न काज

हृदयी मदीय भरते। देवा अपार लाज
काहीच हातुनिया। होई न मातृकाज

असुनी जिवंत मेला। जो कर्महीन दीन
मनबुद्धि देह त्याची। ती व्यर्थ, फक्त शीण

या मातृसेवनात। या मातृकामकाजी
वाटे मनातकाया। झिजुदे सदैव माझी

परि जोर ना जराही। संकल्पशक्ति नाही
मनिचे मनी तरंग। जाती जिरून पाही

मम जीवनात देवा। येवो वसंतवारा
गळू देत जीर्ण पर्णे। फुटु दे नवा धुमारा

शिरु देत मनात जोम। शिरु दे मतीत तेज
करण्यास मातृसेवा। उठु देच जेवि वीज

खेळो वसंतवात। मज्जीवनी अखंड
करुदेच मातृसेवा। अश्रांत ती उदंड

असु दे सदा मदीय। मुखपुष्प टवटवीत
असु दे सदा मदीय। हृत्कंज घवघवीत

तोंडावरील तेज। आता कधी न लोपो
आपत्ति आदळोत। अथवा कृतांत कोपो

दृष्टीमध्ये असू दे। नव दिव्य ब्रह्मतेज
वाणीतही वसू दे। माझ्या अमोघ आज

पायांमध्ये असू दे। बळ अद्रि वाकवाया
हातामध्ये असू दे। बळ वज्र ते धराया

हसु दे विशंक जीव। पाहून संकटांना
निश्चित जाउ दे रे। तुडवीत कंटकांना

निर्जीव मी मढे रे। पडलो असे हताश
चढु दे कळा मुखाला। करु दे कृती करांस

हातून अल्प तरि ती। सेवा शुभा घडू दे
न मढ्यापरी पडू दे। चंडोलसा उडू दे

चैतन्यसिंधू तू रे। दे दिव्य जीवनास
जरी मृत्यू तो समोर। विलसी मुखी सुहास्य

संजीवनांबुधी तू। संजीवनास देई
दे स्फूर्ति जळजळीत। नैराश्य दूर नेई

तू एक शक्ति माझी। तू एक तारणारा
जे दीन हीन त्यांची। तू हाक ऐकणारा

हतजीव-जीवनांच्या। रोपास कोण पाळी
तू एक वाढविवी। तूचि प्रबुद्ध माळी

हृदयी बसून माझ्या। फुलवी मदीय बाग
मातापिता सखा तू। गुरु तूच सानुराग

फुलतील वाळवंटे। हसतील शुष्क राने
नटतील भू उजाड। गातील पक्षि गाणे

जरि त्वत्कृपा-वसंत। येईल जीवनात
चंडोलसा उडेन। संस्फूर्त गात गात

त्वत्स्पर्श अमृताचा। मजला मृता मिळू दे
मम रोमरोमि रामा। चैतन्य संचारु दे

आता सदा दयेचा। सुटु दे वसंतवारा
फुलु देच जीवनाचा। जगदीश भाग सारा

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३४

## माझे ध्येय

करीन सेवा तव मोलवान। असो अहंकार असा मला न
मदीय आहे बळ अल्प देवा। बळानुरूपा मम घेइ सेवा।।

कधी कुणाचे मजला पुसू दे। जलार्द्र डोळे मग तो हसू दे
अनाथदीनाजवळी वदेन। सुखामृताचे प्रभु शब्द दोन।।

कधी करावा पथ साफ छान। कधी हरावी मयल-मूत्र-घाण
बघून रागार्त करीन घाई। बनेन त्याची निरपेक्ष आई।।

जया न कोणी प्रभु मी तयाचा। तदर्थ हे हात तदर्थ वाचा
तदर्थ हे प्रेमळ नेत्रदीप। सदैव जागा मम तत्समीप।।

कधी कधी मंगल मी लिहीन। कथा नवी वा कविता नवीन
लिहीन मी नाटक वा निबंध। करीन भाषांतर वा सबंध।।

जगात जे जे सुविचारवारे। मदीय भाषेत भरोत सारे
असे सदा वाटतसे मनात। तदर्थ माझे शिणतील हात।।

करीन ज्या ज्या लघुशा कृतीस। तिच्यात ओतीन मदंतरास
समस्तकर्मी हृदयारविंद। फुलेल, पूजीन तये मुकुंद।।

असे प्रभूची कृतिरूप पूजा। असे सदा भाविल जीव माझा
मदंतरीची मिसळून भक्ती। मदीय कर्मी, मिळवीन मुक्ती।।

कुठेही सांदीत जरी पडेन। तिथे फुलाचेपरि मी हसेन
मला समाधान असो तयात। असो तुझे चिंतन ते मनात।।

असो तुझे नाम मदीय वक्त्री। असो तुझे रूप मदीय नेत्री
असो तुझे प्रेम मदन्तरात। भरून राही मम जीवनात।।

◙ ◙ ◙

-नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३

## तुझ्या हातातला

खरोखरी मी न असे कुणी रे। चराचराचा प्रभु तू धनी रे
हले तुझ्यावीण न एक पान। उठे तुझ्यावीण न एक तान।।

त्वदंगणांतील लतेवरील। लहान मी क्षुद्र दरिद्र फूल
तुझ्या कृपेने रस गंध दावो। तुझ्याच सेवेत सुकोन जावो।।

मदीय हा जीवनकुंभ देवा। तसे, उदारा! मधुरे भरावा
करून त्वत्कर्म रिता बनावा। तुझ्याच पायी फुटुनी पडावा।।

फुटे जरी नीट तुम्ही करावा। रिता तरी तो फिरुनी भरावा
रसा समर्पून पुन्हा फुटेल। फुटून आता चरणी पडेल।।

फुटे करा नीट रिता भरावा। असाच हा खेळ सुरू रहावा
तुझ्या न सेवेत कधी दमू दे। अनंत खेळांत सदा रमू दे।।

जणू तुझ्या मी मुरली मुखात। तुझेच गीत प्रकटो जगात
बनेन वेणू तव मी मुखीची। असे असोशी प्रभु एक हीची।।

तुझ्या करांतील बनून पावा। कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा
करावया मूर्त शुभ स्वहेतू। करी मला साधन आपुले तू।।

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, जानेवारी

## रडण्याचे ध्येय

केव्हा मी कृतिवीर होइन, न ते काहीच माते कळे
डोळ्यांतून मदीय नित्य विपुला ही अश्रुधारा गळे

स्वप्ने खेळवितो किती निजमन:सृष्टीत रात्रंदिन
ना येती परि मूर्तीमंत करण्या नाही मला तो गुण॥

या माझ्या हृदया बघा उघडुनी मी ध्येयवादी असे
ध्येयालाच अहर्निश स्मरतसे चित्ती दुजे ना वसे

ध्येये मात्र मदंतरी विलसती, ध्येयेच ती राहती
माझे लोचन अश्रुपूर्ण म्हणुनी खाली सदा पाहती॥

इच्छाशक्ति जया नसे प्रबळ ती जी पर्वता वाकवी
यच्चित्ता लघुही विरोध रडवी नैराश्य ज्या कापवी

त्याला ध्येय असून काय? रडतो निर्विण्ण रात्रंदिन
वाटे ध्येयविहीन कीट असणे, तेही बरे याहुन॥

ध्येये जी धरिली उरी न मम का ती? चित्त त्या का भुले?
देवा! ध्येय मदीय नित्य रडणे हे का असे निर्मिले?॥

◙ ◙ ◙

-अमळनेर, १९२७

## द्विविध अनुभव

भरला हा अंधार। सारा भरला हा अंधार॥
क्रूर पशू हे हिंसक भेसुर
गदारोळ करितात भयंकर
थरथरते भीतिने मदंतर
निरखुनि हे कातार॥ सारा....॥

वाघ गुरगुरे अंगावरती
भुजंग फूत्काराते करिती
विंचू करिती नांगी वरती
नाहि कुणी आधार॥ सारा....॥

डोळे जैसे खदिरांगार
झिंज्या पसरुन भेसुर फार
धावुन येई हा अंगावर
पिशाच्चगण अनिवार॥ सारा....॥

काटे रुतती टुपती दगड
भुजंग विंचू दिसती रगड
मरुन जाइन राहिन ना धड
डोळ्यां लागे धार॥ सारा....॥

भयभीतीने मी गांगरत
शतदा मार्गी मी अडखळत
जखमा होती वाहे रक्त
केला हाहा:कार॥ सारा....॥

पाहुनि दु:खाचा बाजार
माझे झाले मन बेजार
अंगी उरला अल्प न जोर

पडली गात्रे गार॥ सारा....॥

तीक्ष्ण नखांनी फाडफाडुन
दातांनी चावुन कडकडुन
टाकतील मजला खाऊन
करितिल वाटे ठार॥ सारा....॥

झंजावाते जैसे पान
कांपे, तेवी मी बलहीन
प्रभुजी, कोणा जाऊ शरण
वदवे ना मज फार॥ सारा....॥

हे विश्वंभर करुणासागर
हे परमेश्वक परमोदार
शेधित आहे तुझेच दार
तार मला रे तार॥ सारा....॥

सरला घन अंधार। आला प्रकाश अपरंपार॥
प्रभूची मुरली हळुच वाजली
क्षणात सारी सृष्टी बदलली
सुमने पायाखाली फुलली
हरला माझा भार॥ आला....॥

गदारोळ तो सकळ निमाला
प्रकाश आला सत्पथ दिसला
करुणासागर तो गहिवरला
जाइन आता पार॥ आला....॥

अभ्रे येती विलया जाती
फिरुन तारकातती चमकती
तैशी झाली मदंतरस्थिति
उदया ये सुविचार॥ आला....॥

विवेकदंडा करी घेउन
वैराग्याची वहाण घालुन
धैर्ये पुढती पाऊल टाकिन
खाइन मी ना हार॥ आला....॥

डसावया ना धजती सर्प
व्याघ्रवृकांचा हरला दर्प
भीति न उरली मजला अल्प
विलया जात विकार॥ आला....॥

हलके झाले माझे हृदय
मोह पावले समूळ विलय
सदभावाचा झाला उदय
केला जयजयकार॥ आला....॥

मदंतरंगी मंजुळवाणी
वाणी तुमची शुभ कल्याणी
प्रभु! येऊ दे ऐकू निशिदिनी
विनवित वारंवार॥ आला....॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

## हे सुंदरा अनंता!

हे सुंदरा अनंता! लावण्यकेलि-सदना।
कधि भेटशील मजला। कंदर्पकोटी-वदना!

सकलांहि या जिवांच्या। प्रेमार्थ तू भुकेला
चित्ते हरावयाला। सचितोसि रंगलीला

संध्या समीप येता। भरिशी नभांत रंग
तव हृत्स्थ प्रेमसिंधु। त्याचेच ते तरंग

सांजावता नभात। उधळीत रंग येशी
रमवीशि या जिवांना। कर लेशही न घेशी

रमवावयास जीवा। सुखवावयास राया!
निज दिव्य चित्रशाळा। करिशी खुली बघाया

हसवावयास जीवा। शिकवावयास राया!
निज भव्य चित्रशाळा। करिशी खुली बघाया

पिवळे निळे गुलाबी। नारिंगी गौर लाल
संमिश्रणे सुरम्य। करितात जीव लोल

काळे कभिन्न मेघ। करितोस ते सुवर्ण
त्वत्स्पर्श दिव्य होता। राहील काय दैन्य

घालूनिया किरीट। कान्हाच का उभा तो
ऐसा कधी कधी तो। आभास गोड होतो

रक्तोत्पले सुरम्य। फुलली अनंत गंमती
ते हंस कांचनाचे। गमतात तेथ रमती

करिती प्रसन्न चित्त। करिती गंभीर धीर
चित्रे विचित्र बघुनी। हृदयात भावपूर

शोभा नभात भव्य। शोभा नभात नव्य
बघुनी अपार भरती। हृदयात भाव दिव्य

करितोस रंगबदल। राया क्षणाक्षणाला
इकडेहि रंग विविध। चढतात मन्मनाला

करितोस रंगफेर। देशी नवा मुलामा
तू दावतोस गोड। जादू मुलांस आम्हां

मोडूनिया क्षणात। रचिशी नवाकृतीस
बघुनी तुझी चलाखी। किती मोद मन्मतीस

गंभीर होइ चित्त। दुस-या क्षणीच हसते
हसले न जो पुरेसे। तिस-या क्षणीच रडते

येती मनी विचार। ते मृत्यु- जीवनाचे
जणु जीव त्या घडीला। दोल्यावरीच नाचे

होताच वासरान्त। होताच भास्करान्त
जणु पूर वैभवाला। चढतो वरी नभात

येता समीप अंत। जीवासही अनंत
ऐसे मिळेल भाग्य। करु मी किमर्थ खंत?

जणु मृत्यु रम्य दार। त्या जीवना अनंत
सौभाग्यहेतु अस्त। करु मी किमर्थ खंती?

श्रीमंत त्या प्रभूचा। मी पुत्र भाग्यवंत
होऊ सचिंत का मी। करु मी किमर्थ खंत?

ऐसा विचार माझ्या। हृदयात गोड येई
माझी महानिराशा। प्रभुजी पळून जाई

जे रंजले प्रपंची। जे गांजले जगात
रिझवावयास त्यांना। नटतोसि तू नभात

दारिद्र्य दु:ख दैन्य। निंदापमान सर्व

सायंनभा बघोनि। विसरून जाइ जीव

रंगच्छटा अनंत। आकार ते अनंत
करु वर्णना कसा मी। बसतो मुका निवांत

बघतो अनंत शोभा। हृदयी उचंबळोनी
मिटितो मधेच डोळे। येतात ते भरोनि

गालांवरून अश्रू। येतात घळघळोनी
सायंतनीन अर्घ्य। देतो तुला भरोनि

नटतोसि रंगरंगी। तू दिव्य- रूप- सिंधू
तू तात मात गुरु तू। प्रिय तू सखा सुबंधु

राहून गुप्त मार्गे। करितोसी जादुगारी
रचितोसि रंगसृष्टी। प्रभु तू महान चितारी

किती पाहु पाहु पाहु। तृप्ती न रे बघून
शतभावनांनि हृदय। येई उचंबळून

भवदीय दिव्य मूर्ति। केव्हा दिसेल नयनां
भिजवीन आसवांनी। केव्हा त्वदीय चरणां

हे सुंदरा अनंता। लावण्यकेलि-सदना
कधि भेटशील माते। कंदर्पकोटि-वदना।

◘ ◘ ◘
-नाशिक तुरुंग, ऑगस्ट १९३२

## रडायाचा लागलासे देवा एक छंद

अनंत दिधली ही वसुंधरा घर
विशाल अंबराचे वितान सुंदर

चंद्रसूर्य तारे दिले दिवारात्र दीप
वारा दिला प्राणसखा सदैव समीप

निर्झरांचे सागराचे दिलेस संगीत
कितितरी देवा तुझी अम्हांवर प्रीत

हिरव्या हिरव्या तृणाचे दिले गालिचे
सौंदर्याने भरलेले जणु मखमालीचे

हिरव्या गर्द तरुवेली यांची मंदिरे
दिली मनोहर ज्यांत कुणीही शिरे

पाण्याने भरलेले दिलेस सागर
सरित्सरोवर, वपी, झरे मनोहर

फुले, फुलपाखले दिली खेळायास
जिकडे तिकडे लाविलीस चित्रे बघायास

भव्य असे उभे केलेस डोंगर, पहाड
कितितरी पुरविशी बापा आमचे लाड

माता, पिता, बहिण, भाऊ, सखे यांचे प्रेम
दिलेस, देवा! चालविशी नित्य योगक्षेम

देह बुद्धि इंद्रिये हे हृदय देऊन
जगात खेळायाला दिलेस धाडून

आनंदाने ओतप्रोत भरुन दिलेस जग
परि माझ्या हृदयाची सदैव तगमग

तुझ्या सृष्टीमध्ये कोंदे आनंद
परि माझ्या अंतरंगी भरे शोकपूर

सृष्टीमध्ये तुझ्या देवा भरले रे संगीत
परि माझ्या अंतरंगी सदा शोकगीत

देवा! दिले खरे तू परि कर्महीन
मतिमंद भाग्यहीन तव दास दीन

देशी परि घेता यो ना करु काय सांग
शोकांबुधिमधि गेलो बुडुन रे अथांग

हसुन खेळुन जीवन न्यावे जगि या मुदे
कला मला साधेना ती, जीव हा स्फुंदे

घेता ये ना आनंदाचा आस्वाद मी मंद
रडायाचा लागलासे मला एक छंद॥

◘ ◘ ◘
-त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१

## रामवेडा

मला हसता का? हसा हसा सारे। चित्त माझे परि रडे शोकभारे
मनामधिल खुडू केवि मोहमोडा। मला सांगा, मी असे रामवेडा।।

मला झडकार कुणि राम दाखवा रे। तयावीण मला शून्य गमे सारे
कोण उकलिल त्यावीण मोहवेढा। मला सांगा, मी असे रामवेडा।।

मला पत्ता सांगाल काय कोणी। राम राहे तो कोणत्या ठिकाणी
रामसीतेचा कुठे असे जोडा। मला सांगा, मी असे रामवेडा।।

द्याल कोणी का मला वदा राम। द्याल कोणी तो का मुनीजन-
विश्राम
कुणी माझ्या पुरवील काय कोडा। मला सांगा, मी असे रामवेडा।।

उठा सत्वर मज राममूर्ती दावा। जया ध्यावे जो अहोरात्र गावा
मला धरवेना धीर अता थोडा। मला सांगा, मी असे रामवेडा।।

राम कोठे? तव अंतरंगि आहे। राम कोठे? सर्वत्र शोभहाते
नयन वेड्या! उघडून बघे नीट। धीट होऊन घे, ऊठ रामभेट।।

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## आई, दार उघड

किती धडपडलो किती भागलो मी। किती श्रमलो यावया तुझ्या धामी
किती रडलो मी सतत धायिधायी। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

तुझ्या पायांशी देइ आस-याला। नको दूर करु आई वासराला
तुझ्या पायांविण काहि नको पाही। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

मला भिवविति हे वृक व्याघ्र घोर। मला घाबरविति उग्र दुष्ट चोर
खाऊखाऊ करितात धीर नाही। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

थंडिवा-याचा बाळ उभा दारी। सकळ थरथरते अंग बघे भारी
घेइ पोटाशी ऊब मला देई। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

ठेव मजला तू निजवुनी कुशीत। मला अंगाई गाइ गोड गीत
कितिक जन्मावधि झोप मला नाही। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

अमित जन्मांची लागली तहान। कसे तडफडती प्राण हीन दीन
तव प्रेम- पयोधर गोड देई। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

तुला करुणेचा बोलतात सिंधु। मला का देशी एकही न बिंदु
मीच नावडते पोर सांग कायी। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

अनेकांना तू सतत पावलीस। परी मजवरती का ग कावलीस
तुझ्यावीणे आधार अन्य नाही। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

अनेकांना तू देशि साउलीस। का ग माऊली! मजवरी रुसलीस
तुझ्यावीण मला ओस दिशा दाही। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

बाळ दारी रडतसे दीनवाणा। तुला ये ना का आज प्रेमपान्हा
कसे आईचे हृदय कठिण होई। दार उघड अता, आइ! जीव जाई।।
चकोराते तो आइ! असा इंदु! चातकाला तो जेवि नीरबिंदु
तुझे दर्शन मज तसे प्राणदायी। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

बोल माझ्याशी,आइ! एक बोल सुधा- सागरकल्लोळ
तुझा शब्द मला नवप्राणदायी। दार उघड अता,आइ! जीव जाई।।

आइ! गेले हे खोल किती डोळे। तुझ्यासाठी मत्प्राण हे भुकेले
अहर्निश त्वद्विरहग्नि फार दाही। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

पिके पाण्याविण जाति गे सुकून। मुले मातेविण जाति गे झुरुन
तुझ्याविण माझा जीव सुकुन जाई। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

कामधेनू होईल का कठोर। ताप देइल का कधी चंद्रकोर
कशी गंगा होईल तापदायी। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

मातमहिमा ना आज मालवावा। मातृगरिमा ना आइ! घालवावा
ब्रीद सांभाळी ते न लया नेई। दार उघड अता, आइ! जीव जाई।।

आइ! माझी ही शेवटील हाक। आइ! बाहेरी येउनिया टाक
अजुन बाहेरी तू जरी न येशी। तुझ्या पोराचे प्रेत तू पहाशी।।

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, मे १९३३

## देवाजवळ

तुझ्याविणे कोणि न माते वत्सले मला गे
तुझा ध्यास आता आई सर्वदैव लागे
अनाथास नाथ ग कोणी ना कुणीहि पाता
तूच तात माझा, प्रेमस्निग्ध तूचि माता॥

पाप अंतरंगी आहे संचले अनंत
सुचे रुचे काहि न वाटे दिवारात्र खंत
पापपंकमग्न मला तू काय ठेवशील
नसे असे आई! तव गे क्रूर दुष्ट शील॥

परम सदय कोमल माते! ते त्वदंतरंग
त्वत्कृपाबुधीचे येवो मजवरी तरंग
मलिन मानसी मम जे जे सकल ते धुवावे
विमल पुण्यवान आई! लेकरु करावे॥

नको गर्व हेवा दावा लोभ तो नसावा
विषयवासनाकंद मळासकट तो खणावा
नको मान उच्च स्थान प्रभु! नकोच किर्ती
मनी वसो एक सदा ती तुझी मधुर मूर्ती॥

करु काय? संतापविती वासनाविकार
हीन दीन दुबळा मी तो शीण होइ फार
विषयडोहि डुंबे मोदे मन्मनोमतंग
कधी आइ! या वृत्तीचा करिशि सांग भंग॥

मदिंद्रिया सकळा करितो मी तुझ्या अधीन
तूच त्यास आवर मी तो त्वत्पदी सुलीन
तुझ्यावरी घालुन आता सर्व दु:खभार
विसंबून राहिन देवा! तार किंवा मार॥

मला देवदेवा! वाटे सांगण्यास लाज
मान घालुनीया खाली असे उभा आज

जगी घालवोनी देवा! वत्सरांस तीस
काय मेळवीले? काही नाहि! धिक् कृतीस॥
कोप अल्प झाला न कमी, कामवासना ती
अहोरात्र गांजित, चित्ती अल्प नाही शांति
लोभ लुप्त झाला नाही, व्यर्थ सर्व काही
फुकट फुकट सारा गेला जन्म हाय पाहि॥

क्षुद्र- वस्तु- लोभी गेलो गुंतुनी कितीदा
क्षुद्र वस्तु हृदयी धरुनी मानिले प्रमोदा
कला नाहि, विद्या नाहि, शील तेहि नाहि
हाय हाय देवा! स्थिति ही मन्मनास दाही॥

अता तरी देवा! ठेवा हृत्स्थ मोह दूर
आता तरी होवो मन हे विमल धीर वीर
सद्गुणाचि सत्कृत्याची मौत्किके अमोल
जीवनांबुधीत बनू दे रुचिर गोल गोल॥

नसो व्यर्थ, सार्थक होवो, प्रभो! जीवनाचे
फुलो फल जीवनमय हे अता एकदाचे
दिसो रंग रमणीय असे वास दरवळू दे
तुझी कृपा झाली आहे हे मला कळू दे॥

मदाचरण होवो धुतल्या तांदळासमान
पुढे पुढे पाउल पडु दे जाउ दे चढून
तुझी कृपा होई तरि हे सर्व शक्य वाटे
नको अंत पाहू आता, लाव बाळ वाटे

स्नेहमयी माउलि तू गे साउली जिवाची
तूच एक आधार मला आस तू नताची
नको उपेक्षू तू, माते! अश्रु हे पुसावे
मला नीट मार्गावरती आणण्यास धावे॥

तिमिर घोर नैराश्याचा मानसास घेरी
मला येइ मदध:पाता बघुन घोर घोरी
कृपाकौमुगदीचे आता किरण येउ देत
उदासीनता चित्ताची सकळ संहरोत॥

किती मनोरथ मी देवा मनी मांडियेले
भव्य किति ध्येयांना मी मनी खेळवीले
दिसे मला जे जे मोठे तेच तेच व्हावे
असे मनी वाटे, हाती काहिही न व्हावे॥

जसे मुल यात्रेमध्ये खेळणी विलोकी
फुगा घेइ किंवा चिमणी खळखुळाच तो की
असे त्यास होई, कोपे तो पिता तयाचा
काहिही न घेउन देई, बाळ रडत त्याचा॥

तसे जगी बाप्पा देवा! जाहले मदीय
करु हे करु की ते हा निश्चयो न होय
मदुत्साह सतरा कामी विभागून जाई
म्हणुन देवराया! हाती काहिही न येई॥

ग्रंथकार प्रतिभावान् या सत्कवि प्रभावी
राष्ट्रवृत्त- संशोधक- सत्कृति करी करावी
दयावंत व्हावे संत प्रभुपदाब्जरक्त
करुन लोकसेवा किंवा आटवू स्वरक्त॥

अशी किती ध्येये रात्रंदिन मला दिसावी
काहिही न करिता वर्षे व्यर्थ सर्व जावी
उभा रिक्त हस्ते त्वत्सिंहासनासमोर
प्रलज्जित, प्रभुजी! ठरलो मी दिवाळखोर॥

दिली बुद्धि, शक्तिहि, दिधली इंद्रिये समर्थ
दिला देह अव्यंग असा व्हावया कृतार्थ
अल्प सार्थकाहि ना केले, मनोबुद्धिदेह
भ्रष्ट विकल सारी केली, नाशिले स्वगेह॥

वास घेतला रे माझा नित्य वासनांनी
कशी तुझी पूजा कारु मी वासल्या फुलांनी
अता तुझ्या ओतिन पायी कढत अश्रु माझे
प्रभो! असे वदताना हे किति मदंत भाजे॥

दिले भांडवल तू देवा! सत्कृपासमुद्रा !
काहि मी न केले झाली म्लान दीन मुद्रा

पोटि होइ अनुताप परी टिकत अल्प काळ
मोह-मधर-रुपे फसतो फिरुन फिरुन बाळ।।
पुन्हा पुन्हा पापे रचितो येति अश्रू डोळा
नाहि त्यांस किंमत, तू न प्रभुजि! मूढ भोळा
खरे अश्रु अनुतापाचे येति एकदाच
म्हणुन अश्रु माझे हे तो नसति खास साच।।

प्रभो! तुला सारे कळते तुजसि सांगु काय
तार तार तार मदीया तूच थोर माय
नाहि काय माया? ये ना कळवळा तुला गे
तुझा बाळ भागे, घेई लोभुनि वा रागे।।

कधी कधी, आई! वाटे जाउ की मरुन
नाही काहि उपयोग जगी हे जिणे जगून
भूमिभार केवळ झालो कर्महीन कीट
न लागेल आता माझ्या मना वळण नीट।।

पदोपदी घसरत जातो मोहमार्गगामी
कामना अनंता धरितो मी मनात कामी
या न जन्मि मज लाभेल प्रभा पुण्यतेची
अहा अहोरात्र मनाला गोष्ट हीच जाची।।

अहोरात्र झगडत आहे अंतरात, आई !
समर हे न संपेल असे वाटते कदाही
रिपूंजवळ झुंजत आहे एकला सदैव
अता धीर नाही आई! मद्विरुद्ध सर्व।।

नको नको जीवन देवा! नको अता आयु
ज्योत जीवनाची विझवी सरो प्राणवायु
जगा प्रभो! उपयोग असे तरि नरे जगावे
भूमिभार जो कुणि त्याने शीघ्रची मरावे।।

भले जगाचे मी देवा अल्पही न केले
पुण्यवंतजननयनी मी अश्रु आणियले
परस्वांत निष्ठुरतेने नित्य पोळियेले
अन्य जीवनांस कितीदा दु:खदग्ध केले।।

मनी नित्य पापविचारा हसत खेळवीले
कुकर्मात जीवन सारे अहोरात्र नेले
विंचु अंतरंगी डसती शेकडो सदैव
म्हणुन मरण आता हेतू मनी एकमेव॥

पापविस्मृती ना देवा दीवनी पडेल
स्मृतिपिशाच्चगण मानेला सर्वदा धरील
मरुन जाउ दे रे आता दे मला मृतीस
मरण देइ, करितो चरणा साश्रु मी नतीस॥

होय, येति विमलहि माझ्या अंतरी विचार
अल्पकाळ टिकुन परू ते फिरुन जात दूर
जशी वीज लवुनी जाई ध्वांत फिरुन राही
तशी होइ मच्चित्ताची गति सदैव पाही॥

सद्विचार धरण्या जावे तोच जाति दूर
हर्षफुल्ल मद्वदनींचा जाइ गळुन नूर
खिन्नता अपारा पसरे अति निराश वाटे
येति अश्रु नयनी किति हे अंतरंग फाटे॥

त्वत्कृपा न, म्हणुनि न राहे सद्विचार चित्ती
दु:खदैन्यनैराश्याची घेरिते विपत्ती
पदोपदी होणारे हे बघुन मदन्याय
सांग तूच जीवन मग हे मज रुचेल काय॥

असा सरी, देवा! ऐक प्रार्थना विनम्र
हृदय समुन्नत हे होवो विमल शांत शुभ्र
तुझी मूर्ति मधुरा राहो मनि, घडो विकास
पुरव पुरव, देवा! माझी एक हीच आस॥

नयन येति भरुनी वदतो तुजसि कळवळोनी
आत जात आहे, आई! बघ किती जळोनी
नको अंत आता पाहू धाव धाव धाव
सत्पती मला सतत तू हात धरुन लाव॥

अजुन पाप करण्यातचि ना वाटते कृतार्थ
पाप जाहल्यावरि तरि ते नयन आर्द्र होत

अजुन नाश नाही झाला सर्व तोच येई
असे अजुन आशा म्हणुनी शीघ्र येई आई!॥
तुझ्या करी देतो माझी मंद रुग्ण नाडी
असे अजुन धुगधुगि तोची औषधास काढी
रसायना दिव्या देई बाळ हासवावा
निज प्रभो! करुणामहिमा आज दाखवावा॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## जीवननाथ

तृणास देखून हसे कुरंग। मरंदपाने करि गान भृंग
जलांतरंगी करि मीन नाच। तवानुरागी प्रभु मी तसाच।।

दयासुधासिंधु तुम्ही अपार। सुखामृताचे तुम्हि डोह थोर
लहानसा तेथ बनून मीन। विजेपरी चमचम मी करीन।।

मदीय तू जीवननाथ देवा। मला स्वपायांजवळीच ठेवा
तव स्मृति श्वाससमान जीवा। मदीय संजीवन तूच देवा।।

मदीय तू नाथ मदीय कांत। मदीय तू प्राण मदीय स्वांत
मदीय तू सृष्टी मदीय दृष्टी। मदीय तू तुष्टी मदीय पुष्टी।।

जिथे तिथे मी तुजला बघेन। कुदेन नाचेन मुदे उडेन
तुलाच गातील मदीय ओठ। तुझेच ते, ना इतरा वरोत।।

कधी कधी तू लपशी गुलामा। परी तुला मी हुडकीन रामा
तुला लपंडाव रुचे सदैव। गड्या परी तू मम जेवि जीव।।

कधी न जाई बघ दूर आता। तुझ्या वियोगे मज मृत्यु नाथा
प्रिया! तुझे पाय मदीय डोई। बसू असे सतत एक ठायी।।

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, डिसेंबर १९३२

# सुखामृताची मग नित्य धार

कळ्या जळीवीण कशा फुलाव्या। दिशा उषेविण कशा खुलाव्या
उचंबळे इंदुविना न सिंधु। तसाच मी त्वद्विण दीनबंधु।।

कशास चिंता परि ही उगीच। जिथे तिथे माय असे उभीच
जिवा कशाला करितोस खंत। जिथे तिथे हा भरला अनंत।।

अनंत नेत्री तुज माय पाहे। अनंत हाती तुज वेढताहे
जरा तुझे तू उघडी स्वनेत्र। दिसेल सर्वत्र पिता पवित्र।।

जरा जरी ते उघडाल दार। प्रकाश तेथे भरतो अपार
हवा शिरे निर्मळ आत खूप। तसेच आहे प्रभुचे स्वरुप।।

करी न तू बंद निजांतरंग। शिरेल तो अंतरि विश्वरंग
सताड ठेवी उघडून दार। सुखामृताची मग नित्य धार।।

◘ ◘ ◘
-नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३

## तुला देतो मी जमिन ही लिहून

जीवनाच्या ओसाड वाळवंटी। कधी करिशिल कारुण्यमेघवृष्टि
कधी झिमझिम पाऊस पाडिशील। वाळवंटांचे मळे शोभतील॥

जीनाची मम पडित ही जमीन। लागवडिला आणील सांग कोण
मला शक्ति नसे कुशलताहि नाही। जगी कोणाचे साह्य तेहि नाही॥

मशागत कर तू पडित वावराची। मला काही नको सर्व घेइ तूची
तुला जे जे प्रभु मनी आवडेल। पडित भूमित या सकळ ते पिकेल॥

मला मोबदला नको एक दाणा। लागवडिला ही पडित भूमि आणा
तुला देतो ही जमिन मी लिहून। मला काहि नको दावि पीकवून॥

मळे होतिल ओसाड वावराचे। पाहुनिया सुखतील नेत्र साचे
जमिन माझी ही फुकट न रे जावी। तुला करुणा एवढी आज यावी॥
-नाशिक तुरुंग, मे १९३३

## आशा

संपोनीया निशा। उजळते प्रभा
दिनमणी उभा। राहे नभी

लाखो मुक्या कळ्या। त्या तदा हासती
खुलती डुलती। आनंदाने

ऊर्ध्वमुख होती। देव त्या पाहती
गंध धुपारती। ओवाळिती

तैसे माझे मन। येताच प्रकाश
पावेल विकास। अभिनव

तोवरी तोवरी। अंधारी राहिन
दिन हे नेईन। आयुष्याचे

फुलेल जीवन कळी। केव्हा तरी
आशा ही अंतरी। बाळगीतो

◘ ◘ ◘
-अमळनेर, १९२८

# सोन्याचा दिवस

जन्ममरणांची। पाउले टाकीत
येतो मी धावत। भेटावया

पापांचे पर्वत। टाकूनिया दूर
येतो तुझे दार। गाठावया

दिवसेंदिवस। होउनी निर्मळ
चरणकमळ। पाहिन तूझे

पाहुन पायांस। निवतील डोळे
सुखाचे सोहळे। लाभतील

कधी तो सोन्याचा। येईल दिवस
पुरेल ही आस। अंतरीची

◘ ◘ ◘
-नाशिक तुरुंग, ऑगस्ट १९३२

## प्रेम का करावे?

उदास झालो त्या दिवशी। निराश वाटे फार मनी
कष्टी झालो मनात मी। बुडतो वाटे घोर तमी
सभोवती भरे अंधार। दिसे न कोठे आधार
भोजनावरी नसे मन। दुस-यांस्तव परि जाऊन
दोन घास ते कसे तरी। खावून गेलो बाहेरी
होते रडवेले वदन। होते पाणरले नयन
सायंवेळा ती झाली। प्रभा न धरणीवर उरली
प्रभा न उरली हृदयात। शिरते हृदयी घन रात्र
मदीय मृदु हळु हृदयात। वाटे कुणि मज न जगात
प्रेम जयांचेवरि केले। डोळ्यांपुढती ते आले
डोळ्यांपुढती त्या मूर्ती। क्षणात सुंदर अवतरती
तनमन मी ज्या दिधले। समोर सगळे ते आले
यदर्थ डोळे मम रडले। यदर्थ देवा आळविले
ज्यांच्या हितमंगलास्तव। प्रेमे रडला मम जीव
मदीय सुंदर जे काही। जयांस दिधले सदैवही
स्मृती तयांची मदंतरी। आली एकाएकि खरी
असेल का मत्स्मृति त्यांना। येइल जल का तन्नयना
दिसेल का मन्मूर्ति तया। गहिवर येइल का हृदया
विसरलेच ते असतील। उठे असा मन्मनि बोल
मदर्थ ना कुणी रडतील। मदर्थ ना कुणी झुरतील
मला न कोणी स्मरतील। मला न कोणी लिहितील
कशास लिहितिल मी कोण। कोण्या झाडाचे पान
असे जवळ तरि ते काय। केवळ आहे हे हृदय
विशाल बुद्धि न मज काहि। स्वयंप्रज्ञता ती नाही
विद्या नाही कला नसे। अभिमानी जग मला हसे
कशात नाही पारीण। जगात दिसतो मी दीन
धैर्य धडाडी ती नाही। सदैव मागे मी राही
शरीरसौष्ठव ते नाही। घरदार मला ते नाही
पैसा अडका ना एक। जगात केवळ कफल्लक

भव्य भडक जे लखलखित। झगमगीत ते दिपवीत
असे न मजपाशी काही। मत्स्मृति कोणा कशि राही
कुणी स्मरावे का मजला। कुठल्या झाडाचा पाला
परी मी तरी करु काय। आहे केवळ हे हृदय
प्रेम त्यात जे मला मिळे। सदा जगाला ते दिधले
असेच जे ना मजजवळी। द्याया ये ना कधिकाळी
प्रेम मदंतरीचे दिधले। तुच्छ जगा परि ते दिसले
असेल दोषी मत्प्रेम। असेन किंवा मी अधम
प्रेमपूर जे मी दिधले। असेल विष ते त्या गमले
जगात मी तर कमनशिबी। धिक्कारी मज सृष्टी उभी
प्रेम तरी मी का केले। स्वार्थे होते का भरले?
प्रेमाचा तो मोबदला। हवा कशाला तरी मला
प्रेम जगाला दिल्याविना। जगी रहाया मज ये ना
हृदय प्रेमे भरलेले। कळा लागती जरी न दिले
देउ एकदा मी लागे। काहि न ठेवी मग मागे
सर्वस्वा मी अर्पितसे। कोण परी हे जाणतसे
मना! जगाचे पासून। व्यर्थ काय इच्छा करुन
प्रेमाचा तो मोबदला। हवा कशाला बरे तुला
देत सदा रे तू राही। हृदय रिकामे जो होई
विचार ऐसे हळुवार। मनात उडवित कल्लोळ
विचार कोमल मनि भरले। माझे मानस गजबजले
तुडुंब भरला हदंबुधि। अगतिक वाटे मनामधी
पाझरले हो मदंतर। डोळ्यां लागे जलधार
माझे भरलेले हृदय। भरलेले डोळे उभय
भावनोत्कटा मदवृत्ती। गात्रे सगळी थरथरली
तो मार्गाने जात। ‘कुणी न मजला’ हे गात
तोचि पाहिली समोर मी। फुले मनोहर अति नामी
काहि रुपेरी सोनेरी। विमल पाकळ्या एकेरी
परागपुंजासभोवती। सकळ पाकळ्या जपताती
पुंज मधोमध काळासा। नयनाममध्ये बुबुळ जसा
जपति पापण्या बुबुळाला। तेवि पाकळ्या पुंजाला
फुले न प्रेमे भरलेले। मजला गमले ते डोळे

प्रेमाने ओथंबलेली। दृष्टी तयांची ती दिसली
सत्प्रेमाचे भरुन घडे। डोळे लावून जगाकडे
होति उभी ती गोड फुले। लक्ष जगाचे ना गेले
वाट पाहानी दिवसभरी। निराश झाली निजांतरी
दृष्टी जराशी लवलेली। मला फुलांची ती दिसली
उघडे अद्यापी नयन। होते त्यांचे रसपूर्ण
उभा राहिलो तिथे क्षण। हृदय येउनी गहिवरुन
प्रेम द्यावया जगाप्रती। होती उत्सुक फुले किती
प्रेम भरलेली दृष्टी। करिती मजवर ती वृष्टी
प्रेमे भरली मनोहर। प्रेमे न्हाणिति मदंतर
दिवसभर कुणी ना भेटे। आले गेले किति वाटे
मला थांबता पाहून। त्यांचे आले मन भरुन
डोलु लागली मोदाने। बोलु लागली प्रेमाने
होती तोवर फुले मुकी। वदती परि होऊन सुखी
सहानुभूतीचा स्पर्श। उघडी त्यांच्या हृदयास
बोलु लागली मजप्रती। गोड तरी ती गिरा किती
'दिले आमुचे प्रेम तुला। प्रेमतृषार्ता भल्या मुला!
प्रेम द्यावया आम्हि जगतो। देउन आनंदे मरतो
फार अम्हा जरि न सुगंध। आहे त्यातच आनंद
सदा मानितो, जे असते। जवळ, देतसे जगता ते
देण्यासाठी समुत्सुक। देण्यामध्ये खरे सुख
कुणी न भेटले आम्हाला। खंत वाटली चित्ताला
दिवस संपुनी अंधार। पडू लागला बाहेर
भरलेले प्रीतीचे घडे। रिते न झाले कुणापुढे
भरलेले प्रीतीचे घडे। तसेच पडलेत बापुडे
तशात तू आलास। प्रकाश जैसा अंधास
तसे वाटले आम्हाला। मोद मनाला बहु झाला
येऊन येथे रमलास। प्रेमे बघुनी आम्हांस
घे तर सारे प्रेम तुला। प्रेमतृषार्ता भल्या मुला
घे सारे हे प्रेम तुला। प्रेम हवे ना तुला मुला'
असे बोलुनी मज बघती। गोड मनोहर ती हसती
अमृतवृष्टिच जणु करिती। सुकलेल्या हृदयावरती

सुकून गेल्या शेतास। जसा मिळावा पाऊस
तसे झाले मदंतरा। विसरुन गेलो जगा जरा
डोलु लागली फुले मुदे। वा-यावरती आनंदे
येई मदंतरही भरुन। पुढे ओढवुन मम वदन
तयांस धरिले मी भाली। करी तयांना कुरवाळी
धरिले प्रेमे हृदयाशी। प्रेमसिंधु त्या सुमनांसी
पुन्हा बघतसे पुन्हा करी। हृदयी त्यांना घट्ट धरी
अपार भरला आनंद। सकळ पळाला मत्खेद
दाउ कुणा हे रमणीय। दृश्य मनोहर कमनीय
प्रसंग मोठा स्मरणीय। हृदयाल्हादक कवनीय
तया फुलांना मी म्हटले। 'तुम्ही मज किति तरि सुखवीले
विसावा तुम्ही मज दिधला। शोक तुम्ही मम घालविला
मदीय डोळे हासविले। ओले होते जे झाले
मदीय हृदया फुलवीले। होते कोमेजुन गेले
धरितो तुम्हां हृदयाशी। कृतज्ञता मी दावु कशी
तुम्हास काव्यी गुंफीन। कृतज्ञता मी दावीन
वदुनी धरिले हृदयाशी। जाणारे बघती मजसी
मज वेड्याला ते हसले। लज्जेने क्षण मन भरले
फिरुन फुलांना पाहून। फिरुन एकदा हुंगून
फिरुन तया कुरवाळून। फिरुन हृदयाशी धरुन
निघून गेलो तेथून। प्रेमाने ओथंबून
विचार आला मदंतरी। सृष्टिश प्रेम सदा वितरी
मनुज देतसे प्रेमकण। परमेश्वर हे कोटिगुण
सुमन तारका तरु वारि। प्रकाश-रुपे प्रकट हरी
प्रेम देतसे सर्वांते। कळे न वेड्या जीवाते
प्रकाशकिरण प्रेमाचे । भरलेले कर देवाचे
कवटाळाया येतात। मोदप्रेमा देतात
या वा-याच्या रुपाने। प्रभुच येतसे प्रेमाने
अंगा प्रेमे स्पर्श करी। गुणगुण गाणे उच्चारी
नद्या वाहती ज्या भव्य। प्रभुची करुणा ती दिव्य
जिकडे तिकडे प्रेमाचा। पाउस पाडी प्रभु साचा
अनंत देतो प्रेमास। कळे न वेड्या जीवास

प्रभुचे प्रेम न बोलतसे। मुके राहुनी वर्षतसे
प्रेम करो वा न करोत। अनंत हस्ते भगवंत
प्रेम देतसे सकळांला। विचार ह्रदयी मम आला
मला वाटली मग लाज। चित्तामाजी ता सहज
प्रेम अगोदर देवाने। दिले तयास्तव मनुजाने
कृतज्ञ राहुन आजन्म। द्यावे निरपेक्ष प्रेम
भगवंताची ही पूजा। सदा जिवा रे करि माझ्या
यातच सार्थक खरोखर। पुन्हा न मळवी निजांतर
पुन्हा न केव्हा रड आता। प्रेम सर्वदा दे जगता
प्रेम सदा तू देत रहा। प्रेमसिंधु तू होइ पहा
प्रेमसागर प्रभुराज। प्रेम द्यावया ना लाज
जगास द्यावे स्वप्रेम। हाच करी तू निजनेम
जगास निरपेक्ष प्रेम। देणे हा करि निजधर्म
सरोत दुसरे ते धर्म। प्रेमदान हे त्वत्कर्म

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

## प्रार्थना

माझ्या ओठावरि थरथरे प्रार्थना एक हीच
व्हावे माझ्या कधि न भगवन् हातुनी कर्म नीच
श्रद्धा राहो हृदयि असु दे त्वत्स्मृती देवराज!
चिंतेचे ना किमपि मग ते नाथ! केव्हाहि काज

◘◘◘

त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

## प्रसन्नता

पुशी अहंता निज पापमूळ। खराखुरा होउन राहि मूल
जिथे अहंकार जिथे घमेंड। प्रसन्नता तेथ न दावि तोंड॥

समस्तपापस्मृति जै जळेल। गळा पिशाच्चापरी ना बसेल
जणू पुनर्जन्मच मानसाचा। तदा घडे लाभ प्रसन्नतेचा॥

प्रसन्नता स्वस्त न वस्तु बापा। प्रसन्नता मुक्तिच मूर्तरूपा
प्रसन्नता वस्तु न मर्त्यभूची। प्रसन्नता सुंदरता प्रभूची॥

प्रसन्नता बाळ मनोजयाचे। प्रसन्नता बाळ तपोबळाचे
प्रसन्नता संयमन-प्रसूती। प्रसन्नता मंगलपुण्य-मूर्ति॥

सदैव सेवारत शांत दात। त्वदिंद्रिये पाहुन विश्वकांत
तदंगि लोभे फिरवी कराते। प्रसन्नता तै वरिते तयांते॥

सुधारसाचा प्रभुच्या कराचा। जया शुभ स्पर्श घडेल साचा
तदीय ते जीवन होइ नव्य। प्रसन्नता-लाभ तयास दिव्य॥

वसुंधरेच्या हृदयामधून। जसा झरा येत उचंबळून
तसा मनोमोद अनंत आत। प्रसन्नतारूप धरून येत॥

असेल ज्याच्या हृदयी अथांगा। मनोहरा मंगलभावगंगा
तदार्द्रता जी झिरपे कृतीत। प्रसन्नतानाम तिलाच देत॥

अनंत जन्म प्रथम श्रमावे। अनंत जन्मावधि संतपावे
अनंत वेळा पडुनी चढावे। प्रसन्नतेने मग रे नटावे॥

◘ ◘ ◘
-नाशिक तुरुंग, मे १९३३

## प्रकाश केव्हा भवनी भरेल?

मदीय या मानस-मंदिरात। तमोमयी सतत घोर रात्र
कुठे असे दीप? कसा मिळेल?। प्रकाश केव्हा भवनी भरेल?।।

जशी विजेची कळ दाबताच। प्रकाश सर्वत्र करीत नाच
कुठे असे ती कळ मंदिराची। सदैव हे धुंडित हात साची।।

मदीय हे हात दमून गेले। मदीय डोळे बनतात ओले
कधीच का ना कळ सापडेल। असाच का दास सदा रडेल?

तुझा सदा मी करितो पुकारा। पुन्हा पुन्हा दावितसा नकारा
असे प्रभो कोठवरी टिकेल। प्रकाश केव्हा भवनी भरेल?

रवी शशी अंबरी लाविलेस। निज प्रकाशे भरलेस विश्व
मदंतरी ज्योति न लावितोस। दिसे स्मशानासम गेह ओस।।

क्षणी परी येइ मनी विचार। उचंबळे तत्क्षणी मोदपूर
मना मुक्याने प्रभुपाय चेप। प्रकाश येईल पहा अपाप।।

असे विजेची कळ सत्पदांत। पदा धरी तेज भरे घरात
सदैव जो दाबिल पाय त्याचे। घरात नाचे बिजली तयाचे।।

अहा मला त्वत्कळ रे मिळाली। मदीय चिंता सगळी पळाली
अता न सोडीन कधीच पाय। चिर-प्रकाशे तम दूर जाय।।

प्रकाश येता मम मंदिरात। बसेन मी नाचत गीत गात
तव प्रभु! प्रेमसुधा पिऊन। खराखुरा पागल मी बनेन।

नुरेल माझे मज देहभान। न भूक लागेल न वा तहान
सुखाश्रु नेत्रांतुन चालतील। तनूवरी रोम उभारतील।।

**प्रकाश नाचेल अनंतरंग। सुदास नाचेल डुलेल दंग**
**बनेल वेडाच बनेल मत्त। तुझ्यात जाईल मिळून भक्त।।**

**जलात जाती मिळुनी तरंग। सदैव एकत्रच अंग रंग**
**धरून राही सुम नित्य वृंत। तुझ्यात जाईल मिळून भक्त।।**

**प्रकाश येवो सदनात थोर। हो समस्त प्रभु चित्तघोर**
**सदा प्रकाशास्तव मी भुकेला। प्रकाश द्यावा प्रणती पदाला।।**

**◘◘◘**
**-नाशिक तुरुंग, एप्रिल १९३३**

## हृदयाचे बोल

मला तुझ्यावीण कुणी कुणी ना। खरोखरी मी तुजवाण दीन
नसेच आधार मला कुणाचा। मला विसावा पद- सारसाचा।।

सख्या जिवाचा मम आसरा तू। उदार माता मज वासरा तू
गड्या दिलाचा मम दिलरुबा तू। म्हणेन मी संतत एक तू तू।।

मदीय तू बोध मदीय मोद। मदीय चित्ता प्रभु! तू विनोद
मदीय संगीत मदीय गान। त्वमेक रे जीवन मामकीन।।

मदीय तू खान मदीय पान। मदीय तू स्थान मदीय मान
मदीय तू सौख्य मदीय ठेवा। तुझ्याविणे काहि न देवदेवा।।

तुझाच आधार तुझा विसावा। तुझाच हे तात! करीन धावा
तुलाच मारीन सदैव हाका। कृपांबराने निज बाळ झाका।।

तुझ्यावरी सर्व मदीय भार। तुझ्यावरी सर्व सख्या मदार
तुझेच माते जरि बंद दार। मदीय दु:खास न अंत पार।।

तुझ्यावरी सर्व उड्या मदीय। सख्या जरि प्रेम नुरे त्वदीय
तरी न सत्कर्म घडेल हाती। समस्त हे जीवन होइ माती।।

न जीव पंखाविण पाखरास। न आस गायीविण वासरास
पतंग सूत्राविण ना तरंगे। तुझ्याविणे दास तुझा न रंगे।।

न मूल हासे जरि अंबिका ना। चकोर दु:खी जरि चंद्रिका न
वने वसंताविण हासती ना। तुझ्याविण दास तुझा सुदीन।।

सुचे वसेताविण ना पिकाला। सुके जरी पाऊस ना पिकाला
जळाविणे जाइ जळून मीन। सुके तसा दास भवद्विहीन।।

अनाथनाथा! उघडा जगात। दरिद्र दु:खी पडलो पथात
मदीय तू लाज न राखशील। तरी निज ब्रीद गमावशील॥

सख्या अनंता करुणावसंता। तुझ्याविणे कोण कलंकहंता
मदीय मालिन्य धुवावयाते। तुझ्याविणे कोण समर्थ माते॥

करी तुझे मूल धुवून नीट। करी मुलाला शिकवून धीट
तदीय घे हात तुझ्या करोत। पडेल ना तो न घडेल घात॥

असो तुझा हात मदीय माथा। न दूर लोटी मज दीननाथा
मदंतरंगी करुनी निवास। सुवास द्यावा मम जीवनास॥

दिला कशाला नरजन्म माते। जरी न तत्सार्थक होइ हाते
दिली कशाला तनु मानवाची। जरी असे वृत्ति सदा पशूची॥

अमोल मोती मजला दिलेस। धुळीत मी मेळविले तयास
अयोग्य हाती बहुमोल ठेवा। दिला किमर्थ प्रभु देवदेवा॥

अमोल लाभे नरजन्म देवा। परी घडेना तव अल्प सेवा
कशी तुला ही नरजन्ममाती। पहावते? सांग, जयास गाती॥

मलाच ठावी मम वेदना रे। न कल्पना येइल ती परा रे
किमर्थ मी ढाळित आसवांते। तुलाहि माहित नसेल का ते?॥

अनाथ दोषी दुबळा गरीब। सदैवत्याचे रडणे नशीब
न देव ना मानव त्या न कोणी। सदा रडावे तिमिरी बसोनि॥

सकाळ होवो अथवा दुपार। प्रभात किंवा रजनी गंभीर
मला असे एकच काम साचे। अखंडनेत्राश्रुविमोचनाचे॥

रडून रात्रंदिन दोन्हि डोळे। फुटून जावोत बनोत गोळे
तुला नसे भाग्य बघावयाचे। नुरे तरी कामच लोचनांचे॥

परोपरी मी तुज आळवीन। सदैव गीते रचुनी नवीन
तुझी घडो भेट न वा घडो रे। मुळी तुझे गीत तरी असो रे।।

मुखी असो नाम तरी निदान। तयास मी मानिन मन्निधान
न आठवी माय जरी मलास। न बाळ केव्हा विसरेल तीस।।

कितीहि झाले जरि खोडसाळ। तरी उराशी धरि माय बाळ
मदीय माता परि फार मानी। न पुत्रहाका परिसे हि कानी।।

सदैव माता जपती मुलांना। सदैव माद्या जपती पिलांना
जगात माता विसरेल बाळ। तरी जगाचा जवळीच काळ।।

मला न पोटी धरिशील आई। मला न नेत्री बघशील आई
कशास हा जन्म तरी दिलास। मला अहोरात्र रडावयास।।

न आत्महत्या करण्यास वीर। जरी बघाया तुजला अधीर
न रोगही मित्र बनेल पाही। न देव त्याला जगि कोणि नाही।।

रडे रडे सतत तू रडे रे। न जोवरी त्वत्तनु ही पडे रे
रडावयाचाचि तुझा स्वधर्म। रडावयाचे करि नित्य कर्म।।

निराश होतो बनतो भ्रमिष्ट। विनिंदतो व्यक्ति जगद्-गरिष्ठ
समस्त माते हसतात लोक। कुणा कळे आंतर आइ! शोक।।

असाच हा चंचल दुर्विचार। वदून ते हासती सान-थोर
तुझ्या मुलाची करिती टवाळी। मुका बिचारा परि अश्रु ढाळी।।

अनंत आनंद तुझ्या जगात। न मी रडावे कधिही मनात
सदैव देवा मजला हसू दे। कधी उदासीन न रे बसू दे।।

हसे सदा मद्वदनी असावे। मदास्य हे खिन्न कधी नसावे
असे जरी वाटतसे मनात। सदा उभे अश्रुच लोचनात।।

भरुन येती मम नेत्र देवा। मला कळेना मम पापठेवा
मला न तत्कारण ते कळेना। मदश्रुधारा कधिही सरेना।।

वसंत येई पिक गोड गाई। वनस्थली रम्य सजून राही
फुलाफळांना प्रभु ये बहार। मदीय नेत्री परि अश्रुधार।।

शरद ऋतू ये सुखद प्रसन्न। धरा सधान्या सरिता प्रसन्न
प्रसन्न आकाश प्रसन्न तारे। मदीय नेत्री परि अश्रु बा रे।।

विषाद जाऊन विकास येवो। अकर्मता जाउन कर्म येवो
निशा सरोनी हसु दे उषेला। वरो सदा मन्मन जागृतीला।।

सरोनी अंधार उजेड येवो। निबद्ध माझी मति मुक्त होवो
स्वतंत्रतेच्या गगनी उडू दे। विचारनक्षत्रफुले खुडू दे।।

कधी न आता प्रभु मी रडावे। विशंक उत्साहभरे उडावे
स्वपंख आनंदुन फडफडावे। वरीवरी सतत मी चढावे।।

सदैव उत्साह असो मनात। सदैव सेवा असु दे करांत
असो सदा शांति मदंतरात। भरुन राही मम जीवनात।।

अखंड आकर्षुनिया ग्रहांस। सभोवती नाचवि त्या दिनेश
पदांबुजाभोवती इंद्रियांस। धरुनिया लावि फिरावयास।।

प्रदक्षिणा ती तुजला करोत। तव प्रकाशे विमल नटोत
हरेल अंधार सरेल रात्र। तुझ्या प्रसादा बनतील पात्र।।

सुचो रुचो ना तुजवीण काही। जडो सदा जीव तुझ्याच पायी
तुझाच लागो मज एक छंद। मुखात गोविंद हरे मुकुंद।।

तुझाच लागो मज एक नाद। सरोत सारेच वितंडवाद
तुझा असो प्रेमळ एक बंध। मुखात गोविंद हरे मुकुंद॥

अनंत हे अंबर नीलनील। उभे न मागे जरि का असेल
तरी न ताराद्युति ती खुलेल। सुपार्श्वभूमी चढवीत मोल॥

समस्त मागे कृतिच्या मदीय। असो भवन्मूर्ति विलोभनीय
समस्त कर्मे पदकासमान। तुझ्या शुभांगी झळकोत छान॥

शुभकृतीची मम वजयंती। गळा तुझ्या घालिन भूषयन्ती
उरी तुझ्या सुंदर ती रुळेल। बघून त्वन्नेत्रनदी निघेल॥

मनोज्ञपुष्पासम गंधवंत। पवित्र तारांपरि दीप्तिमंत
सुरम्य मोत्यांपरि पाणिदार। असा कधी अर्पिन कर्महार॥

नसे मला ज्ञान खरी न भक्ति। नसे मला योग न ती विरक्ति
नसे तपस्या पदरात जाड। तरी तुझी मी करितोच चाड॥

कधी मदश्रु प्रभुजी पुसाल। कधी निजांकी निजबाळ घ्याल
तुम्हास मी मानित मायबाप। कधी बरे दूर कराल ताप॥

जरी मुलाला ढकलाल आज। जरी न राखाल तदीय लाज
जरी न पाजाल अनंत पान्हा। जगेल ना तो तरि दीन तान्हा॥

◙ ◙ ◙

-नाशिक तुरुंग, मे १९३३

## जीवनार्पण

जीवनसुमना मदीय देवा! त्वच्चरणी वाहिन
दुसरी आणिक इच्छाच न
मकरंद तू घे तूच गंध घे सुंदरता तू बघ
तव सेवेतचि सुकुंदे शुभ
आहे गंध काय तो परी
आहे सुंदरता का तरी
आहे रस तरि का तिळभरी
असो कसेही तुला आवडो, गोड करुन घेउन
सुखवी प्रभुवर माझे मन।।

जर भिकारी जीवन माझे तरि तुज ते अर्पिन
हृदयी धरिशिल ते तोषुन
रित्या जीवना तव हस्ताचा स्पर्श सुधामय घडे
तरि परिपूर्णतेस ते चढे
त्वस्त्मित-किरण जीवनांबरी
पडतील दोनचार ते जरी
तरि ते होइल रे भरजरी
स्वताच ते मग निजांगावरी बसशिल तू घालुन
जाईन देवा मी लाजुन

धृवपाळाच्या मुक्या कपोला शंख लाविला हरी
वेदोच्चारण मग तो करी
मदीय जीवन अरसिक रिक्त प्रभु तू भरिशिल रसे
जरि तुज देइन ते सौरसे
ये, ये, जीवन घे तू मम
मत्करधर्ता ना त्वत्सम
प्रकाश दे मज घेउनि तम
रिता घडा मी तुला देउनी क्षीरांबुधि मिळविन
मज मौत्तिकक परि तुज मृत्कण।।

सख्या अनंता मनोवसंता घे मम जीवनवन
आहे निष्फळ हे भीषण
विचारतरु तू फुलवी फळवी लाव भावनालता
स्फूर्ति-समीरे आंदोलिते

सदगानांचे कूजवि पिक
सत्कर्माचे हासवि शुक
येवो भावभक्तिला पुक
जगी न अन्या फुलवाया ये हे हृन्नंदनवन
फुलवी तूच जगन्मोहन॥

प्रभु तव चरणी जीवनयमुना माझी ही ओतिन
तव शुभ चरण प्रक्षाळिन
त्वत्पद- धूलि स्पर्शायाला यमुना कशि तडफडे
वरवर धडपडुनी ती चढे
वसुदेवाच्या हातातला
पद लांबवुनि तुवा लाविला
आत्मा यमुनेचा तोषला
तुझ्या पदाच्या स्पर्शासाठी देवा मज्जीवन-
यमुना तडफडते निशिदिन॥

तनमन माझे तुला वाढले जीवनपर्णावरी
यावे प्रभुजि आता लौकरी
पांचाळीच्या पानास्तव त्या अधीर झाला कसे
या ह्या दीनास्तवही तसे
पांचाळीच्या पानी चव
मम तममनाहि ती ना लव
तरि करि बाळाचे गौरव
किति विनवू मी किति आळवु मी कंठ येइ दाटुन
यावे धावुन मनमोहन॥

आला आला कृष्णकन्हैय्या राधाधर- लोलुप
प्रिय ज्या भावभक्तिचे तुप
आला आला शबरीची ती खाणारा बोरके
आला तोषणार गोरसे
जीवनपात्र तयाच्या पुढे
केले तनमन वाढुन मुदे
माझी दृष्टि तत्पती जडे
जीवनयमुना गेली तत्पदगंगेमधि मिसळुन
गेला जीव शिवचि होउन॥

◙ ◙ ◙
-नाशिक तुरुंग, मार्च १९३३

# जीवनात माझ्या सदा राम गुंफिन

जीवनात माझ्या सदा राम गुंफिन
सकळ इंद्रियांनी माझ्या राम चुंफिन॥ जीव....॥

सत्यं शिवं सुंदराचे
पूजन मी कारिन साचे
ह्यास्तव मी या जीवाचे
मोल अर्पिन
राम गुंफिन॥ जीव....॥

विमलभाव सरलभाव
मधुरभाव प्रेमभाव
सेवा नि:स्वार्थभाव
त्यात ओतिन
राम गुंफिन॥ जीव....॥

ज्ञान, भक्ति, कर्म तीन
पदर असे दृढ धरुन
श्रद्धेने पीळ भरुन
मोक्ष मिळविन
राम गुंफिन॥ जीव....॥

◙ ◙ ◙

-धुळे तुरुंग, मे १९३२

## तुजसाठि जीव हा उरला

कारुण्यवसंता रामा। तुजसाठि जीव हा उरला।।
या जगात तुजविण कोणी। नाहीच खरोखर रामा
तू हृदयी असुनी देवा। का चित्त भुलतसे कामा
तुज सदैव हृदयी धरुनी। तव गोड गाउ दे नामा
तुज सदैव मी आळविन
तुज सदैव मी आठविन
तू जीवन मी तर मीन
तुजविण जीव घाबरला।। तुजसाठि....।।

हृदयात जरी तू नसशी। मी अनंत मोही पडतो
तुजलगी विसरुन रामा। शतवार पडुन मी रडतो
तू नको कधीही जाऊ। हृदयातुन तुज विनवीतो
जरि मूल चुकुन दुर जाई
वापीत पडाया पाही
धरि धावत येउन आई
रघुवीर तेंवि धरि मजला।। तुजसाठि....।।

जरि इतर वस्तु हृदयाशी। निशिदिन मी प्रभुवर धरितो
हृदयाच्या आतिल भागी। तुजशीच हितगुज करितो
एकांती बनुनी रामा। तुजला मी स्मरुनी रडतो
तव चरण मनि येवोनी
तव मूर्ति मनी येवोनी
येतात नेत्र हे भरुनी
कितिकदा कंठ गहिवरला।। तुजसाठि....।।

बसुनिया रघुवरा दोघे। करु गोष्टी एको ठायी
ठेवीन भाळ मम देवा। रमणीय तुझ्या रे पायी
प्रेमांबुधि गंभिर तेव्हा। हेलावुन येइल हृदयी
मन तुझ्याच पायी जडु दे

तनु तुझ्याच पायी पडु दे
मति तुझ्याच ठायी बुडु दे
तुजवीण गति दुजी न मला॥ तुजसाठि....॥

एकची आस मम रामा। तू ठेव शिरी मम हात
होईन पावनांतर मी। मंगल तूच मम तात
त्वत्पर्श सुधामय होता। संपेल मोहमय रात्र
कधि मोह न मग शिवतील
पापादि दूर पळतील
भेदादि भाव गळतील
सेवीन सदा पदकमला॥ तुजसाठि....॥

जे आवडते तुज देवा। ते करोत माझे हात
जे आवडती तुज देवा। ते शब्द ओठ बोलोत
जे आवडती तुज देवा। ते विचार मनि नांदोत
तनमनमती तुज अर्पीन
सेवेत सतत राबेन
जाईन त्वत्पदी मिळुन
ही इच्छा पुरवी विमला॥ तुजसाठि....॥

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, एप्रिल १९३३

## करुणाष्टक

अहा चित्त जाई सदा हे जळूनl मला दु:ख भारी, श्रमे मी रडून
पुशी कोण नेत्रांतली अश्रुधारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

वनी निर्जनी दीप जेवी दिसावाl दिसोनी झणि तोहि वाते विझावा
तसा येउनी जातसे सद्विचारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

मला षड्रिपू भाजिती गांजितातीl मला वासना सर्वदा नागवीती
तुझ्या भक्तिची वाजू दे एकतारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

मदीयांतरी दिव्य पावित्र्य साजोl तया पाहुनी सर्वही पाप लाजो
असो मन्मती सन्मतीचे अगारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

असज्जीवने मी अहोरात्र खिन्नl न ये नीज माते, रुचे ते न अन्न
मदीयांतरंगावरी घोर भारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

तुझा एक आधार ना अन्य मातेl तुझा बाळ सांभाळ हे विश्वमाते
मला कष्टवीतात नाना विकारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

तुझा एक विश्वास विश्वा समस्तl असत्कल्पनांचा करी शीघ्र अस्त
कृपेने मनाचा हरी अंधकारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

दिसो प्रेमळा निर्मळा वृत्ती नेत्रीl वसो पुण्यता माझिया नित्य वक्त्रीं
मनी नित्य नांदोत ते सद्विचारl प्रभो दीन दासा तुझ्या तार तारll

तुझे फूल मी होउ दे सद्विकासl तुझे मूल माते तुझी एक आस
किती प्रार्थु मी सांगु मी काय फारl प्रभो दीन दासा तुझ्या तार
तारll

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, १९३०

## जीवनबाग

(नाचत म्हणावयाचे गाणे)

प्रभु माझी जीवनबाग सजव॥

कुशल तू माळी
बाग सांभाळी
स्वर्गीय सौंदर्ये ती रे खुलव॥ प्रभु....॥

गत काळातिल
सगळा खळमळ
भरपूर येथे खताला सडव॥ प्रभु....॥

द्वेष मत्सर
हेची फत्तर
फोडुन, प्रेमाचे वृक्ष फुलव॥ प्रभु....॥

मोह विकार
बाग खाणार
वैराग्य-दंडाने त्यांना घालव॥ प्रभु....॥

तव करुणेचा
मंगलतेचा
शिवतम वसंतवारा वाहव॥ प्रभु....॥

दृढ श्रद्धेचे
सद्भक्तीचे
सुंदर मांदार येथे डुलव॥ प्रभु....॥

उत्साहाची
आनंदाची

थुइथुई कारंजी येथे उडव॥ प्रभु....॥
धृताचे अभिनव
घालुन मांडव
त्यावर शांतीचे वेल चढव॥ प्रभु....॥

चारित्र्याचे
पावित्र्याचे
शीतल शांतसे कुंज घडव॥ प्रभु....॥

सत्प्रतिभेचे
सतज्ञानाचे
गुंगूगुंगू मिलिंद गुंगव॥ प्रभु....॥

सहजपणाचे
सतस्फूर्तीचे
करु देत विहंगम गोड रव॥ प्रभु....॥

परमैक्याचा
झोला साचा
बांधुन त्यावर जीव झुलव॥ प्रभु....॥

फुलवुन जीवन
तेथे निवसुन
मग गोड गोड तू वेणू वाजव॥ प्रभु....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, मे १९३४

## भाग्याचे अश्रु

अनुताप- आसवांनी। कासार मानसाचे
भरते तुडुंब तेव्हा। ती भक्तिवेल नाचे
त्या भक्तिवेलावरती। चित्पद्म ते फुलेल
येऊनिया मुकुंद। मग त्यात तो बसेल
रड तू सदैव बाळा। भरु दे तुडुंब हृदय
येईल भक्ति मग ती। होईल सच्चिदुदय
ते भाग्यवंत अश्रु। जवळी तुझ्या विपूल
हसशील लौकरीच। जरि आज तू मलूल

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, मार्च १९३२

## तळमळतो रे तुझा तान्हा

तळमळतो रे तुझा तान्हा॥
कामधेनु तू माझी देवा
चोरु नको रे अता पान्हा। तळमळतो....॥

धन कृपणाला जल मीनाला
तेवि मला तू सख्या कान्ह्या। तळमळतो....॥

गोकुळि गोरस सकळां दिधला
प्रभुजि अजी ते मनी आणा। तळमळतो....॥

अजुन दया जरि तू ना करिशिल
ठेवु कशाला तरि प्राणा। तळमळतो....॥

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, ऑगस्ट १९३२

## निर्वाणीचे सांगणे

नाशी मोह प्रभुजि अथवा प्राण घेऊन जाई
नेई देह त्वरित अथवा ही अहंता हरावी
माझे चित्त स्थिर करि न वा थांबव श्वास देवा
पाशां तोडी सकळ, धरवे धीर ना, मृत्यु देवा।।

आनंदाने हृदयि धरु का बदबुदांचे पसारे?
मृत्युंजा का परम- रतिने पूजु सोडून तारे?
पीयूषाची प्रभुजि मजला लागलीसे पिपासा
कांजी लावू कशि मग मुखा? सिद्ध मी सर्वनाशा।।

माते प्रेमामृतजलनिधे मंगले हे उदारे
दृश्यादृश्या सृजिशि सगळे हे तुझे खेळ सारे
मच्चित्तांतर्गत तम हरी, दे प्रकाशांशु एक
आहे मी क्षुद्रिकल बहुता जन्मिचा काहि फेक।।

मच्चित्ती जी सतत उठती वादळे शांत व्हावी
विध्वंसावी मम मदगृहे सर्व आसक्ति जावी
येवो चित्ती स्मरण न कधी कामिनीकांचनांचे
माते! हे दे मजसि, अथवा प्राण फेकीन साचे।।

त्वत्कारुण्यांबुधिमधिल ना बिंदू लाभे जरासा
माते! माते जरि, तरि गळ्यालागि लावीन फासा
आई होशी कृपण कशि तू बाळ जाई सुकून
त्वत्कारुण्ये जलद भरले पाठवी बिंदु दोन।।

विश्वाधारे। अगतिक तुला बाळ हा हाक मारी
दारी आला सहृदये! तारि वा त्यास मारी
हे प्रेमाब्धे! परमकरुणालंकृते! हे अनंते!
दे आधारा मज न रडवी वत्सले! स्नेहमृत!।।

◘ ◘ ◘
त्रिचनापल्ली तुरुंग, फेब्रुवारी १९३१

# कधि येशिल हृदयि रघुराया

**कधि येशिल हृदयि रघुराया
कधि करुणेची करिशिल छाया॥ हृदयि....॥**

**मोह न मजला मळि आवरती
अगतिक मी अति
पडतो पाया॥ हृदयि....॥**

**बहुमोलाचे हे मम जीवन
हे करुणाधन
जाई वाया॥ हृदयि....॥**

**होइल सदया जरि व दया तव
ठेवु कशास्तव
तरि मम काया॥ हृदयि....॥**

**◘ ◘ ◘
-नाशिक तुरुंग, सप्टेंबर १९३२**

## का मजला देता प्रेम?

मम हातांनी काहि न होइल काम
का मजला देता प्रेम?
मी वांझ असे, कसलि न राखा आस
ती आशा होइल खाक
जगि दु:ख नसे आशा-भंगासारे
ते प्रेम म्हणुनि ना द्या रे
प्रेमाला लायक नाही
करुणेला लायक नाही
साहाय्या लायक नाही
तुम्हि सोडुन द्या माझे सकळहि नाद
का बसता घालित वाद॥

तो प्रेमाचा पाउस मजवर होई
परि दु:ख हेच मज दाही
त्या प्रेमाला लायक मुळि नसताना
का देती मजसि कळेना
ते जो जो हे दाखवितात प्रेम
हृदयात भकता किति शरम
मी काय तयांना देऊ
मी काय तयांना दावू
मी काय तत्पदी वाहू
मद्दैन्याने डोळे ओले माझे
हृदयावर दुर्धर ओझे॥

मज्जीवन हे निष्फळ दीन दरिद्र
गतसार अतीव क्षुद्र
किति सांगु तुम्हां अश्रु न दिसती काय
ती ऐकु व ये का हाय
मम सुसकारे कानि न का ते पडले

दिसती का न डोळे भरले
जा सकळ तुम्हि माघारे
मजकडे न कुणिहि बघा रे
तुम्हि थोर कर्मकर सारे
परि मी न असे, मी न करितसे काही
मरतो ना म्हणुनी राही।।

त्या दगडाला काय घालुनी पाणी
येईल कधी ना फुलुनी
त्या मेलेल्या खोडा घालुन पाणी
येईल काय भरभरुनी
मृत देहाला अर्पुन वस्त्रे अन्ने
तो उठेल का चैतन्ये
हे व्यर्थ सर्व सायास
हा अनाठायि हो त्रास
येतील कधि न कामास
तो बंधूंनो विकाससंभव जेथे
अर्पिजे सकलही तेथे।।

मी जगती या कर्मशून्य हत जीव
का करिता माझी कीव
ना कधि काळी अंकुर मज फुटतील
ना फुलेफळे धरतील
ना छायाही देइल जीवन माझे
वदताना मन्मन भाजे
का उगाच येता प्रेम
मी निराश निष्क्रिय अधम
मी मत हत निपतित परम
का लाजविता प्रेम समर्पुन माते
हे प्रेम जाळि हृदयाते।।

ते प्रेमाचे तुमचे सदलंकार
परि मजला मारक गरल
ती प्रेमाने अर्पितसा जी मदत
मज सदैव ती रडवीत
मी प्रेम कशाला घेऊ
जगतास काय मी देऊ
मी मदत कशाला घेऊ
मी घेत असे देउन शके काही
हा विचार हृदया दाही॥

मी तुम्हाला काय देउ परतून
मी काय देउ हो खूण
मी जगताच्या पासुन घेतो भारी
परि अजुनी रडत भिकारी
मज घालाया येईना हो भर ती
म्हणुनी हे लोचन रडती
मज किती मरावे वाटे
ते भवत्प्रेम मज काटे
मति दाटे अंतर फाटे
हा पोळितसे विचार माझ्या हृदया
म्हणुनि ना प्रेम द्या न दया॥

मजपासोनी अपेक्षा तुम्हां असती
प्रेमाची म्हणुनी वृष्टि
हा उपयोगा येइल तुम्हां वाटे
प्रेमाचे म्हणुनी नाते
मज निर्लोभी पवित्र पावन गणुनी
देतसा प्रेम आणोनी
परि तुम्हां सांगतो सत्य
करु नका अपेक्षा व्यर्थ
मी हताश दुर्बळ पतित
हा उपयोगी नाही, येइल दिसुनी

मग जाल सकलही फसुनी॥

ते पुत्राला मायबाप वाढविती
करितात किती ते प्रीती
मनि आशा की होइल मोठा पुत्र
वार्धक्यी देइल हात
हा येइल की पुत्र आमुच्या कामा
मनि इच्छुन देती प्रेमा
जरि उनाड मुलगा झाला
किति दु:ख आईबापाला
केवढा ढका आशेला
त्या हृदयीच्या खेळविलेल्या आशा
जातात सर्वही नाशा॥

तुम्हि काहिच का अपेक्षा न ठेवून
देतसा प्रेम आणून
तुम्हि काहिच का आशा ना राखून
देतसा प्रेम वाढून
मजवरि तुमचे प्रेम सदा जे दिसते
निरपेक्ष काय ते असते
प्रेमास न का फलवास
प्रेमा न कसलि का आस
जे देत असा तुम्हि द्यास
ते निरपेक्ष प्रेम असे जरि जवळ
मज त्याचा द्यावा कवळ॥

मज गंध नसे रंग नसे ना शुभ्रता
पावित्र्य नसे ना मधता
मी दुर्गंधे भरलेले हे फूल
ते विषमय फळ लागेल
या सगळ्याला असाल जरि का सिद्ध
तरि करा प्रीतिने बद्ध

होवो न निराशा तुमची
मागून थोर ह्रदयाची
म्हणुन ही कथा मम साची
मी सांगतसे तुमच्या चरणांपाशी
आणून अश्रू नयनांसी॥

जो पाप्याला ह्रदयापाशी धरिल
प्रेमाने त्या न्हाणील
ज्यापासोनी इवलिहि नाही आस
जो त्यासहि दे प्रेमास
ते प्रेम असे दुर्मिळ दुर्मिळ जगती
या भुवनि नसे तत्प्राप्ति
प्रेमाच्या पाठीमागे
आशांचे असती लागे
ते प्रेम हेतुने जागे
मग रडती की प्रेम व्यर्थची केले
ते सारे मातित गेले॥

कधि केलेले प्रेम न जाई व्यर्थ
ज्याला ही श्रद्धा सत्य
तो पडलेला पर्जन्याचा थेंब
कधि तरि वरि आणिल कोंब
तो टाकीचा पडलेला जो घाव
दगडास करीलचि देव
ही आशा जरि हो अमरा
ते प्रेम तरिच तुम्हि वितरा
ना सोडा कधिही धीरा
मम जीवन हे फुलेल शतजन्मांनी
हे ठेवुनि मनि द्या पाणी॥

◘ ◘ ◘

-पुणे, जानेवारी १९३५

## अश्रु

नको माझे अश्रु
हाचि थोर ठेवा
बाकी सारे नेई
परी हे लोचन
माझे रुप मज
हेचि तातमात
अश्रू माझे थोर
अश्रू कल्पतरु
अश्रू माझे मला
अश्रू भेटवतिल

अश्रू माझा जीव
देवा त्याच्यावीण
अश्रू वाचवीविती
माझा फुलवीती
अश्रुच्या बिंदुत
नको तो गोविंदु
सगळे हे जग
सखा माझा परी
अश्रुस पूजीन
मनी साठवून

कधी नेऊ देवा
माझा एक
धन, सुख, मान
राखी ओले
अश्रू दावितात
प्राणदाते
ज्ञानदाते गुरुवार
माझे खरे
गोड हासवतिल
माझे ध्येय

अश्रु माझा प्राण

न जगेन
अश्रू हासवीती
जीवनतरु
माझा सुखसिंधु
नेऊ कधी
तिरस्कार करी
अश्रु एक
अश्रुस ठेवीन
अहोरात्र

इवलासा अश्रु
जीवाला चढवी
इवलासा अश्रु
पाषाणाचे करी
इवलासा अश्रु
निर्मीत अवीट
इवलासा अश्रु
अमित पिकती
इवलासा अश्रु
कोट्यावधि गोष्टी
इवलासा अश्रु
देवी सरस्वती

इवलासा अश्रु
संसारी महोच्च
इवलासा तारा
परी तो मोजून
बाळकृष्णाचे ते
यशोदा ब्रह्मांड
इवलीशी मूर्ति
परी त्रैलोक्याची
इवलेसे पान
स्वामी तृप्त होत
इवलेसे पान
लीलेने तुळीत
इवलासा अश्रु
सारे त्यात राहे

पर्वत बुडवी
मोक्षपदी
परी वज्रा चुरी
नवनीत
खारट आंबट
सुधासिंधु
ओलावा तो किती
माझे मळे
परी त्याच्या पोटी
साठलेल्या
परी बोले किती
तेथे मूक

नका मानू तुच्छ
स्थान त्याचे
दिसतो दुरुन
कोण येई?
इवलेसे तोंड
देखे त्यात
बटु वामनाची
केली मिती
पांचाळी अर्पित
ब्रह्मांडाचा
रुक्मिणी ठेवीत
विश्वंभरा
तसा माझा आहे
भाग्य माझे

इवलासा अश्रु
करीतसे तूर्ण
इवलासा अश्रु
जीवनग्रंथाला
इवलासा अश्रु
वियोग तो नसो
इवलासा अश्रु
तोवरी सकळ

अश्रु माझी आशा
अश्रु हा निर्मळ
अश्रु हा लहान
अश्रू नारायण
पोटात ठेवीन
मी ना विसंबेन

अपूर्णाला पूर्ण
सांगू काय
पूर्ण विरामाला
गोड देई
माझा मज असो
त्याचा कधी
जो माझ्याजवळ
भाग्य माझे

अश्रु माझे बाळ
जवळ असो
अश्रु हा महान
आहे माझा
डोळ्यांत ठेवीन
त्याला कधी
◙ ◙ ◙
-नाशिक तुरुंग, मार्च १९३३

## माझा देव

‘जग हे मंगल
म्हणे मदंतर
‘देव तो दयाळ
म्हणे मदंतर
येताच निराशा
चित्त हे अशांत
जरा येता चिंता
अशांत मानस
‘लहरी हा देव
जीवन भेसूर’
‘जग हे वाईट
असे म्हणे मनी
श्रद्धा जी ठेविली
क्षणात ती जात
निराशेत आहे
निराशा ही लोटी

जग हे सुंदर’
आशेमाजी
देव परमोदार’
आशेमाजी
जरा जीवनात
परी होई
जरा होता त्रास
माझे होई
कठोर निष्ठुर
म्हणू लागे
अमांगल्य-खनी’
संतापोनी
होती अंतरात
मरोनिया
सद्गुण-कसोटी
दुर्मार्गात

श्रद्धेचा चंद्रमा
हृदयाकाशात
दु:ख-संकटात
गोड जो हासत
ईश्वराची कृपा
जीवन पवित्र
सदा श्रद्धावंत
सदा सेवारत
मंगलाच्यावर
सुखाची हा सृष्टी
अवघाची संसार
मनी हे ठेवून
तोची माझा देव
हृदयाची ठेवीन

निराशानिशेत
शोभे ज्याच्या
घोर विपत्तीत
तोची धन्य
पाही जो सर्वत्र
त्याचे धन्य
सदा आशावंत
धन्य तोची
सदा ठेवी दृष्टी
करु पाहे
सुखाचा करीन
झटे सदा
त्याला मी पूजीन
भक्तिप्रेमे

◘ ◘ ◘
-अमळनेर, ऑगस्ट १९३४

## प्रभु मम हृदयि आज येणार!

प्रभु मम हृदयि आज येणार!
मम जीवन-मरुभूमीत अता शत पाझर फुटणार
परम शांतिचे परम सुखाचे अमित मळे पिकणार।। प्रभु....।।

मुक्या बिचा-या जीवपिकाला कंठ आज फुटणार
हृदयमंदिरी नवगीतांचा मधुरध्वनि उठणार।। प्रभु....।।

प्रभु- करुणेचा वसंतवारा जीवनवनि सुटणार
वठलेल्या मत्सदवृत्तींना नव अंकुर फुटणार।। प्रभु....।।

मालिन्याची कार्पण्याची मग वस्त्रे गळणार
पोषाख मला नवतेजाचा नवरंगी मिळणार।। प्रभु....।।

भ्रम मम जातिल संशय शंका आज सकल फिटणार
शतजन्मांची चिरचिर माझी कायमची मिटणार।। प्रभु....।।

सकल बंधने आज तटातट तुटुन धुळित पडणार
मन्नयनांतुन भावभक्तिची गंगा घळघळणार।। प्रभु....।।

म्लान असा मद्वदनचंद्रमा सकल आज खुलणार
सुकलेले मम बागबगीचे सहज सरस फुलणार।। प्रभु....।।

कुविचारांचे धुके सकल ते आज उडुन जाणार
हृदयमंदिरी चित्सूर्य अता चिर मंगल जळणार।। प्रभु....।।

जीवात्माचे शतजन्माचे ग्रहण आज सुटणार
चिदंबरी मज उंच उडाया पंख दिव्य फुटणार।। प्रभु....।।

दैन्य दुराशा निराशा सकल आज हटणार

**अभिनव- मंगल- मधुर- मनोहर तेजे मी नटणार।। प्रभु....।।**

**अमित युगांची येरझार मम आज सकल खुटणार**
**परमैक्याच्या परमानंदा अगणित मी लुटणार।। प्रभु....।।**

**परमैक्याच्या झोल्यावरती प्रभुसह मी झुलणार**
**प्रेमसमाधी लागुन माझी परममुदे डुलणार।। प्रभु....।।**

**शब्द अंबरी तडित अंबुदी प्रभा रवित शिरणार**
**तरंग अंभोधीत तसा मज्जीव शिवी मिळणार।। प्रभु....।।**

◙ ◙ ◙
**-नाशिक तुरुंग, ऑक्टोबर १९३२**

## फुलाची आत्मकथा

फुलापरी या जगात सुंदर एक हासरे मुल
दुसरे सज्जनमन कोमल
फुलापरी साजिरे गोजिरे तिसरे तारक वरी
चौथे स्मित सतिवदनावरी
इतुकी पवित्रता कोठली
इतुकी सुंदरता कोठली
इतुकी परिमलता कोठली
निष्पाप अशी फुले शोभती पवित्र आत्म्यापरी
पसरिति मोद धरित्रीवरी।।

फुला पाहुनी सदैव माझे जळते पापी मन
भरती पाण्याने लोचन
स्पर्श कराया धैर्य नसे मज थरथरती मत्कर
लज्जित मेल्यापरि अंतर
माझा स्पर्श विषारी असे
माझी दृष्टी विषारी असे
लावू हात फुलाला कसे
मलिन होउनी जाइल जळुनी हात लागला तरी
ऐसे वाटे मज अंतरी।।

एके दिवशी प्रात:काळी माझ्या मार्गावर
फुलले होते सुम सुंदर
दंवबिंदूंनी न्हाले होते मधुर गंध दरवळे
रविने शतकिरणी चुंबिले
माझी दृष्टि तयावर बसे
वाटे पुढे न जावे असे
पाहुन मज सुम जणु ते हसे
गंगायमुना मन्नयनांतुन आल्या गालांवरी
लज्जा भरली माझ्या उरी।।

फुला पाहुनी मदीय हृदयी विचार शत उसळती
थरथर मदगात्रे कापती
मज्जीवन मज दिसे दिसे ते फूलहि दृष्टीपुढे
भेसुर विरोध आणी रडे

मत्कर सुमना मी जोडिले
खाली निज शिर मी नमविले
भक्तिप्रेमे मग विनविले
'सुंदर सुमना! सखा, सदगुरु, परब्रह्म तू मम
माझा दूर करी हृत्तम॥

तुला कशाने अशी लाभली सुंदर जीवनकळा
सांगे मजला तू निर्मळा
लहानशा या तुझ्या जीवनी इतुकी निर्दोषता
आली कोठुन वद तत्त्वता
आचरलासी तप कोणते
केले अखंड जप कोणते
सांग स्वकीय जीवनकथे
त्वदीय जीवनरहस्य मजला कळेल बापा जरी
जाइन मीहि तरोनी तरी'॥

बहुत दिसांनी मूल आइला पाडस वा गायिला
भेटे, तैसे होइ फुला
पुलकित झाले, डोलु लागले, प्रेमे वदले मला
"ये ये जवळी माझ्या मुला!
माझा हृदयसिंधु हा अता
करितो तुझ्यापुढे मी रिता
परिसावी मज्जीवन-कथा"
तद्वच ऐकुन कर जोडुन मी स्थिर झालो अंतरी
बोले सुमन बानरीपरी॥

"होतो प्रभुच्या पायांपाशी सदैव मी अंबरी
त्याची कृपा सदा मजवरी
सूर्याच्या सोनेरी करावर बसुनी एके दिनी
आलो प्रभुपद मी सोडुनी
पृथ्वी पाहू आहे कशी
ऐसा मोह धरुन मानसी
सोडुनी आलो मी स्वामिसी
झरझर सरसर नाचत नाचत रविकिरणांचेवरी
उतरु लागे धरणीवरी॥

खाली खाली जो जो बाळा! येऊ लागलो
तो तो अंध होउ लागलो
विकास गेला, सुगंध सरला, सुंदरता संपली
शंपाहपशी तनु कंपली
तारा अस्मानातुन तुटे
त्याचे तेज उरते का कुठे?
माझा धीर सकळही सुटे
दयासुंदरा वसुंधरेने निजकर केले वरी
झेलुन ठेवी पर्णांतरी॥

अंध जाहलो, बंधी पडलो, अंधार सभोवती
न कळे काय असे मदगती
हाय! हाय! मज मोह कशाला शिवला बोलुन असे
रात्रंदिन मी किति रडतसे
बोले मनात तुज कुणितरी,
'आता रडुन काय रे परी
तप तू थोर अता आचरी
प्रभुचरणच्युत फुला! विकसास्तव तप तू आदरी
त्याविण गति ना या भूवरी'॥

अश्रु पुसुन मग गंभीर असा निश्चय केला मनी
झालो ध्यानस्थ जसा मुनी
दिव्य असे प्रभुचरण अंतरी दृष्टिपुढे आणुन
गेलो ध्यानमग्न होउन
सगळी बाह्य सृष्टी विसरत
केवळ चिंतनात रंगत
जणु मी प्रभुसिंधुत डुंबत
अशा प्रकारे मुला! तपस्यासमारंभ मी करी
करुनी रडगाणे निज दुरी॥

कधी कधी गज किरणी भास्कर भाजुन तो काढित
कधि ती थंडी गारठवित
मारुन मारुन गाल कोवळे लाल करित मारत
पाउस कधि भिजवुन रडवित
दु:खे हीची हासवतिल
रविकर हेची रंगवतिल
वारे हेची डोलवतिल

प्रभुप्रसादे थबथबलेले दु:ख दु:ख ते वरी
धरिला धीर असा अंतरी॥

जशी तपस्या वाढु लागली विकासही वाढला
तप सद्विकासजननी, मुला!
मंद मधुरसा गंध मदंगी लागे रे यावया
लागे लावण्य फुलावया
वारे देती कधि बातमी
'सतत बसशिल न असा तमी
वेळ तुझा तू मोदे क्रमी'
तिकडे माझे लक्षच नव्हते, ध्यास एक अंतरी
होवो स्वीय तपस्या पुरी॥
किति दिन रात्री ऐशा नेल्या ध्यानरसी रंगुन
मजला काळाचे भान न
तपस्या करी, आपोआप प्रकटेल विकास तो;
फसतो जो ना विश्वासतो
श्रद्धा अमर असावी मनी
आशा अमर असावी मनी
श्रद्धा जीवन- संजीवनी
श्रद्धा, बाळा! जिवा नाचवी चमत्कारसागरी
देई मौक्तिक अंती करी॥

घाली प्रिय भूमाय सदोदित माझ्या वदनी रस
मज मत्तपस्येत सौरस
सुंदर मज निज पर्णांचा ती आश्रम दे बांधुन
गेलो ध्यानी मी रंगुन
माझी तहानभूकच हरे
माझे भानच मजला नुरे
चिंतन एक मात्र ते उरे
सौंदर्याच्या महान सागरी तन्मय झालो जणू
माझा अहं न उरला अणु॥

सुगंध मग तो भरुन राहिला सा-या मज्जीवनी
पाहे प्रकटायालागुनी
सुंदरता रंगली अंतरी आत कळा लागती
प्रभुची सृष्टि पहायाप्रति
तरि मी आवरीत मानसा

उल्लू होउन जाइन कसा
होता प्रभुवर मम भरवंसा
अधीर होता कार्य बिघडते, अधीर होणे अंध
न कधी अधीर होई बघ॥

अधीर होउन अंडे फोडी विनता, मग पांगळा
लाभे अरुण तिला तो लुळा
सहस्त्र वर्षे वाट बघोमी दुसरे फोडी मग
प्रकटे गरुत्मान् सदा बघ
कर्मी रंगावे माणसे
फळ ते चिंतु नये मानसे
लाभेल परी भरले रसे
कष्ट संकटे सोसुन सतत सेवाकर्मी रमा
येइल चरण चुराया रमा॥

बाळ घालितो रुजत बी, बघे उकरुनिया सत्वर
येइल कैसा वरि अंकुर?
जरा जाहली नाही तुमची थोडी जी चळवळ
तोची मूर्ख विचारिति फळ
घालित जावे बीजा जळ
सेवेमध्ये न पडो खळ
सुंदर डोलेल वरी फळ
अधीर म्हणुनी मी ना झालो फुलविल परमेश्वर
होते सश्रद्ध मदंतर॥

रविकर आता प्रेमे स्नेहे मजलागी चुंबिती
वारे प्रदक्षिणा घालिती
अधीर जणु मज बघावयाला झाल्या दिशा
सरली जणु मज्जीवन-निशा
तरिही शांत राहिलो मनी
अधिकचि तपस्येत रंगुनी
बाळा! तपचि सुखाची खनी
तरस्येतची आनंद खरा तत्त्व धरावे उरी
फळ ते वांछु नये लौकरी॥

एके दिवशी सायंकाळी किरण वदति कोमळ
'उदयिक विकास तव होइल'

ऐसे सांगुन, मोदे चुंबुन, गेले निघुनी कर
उत्सुक पवन करी भिरभिर
हळुहळु उषा जवळ येतसे
माझी पाकळी ती खुलतसे
दुसरी फुलते, तिसरी हसे
निशा संपली, अमृतत्वाची उषा झळकली वरी
अमृतसिंचन मजवर करी॥

उषा देविने मला चुंबिले धरणीमांडीवरी
भास्कर माझे जातक करी
आनंदाने कृतज्ञतेने मुके मदीयांतर
विश्वी देखे विश्वंभर
करुणा सकळ तयाची असे
प्रभु मदरुपे दावि जगा निज पवित्रता माधुरी
माझा हक्क नसे त्यावरी॥

सुगंध माझा सुंदरता मम त्याची ही देणगी
म्हणुनी ठेवित उघडी जगी
मला कशाला संचय- मति ती? माझे काहिच नसे
प्रभुचे प्रभुस समर्पीतसे
माझे लुटोत सारे धन
हेची वांछी माझे मन
त्यागे परमेश्वर पूजिन
सेवा करुनी सुकुनी जाइन, जाइन प्रभुच्या पदी
मग ती पतनभीति ना कधी॥

अशी मुला ही ऐकिलीस का माझी जीवनकथा
रुचेल तरि आदर मत्पथा
कल्याण तुझे होवो बाळा! अश्रु आपुले पुस
बेटा रडत असा ना बस
करि तू मुका पाहुन श्रम
साहुन दु:खे संकट तम
न शिवो मना निराशा भ्रम
पुरी तपस्या होता ठेवी प्रभु फळ हातावरी
न कधी अधीर हो अंतरी"॥

पवित्र सुमना नमना करुनी, सदगद साश्रू असा

**होतो कापत मी वेलसा**
**सतेज सुंदर गंभीर मंगल विमल भावनाबुधि**
**हेलावे मम हृदयामधी**
**‘ही मम शेवटची आसवे**
**आता रमेन कर्मासवे**
**लागे विवाह श्रद्धेसवे**
**कर्म करावे सदा तपावे’ निश्चय धरिला उरी**
**‘आहे जगदंबा मग वरी’॥**

◙ ◙ ◙

**-नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२**

## मयसभा राहिली भरुन

मम दृष्टीला भेसुर दिसते भुवन
मयसभा राहिली भरुन॥

जे दिसते असे रुप वस्तुचे वरुन
जे आत न येते दिसुन
मम डोळे हे निशिदिन जाती फसुन
त्यामुळे जात मी खचुन
जे वाटतसे जाउ उराशी लावू
ते बघ प्राण मम घेऊ
दंभ हा जगाचा धर्म
उलटेच जगाचे कर्म
मग मिळेल केवी शर्म
मन्मन होई खिन्न वर्म हे बघुन
मयसभा राहिली भरुन॥

मज ओलावा वरुन मनोहर दिसला
जाताच जीव परि फसला
मद्दग्ध जणु प्राण तिथे मी नेले
येईल टवटवी गमले
मज्जीवन जे म्लान फुलापरि होते
ते तेथे नेले होते
तो आग अधिकची उठली
जीवाची तगमग झाली
वंचना रक्तांची कळली
जे आर्द्र दिसे, टाकि तेच करपवुन
मयसभा राहिली भरुन॥

कुणी मज दिसला दिव्यज्ञानांभोधी
वाटले करिल निर्मळ धी

मज मोक्षाचा दाविल वाटे पंथ
वाटले हरिल हा खंत
नव चक्षु मला देइल हा गुरु गमले
जाऊन चरण मी धरिले
तो गुलामगिरिगुरु ठरला
मज अंधचि करिता झाला
अघपंथ दाविता झाला
मम आशेचे अंकुर गेले जळुन
मयसभा राहिली भरुन॥

जे सुधारले ऐसे वाटत होते
जे भाग्यगिरिवर रमते
जे निजतेजे दिपवित होते डोळे
अभिनव नवसंस्कृतिवाले
जे कैवारी स्वातंत्र्याचे दिसती
जे समत्वगीते गाती
परि जवळ तयांच्या गेलो
तो दचकुन मागे सरलो
वृक व्याघ्र बरे मी वदलो
ते करिति सदा समतादींचा खून
मयसभा राहिली भरुन॥

ते शांतीची सूक्ते गाती ओठी
परि काळकूट ते पोटी
ते एकिकडे तोफा ओतित नविन
परि वरुन शांतीचे गान
ते एकिकडे दास्यी दुनिया नेती
स्वातंत्र्यभक्त म्हणवीती
चराचरा चिरुन इतरांचे
ते स्वतंत्रतेचे पुतळे
उभविती कसे मज न कळे

हा दंभ कसा प्रभुवर करितो सहन
मयसभा राहिली भरुन॥

जे पावन, ते जगती ठरती पतित
परि पतित, पूतसे गणित
यत्स्पर्शाने श्रीशिव होइल पूत
अस्पृश्य ते जगी ठरत
जे आलस्ये दंभे दर्पे भरले
ते स्पृश्य पूज्य परि झाले
दुनियेचा उलटा गाडा
जे सत्य म्हणति ते गाडा
जे थोर म्हणति ते पाडा
हे दंभाला पूजिति धर्मच म्हणुन
मयसभा राहिली भरुन॥

मज दीप गमे आहे तेथे भव्य
दावील पंथ मज दिव्य
त्या दीपाचा पंथ सरळ लक्षून
चाललो धीट होऊन
मज दीप अता दिसेल सुंदर छान
पडतील पदे ना चुकुन
परि तिथे भयद अंधार
ना अंत नसे तो पार
ना पंथ नसे आधार
या अंधारा भजति दीप मानून
मयसभा राहिली भरुन॥

मृदू शीतलसे सुंदर दिसले हार
सर्प ते प्राण घेणार
किति सुंदरशी सुखसरिता ती दिसत
परि आत भोवरे भ्रमत
जे अमृत मला जीवनदायी दिसले

ते गरल मृतिप्रद ठरले
मृगजळे सकळ संसारी
होतसे निराशा भारी
ही किमर्थ धडपड सारी
ते कांचन ना कांत दिसे जे वरुन
मयसभा राहिली भरुन॥

जे जगताला जीवन अंबुद देती
त्यामाजी विजा लखलखती
या जगति जणू जीवनगर्भी मरण
परि देइ जीवनामरण
ज्या मखमाली त्यातच कंटक रुतती
परी कंटक कोमल फुलती
हे कसे सकल निवडावे
परमहंस केवी व्हावे
जलरहित पय कसे प्यावे
हे कोण मला देइल समजावून
मयसभा राहिली भरुन॥

◙ ◙ ◙
-नाशिक तुरुंग, फेब्रुवारी १९३३

# खरा धर्म

खरा तो एकची धर्म। जगाला प्रेम अर्पावे

जगी जे हीन अति पतित
जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे। जगाला....॥

जयांना कोणी ना जगती
सदा जे अंतरी रडती
तया जाऊन सुखवावे। जगाला....॥

समस्ता धीर तो द्यावा
सुखाचा शब्द बोलावा
अनाथा साह्य ते द्यावे। जगाला....॥

सदा जे आर्त अति विकळ
जयांना गांजिती सकळ
तया जाऊन हसवावे। जगाला....॥

कुणा ना व्यर्थ शिणवावे
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधु मानावे। जगाला....॥

प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे। जगाला....॥

जिथे अंधार औदास्य
जिथे नैराश्य आलस्य
प्रकाशा तेथ नव न्यावे। जगाला....॥

असे जे आपणापाशी
असे जे वित्त वा विद्या
सदा ते देतची जावे। जगाला....॥

भरावा मोद विश्वात
असावे सौख्य जगतात
सदा हे ध्येय पूजावे। जगाला....॥

असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्थ प्राणही द्यावे। जगाला....॥

जयाला धर्म तो प्यारा
जयाला देव तो प्यारा!
तयाने प्रेममय व्हावे। जगाला....॥

खरा तो एकची धर्म। जगाला प्रेम अर्पावे॥

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३४

## कशासाठी जगावे?

असे का जीवनी अर्थ?
असे रे, जो जगी चिंता
असे, जो आपदा व्याधी
असे, जो दुर्दशाभूता॥

असे, जो गोरगरिबांच्या
न गेले ज्ञान झोपडीत
असे, जो गोरगरिबांची
मुले थंडीत कुडकुडत॥

असे, अज्ञान जो जगती
असे, जो अश्रु या जगती
असे, जो बंधु लाखो हे
उपाशी नित्य रे मरती॥

असे, जो त्रास मत्तांचा
असे, जो राजकी जुलुम
असे, जो दीन दुबळ्यांचा
जगी उच्छेद रे परम॥

असे, जो दु:ख या जगती
असे, जो खिन्नसे वदन
समीप प्रीतिने जाता
हसे जे जेवि ते सुमन॥

असे, जो जाणण्या काही
असे, जो कार्य करण्याला
असे, स्वातंत्र्य जो जगती
कृतीला आणि रे मतिला॥

असे, जो दुष्ट त्या रुढी
असे, जो जाच धर्माचा
असे, जो घाण सर्वत्र
असे, जो सूर शोकाचा।।

असा हा जीवनी अर्थ
असा हा जीवनी हेतू
विपदद्:खाब्धि- तरणाला
जगाला होइ तू सेतू।।

◙ ◙ ◙
-अमळनेर, छात्रालय १९२७

## जीवनातील दिव्यता

आयुष्याच्या पथावर। सुखा न तोटा खरोखर
दृष्टी असावी मात्र भली। तरिच सापडे सुखस्थली
सुंदर दृष्टी ती ज्याला। जिकडे तिकडे सुख त्याला
आशा ज्याच्या मनामध्ये। श्रद्धाही मंगल नांदे
सदैव सुंदरता त्याला। फुलेच दिसतील दृष्टीला

प्रचंड वादळ उठे जरी। गगन भरे जरि मेघभरी
तरी न आशा त्यागावी। दृष्टी वर निज लावावी
वारं शमतिल, घन वितळे। नभ मग डोकावेल निळे
निशेविना ना येत उषा। असो भरंवसा हा खासा
दयासागर प्रभुराजा। सकलहि जीवांच्या काजा
आयुष्याच्या पथावरी। रत्नांची राशी पसरी
दृष्टी असावी परि विमला। फुलेच दिसतील दृष्टीला

माणिकमोती अमोलिक। होती आपण परि विमुख
संसाराच्या पथावरी। माणिकमोती प्रभु विखरी
मुलावरिल ते प्रेम किती। मातेचे त्या नसे मिती
मायलेकरांचे प्रेम। बहीणभावांचे प्रेम
मित्रामित्रांचे प्रेम। पतिपत्नीचे ते प्रेमे
गुरुशिष्यांचे ते प्रेम। स्वामिसेवकांचे प्रेम
माणिकमोती हीच खरी। डोळे उघडुन पहा तरी

तृषार्तास जरि दिले जल। शीतल पेलाभर विमल
क्षुधार्तास जरि दिला कण। हृदयी प्रेमे विरघळून
ज्ञान असे आपणाजवळ। दिले कुणा जरि ते सढळ
कृतज्ञता त्या सकळांचे। वदनी सुंदर किति नाचे
कृतज्ञतेचे वच वदती। तेच खरे माणिकमोती

कृतज्ञतेसम सुंदरसे। जगात दुसरे काहि नसे

रत्ने अशि ही अमोलिक। मागत आपण परि भीक
आयुष्याचे हे स्थान। माणिकमोत्यांची खाण
रत्नजडित मुकुटाहून। त्रिभुवनसंपत्तीहून
अधिक मोलवान हा खजिना। रिता कधिहि तो होईना
कुणास चोराया ये ना। कुणास पळवाया ये ना
माणिकमोती ही जमवा। जीवन सुंदर हे सजवा
प्रभु- हेतुस पुरवा जगती। करी करोनी शुभा कृती
सत्य मंगला पाहून। संसार करु सुखखाण
हृदयी ठेवु या सुविचारी। विश्व भरु या सुखपूरी
काट्यावरि ना दृष्टी वळो। काटे पाहून मन न जळो
आशा अपुली कधि न ढळो। फुलावरिच ती दृष्टि खिळो
सोडून हा मंगल मार्ग। उगीच पेटविती आग
चिंध्या पाहुन ओरडती। आतिल रत्ना ना बघती
उगीच रडती धडपडती। बोटे मोडिति कडकड ती
रागे खाती दात किती। डोळे फाडुन किति बघती
जीवनपट विसकटवून। सुंदर तंतू तोडून
कशास चिंध्या या म्हणती। खोटी दुनिया ते वदती
असे नसे परि जीवन हे। सुखसरिता मधुरा वाहे
सुखास नाही मुळि तोटा। संसार नसे हा खोटा
दृष्टी करावी निज पूता। निराळेच मग जग दिसत
दिसतील मग माणिकमोती। मिळेल सकळा श्रीमंती
ही श्रीमंती सर्वांना। सदैव देतो प्रभुराणा
तत्त्व असे हे मनि आणा। नांदा मोदे ना गाना।।

◙ ◙ ◙

-अमळनेर, छात्रालय १९२८

## मित्रांसाठी प्रार्थना

विशुद्ध मत्स्वांत सदैव राहो। विचार चित्तांत पवित्र येवो
न पापसंपर्क मना असावा। न लोभलेश प्रभुजी! दिसावा।।

करी सदा सत्कृति तीच व्हावी। अशी मला उत्सुकता असावी
नको मला मत्स्तुतिलालसा ती। घडो जनांचे हित नित्य हाती'
असे प्रभो प्रार्थियले अनंत। विलोकिसी काय मदीय अंत
न चित्त होई विमल प्रशांत। अधी रमे सतत विश्वकांत।।

न ऐकशी हाक मदीय काय। दयार्द्र तू कोमल देवराय
विमार्गगामी मज बाळकाते। न सत्पथी आणिशि काय होते?।।

जरी अध:पात मदीय व्हावा। सदैव पंकांतच हा रुतावा
अशी त्वदिच्छा जरि ती असेल। कसा तरी बाळ वरी चढेल?।।

तुझ्या मतीच्या नच मी विरुद्ध। सहावयास सर्व सदैव सिद्ध
मदर्थ आता न कधी वदेन। बुडेन किंवा प्रभुजी! तरेन।।

मदुद्धृतीचे मज नाहि काही। अता न प्रार्थीन मदर्थ पाही
परी सखे जे मम स्नेहपूर्ण। तदर्थ रात्रंदिन आळवीन।।

जयावरी प्रेम अपार केले। यदर्थ अश्रू नयनांत ठेले
दिले जयाते सगळे मदीय। असे सखे जे मम लोभनीय।।

जयाविना ना मजला विसावा। मनात ज्यांच्याजप म्या करावा
झुरे अहोरात्र यदर्थ जीव। जयावरी जीव जडे मदीय
जयाविणे शून्य उदास वाटे। जयाविणे मानस फार दाटे
जयांवरी जीव मदीय लोल। हिरेच माझे जणु जे अमोल।।

मदीय जे देव धरेवरील। मदीय पूजा मन हे करील
यदीय सौख्य मम सौख्य नांदे। यदीय दु:खे मम जीव फुंदे।।

जयांस आनंद अपार द्यावा। विचार रात्रंदीन हा करावा
यदर्थ हे जीवन अर्पण्याला। कितीकदा हा प्रभु सिद्ध झाला।।

मलाच येवो दुखणे तयांचे। यदर्थ वाटे मज हेच साचे
मला जयांची प्रभुराज सेवा। गमे सुधेचा स्पृहणीय ठेवा॥

प्रसन्नता यत्प्रिदर्शनाने। मनास वाटे न तशी कशाने
बघून ज्या दृष्टि मदीय तृप्त। निवे सुखावे मम जीव तप्त॥

बहिश्चर प्राण जणू मदीय। सखे असे जे मम आंतरीय
तया तरी सत्पथि देव ठेवी। अधोगतीला न कधीहि नेई॥

तदुन्नती सतत होत राहो। उदार तच्चित्त पवित्र होवो
कृतार्थ होवोत असोत धन्य। न कोणताही मज काम अन्य॥

अनन्यभावे करितो प्रणाम। प्रभो! करा हा मम पूर्ण काम
मदीय जे मित्र तयां सदैव। करा कृती मागत एकमेव॥

तया दयाळा निज देइ हाता। निवारि आघात बनून माता
तदीय चारित्र्यकळी फुलू दे। तदीय कीर्ति त्रिजगी भरू दे॥

असोत अंतर्बहि रम्यरुप। सखे प्रभो! ठेवि सुखी अमूप
सदा पवित्रा कृती तत्करांनी। घडो न जावोत कधीहि रानी॥

त्वदीय कारुण्यवसंत- वात। सुटो सुहृज्जीवनकाननात
फुलो डुलो, हा मम एक काम। पुरा करावा, रघुवीर राम!॥

जनात होवोत पवित्रनाम। पुरा करा हा जगदीश! काम
नसे मला रे मम जीवनाशा। तयार मी तो मम सर्वनाशा॥

मदर्थ मी प्रार्थिन ते न आता। मदर्थ ना मी नमवीन माथा
मदर्थ ना प्रार्थिन मी कधीही। परी सख्यांच्यास्तव याचना ही॥

प्रभो! सखे जे प्रिय प्रेमधाम। तदर्थ चिंता मज हेच काम
सुखात ठेवी प्रभु ते सदैव। पुन:पुन्हा मागत एकमेव॥

मदर्थ नाहे रडतील डोळे। तदर्थ होतील सदैव ओले
न जीवनाची मम आस माते। सदैव जावोत सखे सुपंथे॥

◘ ◘ ◘
-त्रिचनापल्ली, सप्टेंबर १९३०

## संत

भरो विश्वात आनंद। शांती नांदो चराचरी
म्हणून जळती संत। महात्मे भास्करापरी।।

असो विकास सर्वांचा। हरो दैन्य सरो तम
म्हणून जळती नित्य। महात्मे भास्करासम।।

नसे सौख्य विलासात। त्यात ना राम वाटत
हरावयाला जगत्ताप। तपती संत सतत।।

फळे लागोत मोदाची। लोकांच्या जीवनावरी
म्हणून जळती नित्य। महात्मे भास्करापरी।।

सुखासीन विलासात। पाही मरण तन्मन
मरण्यात तया मौज। जळण्यातच जीवन।।

पेटलेले होमकुंड। संताचे तेवि जीवन
परचिंता सदा त्यांना। करिती प्राण अर्पण।।

राम ना ऐषारामी। राम ना लोळण्यामध्ये
राम तो एका गोष्टीत। परार्थ जळण्यामध्ये।।

परार्थ जळती तारे। रविचंद्रहि तापती
परार्थ पळती वारे। नावेक न विसावती।।

परार्थ जगती मेघ। परार्थ तरु तिष्ठती
परार्थ पर्वत उभे। कदा काळी न बैसती।।

परार्थ सरितासंघ। परार्थ सुमने तृणे
परार्थ फळधान्यादी। परार्थ भवने वने।।

तसेच हे महा संत। परार्थ जळती सदा
तोच त्यांना सदानंद। प्रणाम शत तत्पदा।।

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२

## मेघासारखे जीवन

काय करावे
मी मेघासम विचरावे॥

तनुवर दु:खाचे कांबळे
चिंता-चपला हृदयी जळे
शांति क्षणभर मज ना मिळे॥ काय....॥

कधि सन्मित्रसंगतीमधे
घटकाघटका रमती मुदे
कधि मी फटिंग कोठे उडे॥ काय....॥

कधि मी शुभ्र रुप्याच्या परी
कधि सोनेरी वेषा करी
परि ना ओलावा अंतरी॥ काय....॥

कधि मी जनमतवा-यासवे
जाऊ देतो मजला जवे
होतो सुज्ञ परी अनुभवे॥ काय....॥

कधि किति अधोगती पावतो
थोराथोरांशिहि झगडतो
टपटप अश्रू मग ढाळितो॥ काय....॥

कधि मी वरवर किति जातसे
मन हे चिदंबरी रमतसे
इवलेही मालिन्य न दिसे॥ काय....॥

कधि मी होतो मुनि जणु मुका
बघतो प्रसन्न प्रभुच्या मुखा
लुटितो अनंत आंतर सुखा॥ काय....॥

कधि मी जगा सुपथ दावितो
मोठ्यामोठ्याने गरजतो
हाका मारुन मी शिकवितो॥ काय....॥

येते कधि मन ओसंडुन
येतो प्रेमे ओथंबुन
तप्ता शांतवितो वर्षुन॥ काय....॥

कधि गगनाहुन गुरु होतसे
कधि बिंदुकले मी बनतसे
ब्रह्मस्वरुप अनुभवितसे॥ काय....॥

कधि मी हासतो रडतो कधी
कधि मी पडतो चढतो कधी
कधि कुमती मी परि कधि सुधी॥ काय....॥

कधि वाक्पटू केवळ कोरडा
कधि मी भरलेला हो घडा
कधि जनसंगत कधि मी सडा॥ काय....॥

ऐशा अनंत करितो कृति
अनुभवितो मी विविध स्थिति
अंती मिळविन परि सदगति॥ काय....॥

जीवन यापरि मी नेइन
दिन मी ऐसे मम कंठिन
मजला आणिक ते मार्ग ना॥ काय....॥

कधि तरि पूर्णत्वा पाहिन
रसमय अंतर्बहि होइन
सेवा करुनी मग राहिन॥ काय....॥

गळेन शिणलेली तनु यदा
सिंधुत बुडेल हा बुडबुडा
मिळविन मंगल सच्चित्पदा॥ काय....॥

◙ ◙ ◙

-अमळनेर, छात्रालय १९२६

## वंदन

मी वंदितो पदरजे विनये तयांची
ज्यांची मने विमल सुंदर सोनियाची
जे संकटास न भिती न जयास पाश
आशा सदैव अमरा न कधी उदास।।

कार्ये करून, वदती न कधी मुखाने
उत्साहमूर्ति मति सांद्र दयारसाने
जे ठेविती निजसुखावरती निखारा
त्या वंदितो नरवरा विमला उदारा।।

स्वार्थी खरोखर तिलांजलि देउनीया
संतोषवीत पर कष्टहि सोसुनीया
श्रद्धा जया अविचला रघुनाथपायी
माझी नमून मति जात तदीय ठायी।।

ज्या मोह ना पडतसे पदवीधनांचा
ज्या धाक ना कधि असे रिपुच्या बळाचा
अन्याय ना कधि बसून विलोकतील
ते वंदितो नरमणी गुणि पुण्यशील।।

ना पाहतील नयनि कधि सत्यखून
ना दीनभंजन तसे बघती दुरुन
जाळावयास उठती सगळा जुलूम
ऐशा नरांस करितो शतश: प्रणाम।।

त्यांच्यापरी मति मदीय विशुद्ध राहो
त्यांच्यापरी हृदय कष्टदशास साहो
त्यांच्यापरी परहितास्तव मी झिजावे
त्यांच्यापरी जगि जगून मरुन जावे।।

◘ ◘ ◘
-अमळनेर, छात्रालय १९२७

## मदीय त्या नमस्कृती

विशुद्ध भाव अंतरी
कृती उदार यत्करी
सदैव जो असे व्रती
मदीय त्या नमस्कृती॥

न पापा यन्मना शिवे
शिवे तरी झुरे जिवे
करी सदा निजोन्नती
मदीय त्या नमस्कृती॥

परोपकार आवडे
स्तुती जयास नावडे
सुनिर्मळा सदा मती
मदीय त्या नमस्कृती॥

सदैव ईश्वरस्मृती
स्वदेशकारणी रता
तयास वर्णु मी किती
सदैव त्या नमस्कृती॥

◘ ◘ ◘
-अमळनेर, छात्रालय १९२८

## नवीन संन्यास

उत्साहसिंधु थोर। चित्तात नाचवील
संन्यास हा नवीन। राष्ट्रास हालवील

मालिन्य संहरुन। स्फूर्तीस पेटवील
संन्यास हा नवीन। राष्ट्रास चेतवील

कर्मात रंगुनिया। लोकांस रंगवील
संन्यास हा नवीन। आलस्य घालवील

सेवेत राबुनिया। लोकांस राबवील
संन्यास हा नवीन। राष्ट्रास शोभवील

सेवेत रंगुनिया। वस्त्रे न रंगवील
संन्यास हा नवीन। राष्ट्रास जागवील

दास्यास दूर करुन। चैतन्य खेळवील
संन्यास हा नवीन। मोक्षास पाववील

राष्ट्रास उद्धरील। दैन्यास भंगवील
संन्यास हा नवीन। राष्ट्रास हासवील

क्षण एक ना बसेल। बंधूस जीववील
संन्यास हा नवीन। देशास भूषवील

बांधील कारखाने। शाळा उभारवील
संन्यास हा नवीन। राष्ट्रास वाचवील

रस्ते करील नीट। संडास साफ करील
संन्यास हा नवीन। घाणीस संहरील

अस्पृश्य बाळकांना। जाऊन तो धुवील
संन्यास हा नवीन। भेदास घालवील

सर्वत्र आत्मतत्त्व। आचारि दाखवील
संन्यास हा नवीन। न वदेल फक्त बोल

गायींस पोषुनिया। भरपूर दूध करील
संन्यास हा नवीन। आरोग्य वाढवील

ऐक्यास निर्मुनिया। सत्प्रेम दाखवील
संन्यास हा नवीन। सत्पंथ शिकवील

राष्ट्रास भूषवील। विश्वास तोषवील
संन्यास हा नवीन। सन्मुक्ति चाखवील

संन्यास हा नवीन। सूत्रांस हालवील
संन्यास हा नवीन। संसार चालवील

राहूनिया अ- सक्त। सेवा सदा करील
संन्यास हा नवीन। सत्पंथ हा वरील

◘◘◘
-नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२

## विपत्ति दे तीहि हवी विकासा

करुन माता अनुराग राग। विकासवी बाळ- मनोविभाग
फुले करु सेवुन उष्णशीत। जगी असे हीच विकासरीत॥

पिका हवे ऊन तसे पाणी। तरीच ते येइल भरभरोनी
प्रभो! न संपत्ती सदैव मागे। विपत्तिही दे मज सानुरागे॥

कभिन्न काळे घनमेघ येती। परी जगा जीवनाधार देती
विपत्ति येतील अनेक घोर। परंतु देतील विकास थोर॥

विपत्ति ही चित्तविकास- माता। दुजा नसे सद्गुरु बोधदाता
विपत्ति मानीन सदा पवित्रा। विपत्ति माझे घडवी चरित्र

विपत्ति मानीन मनी अमोल। विपत्ति माझे बनवील शील
विपत्ति आकार मनास देई। विपत्ति खोटे भ्रम दूर नेई॥

विपत्ति आणील जळास डोळा। मिळेल पाणी तरि जीवनाला
विपत्ति डोके जरि तापवील। स्वजीवना ऊबच ती मिळेल॥

विपत्ति मांगल्यखनी खरीच। विपत्तिरुपे मिळतो हरीच
उराशि मी लाविन ती विपत्ति। कधी न जाईन जळून चित्ती॥

विपत्तिमाजीच विकासबीज। घनांतरी वास करीत वीज
विपत्तिंतून प्रकटेल तेज। विपत्तिपंकी शुभचित्सरोज॥

कधी न लागे झळ ज्या नराला। न आच लागे कधि यन्मनाला
तया न पूर्णत्व कधी मिळेल। गंभीर त्या जीवन ना कळेल॥

विपत्ति ही जीवनवीट भाजी। विपत्ति संजीवनधार पाजी
विपत्ति आणी रुचि जीवनाला। विपत्ति दे स्फूर्ति सदा मनाला॥

प्रकाश अंधार, तरीच वाढ। सदा न मारा न सदैव लाड
विपत्ति द्या, द्या मधुन प्रकाश। प्रभो! असे मागतसे पदांस।।

विपत्ति दे तीही हवी विकासा। सदैव देशील करील नाशा
सदैव थंडी, तरि गारठेल। कळी, न ती सुंदरशी फुलेल।।

सदैव दु:खे तरि ये निराशा। दिसे न मांगल्य दिसे न आशा
मनी शिरे द्वेष तशीच चीड। भरे तिरस्कार मनी उदंड।।

म्हणून देवा! प्रणती पदास। विपत्ति ना संतत दे कुणास
करुन कारुण्य करुन कोप। विकसवी जीवन- रम्यरोप।।

प्रभो! विनम्र प्रणती पदांस। विपत्ति दे तीहि करी विकास
परी कृपाळा! न सदैव ती दे। तरीच मांगल्य मनात नांदे।।

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, मे १९३४

## दु:ख आनंदरुप

कर्तव्याला करित असता दु:ख आनंदरूप
व्हावे माते, मजसि भरु दे अंतरंगी हुरूप
जावे दु:खे खचुन न, वरी सर्वदा म्या चढावे
व्हावे क्लेशे विचलित न मी, धीर गंभीर व्हावे।।

दु:खे व्हावे जळुन सगळे चित्तमालिन्य खाक
सदभावांची शुभ झळकु दे तेथ लावण्यझाक
दु:खे व्हावे विमलतर मन्मानसांबु प्रसन्न
दु:खे व्हावे स्थिरमति अति स्वांतरंगांत धन्य।।

दु:खे येता, ह्रदयी भरु दे शाश्वताचा विचार
दु:खे येता, उठुन पुस दे दीननेत्रांबुधार
दु:खे येता सहज मम हा जीव चंडोल व्हावा
जावा ध्यानांबरि उडुनिया दिव्य गानी रमावा।।

दु:खावीणे जगति न असे जीवना पूर्णता ती
दु:खे होते ह्रदय सरस, प्राणि ते धन्य होती
दु:खे उल्लू मतिस करिती खोल गंभीर धीर
दु:खे दृष्टी विमल करिती नेत्रिं आणून नीर।।

आपत्तीला सतत समजा दूत हा ईश्वराचा
व्हावे ना हो विमुख, करणे नित्य सत्कार तीचा
आशीर्वाद प्रभुजि वितरी देउनी दु:ख- वेष
सत्कारावा मुदित ह्रदय्, क्लेश मानून तोषा।

◘ ◘ ◘
-त्रिचनापल्ली फेब्रुवारी १९३१

## प्रेमधर्म

हिंदू आणिक मुसलमान ते भांडत होते तदा
राष्ट्रावरती महदापदा
जिकडेतिकडे हाणामारी दंगेधोपे सुरु
माझा जीव करी हुरहुर
परस्परांच्या खुपशित होते पोटामध्ये सुरे
ऐकुन माझे अंतर झुरे
गेले बंधुभाव विसरुन
गेले माणुसकी विसरुन
गेले पशुच अंध होउन
अविवेकाने परस्परांचे कापित होते गळे
माझ्या डोळ्यांतुन जळ गळे।।

खिन्न होउनी, उदास होउनी निराश होउन मनी
बसलो होतो मी त्या दिनी
एकाएकी अन्यत्र मला आहे बोलावणे
नव्हते शक्यच ते टाळणे
सायंकाळी गाडी होती तिकिट तिचे काढुन
बसलो गाडीत मी जाउन
नव्हते लक्षच कोणीकडे
येई पुन:पुन्हा मज रडे
भारति माझ्या का कलिकिडे
विचार नाना काहुर उडवित मानस शोके जळे
प्रभु दे सुमति कधी ना कळे।।

देव मावळे पश्चिमभागी लाल लाल ते दिसे
रक्तच का ते तेथे असे
काय तिथेही खून चालले? रवि का कुणि मारिला?
कुणि तत्कंठ काय कापिला?
भेसुर ऐसा विचार येउन मनि गेलो दचकुन
पाहू लागे टक लावुन

विरले लाल लाल ते परी
तारका चमकू लागत वरी
शांती पसरे धरणीवरी
लाल लाल रुधिरानंतर का शांति जगाला मिळे
काहिच मन्मतिला ना कळे॥

गाडीमध्ये दिवे लागले, तारका वरि जमकले
तिमिरी प्रकाश जगता मिळे
भारतीय जनता हृदयांबरि प्रेमतारकातती
केव्हा चमकु बरे लागती?
प्रेमदीप कधि भारतीय-हन्मंदिरि पाजळतिल?
केव्हा द्वेष सकल शमतिल?
वरती ता-यांना पाहुन
ऐसे विचार करि मन्मन
मधुनी पाझरती लोचन
खिडकीच्या बाहेरच मन्मुख जे अश्रूंना मळे
डोळे प्रभुचरणी लाविले॥

गाडीमध्ये नानापरिचे होते तोथे जन
तिकडे नव्हते माझे मन
एकाएकी खिडकीतुन परि आत वळविले मुख
विद्युद्दीप करित लखलख
गोड गोड मी शब्द ऐकिले भरलेले प्रीतीने
गेलो मोहुन त्या वाणिने
होती एक मुसलमानिण
होती गरीब ती मजुरिण
दिसली पोक्त मला पावन
आवडता तत्सुत बाहेरी पुन:पुन्हा पाहत
होती त्याला समजावित॥

गरीब होती बाई म्हणुनी नव्हता बुरखा तिला
होता व्यवहार तिचा खुला

प्रभुच्या सृष्टीमधे उघड ती वागतसे निर्भय
सदय प्रभुवर ना निर्दय
खानदानिच्या नबाबांस ती आवरणे बंधने
गरिबा विशंक ते हिंडणे
होती तेजस्वी ती सती
दिसली प्रेमळ परि ती किती
बोले मधुर निज मुलाप्रती
मायलेकरांचा प्रेमाचा संवाद मनोहर
त्याहुन काय जगी सुंदर?॥

"नको काढु रे बाळा! डोके बाहेरी सारखे"
बोले माता ती कौतुके
"किति सांगावे फार खोडकर पुन्हा न आणिन तुला"
ऐसे बोले प्रेमे मुला
"ये मजजवळी मांडीवर या ठेवुन डोके निज
बेटा! नको सतावू मज
झाली भाकर ना खाउन
जाई आता तरि झोपुन
डोळ्यांमध्ये जाइल कण"
असे बोलुन प्रेमे घेई बाळ जवळ ओढुन
ठेवी मांडीवर निजवुन॥

पाच सहा वरुषांचा होता अल्लड तो बालक
माता करिते तत्कौतुक
क्षणभर त्याने शांत ठेविले डोके मांडीवरी
चुळबुळ मधुन मधुन तो करी
पुनरपि उठला, गोड हासला, मातेसही हासवी
जाया संमति जणु त्या हवी
का रे उठसि लबाडा अता
डोळे मिटुनी झोपे अता
ऐसे अम्मा ती बोलता
फिरुन तिच्या मांडीवरती बाळ गोड झोपला

त्याचा मुका तिने घेतला।।

मुसलमान बाईशेजारी होती एक कुणबिण
होते करुण तिचे आनन
लहान अर्भक बसली होती मांडीवर घेउन
पाणरलेले तल्लोचन
एकाएकी मूल रडाया मोठ्याने लागले
पाजायास तिने घेतले
घाली पदर तन्मुखावरी
लावी स्तनास तन्मुख करी
अर्भक आक्रंदे ते परी
पुन:पुन्हा ती स्तनास लावी अर्भकमुख माउली
परि ते तोंड लाविना मुळी।।

"पी रे बाळा! ही वेल्हाळा! नको रडू रे असा
रडुनी बसला बघ रे घसा
किति तरि रडशिल उगी उगी रे काय तुला जाहले
गेले सुकुन किती सोनुले
उगी उगी रे पहा पहा हे दिवे लागले वरी"
राहे बाळ उगा ना परी
त्याला पायावर घालुन
हलवी आई हेलावुन
बघते अंगाई गावुन
रडे तयाचे कमि न होइ परि अधिकच रडू लागला
वाटे मरण बरे जननिला।।

चहा चिरूट चिवडा भजि यांचे भक्त तदा कोपले
मातेवरि गुरुगुरु लागले
"किति रडविशि गे त्या पोराला ट्यांहा ट्यांहा करी
होतो त्रास इथे किति तरी
दांडक थोपट टाक निजवुनी
घंटाभर रडतसे

लाजच बायांना या नसे"
ऐकून निर्दय ते बोलणे
बालक आपटिले जननीने
बाकावरती निष्ठुरपणे
"तूहि कारट्या आईला या आलास छळावया"
बोले माया विसरुनिया।।

पुन्हा उचलिले तिने तान्हुले प्रेम न रागावते
क्षणभर जणु ते भांबावते
"उगी उगी रे तुला नाहि हो बाळा! मी बोलल्ये
दैवच फिरले रे आपुले
पी रे राजा, पी हो थोडे, वाटेल तुल बरे"
ऐसे बोले ती गहिवरे
बाळ स्तना न लावी मुख
माता खाऊ पाहे विख
करुनी पायांचा पालख
बसली हलवित फिरुनी त्याला अगतिक भरल्या मने
वदवे काहि न तिज वाणिने।।

केविलवाणी हताश होउनि बसली ती माउली
रडते बाळक मांडीवरी
मनात म्हटले मी देवाला 'बाळ करी रे उगी'
परि मद्वाणी ती वाउगी
प्रेमे हृदयी वोसंडोनी स्वपर सकल विसरुनी
हाती बालक ते घेउनी
असते जरि मी समजाविले
असते किति सुंदर जाहले
नव्हते भाग्य परी तेउले
मदहंकारे दूर राहुनी आळविला मी प्रभु
दंभचि परि तो जाणे विभु।।

मुसलमान बाईचे त्या असे हृदय खरे आइचे

गेले कळवळुनी मन तिचे
पुत्रप्रेमाचा तिज होता पावन तो अनुभव
सुमधुर मंगल सुंदर शिव
मांडीवरती डोके ठेवुन बाळ तिचा झोपला
होता हळुच तिने उचलिला
तेथे चिरगुट मग पसरुन
त्यावर निज बाळक निजवुन
उठली बाई मुसलमानिण
हिंदू बाइच्या जवळी गेली बोले मधुर स्वरे
कुणबिण फारच ते गहिवरे॥

"द्या मजजवळी, द्याच जरासा, घेते त्याला जरा"
ऐसे बोलुन पसरी करा
"फारच आहे रडत सारखा दृष्ट काय लागली
घामाघूम तनू जाहली
रडुनी रडुनी दमला तरिही रडणे ना थांबवी
दूधही अंगावर ना पिई
द्या मजजवळ जरा लेकरा
संकोच न तो इवला करा
घेउन बघते मी त्या जरा"
प्रेमाचे अनकंपेचे ते गोड शब्द बोलुन
घेई बाळक ती ओढून॥

गोड बोलते मुलाजवळ ती "रडू नको रे असा
रडुनी रडविसि आइस कसा"
टिचक्या वाजवि, दिवे दाखवी, हातांनी नाचवी
त्याचे हातपाय खाजवी
कानी त्याच्या कुर्र करितसे भांडे ती वाजवी
अम्मा अर्भक ते खेळवी
तेव्हा चांद उगवला नभी
फुलवी बालकवदनच्छबि
"रो मत उगि हां बेटा अबी"

प्रेमे बोलुन, बाळ डोलवी वात्सल्ये खेळवी
त्याचे रडणे ती थांबवी॥

चमत्कार जाहला खरोखर बाळ-रडे थांबले
हासू खेळू ते लागले
अम्मा त्याला वरती उडवी घेइ करी झेलुन
बाळक हसते ते खेळुन
गोड गोड ते हास्य तयाचे डब्यात पसरत असे
इतरांनाही सुखवीतसे
येती चंद्रकिरण गाडित
अर्भक गोड तसे हासत
माझे मानस मोहावत
कृतकृत्य तया अम्मेलागी मनात जणु वाटले
अमित प्रेम मनी दाटले॥

“उगा राहिला, खेळु लागला, पाजा त्याला अता
झोपले क्षण न लागता”
असे बोलुनी अम्मा देई अर्भक जननीकरी
घेई माता मांडीवरी
पाजायाला मूल घेतले स्तनास लावी मुख
बाळ प्राशी होई सुख
भरले मातेचे लोचन
भरले मातेचे ते स्तन
भरले गहिवरुन तन्मन
बाळराज तो राजस होता पीत पोटभर पय
झाले मातृहृदय सुखमय॥

पुन:पुन्हा ती त्या बाळाला घट्ट आवळुन धरी
माता सुखावली अंतरी
बाळाने हे रिते करावे भरलेले स्वस्तन
ऐसे वांछी किति तन्मन
पोटभरी तो प्याला धाला पदर दूर सारित

बालक निजमुख-शशि दावित
हसणे मधुर किति मनोहर
काळेभोर नयन सुंदर
मुख मोहाचे माहेरघर
अमित सुखाचे भरले आले घेइ मुके किततरी
माता, तृप्त न परि अंतरी॥

"काय लबाडा! झाले होते, रडावयाला मघा
आता गुलाम हसतो बघा
मघा कोणते आले होते भूत गुलामा तुला
चावट कुठला वेडा खुळा
पहा पहा हो किति तरी हसतो, तुम्हि याला हसविले
अमृत त्याच्यावर शिंपले
ओळख पूर्वजन्मिची जणु
संशय मज न वाटतो अणु"
ऐसे बोलुन हलवुन हनु
मुका तयाचा घेइ आई बाळक ते हासले
पोटी प्रेमाने घेतले॥

कृतज्ञतेने कुणबिण किति ती हृदया भरली असे
गहिवर पोटी मावत नसे
हासत खेळत बाळक निजला क्षणात मांडीवर
आइस आवरे न गहिवर
अम्मेचे मुख कृतज्ञतेने भरल्या नेत्री बघे
शब्द न बाहेरी परि निघे
"तुम्ही हासविला मद्बाळक..."
परि तिज वदवेना आणिक
पाहे भरल्या नेत्री मुख
अम्मेचा ती हात आपुल्या हाती प्रेमे धरी
त्यावरि गळती अश्रुच्या सरी॥

भरलेल्या अंतरातून त्या वच बाहेर न फुटे

नयनी प्रेमझरा परि सुटे
हृदयामधला भाव सकल तो विमलाश्रू दाविती
तेथे शब्द सकळ खुंटती
मुकेपणा तो बेलुन दावी अनंत हृदयातले
अन्योन्यासचि सगळे कळे
थोडी ओसरली भावना
झाला अवसर संभाषणां
पुशिती पदराने लोचना
दोन अशा त्या माता दिसल्या गंगायमुनांपरी
नति मी केली दुरुनी करी॥

कुणबिण मग ती हळुच सोडिते पदराच्या गाठिस
काढी त्यातून सुपारिस
अम्मेला द्यावयास जवळी दुसरे काहिच नसे
कुणबिण दीन दरिद्री असे
कृतज्ञतेला प्रकट कराया उत्सुकता मानवा
त्याविण समाधान ना जिवा
करण्या कृतज्ञता प्रकट ती
पुरते पोह्यांची मूठ ती
असु दे वस्तु कशी वा किती
कृतज्ञतेचा सिंधु मावतो बाह्य-चिन्ह-बिंदुंत
जैसा विश्वंभर मूर्तित॥

सुपारिचे ते खांड काढिले अम्मेला ते दिले
भरले कृतज्ञतेने भले
साधे नव्हते खांड, अमोलिक मंतरलेले असे
जिविचा भाव त्यात तो वसे
माणिकमोत्यांच्या राशीहुन त्रिभुवनलक्ष्मीहुन
अधिकचि कृतज्ञतेची खुण
होती कठिण सुपारी जरी
प्रेमे भिजलेली ती परी
अम्मेच्या ती देई करी

देउन पाही पुन्हा तन्मुखा भरलेल्या लोचनी
अम्मा विरघळली ती मनी॥

होते मांडीवरती निजले मूल गोड गोजिरे
साजिरे दमले रडुनी खरे
रडावयाचे कसे थांबले? काय जादु जाहली
माझी वृत्तिच ती गुंगली
क्षणात पडला प्रकाश माझ्या हृदयी सुंदर परी
कळली गोष्ट मला अंतरी
नवपिढिचा तो बालारुण
होता करित अमित रोदन
होता भुका, न परि घे स्तन
भेदातीत प्रेम पिउन तो बालप्रभु तोषला
खुलला फुलला मग हासला॥

मुसलमान मी, मी हिंदू, हे माता त्या विसरल्या
प्रेमसमुद्री त्या डुंबल्या
माता तेथुन एकच, त्यांचा धर्म एकची असे
एकच वत्सलता ती असे
हास्य, अश्रु ते एकच असती सगळ्यांना समजती
हृदये हृदयाला जोडिती
एक प्रेमधर्म तो खरा
कळतो सकळांच्या अंतरा
परि ना रुचतो अजुनी नरा
हृदयांतील या सद्धर्माला दडपुन पायातळी
जगि या माजविती हे कली॥

परस्परांची वैरे विसरा विरोध ते मालवा
प्रेमे जीवन निज रंगवा
परस्परांची उणी न काढा परगुणगौरव करा
कर धारुनी सहकार्या करा
परस्परांच्या संस्कृतिमधले हितकर मंगल बघा
बघु दे दृष्टि सुंदर शुभा

होऊ प्रभुचे यात्रेकरु
सगळे सुपंथ आपण धरु
जग हे आनंदाने भरु
कधी परी हे होइल? कधि का होइना मी तरी
पूजिन प्रेमधर्म अंतरी॥

मोठे मोठे आग लावणे हाच धर्म मानिती
प्रेते उकरुन ती काढिती
इतिहासातिल जनांपुढे हे भुतावळिच मांडिती
मंगल शिव ना ते दाविती
विझवतील ना वणवे कोणी तेलच ते ओतिती
सार्थक ह्यांतच ते मानिती
खोट्या स्वाभिमान-कल्पना
खोट्या धर्माच्या कल्पना
करिती स्मशान नंदनवना
न अहंतेचे महंत व्हावे धर्म अहंता नसे
धर्म प्रेमी नांदत असे॥

धर्माचे सत्प्रेम हेचि हो सुंदर सिंहासन
दिसती धर्म तिथे शोभुन
द्वेषमत्सरांचे ते आहे धर्माला वावडे
धर्मा प्रेम एक आवडे
प्रेमरुप तो परमेश्वरही प्रेमे त्याला पहा
पूजा प्रेमाची त्या वहा
सकळही देवाची लेकरे
कोठे भेद तरी तो उरे
झाले पाप अता ते पुरे
जीवनपंथा उजळो आता प्रेमदीप शाश्वत
पावू मंगल मग निश्चित॥
◙ ◙ ◙
-नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३३

## परी बाळाला सकळ ती समान

तीन वर्षांचा बाळ गोड आला। नसे सीमा जणु त्याचिया सुखाला
हास्य त्याच्या मुखि गोड किति साजे। मूर्ति गोंडस ती गोजिरी विराजे॥

अधर मधुर तसे गोड गाल डोळे। सुखानंदाने भरुन जणू गेले
काय झाले सुख एवढे अपूर्व। तया बाळा, ज्यापुढे तुच्छ सर्व॥

"काय सापडले? हससी का असा रे। लबाडा सांग सांग सारे"
प्रश्न ऐकुन लागला हसायाला। अधिक निज मोदा दाखविता झाला॥

खिशामाजी तो बाळ बघू लागे। "काय आहे रे त्यात मला सांगे"
फिरुन हसला मत्प्रश्न ऐकुनी तो। कौतुकाने परि पुन्हा तो पहातो॥

हास्य ओठांतुन दाबल्या निघाले। बाळकाने मग फूल काढियेले
खिशातूनी ते गोड गुलाबाचे। दिव्य सुंदर सदधाम सुगंधाचे॥

काढि बाळक ते प्रथम फूल एक। दुजे काढी मग त्याहुनी सुरेख
आणि तिसरे ते कण्हेरिचे लाल। सकल संपत्ति प्रकट करी बाळ॥

परी राहे सुम अजुन एक आत। खिशामाजि पुन्हा घालि बाळ हात
फूल चौथे बाहेर काढियले। सर्व सुकलेले वाळुन जे गेले॥

चार पुष्पे मज दाखवून हासे। चार पुष्पे मज दाखवून नाचे
पुन्हा चारीही ठेवि ती खिशात। हसुन बाळक तो दूर निघुन जात॥

तीन पुष्पे रमणीय गोड छान। परी चवथे ते गलित शुष्क दीन
तुम्ही म्हटले असतेच तया घाण। परी बाळाला सकळ ती समान॥

◘ ◘ ◘
-अमळनेर, छात्रालय १९२९

## ग्रंथमहिमा

दु:खाला जे विसरवनिया दिव्य आनंद देती
एकांती जे परम निकट स्नेहि सप्रेम होती
चित्ती ज्यांच्या मुळि न शिवतो भेद हा साव चोर
सर्वांनाही सुखवित सदा ग्रंथ हे संत थोर॥

कोणी येवो पुरुष वनिता बालिका बाल वृद्ध
सर्वा देती सुरस, करिती बुद्धिते जे समृद्ध
गांभीर्याते किति तरि पहा जीवनी आणितात
आपन्मग्ना हत-जन-मना ग्रंथ हे तातमात॥

तुम्हां द्याया सतत असती ग्रंथराजे तयार
पावित्र्याची परम विमला ज्ञानपीयूष-धार
जी संसारी तृषित हृदये ग्रंथ हे ज्ञानसिंधु
त्यांना होती मधुर, निवती सेविता एक बिंदु॥

झाले गेले कितिक परि ते ग्रंथ आहेत नित्य
आनंदाला वितरुन जगा दाविताती सुपंथ
सेवा धामी विपिनि करिता ग्रंथ तैशीच कारी
नाही सा-या भुवनि असले मित्र नित्योपकारी॥

रात्री प्रात:समयि उघडा ग्रंथ केव्हाहि वाचा
युष्मत्सेवा विपुल करणे हाच आनंद त्यांचा
हिंडायाची अविचलमने काळसिंधूवरून
ज्याला इच्छा, फिरविति तया ग्रंथ हातात धरून॥

नानालापे रमविति मना ग्रंथ ही गोड वेणू
जे जे वांछी मन वितरिती ग्रंथ ही कामधेनू
मातीलाही कनक करिती लाजवीती परीस
नाही मोठा हितकर सखा अन्य ग्रंथापरीस॥

आयुष्याची हितकर दिशा ग्रंथ हे दाखवीती

जीवित्वाची शिकविति कला नूतना दृष्टि देती
उन्मत्तांना नमविति विपदग्रस्त त्या हासवीती
प्रज्ञावंत स्थिर करुनिया मूर्ख त्या लाजवीती।।
संबोधूनी करिति जगदुत्कर्ष हे ग्रंथ साधे
ग्रंथलोके मनुजमतिला कार्यकौशल्य लाधे
नि:स्वार्थी हे अखिल-भुवनाचार्य सदग्रंथ दिव्य
मानव्याला उचलिति वरी पंथ दावीत भव्य।।

माता भ्राता प्रियसख गुरु तात वा रम्य कांता
नानारुपे रमविति पहा ग्रंथ हे मानवाता
जे ना कोणाप्रतिहि कथिले ग्रंथकारे विचार
ते या ग्रंथी प्रकट, उघडे अंतरातील सार।।

सांगे ना जी प्रियतमजनापाशिही ग्रंथकार
ओती ती हो खळबळ इथे, विवृत स्वांतदर
पापुद्रे ते सकळ दिसती चित्तकंदावरील
येई सारे हृदय कळुनी गूढ गंभीर खोल।।

ग्रंथाकारे विमल अमरा दिव्यरंगा समाधी
लावण्याची परम मधुरा लेखक स्वीय बांधी
कैसे तेथे झळकति हि-यांसारखे सद्विचार
जैसे नानाविध मणि तसे भावनांचे प्रकार।।

ग्रंथामाजी अमर असती दिव्य चैतन्यरुप
कर्ते, विश्वा सुखविति सदा मोद देती अमूप
केव्हाही ना मृति शिवतसे थोर सदग्रंथकारा
लोकोद्धारा निशिदीन उभा द्यावया ज्ञानधारा।।

त्रैलेक्यी या फिरविति तुम्हां ग्रंथ देऊन पंख
तत्त्वज्ञानी कवि मुनि तसे भेटती राव रंक
अंतर्यामी उसळविति ते गोड आनंदपूर
केव्हा केव्हा रडविति किती गाउनी दु:खसूर।।

संसाराचे त्रिविध मनुजा दाविती ग्रंथरुप
नाना रुपे मनुजहृदया ज्ञान देती अमूप
छेडोनीया तरल हृदयी सूक्ष्म तारा अनंत
जीवात्म्याला परिसविति ते दिव्य संगीत ग्रंथ।।

जे जे काही घडत असते मानवी जीवनात
अंतर्बाह्य प्रकट करिती ग्रंथ सामर्थ्यवंत
अंत:सृष्टी गुरु किती तरी बाह्यसृष्टीपरीस
ते सद्ग्रंथांवरुन कळते होइ अंतर्विकास॥

केव्हाही दुर्मुख न दिसती ग्रंथ नित्य प्रसन्न
ना कोणाला कथितिल कधी गोष्टी त्या भिन्न भिन्न
ग्रंथांऐसे परमसुख ना देखिले या जगात
ग्रंथी होता निरत मज तो होउ दे मृत्यु प्राप्त॥

आदर्शाला, शुभ अशुभ वा स्वीय रुपा बघाया
देती ग्रंथ स्वकरि मनुजा, या मिषे उद्धाराया
'सत्याचा तो विजय ठरला, सत्य पूजा सदैव'
सद्ग्रंथी हे सतत असते सूत्र हो एकमेव॥

माते ना ते विभव रुचते राजवाडे नको ते
नाते गोते मजसि नलगे नाम मोठे नको ते
वस्त्रांची ती तलम न रुची ना अलंकार काम
व्हावे माझ्या निकट परि हे ग्रंथ कैवल्यधाम॥

रात्री माझ्या निकट असु दे तैलसंपूर्ण दीप
इच्छा नाही इतर असु दे ग्रंथराजे समीप
कोठे रानी मग सदनि वा अन्य देशी तुरुंगी
आनंदाने परिहरिन मी काळ सद्ग्रंथ-संगी॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

## गुढीपाडवा

नूतन संवत्सर आला। मोद मनाला बहु झाला
घालुन सुंदर सडे पथी। शोभा करिती लोक किती
उंच गुढी ही उभारली। चमके तेजे नभ:स्थळी
सुंदर पट सुंदर माळा। गुढी सजवली सुमंगला
मंद वायुने कशी डुले। जनमतिकलिका मुदे खुले
विसरा मागिल शुभाशुभ। नूतन करणे आरंभ
विसरा मागिल कलहाना। विसरा मागिल अपमाना
विसरा दुष्कृति मागील। टाका पुढती पाऊल
मागिल मंगल घेऊन। पुढेच जाऊ चालून
निर्मा उज्ज्वल आकांक्षा। निर्मा हृदयी शुभ वांछा
नूतन जीवन सजवावे। आशेने पुढती जावे
दु:ख दैन्य नैराश्य कथा। हरु संहरु जगदव्यथा
आनंदरसा निर्मू या। विपुल समस्ता देऊ या
आनंदाचे साम्राज्य। स्वातंत्र्याचे साम्राज्य
मांगल्याचे साम्राज्य। भूवर निर्मू या आज
चला सकल सवंगडे तुम्ही। आपणास ना काहि कमी
स्वर्ग धरित्रीवर आणू। पृथ्वी मोदाने न्हाणू
विजयध्वज उभवू दिव्य। स्वातंत्र्याचे ते भव्य
चला उभारा गुढी उंच। कुणी न राहो जगि नीच
करु वर अपुल्या या माना। घेऊ सन्मानस्थाना
गुढी नाचते गगनात। श्रद्धा नाचे हृदयात
सदैव आशा बाळगुन। सदैव विजयी होऊन
गुढीपाडवा शुभंकर। करु साजरा खरोखर॥

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९१९

## नागपंचमी

अजि नागपंचमीचा। आला पवित्र वार
निज अंतरंगी आज। राखा मुळी न वैर
हृदयात प्रेमपूर। भरपूर आज वाहो
आनंद सर्व जीवा। जगतात आज राहो
हा नागपंचमीचा। दिन थोर थोर साचा
जो सर्प मूर्त मृत्यु। त्यालाहि पूजण्याचा
मृत्युहिही गोड माना। सर्पाहि पूज्य माना
जो दुष्ट घेइ चावा। त्यालाहि देव माना
सर्वांतरी सदंश। सर्वात सच्चिदंश
आहे शिकावयाचे। हे नागपंचमीस
प्रेमा सदैव देऊ। अवघ्या चराचरास
आहे शिकावयाचे। हे नागपंचमीस
नागाहि पूज्य मानू। त्या प्रेम गोड देऊ
मग बंधुबंधु आम्ही। किति गोड रीति राहू
हा थोर थोर दिवस। दिधला तुम्हां आम्हांस
घालून पूर्वजांनी। प्रेमा शिकावयास
वर्षात एक दिवस। ना सुष्ट दुष्ट पाहू
दिनी ह्या तरी निदान। सर्वांस प्रेम देऊ
अद्वैत तत्त्व थोर। कर्मात आणण्यास
आहे शिकावयाचे। हे नागपंचमीस
ती संस्कृती उदात्त। अपुली शुभा अनंत
जणु साठवीत एका। ऋषि नागपंचमीत
त्या थोर पूर्वजांची। पाहून थोर दृष्टी
मज येतसे भरुन। ही होइ अश्रुवृष्टि
डोळ्यांमधून आज। वाहोत प्रेमगंगा
सौख्यांबुधीत सारे। या रे विशंक डुंबा
वाणीमधून आज। माधुर्य ते स्त्रवू दे
करणीमधून सर्व। स्नेहामृता झरू दे

वेलीवरील फूल। तेही न आज तोडा
हिरव्या तणांकुराला। त्याही न आज तोडा
काडी न आज मोडा। लावा कुणा ढका न
प्रेमात आज राहो। सृष्टी उभी बुडून
घ्या फावडे न कुदळ। असतील जीवजंतू
दुखवा न त्यांस आज। आणा न त्यांस अंत
भूमाय ही क्षमेची। मूर्ती तिला न दुखवा
न खणा मुळीच आज। गाऊन गीत सुखवा
जगतात आज कोणा। भयभीति ती नसू दे
आजी परस्परांत। विश्वास तो वसू दे
लघु जीव कीड मुंगी। तृणपर्ण मृत्कणाही
दुखवी न आज बंधो। सर्वत्र देव पाहि जीव
सर्वत्र आत्मतत्त्व। समदृष्टि थोर ठेव
सकलांहि त्या सणांत। ह्या नागपंचमीस
आहे महत्त्व फार। वाटे मदंतरास

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२८

## दसरा

आला दसरा, रमणीय सुखाचा हसरा॥ आला....॥

माझे मम ही सीमा लंघा
शमवा अंत:कलिचा दंगा
परोपकारामाजी रंगा
दु:खा विसरा॥ रमणीय....॥

अज्ञानाची संपो रात्री
लावा ज्ञानाच्या त्या ज्योती
भू-मातेची मंगल किर्ती
भुवनी पसरा॥ रमणीय....॥

सदगुण-सोने आज लुटू या
दुर्गुण सारे दुरी घालवु या
निज-चित्तावर मिळवू विजया
हे ना विसरा॥ रमणीय....॥

मनावर जरी विजय मिळेल
स्वातंत्र्यादिक सहज येतिल
भाग्यश्री ती धावत येइल
शंका न धरा॥ रमणीय....॥

◘ ◘ ◘
-अमळनेर छात्रालय, १९२७

# संक्रांत

मकर-संक्रांत
सुखाच्या सुकाळा
चला हलवा करु
या रे सारी जणे
कलह-मत्सर
शेगडी पेटवा
कळकळ तळमळ
शेगडीच्यावर
स्नेहाचे घ्या तिळ
भक्तीच्या शर्करे
औत्सुक्याच्या हाते
सुंदर हलवा
प्रेमाचे रोमांच
पितळी ती फुले
दयेचा श्रद्धेचा
रंग केशराचा
दिव्य हा हलवा
मने जोडणारा
चला एकमेकां
गोडीने या राहू
आली शुभ वेळा
चला करु
मोठ्या आनंदाने
श्रमावया
कोळसे जमवा
हृदयाची
पितळी सुंदर
द्या ठेवून
निर्मळ साजिरे

पाक करा
हळूच हलवा
होऊ लागे
काटा हाच खुले
हलव्याने
सहानुभूतीचा
हाच शोभे
मने मोहणारा
अभिनव
देऊ घेऊ खाऊ
संसारात

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२७

## लहान मित्राबद्दल!

असे माझा मित्र हो लहान। तदगुणांचे परि सकल करिति गान
ऐकुनीया किति सौख्य होइ माते। असे ठाव ते फक्त मन्मनाते।।

दृष्टी निर्मळ मुखमंडल प्रसन्न। दिसे न कधी तो कुणालाहि खिन्न
दु:ख निज लपवी, अन्य दु:ख जाई। हरायाते तो सदोदीत पाही।।

वीणिमाजी वाहते प्रेमगंगा। करि न कोणाच्या कधी मनोभंगा
हृदय हाळु त्यांचे फुलापरी रम्य। कार्यशक्ति परी तदीया अदम्य।।

शील त्याचे सर्वांशि निष्कलंक। करी जवळ सदा गोरगरिबरंक
गर्व चित्ताला नसेच तो ठावा। जगन्मित्र जणू कुणाशी न दावा।।

अंतरंगी खेळवी सद्विचार। घडे हातुन सर्वदा सदाचार
जरी घडली हातून अल्प चूक। अश्रु आणिल लोचनी करिल शोक।।

निज स्वल्पहि अपराध घोर मनी। परी दुस-याचा चित्ति कधी नाणी
जरी दुस-याचा अल्प गुण दिसेल। स्तवन त्याचे करुनिया मनि
सुखेल।।

देशभक्तीचा तदंतरी पूर। देशसेवेचा हृदयि उठे सूर
वस्तु परदेशी सदा ठेवि दूर। तया स्वातंत्र्याचीच हूरहूर।।

स्वता वापरुनी शुद्ध साधि खादी। वळवि परमनही गोड वचें बोधी
कार्य करुनी जो ना कधी वदेल। निज स्तुति ऐकुन लाजुन जाईल।।

कार्य दुस-याचे सतत ये कराया। स्वयंसेवक तो स्रवदा सहाया
असा नाही पाहिला युवा अन्य। बघुनि त्याला वाटते धन्य धन्य।।

मुखी त्याच्या ते हास्य सदा गोड। शब्द अमृतासम नाहि तया जोड

प्रेमपूर्ण किती सरळ मधुर डोळे। दिव्य सुंदर ते तेज भाळि खेळे।।
दंत निर्मळ ते जणू मोतियांचे। अधर पातळ जणू वेल पोवळ्यांचे
नाक सरळ परी जरा बाकदार। दिसे मुद्रा दिलदार ती उदार।।

सदा गाठाया ध्येय उच्च पाही। सदा दिनदिन जो वरति वरति जाई
थोर त्याचे ते जीवन मज वाटे। तया पाहुन गहिंवरे हृदय दाटे।।

असे त्याला शुभ नाम नामदेवष करो नामासम वर्तना सदैव
नाम अन्वर्थक देवराय होवो। तुझी त्याच्यावर सर्वदा दया हो।।

प्रभो! तुमच्या मी लागतसे पाया। तयावर ठेवा सदा दया-छाया
मनोरथ त्याचे पूर्ण करा देवा। तच्छिरावरती वरदहस्त ठेवा।।

मदायुष्यहि हे तयालागि द्यावे। असे जे जे मत्सत् तयास द्यावे
प्रभो! सांभाळी त्यास तू कृपेने। सकल संकट मोहादि लयाते ने।।

दयासिंधो हे दीनबंधु देवा। असे माझी प्रार्थना एकमेवा
मित्र माझा मत्प्राण जणू अन्य। कृतार्थ करा तज्जीवनास धन्य।।

◙ ◙ ◙

-अमळनेर छात्रालय, १९२७

## लहानपणची आठवण

होतो मी लहान
आनंदाने मनी
नाचता नाचता
क्रीडा-रसपान
टपकन आवाज
जीव माझा भ्याला
भानावरी आलो
अंगणी हिंडलो
देखिले मी दृश्य
माझे तो लोचन
झाडावरुनिया
पडलेसे साचे
लोळा गोळा त्याचे
मन्मना गहिवर
आसन्नमरण
घरात घेवोनी
मऊ कापसाची
झारी आणीयेली
चिमुकली चोच
घातले, हत्सिंधु
मधून ते पाहे
हृदय कोवळे
बारीक धान्याचे
चोचीत घातले
मज त्या वेळेला
खेळ तो रुचेना
पिलाच्या समीप
कोठेही न गेलो
फिरवीत डोळे
जीव हुरहुरु
हात लावताच
खेळत अंगणी
नाचतयसे
हरपले भान

करीतये
अंगणात झाला
एकाएकी
पाहू मी लागलो
चहूकडे
अत्यंत करुण
ओलावले
पिलू पाखराचे
विव्हळत
पंख ना खंबीर
आवरेना
पिला उचलोनी
शीघ्र आलो
गादी छान केली
पाणियाची
उघडून बिंदु
हेलावत
उघडोनी डोळे
माझे भरे
कण मी आणिले
हळूहळू
काहीही सुचेना
खाणेपिणे
बसून राहिलो
सोडूनिया
दुर्बळ पाखरु
करी माझा
चीं चीं चीं चीं करी
हृदय विदारी
त्याच्या मऊ अंगा
कापूसही टुपे
होते हबकले
वेदना अपार
‘कैसे याचे दु:ख
काय मी रे करू
देवा आळविले
दयेच्या माहेरा

पाखराजवळ
त्याला समजावित
‘खाई दाणापाणी
काय तुज माझा
नको रागवू हो
वाचवाया प्राण
होई बरा नीट
मग जा तू थेट
आठवण तुज
कुशीच्या उबेची
येईल स्मृती हे
जरा होई पाहे
येथे उणे तुज
करांत घेईन
गादी मऊमऊ
त्यावर निजवीन
माझे न ऐकशी
तोंड हे मलूल
आई, बघ कैसे
कैसे काय करू
आई बघ याला
काही तरी करी
उपाय थकले
मिटीत तो डोळा
त्याचा शब्द
हात माझा खुपे
जणू वाटे
उंचावरुन फार
होती त्यास
अजाण मी हरू
देवराया’
‘वाचव पाखरा
विश्वंभरा’
होतो मी बोलत
गोड शब्दी
पी रे माझ्या राजा
राग येतो

मीही रे लहान
झटे तुझे
होई जरा धीट
आईकडे
येते का आईची
गोड गोड
खरे जरी आहे
चांगला तू
पडू ना देईन
कुरवाळोनी
तुला मी घालीन
थोपटून
का रे गोड बोल
का रे केले
करीत पाखरु
सांग मज
होते काय तरी
उपाय तू'
झाला लोळा गोळा
क्षणामाजी
मृदुल ती मान
हृदयरडले
पाखरा राजसा
मजसी तोडून
मी ना कोणी तुझा
आई आहे परी
धाय मोकलील
प्राण ती सोडील
चोचीमध्ये दाणा
तुला न बघून
रडेल ती शोके
घिरट्या घालील
तुझ्या आईसाठी
नको ताटातुटी
मऊ मऊ तुला
टाकून तू प्राणा
संबोधिले ऐसे

पावले ते मृती
मी माझ्या लहान
“मूठमाती यास
आईजवळून
घेतले पवित्र
सोवळ्याची होती
फाडून घेतली
रेशमाच्या वस्त्री
गुंडाळून, गेह
बागेमध्ये गेलो
जेथे त्या फुलती
मोग-याजवळ
रडत खणली
आसवांच्या जळे
पवित्र ती केली
दगडधोंड्यास
टाकून पडले
माझे किती
गेलास सोडून
क्षणामध्ये
वाटे तुला जरी
घरी तुझी
टाहो रे फोडील
तुझ्यासाठी
येईल घेऊन
रडेल ती
वेडी ती होईल
भिरीभिरी
तिच्या प्रेमासाठी
करु राजा
घातला बिछाना
जाशी परी
पाखरास किती
हाय गेले
बोललो भावास
चल देऊ”
रेशमाचे वस्त्र

गुंडाळाया
जुनी एक चोळी
धांदोटी मी
पिलाचा त्या देह
सोडियेले
मोगरे शेवंती
तेथे गेलो
जागा नीट केली
खळगी एक
भूमी ती शिंपिली
जणू आम्ही
बाजूस करोनी
देह उचलोनी
फुले ठेवीयेली
अश्रू ते नेत्रीचे
शेवटले स्नान
पिलाला प्रेमाचे
डोळ्यांतील धारा
लोटिली ती माती
मऊ मेणाहून
त्यावर लोटून
डोक्यावर तेव्हा
शोकाने भरलेला
पिलाची ती आई
वर घिरट्या घाली
"तुझे बाळ गेले
नको ओरडोनी
त्याला नाही काही
मातृप्रेमाविणे
दिले त्याला पाणी
दिले बिछान्यास
नको ग ओरडू
माझी कासाविशी
बैसली पक्षिणी
करी आर्तस्वर
उरलेली माती
माता ती पहाते

कठोर वाटले
डोळ्यांतून लोटे
माती लोटुनिया
माता येई तीर
हुंगीतसे माती
डोळ्यांतून पाणी
प्रदक्षिणा घाली
मातीत खुपसूनी
ठेवियेला
शेजारी तयाचे
थांबती ना
घातले अश्रूंचे
दु:खाचे ते
स्नान त्या घालिती
मोठ्या कष्टे
मऊ लोण्याहून
दिली माती
पक्षी ओरडला
त्याचा शब्द
पहावया आली
केविलवाणी
गेले हो पक्षिणी
फोडी टाहो
पडू दिले उणे
सारे दिले
दिले त्याला घास
मऊ मऊ
माऊली तू अशी
होई फार"
वरी डहाळीवर
आरडून
लोटिली मी हाते
भरल्या नेत्री
कर्तव्य ते मोठे
अश्रुपूर
झालो आम्ही दूर
तैशी खाली

प्रेमळ पक्षिणी
माझ्या आले
पिलास पक्षिणी
चोच राही
शेवटला घास
शेवटल्या बोला
गेली ती माउली
माझा शोके ऊर
गेली ती पक्षीण
करित आर्तस्वर
बळे शोकपूर
आलो हो निघून
आईस म्हणालो
माझे गेले आज
दहा दिन त्याचे
आसवी भिजवीन
मोग-याजवळ
तेथे मी रडेन
आई म्हणे, “वेड्या,
कर्तव्य तू केले
पाखराला रोग
सुतक कशाला
मोग-याला तुझ्या
त्यात ते बसेल
तुम्हांला बघेल
सुगंध अर्पील
जा ये हातपाय
नको करु कष्ट
जेवायचे झाले
श्रमलासी फार
आईचे बोलणे
माझी मी धुतले
हातपाय माझे
जेवाया बैसलो
पोटामध्ये एक
भरोनीया येई
घास नेता वर

पिला जणू दिला
बोले जणू
पुन्हा डहाळीवर
फुटू पाहे
उडूनिया दूर
गेली गेली
आम्ही आवरुन
घराप्रती
"शिवू नको मज
पाखरु ते
सुतक धरीन
जागा त्याची
रोज मी जाईन
दोन्ही वेळा"
सुतक कसले
ये घरात
नव्हता कसला झाला
तरी त्याचे
फुले जी येतील
येऊनिया
प्रेमाला देईल
गोड गोड
धुवून ते नीट
आता मनी
घेई घास चार
पंढरी तू"
ते तदा ऐकिले
हातपाय
धुवुन मी आलो
खिन्न मनी
घासही न जाई
अंतरंग
तोंडाच्या जवळ
वरुन ते जळ
खाऊन बळेच
सदगदीत झालो
काही दिन चैन

पुढेपुढे त्रास
शोकापूर गेला
खेळात बुडाली
संसारसागरी
करी चमत्कृती
आज तो प्रसंग
लिहून काढला
लहानपणीचे
आहे का अजून
का झाले पाषाण
जगी वावरुन
सोनियाचा घडा
ठेवावा भरुन
सत्स्मृतींची सुधा
प्राशावी पाजावी
गोड आठवणी!
आज नाही साचा
करी माझे मन
प्रेमाने भरलेले
जीवनात माझ्या
आणावी निर्मळा,
प्रेम मानवांना
प्रेम सर्व प्राण्यां
प्रेम देऊ दे गे
पाषाण मृत्कणां
सर्वत्र पाहू दे
वर्षु दे सत्प्रेमा
घळघळे
थोडेसे मी गेलो
पुन:पुन्हा
पडेना जीवास
ओसरला
आठवण गेली
वृत्ती पुन्हा
संस्मृती विस्मृती
अभिनव
पुन्हा आठवला

भरल्या मने
प्रेमळ मन्मन
जैसे तैसे?
भावनाविहीन
इतुकी वर्षे?
मानवी जीवन
सतस्मृतींनी
भरुन ठेवावी
स्नेह्यांसख्यां
लहानपणीचा
राहिलो मी
पुन्हा आज ओले
करी पुन्हा
पुन्हा प्रेमकळा
आठवणी!
प्रेम पाखरांना
देऊ दे गे
झाडा माडा तृणा
देऊ दे गे
मला माझा आत्मा
निरंतर

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२६

# मृत्युमित्र

( कोलेरिज कवीने एका अर्भकाच्या मृत्युप्रसंगी चारच ओळींचा श्लोक लिहिला, त्याचा अनुवाद.)

अद्याप पातकाने। नाहीच स्पर्शिलेली
अद्याप दुःखदैन्ये। नाहीच भाजिलेली
तो येइ मृत्युमित्र। कळि गोड ही खुडीत
फुलली न पूर्ण तोची। देवासमीप नेत
'देवासमीप आता। कलिके फुले सुखाने
येथे किडी न खाती'। मृत्यू वदे मुखाने

◘ ◘ ◘

-अमळनेर १९२८

## शांति कोण आणते?

(जगात मोठमोठ्या लढाया होताता. शेवटी तह होतात. शांती येते. परंतु हे तह, ही शांति कोण घडवून आणते? सतीचे अश्रू व संतांची प्रार्थना. एका इंग्रची कवितेच्या आधारे.)

शस्त्रास्त्रांनी सुटती न कधी प्रश्न ते जीवनाचे
ना केव्हाही मिटतिल लढे संगराने रणाचे
शांती येते भुवनि न कधी बाँबतोफादिकांनी
अर्की निर्मी अमृतरस हे ऐकिले काय कोणी?॥

युद्धी जाई पति मरुनिया होइ पत्नी अनाथा
बाळा घेई जवळि रडते फोडूनी स्वीय माथा
शोकावेगे अगतिक अशी सोडिते अश्रुधार
त्या अश्रूंनी सकल जगती शांतिचा येइ पूर॥

"येवो देवा! सकल भुवनी प्रेम, दावी सुपंथ
मद्वंधना, सतत चुकती, तू क्षमा मूर्तिमंत"
ऐशी अंत:करणि करि जी प्रार्थना नित्य संत
आणी तीच प्रशमुनि रणे शांततेचा वसंत॥

जे कारुण्ये कढत कढत श्वास तो संत सोडी
त्यांच्यामध्ये अभिनव असे तेच त्याला न जोडी;
धर्मग्रंथांमधिल सगळे सार ते मूर्तिमंत
सत्यश्रू तो उभय मिळुनी होतसे आपदंत॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, फेब्रुवारी १९३१

## गायीची करुण कहाणी

रवि मावळला, निशा पातली, शांत दिसे हे जग
संपुन कामाची भगभग
तमे हळुहळु पहा पसरिले पट काळेसावळे
त्यात त्रिभुवन गुरफटविले
गगनी लुकलुकती तारका
अवलोकनास सुखकारका
न परी अंधकार-हारिका
चांदोबा बालकानंदकर आज दिसेना वरी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

“वियेल आजी गाय आपुली, बाबा! सोडू नका
कोणी लाविल तिजला ढका
भरलेले गोजिचे दिवस तिज पाडस होइल नवे
आम्ही खेळू मग त्यासवे
गोजी दूध बहुत देइल
खर्वस, आई! तू करिशिल
आम्हां नाही ना म्हणशिल
गंमत होइशल मोठीच करु मजा अता लौकरी”
प्रभु तव कठोर करणी खरी॥

बाप म्हणे निज मुलांस “मजला विचार करणे पडे
गोजिस उपवास घरी घडे
दोन चार दिन जातिल अजुनी चिंता काहि न करा
देवा हृदयामाजी स्मरा
जाइल जर गाय फिरावया
तृण तिज मिळेल ते खावया
काडी एक न घरि द्यावया”
ऐसे बोलुन विचारपूर्वक दावे करि तो दुरी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

मंद मंद पाउले टाकिते धेनु सुखाने चरे
पोटी गर्भ वाटले फिरे
प्रसवसमय ये जवळ तिचा मग तृण खाणे संपले
पोटी कळा, अंग तापले
पुढती तदगति ती खुंटली
तेथे गरिब गाय थबकली
पथ गाडिया असे पदतळी
विचार तो न, प्रसववेदना तिजला कष्ट करी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

दहा वाजुनी गेले होते रात्रीचा समय तो
अधिकचि अंधकार दाटतो
त्या मार्गाने गाडी जाई वेळ तिची ती असे
परि ते धेनुमानसी नसे
पुढचे कोणाला कळतसे
मी मी म्हणणारा चुकतसे
ही तर गाय बिचारी असे
या मार्गाने जाइल गाडी विचार न तदंतरी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

रागाने फणफणे भगभगे गाडी येई जवे
येणे जाहिर करि निजरवे
उशीर झाला जणु जायाला बेफामपणा दिसे
स्वैरिणि धावपळ करीतसे
'मार्गातून दूर हो सरा
जरि परिसाल न होइल चुरा
जावे लागे मग यमपुरा'
प्रचंड ऐसा घोष करित ये, घसा न बसतो परी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

हाकेवरती गाडी आली शब्द तिचा ऐकला
धेनुस टाकवे न पाउला
सर्व गर्भ बाहेर न आला प्रसवसमयवेदना

होत्या होत तिला दारुणा
जो जो निकट गाडि येतसे
तो तो चित्त तिचे उलतसे
बळ हलण्यास जागचे नसे
मरणाचा अति दु:खद आला विचार धेन्वंतरी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

मृत्युभयाने धेना दचकली, खचली, थरके मन
मानस मृदुल निघे पोळून
बहुतेक तिचा गर्भ येत चो बाहेरी भितिने
तो तिज गाठिलेच गाडिने
विलंब पळभर तेथे नसे
करुणा दया न काही वसे
झरझर गाडी ती जातसे
जसा विजेया लोळ कोसळे गदारोळ ती करी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

दीन गायिने मरणकाळचा हंबरडा फोडिला
गगनी विलयाला पावला
जवळ न कोणी करुणासागर म्हणती परमेश्वर
परि ते कठिण तदीयांतर
अंग च्छिन्नभिन्न जाहले
चेंदुन जाइ वत्स कोवळे
तेथे रक्त-तळे तुंबले
क्रूर गाडिने बळी घेतला घेइ असे कितितरी
प्रभु तव कठोर करणी खरी॥

वज्रालाही पत्थरासही पाझर फुटते तदा
पाहुन धेनूची आपदा
प्रात:काळी करुण दृश्य ते पाहुन पुलकित जन
भरती पाण्याने लोचन
हळहळताती नारीनर

करिती गमन मग घरोघर
वदती किती एक परस्पर
सुखदु:खाच्या द्वंद्वामधुनी सुटली ही लौकरी
प्रभु तव कठोर करणी खरी।।

केविलवाणी करुण कहाणी धन्यास जेव्हा कळे
मानस त्याचे शोके जळे
म्हणे मनी “निज बाळाचे नच हितवच मी ऐकिले
कटु हे फळ मज देवे दिले”
येती अश्रू डोळ्यांतुन
स्फुंदस्फुंदत बाळकगण
घरात रडती नारीजन
असे कोण तारिता, मारणे त्याच्या चित्ती जरी
प्रभु तव कठोर करणी खरी।।

◙ ◙ ◙

-अमळनेर,१९२८

## जीवनमित्रास!

(मरण ज्याच्या जवळ आले आहे, परंतु जो जगू इच्छित आहे, असा एक तरुण आपल्या जीवनास उद्देशून म्हणतो. इंग्रजीत अशी एक लहान कविता मी वाचली होती. ती कल्पना मनात येउन ही मी मराठीत लिहिली आहे.)

“चिरमित्र सखा सहोदर
मम तू मित्र उदार सुंदर
सहसा निघतोस सोडुनी
मम माया सगळीच तोडुनी॥

वदु काय कसे कळेच ना
वच कंठातुन ते निघेच ना
सगळे स्वचरित्र आठवे
हृदयी शोक अपार साठवे॥

सदया सखया! मनोहरा!
वद केवी उघडू मदंतरा
मज सोडुन ना गड्या निघे
मम आशा मम हेता तू बघे॥

किति येता विचार मोहना!
प्रिय मित्रा मम गोड जीवना
सखया! मज एक ठाउक
घडली भेट तुझी, न आणिक॥

जमली तव नित्य संगती
परि केव्हा कधि वा किमर्थ ती
न कळे न वळे मला लव
सगळे त्या प्रभुचेच लाघव॥

धरिली तव फार आवडी
किति माझी जमली तुझी गडी
दिनरात्र सदैव सन्निधी
तुझी माझी नव्हती तुटी कधी॥

हसलो रडलो कितीकदा
परि देशी मज धीर तू सदा
सुखदु:खरसी सखा खरा
मज देशी न कधीहि अंतरा॥

रडवीत अनंत आपदा
परि तू मन्निकटी उभा सदा
पुशिशी स्वकरे मदश्रुते
प्रियबंधो किति केवि वर्ण ते॥

सखया! सकला मदंतर
स्थिति तू जाणिशि जेवि ईश्वर
सदसत् मम जे तुजप्रती
कळलेले तुज सांगु मी किती॥

विहरून अभिन्न आपण
भुवनी जो मिळाला कधी कण
कटु गोड तसाच चाखिला
न दुजा भाव मनात राखिला॥

बघता तरि तू अमूर्तसा
हृदयी राहुन निर्मिशी रसा
तव रूप न देखिले जरी
तव तो वास सदा मदंतरी॥

नयने नयनांत पाहणे
तुज बाहेर तसे विलोकणे

वरिशी मशि एकरूपता
असशी व्यापुन पूर्ण हतस्थिता॥

कधि शुभ्र सुरेख चांगले
कधि काळे तुज रंग मी दिले
सजवीत तुला जसे सुचे
नटशी तूही तसा, तुला रुचे॥

न कधी तुज रुष्ट देखिले
किति तू प्रेम मला सदा दिले
चढशी पडशी बरोबर
बसशी वा पळशी भराभर॥

प्रगती अथवा अधोगती
त्यजिली तू न मदीय संगती
गगनी चढवूनिया वरी
तुज मी दाखविली पुन्हा दरी॥

कधि वैभवता तुला दिली
कधि कष्टस्थिति तीहि दाविली
तुज ना कुरकूर माहिती
तव निष्ठा तरि वर्णु मी किती॥

कधि रम्य विलास मांडिले
झणि सारे परि ते झुगारिले
वदशी परि एक शब्द ना
करु मित्रा तव केवि वर्णना॥

मम बाल्य तसेच यौवन
बघुनी जाशिल काय सोडुन
न मदीय विकास जोवरी
सखया तू न वियोग आदरी॥

मज सोडुन घोर या तमी
नच जाई, वरती चढेन मी
तुजला नटवीन मी बघ
पसरीन त्रिजगात सौरभ।।

घसरेन न मी अत:पर
मम कर्तृत्व दिसेल सुंदर
धवलोज्वल कांति देइन
तुजला जाउ नकोच सोडुन।।

पुरवीन गड्या तुझे लळे
पिकवीतो बघ मुक्तिचे मळे
बघ हे दिसती मुके कळे
न फुलावे वद का? तुला कळे।।

कसुनी खपुनी किती बरे
बघ केली मृदु शुद्ध भूमि रे
झणि येइल खास पाउस
सखया जाइ न तू, न रे रुस।।

जरि मी फिरलो इतस्तता
क्षण मी ना दवडीन रे अता
घडली जरि हातुनी अघे
मज कंटाळुन जाइ ना, बघे।।

करितो अध- मार्जनाप्रती
सखया! नित्य करीन सत्कृती
अजिपासुन नूतना दिशा
मज लागे, मग सोडिशी कसा?।।

अपुले रमणीय गोड ते
स्मरणीय स्मर तू प्रसंगी ते
भरसागरि तू न सोडिले

दिसते तीर न सो, ना भले॥

किति रे अनुरक्त आपण
कधि झालो न वियुक्त रे क्षण
अशनी शयनी जिथे तिथे
अविभक्त, स्मर, अंतरंगि ते॥

जरि वृंत गळून जातसे
जगती या जगणे फुले कसे?
जरि नीर समग्र आटले
तरि ते नीरज केवि रे फुले?॥

रुसुनी जरि जाइ अंबर
च्युत नक्षत्रतीहि सुंदर
तरुला जरु मळ ना धरी
तरि कैसे फळफूल ते वरी?॥

खुडिता स्पृहणीय अंकुरा
मिळते ते न कणीस ना तुरा
जरि निर्झर बंद होइल
तरि वापी सुकुनीच जाईल॥

करिता दुरि जीवनाश्रया
मग पावे झणि वस्तु ती लया
न तुझ्यावर का विसंबून?
करि, मित्रा! न कठोर रे मन॥

तुज निष्ठुरता न शोभते
तवठायी मम दृष्टि लोभते
तुजवीण जगी न मी उरे
मज आधार तुझाच एक रे॥

जगी होइन नीट चांगला
मग सारे म्हणतील हा भला
जगतास सुखास देइन
न जगाला मुळि भार होइन॥

मम गोड फुलेल जीवन
मग तदगंध सुटेल पावन
जगता वितरीन मी रस
जगता या नटवीन नीरस॥

फुलवी सुमनांस भास्कर
नटवी जीववि सृष्टि सुंदर
फुलवीन तशी जनांतरे
मनि माझ्या किति ये असे बरे॥

किति खेळवितो मनी अशा
मधु आशा, परि मारिशी कशा?
मम हेतु अपूर्ण राहती
किति वाटे मनि खेद ना मिति॥

न तुला दिसली सरस्वती
मम संगे, न तशी रमा सती
दिसली न उमाहि चिन्मया
म्हणुनी काय अधीर जावया?॥

मजला जगि मित्र ना कुणी
मज गेले सगळेच सोडुनी
मजला तव आस होति रे
परि तूहि त्यजिशी कसा बरे?॥

गळले सगळे मनोरथ
मम आशा सगळ्या पदच्युत

पुरवी न जगात एकही
मम सद्धेतु कठोर देवहि।।

सगळा मम धीर मावळे
किति नेत्रांतुन नीर हे गळे
दिधले मम सर्व मी तुला
परि जाशी अजि सोडुनी मला।।

जगि जन्म मदीय जाहला
तव मी स्नेह तदैव जोडला
तुज मी दिनरात्र पूजिले
परि माते अजि तूच टाकिले।।

रडण्यास्तव मात्र जन्मलो
जगता केवळ भार जाहलो
मज सोडुन जाशि, जीवना!
किति जाळी, बघ, शोक मन्मना।।

मज सोडु नयेच ती, असे
जरि वाटे बहु, ते घडे कसे?
मजपासुन जाशि जै दुरी
पहुडोन क्षितिला हतापरी।।

जगतास समीप ओढले
परि माते जगतेच सोडिले
अपवाद तुझा तरी कसा?
नशिबाता मम खेळ हा असा।।

करु मी तरि काय हाय रे!
मम उदध्वस्त समस्त हाय रे
पुरला मम हेतु एक ना
मज जाशी रडवून, जीवना!।।

किति रे हुरहूर मानसी
हृदयी क्रंदन धीर ना मशी
मम स्वप्न समस्त संपले
जणु शंपाहत चित्त कंपले"।।

विनवून सुदीन जाहलो
सखयाच्या किति कंठि झोंबलो
करुणा नुपजे मनामधी
मम हेलावुन ये हृदंबुधी।।

फिरुनी वदलो सगदगद
"मम मित्रा! धरितो तुझे पद"
परु तो न बघेहि निष्ठुर
अति झाला गमनार्थ आतूर।।

वच ऐक सख्या मदंतिम
परम प्रेम तुझ्यावरी मम
न मज, त्यज मत्सवे रहा
बघशी मन्मुखही न रे अहा।।

सकल प्रियबंध लोपले
तव माझ्यावर नेत्र कोपले
तुटते अजि भावबंधन
गळते मदहृदयावलंबन।।

सखया! जरि जाशि जा परी
वदतो एकच, ठेव अंतरी
तुजला पकडीन मी पुन्हा
करुनी जाशि मदीय तू गुन्हा।।

किति देख अनंत काळ हा
तुजला ओढिन मी पहा पहा

जगता वितरीन मी सुख
मग आझे करिशील कौतुक॥
करुनी जगदापदा दुरी
भरु सारी धरणी सुखस्वरी
वितरुन मुदा शुभा जनी
कलहद्वेष समूळ मारुनी॥

जगतात समस्त बंधुसे
बघ, नांदू अम्ही सर्व सौरसे
सकळा समता स्वतंत्रता
करु भूमीवर स्वर्ग नांदता॥

करुनी निज-कार्यपूर्णता
तुजलाही वितरीन धन्यता
तरि जाइ, विलंब ना करी
स्थिर मी शांत विकंप अंतरी॥

मज सोडिशि तू, न मी तुला
जननी सोडुन जातसे मुला
न फिकीर, पुन:पुन्हा परी
तुज भेटेन रवींदु जो वरी॥

शतवारहि जन्म घेइन
मम हेतूप्रति पूर्ण पाहिन
तुज खेचिन मी पुन:पुन्हा
दमवी कोण बघूच ये कुणा॥

तरि ये, मम रामराम घे
हृदयी स्नेह धरून तू निघे
परतून तुलो विलोकिन
अविलंबे, हृदयासि लाविन॥

जरि जाशि विशंक जा परी

**वितरी हा मज आशि अंतरी**
**तुज शेवटचेच मागणे**
**करि ते पूर्ण गड्या न ना म्हणे॥**

**‘घृतिचा न झरा सुको, झरो;**
**मरताही तम ना मनि शिरो’**
**मज दे सखया असा वर**
**मग जाई तुज जायचे जर॥**

◙◙◙

**-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१**

## कसे तरी मग जग दिसते?

नसती जगी या जरी मुले
नसती जगी या जरी फुले
नसते अंबरि वरि तारे
नसते गाणारे वारे
कसे तरी मग जग दिसते।
हे मन्मतिला ना कळते॥

जरी जगती या जल नसते
रविचे तेज जरी नसते
नसते जरि ते तरुवेल
नतसे दिनरजनी- खेळ
कसे तरी मग जग दिसते।
हे मन्मतिला ना कळते॥

नसती जरि ही वसुंधरा
धनधान्यवती मनोहरा
विहंगम जरी हो नसते
गाय बैल हे जरि नसते
कसे तरी मग जग दिसते।
हे मन्मतिला ना कळते॥

नसत्या प्रेमळ जरी माता
प्रेमसुधेच्या त्या सरिता
परोपकारी जन नसते
परदु:खे यन्मन जळते
कसे तरी मग जग दिसते।
हे मन्मतिला ना कळते॥

कृतज्ञता जरि ती नसती

प्रेमबंधुता जरि नसती
अश्रु जगी या जरि नसते
हास्य जगी या जरि नसते
कसे तरी मग जग दिसते।
हे मन्मतिला ना कळते।।

सुंदर सकळहि या वस्तु
मधुर मनोहर या वस्तु
जगणे म्हणुनी धरेवर
सह्य होतसे खरोखर
हे वैभव हे सुख नसते।
कसे तरी मग जग दिसते।।

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२७

## प्रेमाचे गाणे

(भूतकाळ भविष्यकाळाला उद्देशून गाणे म्हणतो)

बा नीज, सख्या! नीज गड्या लडिवाळा!
राजसा परम वेल्हाळा॥

या सकळ जगी उठले विषमय वारे
द्वेषाचे उडत फवारे
ही अखिल मही सूडबुद्धिने भरली
हृदयेच जणु कुणा नुरली
जगि झाला रे सुळसुळाट कामाचा
क्रोधाचा मात्सर्याचा
परि भिऊ नको तू, बाळ!
धरि प्रेमवृत्ति तू अढळ
प्रेम हेच तव दिव्य बळ
या प्रेमाच्या सामर्थ्ये जगताला
देशील वळण नव, बाळा॥ बा नीज....॥

सत्प्रेमाची आहे अदभुत शक्ति
प्रेम हीच खरि चिच्छक्ति
या प्रेमाचे वर्णन कोण करील
तोकडे शब्द पडतील
तू प्रेमाचा सागर हृदयी जमवी
सुकलेले जग हे फुलवी
शमवाया विश्वद्वेष
ये घेउन तू प्रेमास
भरपूर वाटि जगतास
तू देशील प्रेम जरी जगताला
बदलशिल आजच्या काळा॥ बा नीज....॥

ना जगति कधी प्रेम दिल्याने सरते
हे प्रेम कधी ना मरते
ते दिधल्याने वाढतसे, जागविते
परहृदयि सुप्त जे असते
परहृदयाचा विकास करिते प्रेम
प्रेम एक जगदभिराम
बाळ तू नजोनी आज
प्रेमाने हृदयी साज
हो सज्ज पुढे किति काज
तू नीज अता येइल तव कृतिवेला
करि तेव्हा प्रेम-सुकाळा॥ बा नीज....॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, डिसेंबर १९३०

# आत्मा ओत रे ओत

आत्मा ओत रे ओत
निर्मावा दिव्य तेजाचा झोत।। आत्मा....।।

फुलवी रे फुलवी
सुकला फुलवी
हलवी रे हसवी
विद्या हसवी
राष्ट्रात पेटव निर्मळ ज्योत।। आत्मा....।।

होऊ दे होऊ हो
राष्ट्रविकास
होऊ दे होऊ हो
शास्त्रविकास
वाहु दे शतमुख संस्कृतिस्त्रोत।। आत्मा....।।

प्रकट करी रे
अंतरिचा देव
प्रकट करी रे
अंतरिचा भाव
असशी तू दिव्य रे वतनाचा खोत।। आत्मा....।।

परमात्म्याचा
पुत्र तू अभिनव
बळवंताचा
पुत्र तू अभिनव
निर्भय असशी तू केसरिपोत।। आत्मा....।।

स्वातंत्र्याचे
मंदिर सुंदर
शास्त्रकलांचे
कळस मनोहर
दैदीप्यमान त्याला झळकोत।। आत्मा....।।

◘ ◘ ◘
-नाशिक तुरुंग, फेब्रुवारी

## निरोप

(घरी फार बिकट परिस्थिती असलेल्या उत्तम पाटील या मित्रास धाडलेला हा निरोप.)

निरोप धाडू काय तुला मी बांधो गुणसुंदरा
त्वत्स्थिती रडवी मम अंतरा
असहाय तुझी दशा बघोनी मन्मन हे गहिवरे
सुटती नयनांतुन शत झरे
बघतो सत्त्व तुधे ईश्वर
त्याचा असशी तू प्रियकर
म्हणुनी येई आपदभर
कृपा प्रभुची होइ जयावर जगि सुख ना त्या नरा
घण हाणुन तो बघती हिरा

जसे जसे हे दूर करितसे धिक्कारुनी जग कुणा
घडि घडि करुनि मानखंडना
जसे जसे जगदाघात शिरी बसती निशिदिन मुला
भाजिति अंगार जसे फुला
होउनि निरहंकृति तसातसा
बनतो निर्मळ जणु आरसा
पाहिल तो प्रभुपद- सारसा
भाग्य मिळे त्या भेटायाचे जगदीशा सुंदरा
होइल मुक्त निरंजन खरा

नको घाबरु नको बावरु अभंग धीरा धरी
करुणा वितरिल तो श्रीहरी
जगात त्याच्याविण कोणाचा खरा आसरा नसे
बाकी फोल सोलपट जसे
दे तू सुकाशणु त्याच्या करी
तोची विपत्समुद्री तरी

नेइल सांभाळून बंदरी
सूत्र प्रभुकरि देइल धरुनी श्रद्धा अचलाऽमरा
नाही नाश कधी त्या नरा।।

श्रद्धा जिंकी श्रद्धा विकळवि संकटमय पर्वता
श्रद्धा अमृतधारा मृता
विपत्तिमिर संहरी चंद्रमा श्रद्धेचा सोज्वळ
श्रद्धा दुर्बल जीवा बळ
श्रद्धा असेल यन्मानसी
तो जगि होइल ना अपयशी
संजीवनीच श्रद्धा जशी
श्रद्धा धरुनी गडबडलेल्या मतिला करि तू स्थिर
होइल विपद्दशेचा चूर।।

कर्तव्याचा पंथ बिकट हा उत्साहा वाढवो
निश्चय तिळभर ना हालवो
जशी संकटे येतील तशी त्वदीय चमको प्रभा
येइल मंगल वेळा शुभा
तुज मी सहाय्य करु काय रे
पामर निर्धन मी दीन रे
झरती माझे लोचनझरे
त्वदर्थ निशिदिन आळवीन परि सखया जगदीश्वरा
जो जोडितसे उभयांतरा।।

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, मे १९३३

# देशभक्तीपर कविता
## भारतमाता

हे भारतमाते मधुरे!
गाइन सतत तव गान॥

त्याग, तपस्या, यज्ञ, भूमि तव जिकडे तिकडे जाण
कर्मवीर किति धर्मवीर किति झाले तदगणगा ना॥ गाइन....॥

दिव्य असे तव माते करिता इतिहासामृतपान
तन्मय होतो मी गहिवरतो हरपून जाते भान॥ गाइन....॥

देउन देउन दीन जाहलिस तरिही देशी दान
परजीवन सांभाळिशि संतत अर्पुन अपुली मान॥ गाइन....॥

सत्त्वाचा सत्याचा जगती तूचि राखिशी मान
तुझ्या कथा ऐकाया उत्सुक भगवंताचे कान॥ गाइन....॥

एकमुखाने किति वर्णु मी आई तव महिमान
थकले शेषहि, थकले ईशहि, अतुल तुला तुलना ना॥ गाइन....॥

धूळीकण, फळ, फूल, खडा वा असो तरुचे पान
तुझेच अनुपम दाखविती मज पवित्र ते लावण्य॥ गाइन....॥

मांगल्याची माधुर्याची पावित्र्याची खाण
परमेशाच्या कृपाप्रसादे नुरेल तुजला वाण॥ गाइन....॥

समरसता पावणे तुझ्याशी मदानंद हा जाण
यश:पान तव सदैव करितो करितो मी त्वद्ध्यान॥ गाइन....॥

बहुभाग्याने बहुपुण्याने झालो तव संतान
तव सेवा मम हातुन होता हरपो माझा प्राण॥ गाइन....॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

# मनमोहन मूर्ति तुझी माते

मनमोहन मूर्ति तुझी माते
सकल जगाची माय माउली
गोड असे किति नाते॥ मनमोहन....॥

कुरवाळिशि तू सकल जगाला
निववुिशि अमृत-हाते॥ मनमोहन....॥

स्नेहदयेचे मळे पिकविशी
देशी प्रेमरसाते॥ मनमोहन....॥

सकळ धर्म हे बाळ तुझे गे
सांभाळिशि त्याते॥ मनमोहन....॥

भेदभाव तो तुजजवळ नसे
सुखविशि तू सकळांते॥ मनमोहन....॥

श्रद्धा देशी ज्ञाना देशी
सारिशि दूर तमाते॥ मनमोहन....॥

थोर ऋषी तव थोर संत तव
शिकविति शुभ धर्माते॥ मनमोहन....॥

सरिता सागर सृष्टि चराचर
गाती तुझ्याच यशाते॥ मनमोहन....॥

तव शुभ पावन नाम सनातन
उचंबळवि हृदयाते॥ मनमोहन....॥

त्वत्स्मरणाने त्वद्‌गुण-गाने

**भरुनि मदंतर जाते॥ मनमोहन....॥**

**तव सेवा मम हातुन होता**
**मरण सुधारस वाटे॥ मनमोहन....॥**

**◘ ◘ ◘**
**-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१**

## माझी एकच इच्छा

एक मात्र चिंतन आता एकची विचार
भाग्यपूर्ण होईल कधी हिंदभूमि थोर
दु:ख दैन्य जाउन विलया होउ हे स्वतंत्र
जन्मभूमी माझी, ध्यानी मनी हाच मंत्र॥

देशदेवसेवेसाठी सर्वही करीन
चित्त वित्त जीवन माझे सर्व हारवीन
प्राणपुष्प माझे माझ्या मातृभूमिकामी
जरी येइ उपयोगाला कितिक होइ नामी॥

मेघ जेवि जीवन सारे देइ या धरेला
जीवना समर्पुन जाई तो परी लयाला
परार्थार्थ जीवन त्यांचे, तेवि हो मदीय
मायभूमिसाठी माझे सर्व काहि होय॥

कदा तुला पाहिन आई! वैभवी अपार
पारतंत्र्यपंकांतुन तू होशिल कधि पार
चैन ना मुळी मज पडते, घोर हाच माते
त्वदुद्धारकार्यी केव्हा कृति करीन हाते॥

थोडि फार सेवा होवो या मदीय हाती
घडे जरी, होइल मजला सौख्य जीवनांती
याच जन्मि याची डोळा मी तुला स्वतंत्र
बघेन का? न कळे कैसे असे दैव-तंत्र॥

तुझे भाग्य पाहिन डोळा मायभूमि काय?
मम प्राणज्योति आधी मालवेल काय?
असो काहि होवो घेइन फिरुन अन्य जन्म
तुझी करुन सेवा जाइन होउनी सुधन्य॥

जरी देह पडला माझा तरिहि मी फिरून
इथे जन्म घेइन आई निश्चये करून
पुन:पुन्हा त्वत्सेवेचा सदानंद-मेवा
मला मिळो, माते! पुरवा हेतु देव-देवा!॥

पुष्प, पर्ण, तरु, वेली वा शिलाखंड हीन
पशु, प्राणि, पक्षी कोणी सर्प, मुंगि, मीन
कोणताहि येवो मजला जन्म कर्मयोगे
दु:ख नाही त्याचे, परि ते दु:ख त्वद्वियोगे॥

तुझ्या धुलिमाजी वाटे लोळणे सुखाचे
इथे पाय पावन फिरले रामजानकीचे
इथे नामघोषे फिरले संत ते अनंत
तुझ्या धुळीमधला झालो कीट तरि पसंत॥

तुझी धूळ आई प्रेमे लावितो स्व-भाळी
इथे जन्मलो मी म्हणुनी प्रेम-नीर ढाळी
कितीकदा जातो आई हृदयि गहिवरून
राहतो धुळीत पडूनी साश्रु सदगदून॥

तुझ्या धुळीपुढती मजला मोक्ष तुच्छ वाटे
तुझ्या धुळीमध्ये मजला मोक्ष नित्य भेटे
तुझी धूळ म्हणजे आई सर्व भाग्य माझे
तुझ्या धुळीसाठी आई झुगारीन राज्यें॥

तुझा आई! न वियोग मला जन्मजन्मी व्हावा
कोणताहि जन्म मला येवो तो इथेच यावा
सदा तुझ्या चरणांपाशी आइ! मी असेन
स्वर्ग मोक्ष त्यापुढती मी तुच्छ ते गणीन॥

तुझे पवन पावन, आई! तुझे पुण्य पाणी
तुझे निळे आकाश किति स्वच्छ रत्नखाणी
तुझे चंद्र तारे दिसती किति सुरम्य गोड
तुला नसे सा-या भुवनी खचित आई! जोड॥

तुझे पाय सागर माते अहर्निश क्षाळी
तुझ्या शिरी शुभ कर ठेवी शंभु चंद्रमौळी
तुझ्या रुपलावण्याला ना तुला जगात
तुझे चराचर हे अवघे स्तोत्र नित्य गात॥

तुझा थोर महिमा माते! मंगले! उदारे!
तुझी कीर्ती वर्णून धाले थोर थोर सारे

ऋषी वदे 'दुर्लभ आहे जन्म भारतात'
देव तेहि जन्मुन येथे आई! धन्य होत।।

तुझे भाग्य न दिसे म्हणुनी विश्व खिन्न होई
तुझे भाग्य गेले म्हणुनी सृष्टी खिन्न होई
तुझी मुले परि का अजुनी उदासीन, आई!
त्वदुद्धारकार्यासाठी उठति का न भाई?।।

उठा सकळ बंधूंनो! या करुच मुक्त माय
रुपिभुजंगपाशांत तिचे ते पवित्र पाय
पक्षिराज गरुड बनू या मुक्त ही स्वमाता
झणी करु, न विलंबाची वेळ आज आता।।

विलंबास जरि का क्षणही बंधुंनो कराल
माय ही मरेल अहा हा! तुम्हिहि रे मराल
उठा, झोप सोडा, तळपा सूर्यसे प्रभावे
करा कार्य नेटे दास्या झुगारुन द्यावे।।

चला, उठा, मी तरि आता चाललो पुढारा
मातृलोचनींच्या मजला बघवती न धारा
तुझे अश्रु आई! माझ्या मी करी पुशीन
प्रतिज्ञेस करितो तुजला मुक्त मी करीन।।

आइ! धायिधायी रडतो त्वद्विपत् बघून
पुन:पुन्हा कार्याला मी लागतो उठून
बुद्धि हृदय गात्रे माझी चंदनासमान
झिजोत गे द्याया तुजला जगी श्रेष्ठ स्थान।।

दिगंतात वृद्धिंगत मी कीर्ति तव करीन
तुझी मूर्ति मधुरा दिव्या अंतरी धरीन
तुझे नाम सतत ओठी गान गोड कंठी
तुझी प्रीति अतुला अचला साठवीन पोटी।।

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## प्रभु! भारतिचे वैभव कोठे गेले?

प्रभु! भारतिचे वैभव कोठे गेले?
राष्ट्र हे दिसे मेलेले
तो भाग्याचा भास्कर अस्ता गेला
अंधार भरुनी उरला
ती सिद्विद्या सकल कला मालवली
दैन्याची पाळी आली
गोकुळे येथली गेली
विपुलता येथली गेली
अन्नान्नदशा ही आली
हे कठिण कसे दिवस असे रे आले
कोणते पाप ते झाले॥ प्रभु...॥

श्रीरामांनी भूषविली ही भूमी
सत्त्वाढ्य हरिश्चंद्रांनी
शिबि, मांधाता, राजे येथे झाले
परि दुर्दिन आजी आले
श्रीशिव, बाजी गाजी रणशार्दूल
येथेच खेळले खेळ
ती राजर्षींची भूमी
ती ऋषीश्वरांची भूमी
ती वीरांची ही भूमी
नि:सत्त्व अजी काहि नसे उरलेले
दु:खाचे भांडे भरले॥ प्रभु...॥

जरि जगि झालो अस्पृश्य अम्ही सगळे
तरि काहीच चित्ता न कळे
निजबंधूंना दूर लोटितो अजुनी
ठेवितो पशुच त्या करुनी
जरि जग थुंके तरिही श्रेष्ठाश्रेष्ठ
मांडिती बंड हे दुष्ट
उपनिषदे जेथे झाली
तेथेच विषमता भरली
सद्धर्मा ग्लानी आली
हे सनातनी अनृतदेव जणु झाले

माणुसकी विसरुन गेले॥ प्रभु...॥

या भूमिमध्ये मरणाचा डर भरला
बाजार किड्यांचा झाला
ती मृति म्हणजे वस्त्र फेकणे दूर
करि गीता जगजाहिर
परि मरणाला भिणार आम्हांवाणी
जगतात कुणी ना प्राणी
जन्मले जिथे अद्वैत
मरणाला तेथे ऊत
ते मोठाले शब्दच ओठी उरले
भयभेद अंतरी भरले ॥ प्रभु...॥

बहुभाग्याने नायक गांधी मिळती
परि डरती घरि हे बसती
तो राष्ट्राचा ओढि एकला गाडा
झिजवीत अहर्निश हाडा
तो मूर्त महान यज्ञ, मूर्त तो धर्म
मोक्षाचे दावी वर्म
परि वावदूक हे भितरे
हे भुंकत बसती कुतरे
कुणि कर्मक्षेत्रि न उतरे
हे शब्दांचे पूजक हरहर झाले
दुर्दैव घोर ओढवले॥ प्रभु...॥

प्रभु! गर्जू दे भीषण तुमची भेरी
हलु देत मढी ही सारी
निजकर्तव्या करावयाला उठु दे
मरणास मिठी मारू दे
निज बंधूंना अस्पृश्य न लेखोत
रूढीस दुष्ट जाळोत
तत्त्वांस कृतित आणोत
ओठिंचे करुन दावोत
सद्धर्म खरा आचरुत
ते रुढींचे राज्य पुरेसे झाले
प्रेमाने होवो ओले॥ प्रभु...॥

प्रभु! गर्जू दे भीषण तुमची भेरी
मति जागृत होवो अमुची
प्रभु! येऊ दे गुलामगिरिचा वीट
होउ दे समस्तां धीट
ते हिंदु तसे शीख मुसलमानादी
होउ दे बंधुसे आधी
विसरु दे क्षुद्रता सारे
विसरोत मागचे सारे
ऐक्याचे खेळो वारे
किति लागे तो त्याग करा रे सगळे
परि ऐक्य पाहिजे पहिले।। प्रभु...।।

प्रभु! गर्जू दे भीषण तुमची भेरी
करु देत मुक्त निज माता
मन विमल असो, स्वार्थ दुरी राहू दे
निजमाय- कार्य साधू दे
ते होउनिया वेडे मातेसाठी
उठु देत बंधू हे कोटी
घेऊ दे उडी आगीत
घेऊ दे उडी अब्धीत
ओतु दे विष तोंडात
परि मातेचे वदन दिसो फुललेले
मोक्षश्रीने नटलेले।। प्रभु...।।

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२८

## स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई!

स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई। सुखवू प्रियतम भारतमायी॥

देशभक्तिचा सुदिव्य सोम
पिउन करु प्राणांचा होम
कष्ट, हाल हे अमुचे भाई॥ स्वातंत्र्याचे....॥

धैर्याची ती अभंग ढाल
त्यागाची ती वस्त्रे लाल
निश्चयदंडा करांत राही॥ स्वातंत्र्याचे....॥

समानतेची स्वतंत्रतेची
पताकेवरी चिन्हे साची
दिव्य पताका फडकत जाई॥ स्वातंत्र्याचे....॥

ऐक्याचा झडतसे नगारा
कृतिरणशिंगे भरिति अंबरा
चला यार हो करु रणघाई॥ स्वातंत्र्याचे....॥

कळिकाळाला धक्के देऊ
मरणालाही मारुन जाऊ
प्रताप अमुचा त्रिभुवन गाई॥ स्वातंत्र्याचे....॥

विरोध आम्हां करील कोण
सूर्यहि आम्हांसमोर दीन
प्रतापे दिशा धवळू दाही॥ स्वातंत्र्याचे....॥

विरोध आम्हां करील कोण
करु सर्वांची दाणादाण
जोर आमुचा कुणी न साही॥ स्वातंत्र्याचे....॥

असत्य अन्यायांना तुडवू
दुष्ट रुढिंना दूरी उडवू
घाण अता ठेवणार नाही।। स्वातंत्र्याचे....।।

जशी पेटलेली ती चूड
तसेच आम्ही भैरव चंड
औषधास दास्यता न राही।। स्वातंत्र्याचे....।।

परकी अथवा स्वकीय झाला
जुलूम आम्हां असह्य झाला
जुलूम जाळू ठायी ठायी।। स्वातंत्र्याचे....।।

जाच काच गरिबांना नुरवू
झोपड्यांतुनी मोदा फुलवू
मक्त तयांना करु लवलाही।। स्वातंत्र्याचे....।।

श्रेष्ठकनिष्ठत्वाचे बंड
मोडू करुन प्रयत्न चंड
अस्मादगण या शपथे घेई।। स्वातंत्र्याचे....।।

देश अमुचा करु स्वतंत्र
मनोबुद्धिला करु स्वतंत्र
स्थापन करणार लोकशाही।। स्वातंत्र्याचे....।।

अनंत यत्ने अखंड कृतिने
परमेशाच्या कृपाबलाने
सफल मनोरथ निश्चित होई।। स्वातंत्र्याचे....।।

◘ ◘ ◘
-धुळे तुरुंग, मे १९३०

## आमचे कार्य

अम्ही मांडू निर्भय ठाण। देऊ हो प्राण
स्वातंत्र्य-सुधेचे निजजननीला घडवू मंगलपान।। अम्ही...।।

स्वार्थाची करुनी होळी
छातीवर झेलू गोळी
करु मृत्युशि खेळीमेळी
मातृभूमिच्यासाठी मोदे करु सारे बलिदान।। अम्ही...।।

श्रीकृष्ण बोलुनी गेला
जय अखेर सत्पक्षाला
ना पराभूति सत्याला
जयजयकारा करुनी पुढती घुसु होउन बेभान।। अम्ही...।।

ही मंगल भारतभूमी
करु स्वतंत्र निश्चय आम्ही
हा निश्चय अंतर्यामी
मातृमोचना करुनी जगी तिज अर्पू पहिले स्थान।। अम्ही...।।

येतील जगातिल राष्ट्रे
वंदितील भारतमाते
करतील स्पर्श चरणाते
धन्य असा सोन्याचा वारस दाविल तो भगवान।। अम्ही...।।

◙ ◙ ◙

-अमळनेर, मार्च १९३०

## देशभक्त किति ते मरती

धैर्यमूर्ति उज्ज्वलकीर्ती। देशभक्त किति ते मरती
त्यागराशि मंगलमूर्ती। देशभक्त किति ते मरती।।

मातृभूमि हसवायाते
मायभूमि सुखवायाते
निजबंधू उठवायाते
बलिदाना मोदे देती।। देशभक्त....।।

निजमातृ-मोचनासाठी
निजबंधु समुदधृतिसाठी
निज सकल सुखाचे वरती
ठेवून निखारे हाती।। देशभक्त....।।

निज यौवन निजधनमान
निज आप्त सकल बंधु-गण
हे जात सकल विसरून
करतळी प्राण निज घेती।। देशभक्त....।।

करि घेति सतीचे वाण
होऊन मनी बेभान
घेतात उडी धावून
मरण दिसे जरि ते पुढती।। देशभक्त....।।

ना चैन पडे जीवास
देश दिसे रात्रंदिवस
त्या देशभक्तिचा ध्यास
देशविचाराने जळती।। देशभक्त....।।

सहन तो विलंब होई
जीवाची तगमग होई
करपून तन्मती जाई
मरणाचा पथ मग धरिती।। देशभक्त....।।

तेजाला कवटाळावे

हे ध्येय पतंगा ठावे
मरुनीही त्यास्तव जावे
ही दिव्य वृत्ति तच्चित्ती।। देशभक्त....।।

अजगरसे पडले सुस्त
निजबंधु, बघुन अस्वस्थ
त्या जागति देण्या त्वरित
प्राणांचा बळि ते देती।। देशभक्त....।।

चर्चेने काहि न लाभ
याचनेत काहि न लाभ
स्वावलंबनाने शोभ
घोषणा वीर ते करिती।। देशभक्त....।।

अजुन तरी झापड उडवा
स्वातंत्र्यध्वज फडफडवा
देशकार्य करण्या धावा
झाला का केवळ माती।। देशभक्त....।।

घ्या स्वदेशिच्या त्या आणा
मनि धरा जरा अभिमाना
जगताला दावा बाणा
उद्धरा माय निज हाती।। देशभक्त....।।

सुखविलास सारा राहो
आलस्य लयाला जावो
कर्तव्य-जागृती येवो
संपु दे निराशा-रात्री।। देशभक्त....।।

आशेचा होवो उदय
कार्याचा आला समय
भय समूळ पावो विलय
निष्कंप करा निज छाती।। देशभक्त....।।

वरुनिया पडो आकाश
वा होवो अशनि-नि:पात
कार्याला घाला हात

घ्या करुन मोक्षप्राप्ति।। देशभक्त....।।

देशभक्त किति ते मेले
चंदनापरी ते झिजले
तत्कार्य अजुन जे उरले
ते पूर्ण करा निज हाती।। देशभक्त....।।

तडफडत वरी असतील
पाहून तुम्हां सुखलोल
त्या शांती-लाभ होईल
जरि उठाल मातेसाठी।। देशभक्त....।।

ही वेळ नसे निजण्याची
ही वेळ नसे हसण्याची
ही वेळ असे मरण्याची
ना मोक्षाविण विश्रांती।। देशभक्त....।।

जरि नसाल तुम्ही क्षुद्र
तरि उठाल जैसे रुद्र
ती चळवळ करणे उग्र
घ्या रक्तध्वज निज हाती।। देशभक्त....।।

आरती निजप्राणांची
ओवाळा मंगल साची
ही पूजा निज मातेची
सत्प्रसाद मिळवा मुक्ति।। देशभक्त....।।

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०

## भारतसेवा

प्रिय भारतभू-सेवा सतत करुन
जाईन सुखाने मरुन
जरि मातेचे कार्य न करितिल हात
तरि झणी झडुन जावोत
जरि मातेचे अश्रु न पुशितिल हात
तरि झणी गळुन जावोत
प्रिय बंधूंच्या उद्धृतिच्या कामात
हे हात सदा राबोत
हातांस एक आनंद
हातांस एकची छंद
तोडणे आइचे बंध
हे ध्येय करी करिता, तनु झिजवीन
जाईन सुखाने मरुन॥ प्रिय....॥

जोवरि बंधू पोटभरी ना खाती
ना वस्त्र तदंगावरी
जोवरि त्यांना स्वपरमत्त रडविती
शतमार्गांनी नागविती
जोवरि त्यांना ज्ञानकिरण ना मिळती
अंधारी खितपत पडती
तोवरि न झोप घेईन
अंतरी जळुन जाईन
सौख्यास दूर लोटीन
मी सुखावया झटेन बांधव दीन
जाईन सुखाने मरुन॥ प्रिय....॥

या शरिराचे जोडे, भारतमाते!
घालीन त्वत्पदी होते
या बुद्धीला त्वदर्थ मी श्रमवीन

सेवेत हृदय रमवीन
जरि देहाचे करुन, आइ! बलिदान
स्वातंत्र्य येइ धावून
तरि झुगारीन हा जीव
ही तुझीच, आई! ठेव
तव फुलो वदन-राजीव
मी घेत अशी, आइ! तुझिच गे आण
जाईन सुखाने मरुन॥ प्रिय....॥

मी प्राशिन गे मृत्युभयाचा घोट
होइन आइ! मी धीट
मी खाइन गे भेदभाव हे दुष्ट
होईन, आइ! गे पुष्ट
मग करण्याते, माते! तुजला मुक्त
सांडिन मी माझे रक्त
त्वच्चिंतन निशिदिन करिन
त्वत्सेवन निशिदिन करिन
सुखगिरिवर तुज चढवीन
मग भाग्याचे अश्रु चार ढाळून
जाईन सुखाने मरुन॥ प्रिय....॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, जून १९३२

## जा रे पुढे व्हा रे पुढे!

झापू नको झणि ऊठ रे
पाहे सभोती जे घडे
घनगर्जना उठते नभी
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

रणभेरि शिंगे वाजती
ध्वनि काय ना कानी पडे?
पडलास मुर्दाडापरी
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

ललनीहि सजल्या संगरा
नर केवि मागे तो दडे?
चल, ऊठ, जागृत सिंहसा
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

ना मेष तू तर मानुष
बें बें करोनी ना रडे
निजकर्मशक्तिस ओळख
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

बांधून, मर्दा! कंबर
तू अंबरी वरती उडे
निजपंख-बल भुललास तू
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

जावो खचोनी धीर ना
लंघावयाचे हे कडे
दे हात मर्दासी खुदा
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

हे दुर्ग दुर्गम दुष्पथ
तरि ते फिरोनी तू चढे
पडण्यात ना अपमान रे
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

शतदा पडे तो रे चढे
बसुनी न काही ते घडे
पशु तो, न जो यत्ना करी
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

पसरुन आ येती जरी
पथि संकटे तरि ना अडे
बलभीम हो तू मारुती
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

गिळि राक्षसी तरि ना डरे
ये पोट फाडुन ना रडे
मग हाक फोडी वीर तो
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

लाटा कितीही आदळो
शतचूर्ण त्या करिती कडे
गिरि ना खचे घन पाऊसे
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

जरी कष्ट-वृष्टी होइल
डोके करि मारापुढे
अभिमन्यु हो अभिराम तू
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

चैतन्य खेळो जीवनी
तू ना पडे जेवी मढे

हो स्फूर्ति मूर्त प्रज्वला
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

कृतिपंथ तू अवलंबुनी
करि बंद हे वाक्बुडबुडे
वाणी पुरे करणी करी
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

बाहु स्फुरो ना ओठ ते
तव पिळवटू दे आतडे
हा मृत्यु नाही गंमत
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

ओठांवरील प्रेम ते
ज्वाळेपरी ना धडधडे
ना पेटवी ते अंतर
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

ती तोंडदेखी आरती
ओवाळ ना तू यापुढे
स्वप्राण करि पंचारती
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

लागे दिव्याने रे दिवा
राखुंडि कामी ना पडे
तो देत जीवन, जो जिता
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

मोक्षामृताचे मंगल
आणी भरोनी रे घडे
पाजी तृषार्ता आइला
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

माते स्वहाते लेववी
स्वातंत्र्यलक्ष्मीचे चुडे
सत्पुत्रधर्मा आचर
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

बघ मोक्षनगरद्वार हे
दिसते पुढे उघडे फुडे
तो भीरु कातर जो नुठे
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

कर्माबुधीमधि घे बुडी
त्या मुक्तिमौक्तिक सापडे
पापी करंटा जो नुठे
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

वरिते जयश्री त्या नरा
कर्मी निरंतर जो बुडे
ना कर्महीना वैभव
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

नरवीर-वृंद उठावती
निज कर्मतेचे चौघडे
हेएक गंभिर वाजती
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

शिर धूस टिप्पर घाईत
ना वाचवी निज कातडे
सेवेत मरतो तो जगे
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

कुरवाळितो स्वप्राण जो
मेलाच तो जरि ना सडे

जो प्राण दे, तो ना मृत
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

काळा कुरोंडी ही तनू
जरि मातृकामी ती पडे
सोने तिचे होई तरी
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

ज्या स्फूर्ति ना तिळ अंतरी
ती काय जाळावी धुडे
जरि न स्फुल्लिंग, न जीवनी
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

ठिणगी पडू दे जीवनी
वीरापरी व्हा रे खडे
रक्तध्वजा धरुनी करी
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

जरि मूठभर तरि ना भय
व्हा छातिचे ना बापुडे
व्हा सिंह व्हा नरपुंगव
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

खाऊ न केव्हाही कच
माघार शब्द न सापडे
कोशात बोला आमुच्या
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

कर्मात आत्मा रंगवा
आत्मा जरी कर्मी जडे
स्वातंत्र्य तरि ते लाभते
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

सेवेत आत्मा ओतणे
मांगल्य-मोक्ष श्रीकडे
हा पंथ एकच जावया
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

स्वार्थी निखारा ठेवुनी
रमतो स्वकर्मी जो मुदे
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

शिवते निराशा ज्यास ना
लोभाशि ज्याचे वाकडे
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

कर्मी अहोरात्र श्रमे
परि मान कीर्ति न आवडे
ते मुक्त होतो आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

न विलास घे, स्व-विकास घे
निंदादिके जो ना चिडे
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

जे अंबरात उफाळती
ना लोळती शेणी किडे
ते मुक्त होती आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे॥

सर्वत्र करि संचार जो
कोठेच काही ना नडे

तो मुक्त होतो आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

करुनी महाकृतिही जया
अवडंबराचे वावडे
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

शिर घेउनी हातावरी
जो कर्मसमरी या लढे
करि माय अमरा तो निज
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

जरि व्हाल योद्धे संयमी
तरी मोक्षफळ हाता चढे
फाकेल भुवनी सु-प्रभा
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

नवमंत्र घ्या तेजे नटा
व्हा सिद्ध सारे सौंगडे
चढवा स्वमाता वैभवी
जा रे पुढे व्हा रे पुढे।।

◘ ◘ ◘

-नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३

# बलसागर भारत होवो!

बलसागर भारत होवो
विश्वात शोभुनी राहो॥
बलसागर....॥

हे कंकण करि बांधियले
जनसेवे जीवन दिधले
देशार्थ प्राण हे उरले
मी सिद्ध मरायाला हो॥
बलसागर....॥

वैभवी देश चढवीन
स्वातंत्र्य त्यासि अर्पीन
हा तिमिर घोर संहरिन
या बंधु साहाय्याला हो॥
बलसागर....॥

हातात हात घेऊन
हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून
या कार्य करायाला हो॥
बलसागर....॥

करि दिव्य पताका घेऊ
प्रिय भारतगीते गाऊ
विश्वास पराक्रम दावू
ही माय निजपदा लाहो॥
बलसागर....॥

या उठा करु हो शर्थ

**संपादु दिव्य पुरुषार्थ**
**हे जीवन ना तरि व्यर्थ**
**भाग्यसूर्य तळपत राहो॥**
**बलसागर....॥**

**ही मुक्त माय होईल**
**वैभवे दिव्य शोभेल**
**जगतास शांति देईल**
**तो सोन्याचा दिन येवो॥**
**बलसागर....॥**

◙ ◙ ◙

## हा देश वैभवी न्यावा!

जगदीश दयाघन देवा
हा देश वैभवी न्यावा॥

तू सुंदर मंगलमूर्ती
पुरवावी मनीची आर्ती
हे दीन धरावे हाती
तू सकळ सिद्धिचा ठेवा॥ हा देश....॥

बलदाता तू मतिदाता
तू गणपती ऐक्य-विधाता
भयहर्ता तू सुखकर्ता
आम्हांस समयि या पावा॥ हा देश....॥

तू कलह सकळ हे मिटवी
तू प्रेम आम्हांला शिकवी
तूत्याग तपस्या शिकवी
जनमनि न तिमिर उरवावा॥ हा देश....॥

करु देत माय निज मुक्त
उठु देत सर्व सत्पुत्र
ते सकल निज समर्पोत
हा लोभ सकळ हटवावा॥ हा देश....॥

जरि होइल भारत मुक्त
तरि होइल जग सुखभरित
पावेल विषमता अस्त
आनंद जगी पिकवावा॥ हा देश....॥

◘ ◘ ◘

-अमळनेर, ऑगस्ट १९३१

## भूषण जगताला!

भूषण जगताला
होइल, भूषण जगताला
भारत मिळवुन श्रेष्ठ पदाला॥ भूषण....॥

विद्या येतिल कलाहि येतिल
भारत जरि हा स्वतंत्र झाला॥ भूषण....॥

शिकविल समता, स्नेह, सुजनता
देइल जगता शांतिसुखाला॥ भूषण....॥

प्रेमाच्या स्वर्गास विनिर्मिल
पूजिल मग शुभ प्रभुपद-कमला॥ भूषण....॥

◘ ◘ ◘
-अमळनेर, ऑगस्ट १९३१

# भारतजननी सुखखनि साजो

**भारतजननी सुखखनि साजो**
**तद्विभवाने स्वर्गहि लाजो॥ भारत....॥**

**स्वातंत्र्याची अमृतधारा**
**प्राशुन निशिदिन रुचिर विराजो॥ भारत....॥**

**विद्यावैभववाङ्मयशास्त्रे**
**कलादिकांचा डंका वाजो॥ भारत....॥**

**पावन मोहन सुंदर शोभून**
**नाम तिचे शुभ भुवनी गाजो॥ भारत....॥**

**दिव्य शांतिची अमृत-सु-धारा**
**संतप्त जगा सतत पाजो॥ भारत....॥**

**◙ ◙ ◙**
**-अमळनेर, १९२९**

## हृदय जणु तुम्हां ते नसे!

हृदय जणु तुम्हां ते नसे।।
बंधु उपाशी लाखो तरिहि
सुचित विलास कसे।। हृदय....।।

परदेशी किति वस्तू घेता
बंधुस घास नसे।। हृदय....।।

बाबू गेनू जरि ते मरती
तरिही सुस्त कसे।। हृदय....।।

खादी साधी तीहि न घेता
असुन सुशिक्षितसे।। हृदय....।।

माणुसकी कशि तीळ ना उरली
बसता स्वस्थ कसे।। हृदय....।।

जगतामध्ये निज आईचे
हरहर होइ हसे।। हृदय....।।

कोट्यावधी तुम्हि पुत्र असोनी
माता रडत बसे।। हृदय....।।

देशभक्त ते हाका मारिति
त्यांचे बसत घसे।। हृदय....।।

स्वदेशिचे ते साधे अजुनी
तत्त्व न चित्ति ठसे।। हृदय....।।

बंधू खरा जो बंधुसाठी

प्राणहि फेकितसे॥ हृदय....॥

पुत्र खरा जो मातेसाठी
सर्वहि होमितसे॥ हृदय....॥

बंधू रडता आई मरता
कुणि का स्वस्थ बसे॥ हृदय....॥

◘ ◘ ◘

-अमळनेर, सप्टेंबर १९३१

## माझा महाराष्ट्र भाग्ये सजो

माझ्या महाराष्ट्रभूमीत मोठे
प्रतापी पुन्हा वीर निर्मी विभो
शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, वागीश, शिल्पी,
कलाविद् खरे थोर निर्मी प्रभो
श्री, नीति, संपत्ति, सदबुद्धि, सहकार्य
आरोग्य, ऐक्यादि येथे रुजो
धावो यशोगंध देवा! दिगंतात
माझा महाराष्ट्र भाग्ये सजो।।

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२९

# भारतमाता माझी लावण्याची खाण!

(नाचून म्हणावयाचे गाणे)

भारतमाता माझी लावण्याची खाण
गाइन तिचे गान, मी गाइन तिचे गान
करिन तिचे ध्यान, मी करिन तिचे ध्यान
भारतमाता माझी लावण्याची खाण
प्राणांचीही प्राण, माझ्या प्राणांचीही प्राण, माझ्या प्राणांचीही प्राण
भारतमाता माझी लावण्याची खाण॥

मांडिन निर्भय ठाण, मी मांडिन निर्भय ठाण
देइन माझे प्राण, मी देइन माझे प्राण
हातात घेतले आहे सतिचे मी वाण॥ गाइन...॥

जाळिन सारी घाण, मी जाळिन सारी घाण
काटिन रुढिरान, मी छाटिन रुढिरान
हसवीन आइचे जे मुख झाले म्लान॥ गाइन...॥

उडविन दाणादाण, मी उडविन दाणादाण
करिन धूळधाण, मी करिन धूळधाण
स्वातंत्र्य-विरोधकां देतो मी आव्हान॥ गाइन...॥

विसरेन देहभान, मी विसरेन देहभान
कापुन देइन मान, मी कापुन देइन मान
मातेला जगामध्ये देइन पहिले स्थान॥ गाइन...॥

नुरविन कसली वाण, मी नुरविन कसली वाण
काढिन रुतले बाण, मी काढिन रुतले बाण
मातेला घालीन माझ्या हातांनी मी स्नान॥ गाइन...॥

सर्वस्वाचे दान, करिन सर्वस्वाचे दान
घेतो आज आण, मी घेतो आज आण
मातेला घडविन माझ्या मोक्षामृतपान॥ गाइन...॥

◘ ◘ ◘

-धुळे तुरुंग, मे १९३२

## मरणही ये तरी वरिन मोदे

मरणही ये तरी वरिन मोदे
जननिचे परि जगी यश भरु दे॥ मरणही....॥

वीट वन्हित पडे
दृढ तरी ती घडे
तेज कष्टे चढे
हे कळू दे॥ मरणही....॥

हाल होवोत ते
चित्त ना मुळि भिते
दास्य जे जाळते
नष्ट करु दे॥ मरणही....॥

◙ ◙ ◙
-अमळनेर, ऑगस्ट १९३१

# दिव्य मी स्वर्ग निर्मीन

ध्येय देईन
दिव्य मी स्वर्ग निर्मीन
सचिंत सगळे दिसती लोक
जिकडे तिकडे भरला शोक
करुन तयांवर अमृतसेक
तया उठवीन।। दिव्य....।।

मेल्यापरि हे दिसती बंधू
उरला न दिसे जीवनबिंदु
निर्मुन मी संजीवनसिंधु
तया जिववीन।। दिव्य....।।

गुलामवृत्ती जिकडे तिकडे
दुबळी वृत्ती जिकडे तिकडे
चैतन्याचे भरभरुन घडे
तया पाजीन।। दिव्य....।।

स्वातंत्र्याची लाविन ज्योत
स्फूर्तीचा मी निर्मिन स्त्रोत
तेजाचा मी सोडिन झोत
दैन्य दवडीन।। दिव्य....।।

भेदभाव मी जाळिन सारे
ऐक्याचे मी सोडिन वारे
दिव्यबळाच्या जयजयकारे
राष्ट्र उठवीन।। दिव्य....।।

करिन त्यागा ते उद्युक्त
निर्भयतेचे शिकविन मंत्र

नि:शस्त्राचे देइन शस्त्र
पंथ दावीन॥ दिव्य....॥

आळस दवडून सेवा देइन
विलास दवडून विकास देइन
खेदा दवडून बोध देइन
भाग्य देईन॥ दिव्य....॥

कळकळ शिकविन तळमळ शिकविन
सदगुण संघटना मी वितरिन
सत्याचा सत्त्वाचा शोभन
ध्वज उभवीन॥ दिव्य....॥

रुढी जाळुन विचार देइन
हृदयमतीला निर्मळ करिन
श्रद्धा सद्धर्माला देइन
मोक्ष देईन॥ दिव्य....॥

मंगल उज्वल ते देइन
पावन निर्मळ ते देइन
सुंदर सत्य शिवा देइन
देव देईन॥ दिव्य....॥

◙ ◙ ◙
-धुळे तुरुंग, मे १९३२

## देशासाठी मरु!

देश आमुचा वैभवशाली वाली सकलहि जगताचा
तद्ध्यानामधि रंगुन जाऊ गाऊ त्याला निज वाचा
पराक्रमाने निजमातेला मिरवू सा-या जगतात
कीर्तिध्वज विश्वात उभारु निजतेजाने दुर्दांत

वीरापरि तरि उठा झणी
दिगंत जिंकू चला क्षणी
निजमातेला स्मरुनि मनी
मुकुंदपादांबुज वंदुनिया प्राणांवर हाणू लाथ
कोण करी जगी विरोध आता करु सर्वांचा नि:पात॥

धन्य मावळे पावन झाले देशासाठी निज-मरणे
जगणे भूषण आम्हां कायसे भीति कशाला मनि धरणे
दों दिवसांची तनु तर साची वाचवुनी तरि काय मिळे
देशासाठी उदार होऊ मृत्यु कुणाला जगी टळे

हसू यमाचा फास जरी
हसू जगाचा जाच जरी
हसू सदोदित निजांतरी
धैर्य हासत तेजे तळपत निजमातेचा सन्महिमा
त्रिभुवनि अवघ्या पसरु दावू मातेचा वैभवगरिमा॥

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२७

## तेव्हा घडे उन्नती!

उत्साही मुखमंडले भुजगसे दोर्दंड दिव्याकृती
नानापत्ति पथी जरी दिसती ना लोपे यदीया धृती
मोठे कार्य करावयास बघते दिव्या सदा यन्मती
ऐसे पुत्र यदा इथे निपजती तेव्हा घडे उन्नती॥

स्नेहाने भरले परस्पर सदा विश्वास जे दाविती
सर्वांची सहकार थोर करण्यासाठी असे संमती
ऐक्याचे कळुनी महत्त्व न कधी जे मत्सरे भांडती
ऐसे पुत्र यदा इथे निपजती तेव्हा घडे उन्नती॥

ज्यांच्या निर्भय अंतरी सतत जो सत्स्वाभिमान स्फुरे
ज्यांच्या दृष्टिसमोर जाच जुलमी दुष्ट जनांचा नुरे
भीती एक जगत्पतीस, न दुजा कोणाहि, जे सुव्रती
ऐसे पुत्र यदा इथे निपजती तेव्हा घडे उन्नती॥

तेजाला कवटाळिती परि सदा जे शिस्त सांभाळिती
अन्याला सुखवावया स्वसुखही नि:शंक जे होमिती
चित्ती उज्वल भावना परि विचाराला न जे सोडिती
ऐसे पुत्र यदा इथे निपजती तेव्हा घडे उन्नती॥

देशाची अतुला निरंतर वसे भक्ती यदीयांतरी
देशाचे हित ज्यात तीच करिती कार्ये सदा जे करी
भूमातेस्तव जे सदा झिजविती वाणी, वपु, श्री, मती
ऐसे पुत्र यदा इथे निपजती, तेव्हा घडे उन्नती॥

देशासाठि सचिंत अन्य कसली चिंता न ज्यांना असे
देशासाठि फकीर नित्य हृदयी ती मातृमूर्ती वसे
सेवा नित्य रुचे, सुचे न दुसरे सेवेत जे रंगती
ऐसे पुत्र यदा इथे निपजती, तेव्हा घडे उन्नती॥

**जेव्हा ऐक्य सहानुभूती उदया येतील आम्हांमध्ये**
**त्यागी उद्यममग्न होतिल यदा, बंधुत्व चित्ति जडे**
**जेव्हा स्वार्थ असेल दूर, हृदया वाटेल सत्यीं रती**
**जेव्हा निर्भयता दिसेल नयनी, तेव्हाच राष्ट्रोन्नती।।**

◘◘◘

**-अमळनेर, १९२६**

## तुफान झालो!

नाही आता क्षणहि जगणे भारती या गुलाम
मारु सारे भय हृदयिचे निर्मू स्वातंत्र्यधाम
नाही एक क्षणहि खपते दास्य विश्वंभराला
स्वातंत्र्याला मिळउन चला जाउन तत्पूजनाला॥

जो या आहे क्षणिक शरिरी अंतिम श्वास एक
भूमातेला सुखविन सुखे होउ मद्रक्तसेक
माता आता क्षणभरिहि ना बंधनी ह्या बसू दे
जावो माझी तनु परि मम म्लान माता हसू दे॥

कैसे साहू? सतत जरि ते आइला नागवीती
कैसे पाहू? सतत जरि ते बंधुंना गांजिताती
बैसावे का विलपत? न का पौरुषाचा स्फुल्लिंग
न श्वानाचे वरु हत जीण, होउ या धीरधिंग॥

झालो का हो सकळ इतुके श्वान पस्तीस कोटी
कैसे दास्यी सतत पिचतो नाहि का त्वेष पोटी
आहो का हो हृदयि बघणे मेष मानूष वा ते
सारे तुम्हां जग भरडिते धान्य ते जेवि जाते॥

आता ओठी मधुरतम त्या गाउ या मातगीता
आता सारे उठुन करु या बंधमुक्त स्वमाता
ना लावावे क्षणहि पळहि भारते मुक्त व्हावे
लोकी आता वर करुनिया मस्तकाते जगावे॥

या रे सारे मिळून करु या आधि ऐक्यावलंब
स्पृश्यास्पृश्ये सकळ उडवू जाळु हे भेददंभ
हालक्लेशा मुळिहि न भिणे स्वीय स्वातंत्र्य घेणे
तेजे पेटू अनलसम ही वैभवी माय नेणे॥

या देहाचे करिल तुकडे राईराईसमान
कोणी क्रोधे तरि सतत मी उंच राखीन मान
ओठी माझ्या प्रियजननिचे दिव्य नाचेल गान
माझ्या मातेस्तव करित हो मी मुदे देहदान॥

मारी माते कुणि जरि न ती मन्मनोमातृमूर्ती
कंठा कापी कुणि जननिचि ती न कंठस्थकीर्ती
हालांची ना लवहि उरली आज आम्हां गुमान
आता गेलो खवळून खरे आम्हि झालो तुफान॥

केला विरोध जरि या सगळ्या जगाने
ना गांगरुन मुळि जाउ आता भयाने
मोक्षार्थ जे ज्वलित राष्ट्र उभे असेल
त्याच्यापुढे न जगती कुणिही टिकेल॥

या भारतास हसवू करुनि स्वतंत्र
ते देशभक्तिमय या म्हणु दिव्यमंत्र
सर्वस्व-होम करणे सगळे उठा रे
वारे पहा प्रबळ, हे झडती नगारे॥

ही वेळ बंधु न असे तुमच्या निजेची
ही वेळ बंधु न विलास-विनोदनाची
स्वातंत्र्य वेळ शुभ दिव्य अपूर्व आली
आता उठा सकळही झणि याच काळी॥

आली घडी पुनरपि परतोन ये ना
जो जातसे क्षण कधी फिरुनी मिळेना
ना आळशी तुम्हि बना न बना उदास
या आइचे सकळही झणि तोडु पाश॥

उत्साहसागर बना दृढ धैर्यमूर्ती
स्फूर्ति प्रचंड उसळो मिळवा सुकीर्ती

होईल माय अपुली शतबंधमुक्त
तेजे उठाल सगळे जरि रे सुपुत्र॥

हे राष्ट्रतेज सगळे भडके उफाळे
हे देशभक्तिस पाहा शतपूर आले
हे ठेउनी निज सुखावरती निखारे
दास्या पदी तुडविण्या सुत सिद्ध सारे॥

झालो तुफान सगळे न अता गुमान
झालो तुफान सगळे नच देहभान
झालो तुफान करु हासत देहदान
स्वातंत्र्य आणु अथवा मरु हीच आण॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, फेब्रुवारी १९३१

# प्रिय भारता सुंदरा!

प्रिय भारता सुंदरा!।।
ज्ञानविहारा! परम उदारा!
कुदशा जाइल तव कधि दूरा?।। भारता....।।

सत्त्व कुठे तव? त्याग कुठे तव?
तोडी कवण तव सुयशो-हारा?।। भारता....।।

पुत्र न दिसती, वैरी गमती
जे तुज लोटिति दुर्गति-दारा।। भारता....।।

शोक न करि तू प्रभुला प्रिय तू
अवतरुन तुला तारिल, मधुरा!।। भारता....।।

◘ ◘ ◘
-अमळनेर, ऑगस्ट १९३१

## दुबळी मम भारतमाता!

**दुबळी मम भारतमाता**
**दीन विकल दिसते अनाथा।। दुबळी....।।**

**कोट्यावधि हे पुत्र असोनी, येति न कोणी ते धावोनी**
**आज तिला कुणि देइ न हाता।। दुबळी....।।**

**ये करुणाकर, ये मुरलीधर, भारतभूमी तुज ही प्रियकर**
**ये नतनाथ! खरोखर आता।। दुबळी....।।**

◙ ◙ ◙

**-अमळनेर, ऑगस्ट १९३१**

## देशभक्ताची विनवणी!

सन्मित्रांनो! सुबांधवांनो! परिसावी मदगिरा
यथार्था परिसवी मदगिरा
गारगोटीच्या परी न व्हावे, व्हावे सुंदर हिरा
धवळावे निज-यश:सुरंगे विश्व सकल सुंदर
उठा रे, विश्व सकल सुंदर
मुकुंद पूजुन निजान्तरंगी करा यत्न दुर्धर
यत्नास यश प्रभु देई
श्रद्धेस यश प्रभु देई
आशेस फळ प्रभु देई
कर्तव्याचे कंकण बांधुन करी, न उदरंभर
बनावे, केवळ उदरंभर
महायशाते बलविभवाते संपादा सत्वर॥

ज्ञान नको, बळ नको, नको ते शील, नको ते धन
आम्हाला नको नको ते धन
निरस्तविक्रम होउन दुर्बल ऐसे म्हणती जन
खरे न हे वैराग्य, बंधुंनो! खरे तपस्वी बना
तुम्ही रे खरे तपस्वी बना
देण्यासाठी मिळवा ज्ञाना मिळवा दौलत धना
भाग्यास जगी मिरवावे
वैभवी राष्ट्र चढवावे
कीर्तिने विश्व वेधावे
स्वाभिमानधन अनंत सतत संचवून अंतरी
सख्यांनो, संचवून अंतरी
स्वर्गसुखाते संपादावे राहोनी भूवरी॥

मेंढ्यापरि ना पडा बापुडे, मरण त्याहुनी बरे
खरोखर मरण त्याहुनी बरे
मेल्यापरि हे जीवन कंठुन कोण जगी या तरे

लोखंडाची कांब त्यापरी देह करा कणखर
अगोदर देह करा कणखर
देहाहुन निज मग उत्साही करा धीरगंभिर
आकाश कोसळो वरी
पदतळी भूमि हो दुरी
मज फिकिर नाही परी
ध्येयोन्मुख मी सदैव जाइन पतंग दीपावरी
जसा तो पतंग दीपावरी
ऐसा निश्चय करा, भस्म हो, जाउ न मागे परि॥

स्वातंत्र्याच्या स्वर्गामध्ये जीवात्मा रंगवा
बंधुंनो! जीवात्मा रंगवा
पारतंत्र्यशृंखला कडाकड बलतेजे भंगवा
निजांतरंगी अखंड अशादीप पाजळोनिया
गडे हो दीप पाजळोनिया
नैराश्याची निशा नाशकर सत्वर न्यावी लया
तर उठा झडकरी अता
लावा न मुळि विलंबता
द्या धीर दुर्बला हता
विजयाचा जयनाद घोषवा दुमदुमोन अंबर
जाऊ दे दुमदुमोन अंबर
स्वर्गी गातिल युष्मन्महिमा मग नारद-तुंबर॥

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२७

## मातृभूमिगान

हे शुभकीर्ते जगद्विश्रुते भारतमाते विमलतरे
मंगलमूर्ते मानसपूर्ते त्वन्नमने जन सकल तरे॥
अतिकमनीये शुभ रमणीये नमनीये स्तवनीयवरे
विद्यानंदे वैभवकंदे वंदेऽहं त्वां प्रेम-भरे॥
जगद्भूषणे मनस्तोषणे विपच्छोषणे मधुरतरे
सकलपावने अघविनाशने कलिमलदहने पुण्यपरे॥
तत्त्वपंडिते सुमुनिमंडिते वाङ्मयसरिते विजयवरे
शुभगिरिभूषित सुसरित्-पूरित सुवनालंकृत अतिरुचिरे॥
सदय-मानसे वात्सल्यरसे प्रसादपूर्णे दैन्यहरे
अजरे विश्वंभरे देवते कविस्तुते परमार्थपरे॥
अन्नदायिनी ज्ञानदायिनी जगन्मोहीनी प्रभुप्रिये
तपोभूमि तू, कर्मभूमि तू, निस्तुल निरुपम निरंतरे॥
त्वद्गुणगायन, त्वत्पदवंदन, त्वत्सेवन, मत्कर्म खरे
त्वत्सुत हे मद्भूषण माते! परमोदारे स्नेहसरे॥ हे शुभ...॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## गाऊ मी कसले गाणे?

हे जीवन केविलवाणे।
गाऊ मी कसले गाणे?।।

जगि झालो आम्ही दीन
जीवनावीण जणु मीन
ही अमुची स्थिति किति हीन
मन जळते मम अपमाने।। गाऊ..।।

आमुचे असे ना काही
सत्तेची वस्तू नाही
सुतळीचा तोडा नाही
दुर्दशा देखणे नयने।। गाऊ..।।

ना गायिगुरे ती दिसती
वासरे न ती बागडती
दूध तूप शब्दची उरती
दुर्मिळ ते झाले खाणे।। गाऊ..।।

जी अन्न जगाला देई
ती उदार भारता मायी
किति रडते धायीधायी
मिळती ना चारहि दाणे।। गाऊ..।।

अन्नास माय मोताद
घेई न तिची कुणि दाद
सुत घालित बसती वाद
पोट का भरे वादाने।। गाऊ..।।

उद्योग सकलही गेले

बेकार सर्वही झाले
जगताती अर्धे मेले
श्रेयस्कर याहुन मरणे॥ गाऊ..॥

देण्यास नाहि तो कवळ
यासाठी माता विकळ
अर्पिती नद्यांना बाळ
जळतोच ऐकुनी काने॥ गाऊ..॥

उपजली न मरती तोची
प्रिय बाळे भारतभूची
मेजवानि मृत्युस साची
मांडिला खेळ मरणाने॥ गाऊ..॥

ना वस्त्रहि अंगी घ्याया
ना मीठहि थोडे खाया
ना तेल दिवा लावाया
मृति येना म्हणुनी जगणे॥ गाऊ..॥

लागल्या शेकडो जळवा
संपत्ती नेती सर्वा
आमुची न कोणा पर्वा
आम्हि हताश होउन रडणे॥ गाऊ..॥

जाहलो लोक फटफटित
नि:सत्त्व भुतांसम दिसत
पावले सर्वही अस्त
किति दिवस असे हे पडणे॥ गाऊ..॥

भारतीय जनता रोड
नि:सत्त्व करित काबाड

मोजुन घ्या हाडन् हाड
पोटभरी न मिळे खाणे॥ गाऊ..॥

तेजस्वी विद्या गेली
ती पोपटपंची उरली
जी गोष्ट पश्चिमे लिहिली
ती आम्हां श्रुतिसम माने॥ गाऊ..॥

सत्कला मावळे सारी
सच्छस्त्रे मेली सारी
अनुकरणे करित भिकारी
शेणात सदा हो सडणे॥ गाऊ..॥

ती थोर संस्कृती गेली
ती गजान्त लक्ष्मी गेली
पुरुषार्थ सत्त्वता गेली
उरली ती स्मृतिची चिन्हे॥ गाऊ..॥

सोन्याचा जेथे धूर
द्रव्याचा जेथे पूर
ती चिंतेमाजी चूर
भारतभू कैशी बघणे॥ गाऊ..॥

भरलेली होती बाग
भरलेले होते भाग्य
ते गेले परि सौभाग्य
अपमाने आता जगणे॥ गाऊ..॥

तो बाग मनोहर गेला
हा मसणवटा हो झाला
दैवाची भेसुर लीला
आम्हि गुलाम म्हणुनी जगणे॥ गाऊ..॥

कुणि उंदिर आम्हां म्हणत
ती मेयो निंदा करित
जग अस्पृश्य आम्हां गणित
किति निंदा ऐकू काने।। गाऊ..।।

अज्ञानपंकगत लोक
आढळे घरोघर शोक
नांदतात साथि अनेक
ठाण दिले दृढ रोगाने।। गाऊ..।।

शेतकरी मागे भीक
शिकलेला मागे भीक
तो भिकारी मागे भीक
धंदा ना भिक्षेवीणे।। गाऊ..।।

हृदयाची होई होळी
आपदा सदा ही पोळी
खाऊ का अफुची गोळी
मज सहन होइ ना जगणे।। गाऊ..।।

खाऊन अफू परि काय?
ही रडेल सतत माय
बंधूंची न हरे हाय
काय मिळे मज मरणाने।। गाऊ..।।

हा हिमालय दिसे खिन्न
या सरिता दिसती दीन
पशूपक्षिवनस्पती हीन
सोडिती श्वास दु:खाने।। गाऊ..।।

हे परात्परा भगवंता
हे अनंत करुणावंता
हे जगदीशा बलवंता

ऐकावे हे रडगाणे।। गाऊ..।।

वाजवी मनोहर पावा
मोहांधतिमिर हा जावा
खडबडुनी लोक उठावा
उघडावी अस्मन्नयने।। गाऊ..।।

दे स्फूर्ति आम्हाला दिव्य
कृति करु दे उत्कट भव्य
स्वातंत्र्य येउ दे नव्य
हलवावी अस्मद्वदने।। गाऊ..।।

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## स्वातंत्र्य

प्राण अर्पावे। स्वातंत्र्यसौख्य मिळवावे।।

केवळ बडबड ना कामाची
गरज असे निशिदिन कष्टांची
कष्टत जावे।। स्वातंत्र्य....।।

विलास-सुखभोगांना सोडा
मोह सकळ ते मारक तोडा
स्वार्थांकुर चित्तातील मोडा
निर्मळ व्हावे ।। स्वातंत्र्य....।।

देशभक्तिचा मनात काम
भारतभूचे वदनी नाम
दृष्टि दिसावी तेजोधाम
निर्भय व्हावे ।। स्वातंत्र्य....।।

द्वेष कलह ते विसरुन जावे
बंधुबंधुचेपरि सजावे
हाती हात प्रेमे घ्यावे
पुढे दौडावे ।। स्वातंत्र्य....।।

उचंबळोनी वृत्ती जावी
उचंबळोनी हृदये जावी
वेडावुन जणु मति ती जावी
तन्मय व्हावे ।। स्वातंत्र्य....।।

गुलामगिरिवर हाणा घाव
दास्या देशी नुरोच ठाव
प्रयत्नावरी ठेवुन भाव

सदा झुंजावे ॥ स्वातंत्र्य....॥

स्वातंत्र्याची जया तहान
धावून जाऊ घेऊ ठाण
गाठू ध्येया देऊ प्राण
व्रत हे घ्यावे ॥ स्वातंत्र्य....॥

परवशतेचे तोडा पाश
तोडा तोडा हरपो त्रास
चीड न येते काय तुम्हांस
चला चमकावे ॥ स्वातंत्र्य....॥

परदास्याच्या पंकी कीट
असणे याचा येवो वीट
होउन सावध नीट सुधीट
निजपद घ्यावे ॥ स्वातंत्र्य....॥

स्वातंत्र्याचा ईश्वरदत्त
हक्क करोनी घेऊ प्राप्त
करु यत्नाची अपूर्व शर्थ
मरुनी जावे ॥ स्वातंत्र्य....॥

निज मरणाने मंगल येइल
निज मरणाने वैभव येइल
निज मरणाने मोक्ष मिळेल
मरण वरावे ॥ स्वातंत्र्य....॥

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, जानेवारी १९३०

## स्वातंत्र्यदेवीचे शुभ आगमन

आनंदाचा।
उगवला दिवस सोन्याचा।।

मालिन्यरात्र लोपली
सौभाग्यउषा उजळली
सत्कीर्तिगुढी उभविली
चला रे नाचा।। उगवला....।।

गंभीर भेरिगर्जन
शंखादि मंगलस्वर
देवता येतसे दुरुन
मांगल्याचा।। उगवला....।।

ते पहा मराठी भाले
चपळेपरि चमकत आले
मंदील पाठिवर खेळे
तच्छौर्याचा।। उगवला....।।

शत्रुच्या पिऊन रक्ताला
यज्जीव निरंतर घाला
तो आला रजपुत भाला
तत्तेजाचा।। उगवला....।।

ते पहा शिवाजी राजे
तो प्रतापसिंहही साजे
पृथ्विराजहि तेथ विराजे
धन्यत्वाचा।। उगवला....।।

ती जिजा तुम्हां दिसली का

ती उमा तुम्हां दिसली का
लक्ष्मीहि तुम्हां दिसली का
पावित्र्याचा॥ उगवला....॥

दुंदुभी नभी दुमदुमली
माणिकमोती उधळिली
स्वातंत्र्यदेवता आली
जयघोषाचा॥ उगवला....॥

सर्वैक्य-सुंदरासन
मांडिले बहुत सजवून
देवता दिसतसे खुलुन
मोक्षश्रीचा॥ उगवला....॥

सुखसिंधु किति उचंबळे
भाग्यात चित्त दंगले
मोदात विश्व रंगले
कैवल्याचा॥ उगवला....॥

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२८

## स्वातंत्र्यानंदाचे गाणे

(लाहोरला स्वातंत्र्याचा ठराव पास झाला ती वार्ता ऐकून केलेले गाणे.)

मंगल मंगल त्रिवार मंगल पावन दिन हा धन्य अहो
भारत प्यारा स्वतंत्र झाला जय बोला जय बोला हो।।

मेवाडाच्या रणशार्दूला उठा, उठा शिवराया हो
माता अपुली स्वतंत्र झाली जय बोला जय बोला हो।।

दिशा आज का प्रसन्न दिसती निर्मळ दिसती सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

पवन आजचा पावन वाटे कारण मजला सांगा हो
भारतमाता मुक्त म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

पाषाणांची फुले जाहली का ते मजसी सांगा हो
गतबंधन भू झाली म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

मातीची ही माणिकमोती झाली का मज सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

काट्यांची मखमल मृदू झाली चमत्कार का झाला हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

सतेज आजी अधिकच दिसतो दिनमणि का मज सांगा हो
आई झाली मुक्त म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

पर्वतातुनी खो-यांतूनिही दुर्गांतुन का गाणी हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो।।

नद्या आज का तुडुंब भरल्या वाहावयाचे विसरुन हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

उचंबळे का अपार सागर सीमा सोडुनी आज अहो
भारत झाला मुक्त म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

गगनमंडपी विमानगर्दी झाली का मज सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

स्वर्गातून सुमवृष्टि होतसे अपार का मज सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

नारद तुंबर गाणी गाती सुरमुनि हर्षित ते का हो
भारत झाला मुक्त म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

कैलासावर डमरु वाजतो नाचे शिवशंकर का हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

चार मुखांनी चतुरानन की सामगायना करितो हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

सृष्टी नाचते विश्व हासते चराचर भरे मोदे हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

पाहा पाहा ते विश्वजन बघा, भेट घेउनी आले हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो॥

चिनी जपानी अमेरिकन ते आले वंदन करण्या हो
'भारतजननि! क्षमस्व' म्हणती जय बोला जय बोला हो॥

तार्तर मोगल अफगाणादी शेजारी ते आले हो
'भारतजननि! क्षमस्व' म्हणती जय बोला जय बोला हो॥

युरोपातले सारे गोरे सविनय साश्रू आले हो
'भारतजननि! क्षमस्व' म्हणती जय बोला जय बोला हो॥

भारतमाता अनाथनाथा प्रेमे कुरवाळीत अहो
आपपर तिला नाही ठावे जय बोला जय बोला हो॥

आज जगाचे भाग्य उदेले वैभव फुलले अगणित हो
उचंबळे सुखसागर मंगल जय बोला जय बोला हो॥

दैन्य पळाले दु:ख गळाले कलहद्रोह दुरावति हो
नव्या मनूचा उदय जाहला जय बोला जय बोला हो॥

चुकली माकली जगातील ती राष्ट्रे जवळी घेउन हो
प्रेमे न्हाणी त्यांना भारत जय बोला जय बोला हो॥

पिवळी ढवळी काळी सारी भुवनामधली बाळे हो
भारतमातेजवळ नाचती जय बोला जय बोला हो॥

"भलेपणाने खरेपणाने प्रेमे सकळहि वागा हो
सुखास निर्मा" बोले भारत जय बोला जय बोला हो॥

"शांति नांदु दे अता अखंडित आनंद सहा नांदो हो
विसरा मागिल" बोले भारत जय बोला जय बोला हो॥

"परमेशाची सकळ लेकरे सुखेन भुवनी खेळू हो
स्वर्ग निर्मु या" बोले भारत जय बोला जय बोला हो॥

"परस्परांचे हात धरु या फेर धरुनी नाचू हो
शांतिगीत गा" बोले भारत जय बोला जय बोला हो॥

“थोर भारता! मार्गदर्शका! तूच आमुचा सदगुरु हो”
वदती सारी राष्ट्रे सदगद जय बोला जय बोला हो॥

अनंत झाली सुपुष्पवृष्टी गगनामधुनी तेव्हा हो
थै थै थै थै नाचु लागले गाउ लागले जय जय हो॥
जयजय भारत प्रियतम भारत जयजय भारत बोला हो
जयजय जयजय जयजय जयजय जय भारत जय बोला हो॥

आनंदाने डोला हो
आनंदाश्रू ढाळा हो
जयजय भारत जयजय भारत जयजय भारत बोला हो॥

हृदय कपाटे खोला हो
बांधा चित्सुखझोला हो
नाचा त्यावर नाचत बोला जयजय भारत बोला हो॥

जय बोला जय बोला हो॥
जय भारत जय बोला हो॥
जयशब्दाने अंबर कोंदे जय भारत जय बोला हो॥

भारत प्यारा स्वतंत्र झाला जयजय म्हणुनी बोला हो
सृष्टी सकलही स्वतंत्र झाली जयजय म्हणुनी बोला हो॥
◙ ◙ ◙
-अमळनेर छात्रालय, २६ जानेवारी १९३०

## भारतास!

मनोहरा भारता! मदंतर देवा! त्वन्मुखकळा
शोभेल कधी दिव्ये तेजे कळे कळेना मला
मोहरात्र संपेल कधी ही उषा कधी येइल
सदभाग्याची सुंदर किरणे कदा बरे पसरिल
स्वार्थ कधी जाईल लयाला, कलह कधी सरतिल
सद्धर्माची परमैक्याची फुले कधी फुलतिल
हे भाइभाइचे परि होतील कधी हिंदिजन
कधी हृदया मिळतिल हृदये, जोडेल मनाला मन
उठतील कधी तेजाने हातात हात घालुन
अलौकिक अपूर्वा कृति करितिल त्वत्सुत कधी निर्मळ
आनंदाश्रू त्वन्नयनांतुन वाहवतिल घळघळ॥

अस्मन्माता करु स्वतंत्रा ध्येय हेच लोचनी
त्वत्पुत्रांच्या दिसुनी केव्हा उठतिल त्वन्मोचना
जपती अजुनी निज शरिरांना अमूल्य ठेव्यापरी
मरणाची ती भीति क्षुद्रा अजुन तदीयांतरी
निज आप्तांच्या निज गेहांच्या मोही हे अडकती
रडती, पडती, प्रखरता न ता पेटवी चित्ताप्रती
तोडितील आई! केव्हा त्वत्सुत हे मायापाश
त्वत्स्वातंत्र्याचा केव्हा लागेल एक त्या ध्यास
त्वदभक्तीचा तो केव्हा दरवळेल तन्मनि वास
देशभक्त तो रक्त एकच व्रती इतर विसरुन
घेइ करी जो वाण सतीचे वज्रमूर्ति होउन॥

नयनी, वदनी, भाळी, ज्यांच्या देशभक्ति रेखिली
नररत्ने ना अशी सहस्त्रावधि अजुनी देखिली
ज्यांचे जीवन तहानलेले स्वातंत्र्यसुधेस्तव
तळमळते जळते मन ज्यांचे, धीर न धरिते लव

उच्चारी आचारी ज्यांच्या अखंडित प्रगटते
स्वातंत्र्याची मंगल गंगा, तरुण असे कितिक ते?
भोगावरती दृष्टि तयांची विलासैकजीवन
अनंतभोगी भ्रमरसम रमे नित्य तयांचे मन
भावना उज्वला नाही मेल्यापरि दिसती तरुण
स्वातंत्र्यरवीचे ज्यांनी आगामी व्हावे अरुण
हसवावे निजजननींचे मुखकमल जयांनी करुण
व्यसनशरण हे तरुण बघोनी जीव किती तडफडे
मदंतराला ठावे, माते! अश्रुसडा मम पडे॥

तुझ्या भारता! वातावरणी जिकडे तिकडे कदा
स्वातंत्र्याचे वारे उठतिल पळावया रिपु-मदा
स्वातंत्र्याचे पुरुषार्थाचे पराक्रमाचे तसे
विचार केव्हा रोमरोमिं ते भरतिल भरपूरसे
देशभक्ति पाजितील केव्हा माता निज लेकरा
देशप्रेमे दिव्ये भरतिल कधी तदीयांतरा
अज्ञानसागरी बुडती, भारतीय माता अजुनी
देशभक्ति पाजील कोण माता जरि पडती निजुनि
देशभक्ती खेळे जो ना मातांच्या नयनी वदनी
तोवरि नाही आशा, देशा! त्वदुद्धृतीची मला
दृश्य असे हे नैराश्याचे पाहुन दाटे गळा

मातापितरे शिक्षक रमतिल देशभक्तिसागरी
जेव्हा तेव्हा आशेला मम पल्लव फुटतिल तरी
जिकडे तिकडे एक दिसावे दृश्य देशभक्तिचे
कानी यावे जिकडे तिकडे शब्द देशभक्तिचे
विचारविद्युत एकच खेळो सर्वांच्या हन्मनी
ध्येय दिसावे एक सर्वदा सर्वांना निशिदिनी
सर्वांच्या दृष्टीपुढती स्वातंत्र्यचित्र शोभावे
सर्वांनी यत्न करावे त्यासाठी जीवेभावे
प्राणचित्त वित्त असे जे सर्वस्व सुखे वेचावे
लाखो जेव्हा अशा विचारे उठतिल मग तळपला

भाग्यसूर्य तव समज भारता! संशय नाही मला
प्रसन्न होतिल दिशा, निराशानिशा नष्ट होइल
त्वदभाग्याचे जगी पवाडे सत्कवि मग गातिल
त्वन्मुखकंजी लावण्याची दिव्य चढेल प्रभा
गगनमंडपी वृंद सुरांचा राहिल येउन उभा
पुष्पवृष्टि करितील तुझ्यावर मग गंधर्वस्वर
यशोगान तव गातिल डोलत प्रेमाने निर्भर
होईल त्रिभुवनी तेव्हा सोहळा महानंदाचा
बोलतील एकामेका जन सारे नाचा नाचा
शांतीचा मांगल्याचा स्नेहाचा सौभाग्याचा
तो दिन येइल त्वत्पुत्र जरी वेडे त्वदभक्तिने
होतील, करितिल शर्थ जिवाची मरतील स्फूर्तीने॥

◙ ◙ ◙

-धुळे तुरुंग, जून १९३०

## भारता ऊठ!

ऊठ ऊठ, भारता! तू ऊठ उज्वला!
अभिनवबलवैभवयुत शोभ मंगला॥
दशदिशांत कीर्तिगंध मधुर दरवळो
त्वत्पावन-नामबळे दुरित ते पळो
धैर्य तुझे शौर्य तुझे अमित ना ढळो
जीर्ण शीर्ण सकळ आज जे तुझे गळो
दास्ये ना फिरुन कधी मुख तुझे मळो
शांता, दाता, कांता
रुचिर थोर कृति कर तू सतत निर्मळा॥ ऊठ....॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३०

## वंदे मातरम्!

वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम्॥

तव गतवैभव पुनरपि मिळवू
तव सत्कीर्ति न पुनरपि मळवू
उज्वल करु तव वदन त्रिभुवनि
करु कष्ट तुझ्यासाठी निशिदिनी
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम्॥

तुज पुनरपि जननी गे हसवू
तुज राष्ट्रांच्या शीर्षी बसवू
सकळ जगाची होशिल माता
देलि हतपतिता तू हाता
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम्॥

अश्रु न आई! आता ढाळी
आइ! नआता पाही खाली
त्वत्सुत आम्ही पराक्रमाने
मिरवू तुज जगि सन्मानाने
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम्॥

ऊठ, पहा आम्हि सारे भाई
एक जाहलो द्रोह न राही
घसरु पुढती मिळवू विजया
दास्य झणी तव नेऊ विलया
वंदे मातरम् वंदे मातरम्

**वंदे मातरम् वंदे मातरम्॥**

**विद्यावैभवविकास येइल**
**तववदनांबुज, आइ! फुलेल**
**तुज भाग्यगिरीवरि बघ नेऊ**
**त्वच्चरणी रत सतत राहू**
**वंदे मातरम् वंदे मातरम्**
**वंदे मातरम् वंदे मातरम्॥**

**◘ ◘ ◘**
**-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०**

## भारतजननी तव शरणम्!

भारतजननी तव शरणम्। भारतमाते तव शरणम्
मोददायिनी बोधदायिनी अन्नदायिनी तव शरणम्॥

विद्यावंते तव शरणम्
वैभववंते तव शरणम्
अनंत-तेज:प्रसवे अस्मन्मानससुखदे तव शरणम्

विक्रमकारिणि तव शरणम्
पवित्रकारिणि तव शरणम्
पुण्यकर्मसत्प्रभावतंसे हे ज्ञानरसे तव शरणम्

लावण्यमये तव शरणम्
अनाद्यनंते तव शरणम्
अति-रुचिरे सुचिरस्थिरकीर्ते परमोदारे तव शरणम्

अति-महनीये तव शरणम्
अति-रमणीये तव शरणम्
सुरवर-मुनिवर-नरवर-प्रत्यह-नमनीये हे तव शरणम्

विमले कमले तव शरणम्
नित्यानंदे तव शरणम्
शरणागतजन-अभयदायिनी तापहारिणी तव शरणम्

सुजले सुफले तव शरणम्
अजरे अमरे तव शरणम्
भक्तिज्ञानामृतलेविनि हे शांतरुपिणी तव शरणम्

तपस्विनी हे तव शरणम्
महायोगिनी तव शरणम्

**भाग्याभाग्ये विजयापजये सततहासिनी तव शरणम्**

**प्रभुप्रिये! हे तव शरणम्**
**प्रभुपरिपाल्ये तव शरणम्**
**त्वत्पदकंजी रुंझी घालू मिलिंदसम अम्हि तव शरणम्।।**

**◙ ◙ ◙**
**-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०**

# सुसंस्कृत कोण?

अन्यां करील जगती निज जो गुलाम
तो दुष्ट, संस्कृति न त्या शठ तो हराम
तो रानटी मज गमे न मनुष्य खास
जो मानवा करुन ठेवितसे स्व-दास॥

पापी कृतघ्न अतिदांभिक वित्तदेव
अन्यांस नित्य लुटणे कृति ही सदैव
ऐसे असून 'अम्हि संस्कृत' बोलतात
ना लाज ती जणु अणूहि तदंतरात॥

जातील तेथ करिती भयद स्मशान
अन्यांस नागवुनिया करितात दीन
जे कोणि या पशुंस संस्कृत नाव देती
त्यांना नसे लव विचार उदार चित्ती॥

अन्यांस जो तुडवितो पशू त्या गणावे
त्या व्याघ्र वा वृक म्हणा, नर ना म्हणावे
तो रानटी पतित, संस्कृति ती न त्याला
न स्थान यन्मनि असे लव बंधुतेला॥

ओतीत तोफ वरती फिरवी विमाने
माने तसा विहरतो मिरवे मदाने
ही संस्कृती जरि असे, वृकव्याघ्रीस
त्यांना सुसंस्कृत म्हणा मनुजापरीस॥

स्वार्थांध नित्य बनुनी करिती लढाई
शस्त्रे पहा अमुचि! हीच सदा बढाई
रक्तार्थ जे तृषित चाटित ओठ नित्य
माझे सुसंस्कृत तया वदती न ओठ॥

जेथे असे विजय, जेथ असेल वित्त
तेथेच सुसंस्कृत असे, न असेच सत्य
मोठे यदीय मन, सर्व समान मानी
त्यालाच संस्कृति असे, नच ती विमानी॥

मानव्य ना अवगणी न कुणाहि जाची
जो काळजी निज करी करिही पराची
अन्यापदा बघुन धावत शीघ्र जाई
त्याला 'सुसंस्कृत' म्हणा न दुजा कुणाही॥

कोणी न या जगि असो कधिही गुलाम
नांदो स्वतंत्र सगळे, मनि हाच काम
दीना साहाय्य करण्या निरपेक्ष धावे
त्याला 'सुसंस्कृत' विशेषण हे मिळावे॥

ज्याला समस्त जग हे अपुलेच वाटे
दु:खी कुणीहि बघुन स्वमनात दाटे
ज्यालास्वदेश सगळे निजबंधु सारे
त्याला 'सुसंस्कृत' म्हणाल तरी खरे रे॥

पोळी तुपात भिजवील न आपुलीच
संसार जो करि न अन्य लुटून नीच
मोदे मरेल इतरां हसवावयाला
तुम्ही 'सुसंस्कृत' खरा म्हणणे तयाला॥

ना आढ्यता, सरलता मधुरा समीप
डोळे यदीय गमती अनुराग-दीप
कापट्य ना मनि, विनम्र विशुद्ध शील
त्याला 'सुसंस्कृत' अशी पदवी खुलेल॥

लावीत शोध म्हणुनी न सुधारलेला
ओतील तोफ म्हणुनी न सुधारलेला
ज्याचे उदार मन अंतर ते विशाल
त्याला 'सुसंस्कृत' असे म्हणणे खुशाल॥

जाईन मी मरुन, ना दुसरे मरोत
जाईन मी शिणुन ना दुसरे शिणोत
ऐसे म्हणे, हृदयि जो धरि दीनरंक
त्याला 'सुसंस्कृत' तुम्ही म्हणणे विशंक॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१

## खरा हुतात्मा!

सत्याचा जगतात खून करिती, सत्यास फासावरी
देती हे मदमत्त पापनिरत स्वार्थांध हे आसुरी
अन्याया अभिषिक्त आज करिती निर्लज्ज सिंहासनी
जे जे सत् अवकाश त्यास नुरला त्या न विचारी कुणी॥

दंभाला कवटाळिती सतत हे पापासची पूजिती
संपद्दैवत अर्चिती गरीब जे त्यांचे बळी अर्पिती
सारासार-विवेकअल्प न दिसे सद्बुद्धि झाली मृत
लोकी या भरले किती तरी पहा सर्वत्र हे दुष्कृत॥

ऐशा या समयी जगास सगळ्या सत्पंथ जो दावितो
ध्येयध्यास उदात्त आत्मकृतिने लोकांस जो लावितो
क्रांती जीवनि जो अपूर्व घडवी पाडी उभारीतसे
विश्वा उन्नत जो करी मनि धरा की तो हुतात्मा असे॥

विश्वाला कवटाळितो पसरुन प्रेमे भुजा आपुल्या
प्रेमाने बदलावया बघतसे ज्या कल्पना हो खुळ्या
क्रांती रक्तविहीन जो करितसे दीना जना उद्धरी
सोशी कष्ट अनंत त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

क्लेशाने हसतो न धार खचतो हासेल फासावरी
ध्येयप्राप्ति करावयास पशिता ती ना कधी आदरी
होवो अल्प तरीही तुष्ट हृदयी आशा सदा अंतरी
कर्तव्यार्थ जगे, तयास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

येती संकटराशी घोर ठिक-या त्यांच्या प्रतापे करी
स्वार्थापासुन नित्य दूर, अचव श्रद्धा अमर्त्या वरी
ज्याचे निर्मळ हेतु, दंभ लव ना, निष्पाप बाळापरी
वैराग्याकर थोर, त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

केले साध्य जगात काय न बघा, ते यत्न केले किती
साध्यासाठि नरे, तयावरुनिया घ्या तत्परीक्षेप्रती
ध्येयासाठि उदंड यत्न करि जो आजन्म, जाती जरी
सारे बंधु विरुद्ध, त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

सोशी नित्य दुरुक्ति शांत ह्दये, दारिद्र्य ज्याचे धन
जाई धावुन देखताच दुबळा दु:खार्त कष्टी जन
पापीही जवळी करी निजगुणे पावित्र्य देई, धरी
प्रेमे त्या ह्दयी, तयास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

धिक्कारी न कुणा, गुणास बघतो, तत्त्वा न सोडी कधी
देशद्रोह धरी दुरी, शिरति ते ज्याच्या मनी ना कधी
देवा एक भजे तयास ह्दयी ध्यातो, न भीती धरी
कोणाचीहि जगी, तयास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

द्रव्ये मानमरातबे न, पदवीदाने न होई वश
सत्तेने दबला न जात विलसे निर्दोष ज्याचे यश
चारित्र्यावर डाग नाही इवला, घालून तेला जरी
डोळ्यांमाजि बघाल, त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी॥

ध्येयी जीवनि भिन्नती न उरली ते ध्येय यज्जीवन
ना रात्री दिन वा बघे श्रमतसे खर्ची तदर्थ क्षण
ध्येयाचे अनिवार वेड, न जगी त्यागा यदीया सरी
ऐशा थोर नरास दिव्य पदवी शोभे हुतात्मा खरी॥

ऐशी थोर महा विभूति दिसते जेव्हा धरित्रीवरी
स्वार्थी दुष्ट असत्य दंभमति जे ते कापती अंतरी
सत्या स्थापुन प्रेम निर्मुन जगा देतो धडे उज्वल
जे होता पडले तयांस उठवी दे दुर्बळाला बळ॥

ऐसा एक जगात आज मजला गांधी महात्मा दिसे
दीनांसाठी सदा जळे तळमळे सत्यास पूजीतसे

होती जी मळली धुळीत पडली ती भारती संस्कृती
देवोनी उजाळा तिला करि नवी वानू किती तत्कृती।।

गांधी धर्मच, मूर्त सत्य गमती, धर्मार्थ तज्जीवन
गांधी प्रेमच मूर्त, निर्मळ सदा प्रेमार्द्र त्यांचे मन
गीता चालति बोलती मज गमे, गीतार्थ त्यांची कृती
ऐशी थोर विभूति लाभत अम्हां, भाग्यास नाही मिती।।

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१

## ऊठ झुगारुन देई बेडी

उज्वला! निर्मला
हे भारतवर्षा
हे मंगलदेशा
ऊठ झुगारुन देई बेडी दवडी स्वक्लेशा।।

कितितरि, बापा! काळ लोटला तुजला रे निजुनी
सकल बंधने तोडिश तडातड तेजस्वी बनुनी
अमृता! भारता!
शिर वर कर आता
ऊठ झणी आता
त्वत्पदावरी त्रैलोक्य उभे ठेविल रे माथा।।

पराक्रमाने तेजे आता दास्या तुडवावे
तुझे पवाडे जगात जरि रे सकळांनी गावे
पावना! मोहना!
रमणीया भव्या
स्तवनीया दिव्या
राष्ट्रांच्या तू शिरी शोभ रे अभिनव सत्सेव्या।।

तुझी संस्कृती अनंत, रुचिरा, निर्मल, अमरा, ती
धुळीत परके मिळवु पाहती, ऊठ सोड भीती
दुर्जया! निर्भया!
सुरवरमुनिपूज्या
त्रिभुवनसंस्तव्या
अनंत कीर्ती दिगंतात तू मिरवी निज दिव्या।।

तुझे बळ किती तुझी धृतिती किती ते आणी ध्यानी
अवनीवरती धन्य होउनी शोभे स्वस्थानी
प्रेमळा! कोमळा!

प्रखर बने बापा
हटवी निज तापा
दीनापरि ना पडुनी राही दूर करी पापा॥

स्वातंत्र्याच्या स्वर्गी नांदे, दास्याते तोडी
दैन्य निराशा निरानंदता सकल झणी मोडी
सद्रता! सुव्रता!
विक्रांता दावी
भाग्याला मिरवी
दु:स्थिति अपुली विपत्ति अपुली विलयाला न्यावी॥

डोळे उघडुन केवळ पाही धैर्य मनी धरुनी
नेमेल अवनी सारी निजबळ येइल तुज कळुनी
दुर्धरा! गंभिरा!
सागरसम धीरा
मेरुपरि धीरा
वीरा! वासरणिसम तळपे करि आत्मोद्धारा॥

समय असा ना पुनरपि येइल विलंब ना लावी
व्हावा स्वातंत्र्योदय आता भाग्यवेळ यावी
सिंहसा भीमसा
ऊठ त्वेषाने
झळके तेजाने
दुर्गति अपुली विक्रमसिंधो त्वरित लयाला ने॥

स्वाभिमानघन तू रे होई खितपत न पडावे
धावे, विजये जगी वैभवे तू रे शोभावे
ऊठ रे! ऊठ रे!
तू तर जगजेठी
कृति करि तू मोठी
त्वतभाग्येदूवरी लोभु दे सकल-जगतदृष्टी॥

**स्वतंत्र होउन सच्छांतीच्या सुंदर संदेशा**
**तूच जगा दे हीच असे रे इच्छा जगदीशा**
**उज्वला! निर्मला**
**हे भारतवर्षा**
**हे मंगलदेशा**
**ऊठ झुगारुन देई बेडी दवडी स्वक्लेशा॥**

◙ ◙ ◙

**-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३१**

## प्रभु-प्रार्थना!

करुणाघन अघशमन मंगला जनार्दना श्रीहरी
मुकुंदा मनोहरा श्रीहरी
कृपाकटाक्षा क्षण तरि फेकी, देवा! दीनांवरी
हतबल विकल, प्रभो! जाहलो निराधार केवळ
खरोखर निराधार केवळ
पदारविंदा तुझ्या मुकुंदा पूजितसो दे बळ
पसरला निबिड अंधार
दे कर हितकर तू तार
होऊ दे अस्मदुद्धार
शिर वर करुनी जगी वावरु भाग्यश्रीला वरु
वैभवा संपत्तीला वरू
प्रपंच सुंदर करुनी देवा परमार्थाही करु॥

संकटांबुधीवरुनी येती पवन परम भीषण
भयंकर पवन परम भीषण
आशेचा ते दीप टाकिती झणी, प्रभो विझवुन
पुन:पुन्हा परि पाजळीतसो आशादीपाप्रती
उज्वला आशादीपाप्रती
धैर्याने पाउले टाकितो पुढती रे सत्पथी
त्वत्कृपा अम्हांवर असो
त्वदध्यान मानसी वसो
भयभीति न चित्ती असो
सद्धर्माचा सत्कर्माचा विजयध्वज उभवुन
सुमंगल विजयध्वज उभवुन
भूमातेच्या सशे मंगले उजळू हे त्रिभुवन॥

प्रगतिपथावर पराक्रमानं, गोविंदा, शोभवू
भारता या अमुच्या शोभवू
तदभाग्येंदूवरी सृष्टिची दृष्टि सदा लोभवू

अद्वैताचा आनंदाचा शांतीचा सुंदर
शुभंकर शांतीचा सुंदर
संदेश जगा वितरिल भारत सकलकलहसंहर
ही पवित्र मंगल क-ती
करण्यास अम्हां दे धृती
कर निर्मळ अस्मन्मती
जय जगदीशा! जय परमेशा! जयजय हे श्रीहरी
मुरारे जयजय हे श्रीहरी
धीबल वितरी, प्रेरणा करी, दे स्फूर्ती अंतरी॥

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२८

## राष्ट्राचे उद्यान

राष्ट्रीय जीवन
ओसाड मैदान
या रे निर्मू तेथे
या रे सारे जण
स्वार्थाचे पाषाण
करु त्यांचे चूर्ण
भीषण भुजंग
मारा आधी साचे
ठायी ठायी त्यांची
टाका विध्वंसून
अज्ञान-दलदली
होवो शुद्ध हवा
रुढींचे हे दुष्ट
कराच विध्वंस
दुष्ट आचारांची
जाळावी ही सारी

दिव्य स्वार्थत्याग
पसरु ती हाती
ऐक्याचे भरपूर
बाग सुशोभित
प्रयत्न अनंत
उद्यान समस्त
सद्विचार-वृक्ष
भेसूर भयाण
भगभगीत
रमणीय उद्यान
श्रमावया
भेदांचे पाषाण
चला आधी

क्रोध मात्सर्यांचे
प्राणघेणे
वारुळे भयाण
आधी आधी
सा-या या आटवा
आरोग्याची
मारोतच डास
त्यांचा आधी
जाळी ही काटेरी
माजलेली

अमोलीक माती
आधी आधी
घालू या रे खत
तरि होई
हाच सद्वसंत
शोभवील
सद्वृत्तीचे वेल
पवन वाहेल
मंदार सुंदर
बकुळ भाग्याचे
सच्छील पुष्पांचा
प्रेम अलिकुल
सत्कर्म ताटवे
उद्यान पवित्र
सदगुण-विहंग
विश्वजनमना
खरी समानता
यांच्या कल्पकता
आशेचे अखंड
स्फूर्तीचे तळपोत
नाचोत कारंजी

खऱ्या श्रीमंतीची
श्रद्धेची बाळके
खेळोत गोमटी
अशा राष्ट्रोद्यानी
मांडील स्वासन
सुखाचा सोहळा
पाहेल जो डोळां
पावित्र्याचा
शुभ मांगल्याचे
फुलावेत
गोड परिमल
गुंगू गुंगो
फुलोत सर्वत्र
भरारो हे
करोत कूजना
वेडावोत
दिव्य स्वतंत्रता
फोफावोत
हौद ते वाहोत
दिव्य मीन
खऱ्या उत्साहाची
अंतरीच्या
सच्चिद्वापीतटी
कौतुकाने
तो जगन्मोहन
शुभंकर
भाग्या चढे कळा
तोची धन्य

◘ ◘ ◘
-अमळनेर छात्रालय, १९२९

## राष्ट्रपताका

करु वंदना प्रभाती। करु कीर्तना प्रभाती
राष्ट्रप्रभा पताका। वंदून पूजु हाती
स्वातंत्र्यमंत्रपूते। स्वातंत्र्यगीतगीते
ज्योतिर्मय अखंडे। स्वातंत्र्यसद्विभूते
हे उज्वले पताके। तेजस्वि हे पताके
तुज पाहुनी सदैव। कळिकाळ पोटी धाके
खुलतात तीन रंग। किति गोड गोड गोड
हे तीन रंग म्हणजे। शम शौर्य धर्म जोड
शांतीस दावि हरित। सत्त्वास दावि धवल
शौर्यास केशरी तो। दावीत अर्थ विमल
चकरा वरी विराजे। श्रमगौरवास दावी
समता स्वतंत्र्यचे। हे चिन्ह सुप्रभावी
रमवील उद्यमांत। सर्वांस नित्य झेंडा
देईल सर्व लोकां। साधा स्वतंत्र्य धंदा
जाळील दास्य सारे। नमवील मत्त लोक
वितरील सौख्य सर्वां। दडवील दीन-शोक
हे निर्मळे पताके। तू मोक्षमार्गदीप
न दिसेल दैन्य दास। जरि तू सदा समीप
तू मूर्त राष्ट्रवृत्ति। तू मूर्त राष्ट्रकीर्ती
तू त्याग मूर्तिमंत। तू मूर्त राष्ट्रदीप्ती
तू शौर्य धैर्य वीर्य। तू स्वाभिनामसूर्य
जे स्तव्य सेव्य भव्य। ते सर्व तू अपूर्व
राष्ट्रास तूच आस। राष्ट्रा तुझीच कास
आधार तू जनांचा। विश्वास तू अम्हास
तू ना तरी न काही। ना राष्ट्रानाम राही
ना वित्त अब्रु जीव। स्वातंत्र्यलाभ नाही
करा गर्जना धीर उर्जस्वला ती। जिला ऐकुनी कापती ते अराती
उठावे अता एकदाची समस्ती। चला झाडुनी जीवनातील सुस्ती॥
आम्हां थोर वीरां जगी कोण वारी। अम्हां दिव्य वीरां जगी कोण मारी॥
करु मुक्त आम्ही प्रिया भारताते। प्रतिज्ञा अशी ऐकवीतो जगाते॥

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०

## झेंडागीत

ऊठा बंधुनो! प्रभात झाली झेंडावंदन करु चला
प्रतापशाली गगनी फडके अमरध्वज तो पाहु चला।।
जेवि चराचरि वायु वाहुनी जीवनरस तो ओतितसे
प्रभातकाळी तेवी ध्वज हा अस्मन्मानस फुलवितसे।।
प्रभातकाळी दिनकर कोमल सुमगण जेवी हसवितसे
सुंदर हसरा ध्वज हो विजयी तेवि मनाला खुलवितसे।।
हसवी चित्ता, आशा निर्मी, स्फूर्ति अंतरी संचरवी
तेजोदायक तिमिरविदारक तळपे ध्वज हा जसा रवी।।
पहा स्वकीया करा हलवुनी आपणास तो बोलवितो
माझ्याखाली गोळा व्हा रे तमाम सारे तो वदतो।।
झेंड्याखाली तमाम सारे जमाव करु या मोदाने
अंतरंग रंगवू चला रे शौर्ये धैर्ये वीर्याने।।
राष्ट्राचा हा प्राण अमोलिक राष्ट्राचे हे जीवन हो
सर्वस्व असे अपुले जे जे ते ते झेंडा दावित हो।।
ज्या राष्ट्राते झेंडा नाही त्याते नाही जगी मान
मान तयाची वरी न होई करिती त्याचा अपमान।।
विद्या वैभव कला कीर्तिचे अब्रूचे अभिमानाचे
संरक्षण होतसे जरि वरी गगनी झेंडा हा नाचे।।
झेंडा म्हणजे जीवन अपुले झेंडा म्हणजे स्वप्राण
झेंडा म्हणजे राष्ट्र अपुले झेंडा दैवत ना आन।।
स्वातंत्र्याचे चिन्ह सुमंगल म्हणजे झेंडा हा आहे
झेंडा फडके झळके जोवरि तोवरि वैभवयश राहे।।
झेंडा चमके जोवरि अपुला विश्वी विजयी विक्रांत
राहू तोवरि आपण तेजे निर्भय निर्मळ निभ्र भर्रां
झेंड्याला या वित्ताहून प्राणांहुनहि जपा सदा
झेंडा अपुला जीव धर्महो झेंडा अपुला देव वदा।।
ऐक्याच्या वातावरणाचा झेंडा असतो निर्माता
स्वातंत्र्याच्या संगीताचा झेंडा असतो उदगाता।।
झेंड्यासाठी नाना देशी नाना विरी निजरक्त
दिले, प्राणही फेकुन दिधले, झेंड्याचे व्हा तुम्ही भक्त।।
लाखो करिती बलिदान मुदे एका या झेंड्यासाठी

झेंड्याचा महिमा न वर्णवे कधी कुणाही या ओठी।।
सर्वस्वाचे सर्वैक्याचे राष्ट्रत्वाचे हे चिन्ह
एकचित्त समूर्त जाहले धरा अंतरी ही खूण।।
एका अत्तर थेंबामध्ये लाखो कोटी सुमनांचे
ओतिले असे सर्वस्व तसे झेंड्यामध्ये राष्ट्राचे।।
झेंडा दावी परंपरेला झेंडा संस्कृति गात असे
झेंडा तुमच्या पूर्ववैभवे सदगुणवृंदे चमकतसे।।
मधमाशा त्या पोळ्यासाठी निशिदिन जेवी जपताती
झेंड्याला या राखू आपण करू प्रतिज्ञा प्राणांती।।
जे आताचे जे पूर्वीचे भविष्य काळातीलहि जे
अपुले मंगल सुंदर उज्वल ते या झेंड्यामधे सजे।।
झेंडा सुंदर थोर तिरंगी ललामभूत त्रिजगाते
त्रैलोक्य उभे अभिराम अशा या झेंड्याला नत नमते।।
प्रात:स्मरणीया रमणीया वरणीया झेंड्या नमन
तुला करितसे, तव भक्तीने जावो अमुचे भरुन मन।।

◙ ◙ ◙

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## नवयुवक

हसो दिवस वा असो निशा ती। असो पौर्णिमा असो अमा ती
अम्हांस नाही लवही भीती। पुढेच घुसणे ठरली नीती

अदम्य आम्ही पुढेच जाऊ। धैर्ये शौर्ये पुढेच धावू
स्मशानशांती अम्हां रुचेना। भयनकाला करु आव्हाना

प्रचंड पर्वत पायी तुडवू। लोळ विजेचा हाती अडवू
छातीवर ती झेलू गोळी। करु मृत्युशी खेळीमेळी

दिव्य असीम प्रताप अमुचा। पुढेच घुसणे नेम सदाचा
धृवाजवळची थंडी येवो। तन अमुचीही गोठून जावो

सहारातली येवो आग। पुढेच जाऊ काढित माग
अफाट दर्या मना न भिववी। प्रचंड तटिनी मना न डरवी

भीषण दाट प्रचंड कानन। द-याखोरि जी फिरवित नयन
असोत किल्ले कडे असोत। जाऊ दृढ निज पाय रोवित

धूमकेतु ते अभद्र येवो। तुफान डोक्यावर घोंघावो
अपत्तींचे पर्वत येवो। मृत्यू येउनी सन्मुख राहो

मृत्यु असे तो मित्र आमुचा। संकट तो तर सखा जिवाचा
हे प्रिय सगळे सखे सवंगडी। आम्हावरि ते करितिल न कडी

रडावया जे आम्हां येतिल। हसवुन आम्हां तेची रडतिल
अम्हां कशाची तमा न तिळभर। रणधीर अम्ही निर्भय वीर

नवभारतसुत आम्ही दिव्य। घ्याया जाते उत्कट भव्य

जसा मारुती वरति उडाला। जन्मताच धरण्यास रवीला
तेजार्थ तसे असो भुकेले। राहु न आता मृत पडलेले
रडत झुरत ना अम्हि बसणार। भाग्यगिरीवर दृढ चढणार

खुशाल कोणी करो विरोध। झुंजार अम्ही निर्भय योध
प्राणांची ना अम्हां फिकीर। नसे कशाची अम्हां जिकीर

त्यागाने तळपणार हीर। झालो आम्ही खरे फकीर
भारतात या आणू तेज। भारतात या आणू वीज

भारतात या आणू जोम। भारतात या निर्मू प्रेम
प्राण भारती सतेज आणू। ज्ञान भारती जिवंत आणू

जन्म सफल हा तरीच मानू। स्वतंत्रता भारतात आणू
आम्ही युव नवभारत-पुत्र। व्रती पवित्र ज्वलच्चरित्र

घालित न बसू वाद वितंड। केवळ जमवित बसू न फंड
भैरव आम्ही दुर्जय चंड। करु दास्याचे तिळतिळ खंड

तेज आमुचे दिव्य उदंड। जाळिल अवघे हे ब्रह्मांड
हिमालयाला गदगद हलवू। सिंहालाही हिसडे देऊ

कोण अम्हाला करिल विरोध। झुंजार अम्ही निर्भय योध
प्राणांवर जाहलो उदार। कोण अता घेइल माघार

विचार केवळ रुचे न सतत। कृती करावी हे अमुचे व्रत
लंबकापरी आंदोलनता। देइल कधि न स्थिति समुन्नता

या जे उत्सुक नव कार्याला। चला उठा या दिव्य रणाला
काय काम ते विचारता का? ऐका तरि ते उरो न शंका

राजकीय वा सामाजिक ते। दास्य अम्हांते सहन न होते

या दास्याला पदि तुडवाया। अन्यायाला पदि तुडवाया
जगद्दुष्टता ही बदलाया। दु:खनिराशा दूर कराया
दुष्ट रुढींना बुडवायाला। दुष्ट धर्म ते उडवायाला

वैषम्याला दूर कराया। दारिद्र्याला दूर कराया
रोगराइला दूर कराया। दुष्काळाला दूर कराया

पापाला त्या दूर कराया। अज्ञानाला दूर कराया
संकुचिताला दूर कराया। संचयबुद्धिस दूर कराया

मदोद्धतांचा मद उतराया। उद्दामांची रग जिरवाया
पुंजपतींची पत हरवाया। सत्ता त्यांची ती हरवाया

अम्हि उठलेले युव तेजाळ। अम्हि आगीचे जळते लोळ
करी घेतले सतिचे वाण। उठलो आम्ही युव बेभान

झालो आता जसे तुफान। अम्हां कशाची नसे गुमान
मान अता ही वर करणार। कुणास आता ना डरणार

बेडर बेशक बेदरकार। पुढेच आता अम्हि घुसणार
वाटेमध्ये जे जे वाइट। टाकू करुनीच नायनाट

अवास्तविक जे जुलमाचे जे। रास्त नसे जे पाक्त नसे जे
भ्याड असे जे मलिन असे जे। दुष्ट असे जे नष्ट असे जे

जे सडलेले जे कुजलेले। निरुपयोगि जे जे मेलेले
विरोध जे जे करिल विकासा। त्याच्या त्याच्या करुच नाशा

त्या सर्वांना पृथ्वीवरुन। सुदूर देऊ भिरकावून
या जे उत्सुक या कार्याला। तेज आणु या स्वजीवनाला

या या सगळे सखे सहोदर। या जे नवयुव परम उदार

या रे सगळे, समानतेची। माधुर्याची मांगल्याची
सर्वैक्याची सारल्याची। स्वतंत्रतेची समृद्धतेची
सच्छांतीची सतज्ञानाची। सदभक्तीची सत्स्फूर्तींची

निर्मू पावन मंगल गंगा। अनंतरंगा दिव्य अभंगा
सत्प्रेमाला करु अभिषेक। सत्याला या करु अभिषेक

मानव्याला करु अभिषेक। बंधुत्वाला करु अभिषेक
यात्रेकरु हो आपण सारे। यात्रेलागी चला निघा रे

दिव्य निशाणे हाती घ्यारे। सदध्येयाची गाणी गारे
खरे तरुण नव आपण होऊ। भारतास या शोभुन राहू

धृवबाळाचे प्रल्हादाचे। सत्त्वसिंधु चिमण्या चिलयाचे
रोहिदास अभिमन्यू यांचे। सत्यकाम नचिकेता यांचे

शुकसनकांचे उपमन्यूचे। ज्ञानेशांचे शिवबाजींचे
जनकोजीचे विश्वासाचे। वंशज आपण पवित्र साचे

परंपरा ही आहे थोर। तिचा आपणा अनंत जोर
परंपरा ही पुढे चालवू। परंपरा ही कधि न मालवू

परंपरेचा नंदादीप। सदैव पेटत ठेवु समीप
स्वप्राणांचे घालू तेल। सदा दीप हा मग तेवेल

यथार्थ आपण होऊ तरुण। नव्या मनूचे होऊ अरुण
परमेशाचे करुन ध्यान। हीच घेउ या मनात आण

'हसो दिवस वा असो निशा ती। असो पौर्णिमा असो अमा ती
अम्हांस नाही लवही भीती। पुढेच घुसणे ठरली नीती'

◘ ◘ ◘

-अमळनेर छात्रालय, १९२९

## बाल-वृद्ध संवाद

शाळा सुटली कटकट मिटली बाळे मग जमली
वदने तेजाने फुलली
शाळा सुटते कधी अशी ते वाट बघत होते
बाळक तेजस्वी हो ते
सगळे जमले एके ठायी रांग झालि नीट
दिसती उल्हासी धीट
झेंडा घेउन नायक झाला सर्वांच्या पुढती
मग मिरवणूकीस निघती
हुकूम झाला कूच कराया मग वानरसेना
निघाली गात दिव्य गाना
उत्साहाने उल्हासाने बाळे ती निघती
मुखाने मातगीत म्हणती
जो निघाली तोच भेटला वृद्ध एक त्यांस
विचारी प्रश्न बालकांस

वृद्धः कुठे, मुलांनो! जाता तुम्ही? निशाण हे कसले?
सांगे काम कोण असले?
लहान तुम्ही बाळ मजेने हासत खेळावे
मांडीवरती लोळावे
खावे प्यावे मौज करावी चिंता ना करणे
हसुनी इतरां हासविणे
बाल वय असे अजुनी तुमचे हसण्या रडण्याचे
क्षणात रुसण्याफुगण्याचे
कुठे जातसा निशाण घेउन? दिसता मज वेडे
परता मागे घ्या पेढे
मुलामुलींनी घरी बसावे आईशेजारी
जावे कधी न बाहेरी
चला सकळही परता तुम्ही माझे ऐकावे

वृद्धा सदैव मानावे
परता, बघता काय असे रे ऐकावे माझे
तुम्हि तर गोड बाळराजे'

एक मुलगा: अमुचा आहे नायक हा हो तुम्हा सांगेल
कसला खेळतसो खेळ
बोलत नाही आम्ही कोणी शिस्त असे अमुची
आज्ञा ऐकतसो याची
सांग गड्या रे यांना सारे यांना समजावी
शंका त्यांचि न ठेवावी
आम्ही सगळे उभे राहतो रांगेमधि नीट
त्यांना सांग, तूट धीट॥

वृद्ध: नायक तुमचा? काय बोलता? पाळितसा शिस्त? ठेउन त्याच्यावर भिस्त?
शिपायीच जणु झाला? करता थट्टा वृद्धाची नसावी बुद्धि अशी साची?

नायक: अहो खरोखर आम्ही सगळे आहोत शिपायी खोटे सांगुन करु कायी?
शिस्त पाळतो, नीट वागतो, जातो खेळाया
कसला खेळ सांगतो, या
गाणी गावी सुंदर सुंदर भारतमातेची
चित्ते हरण्या लोकांची
देशभक्तिची स्वदेशिची ती दिव्य गाणि गातो
रस्त्यांतून गात जातो
निशाण अपुल्या देशाचे हे झेंडा राष्ट्राचा
सुंदर अपूर्व तेजाचा
तीन रंग हे पहा केशरी हिरवा हा धवल
वरती चरका हा विमल
धर्मैक्याचे स्वातंत्र्याचे झेंडा हे चिन्ह
झेंडा समानता-खूण
थोरामोठ्यांनी हा केला झेंडा निर्माण

भारतसेवेची खूण
या झेंड्याची गाणी गातो करितो तत्पूजा
तेव्हा वाजवितो बाजा
लोकां करणे जागृत, जागृत करणे व्यापारी
म्हणुनी अमुचि निघे स्वारी
दुकानदारापाशी जाउन जोडुन त्या हात
वदतो काय अम्ही गोष्ट
नका विकू हो नका विकू तो परदेशी माल
होती बंधूंचे हाल
नका खरेदी करू नव्याने परदेशी माल
होती देशाचे हाल
परदेशातील मोहक वस्तू वस्त्रे न विकावी
भारतमाय न रडवावी
घरोघरीही जातो आम्ही आळीआळीत
गातो देशभक्ति- गीत
जो जो आम्हां वेळ सापडे सांभाळुन शाळा
देतो तो या कार्याला
खेळ अमुचा हाच, अम्हाला यातच आनंद
नाही इतर अम्हां छंद
कशास पेढे देता? त्यातहि साखर परदेशी
वाइट वाटे आम्हांसी॥

वृद्धः मला वाटते भय, बाळांनो! साहस न करावे
झडकर तुम्ही घरि जावे
वाट तुमचि ते पहात असतिल घरी आइबाप
होइल त्यांस किती ताप
जा परतुन माघारे, ऐका आगित न शिरावे
स्वगृही शांतपणे जावे
जा माघारे म्हाता-याचा ऐकावा बोल
मन निज ठेवा समतोल॥

नायक: भीती न शिवे थोडी देखिल अमुच्या चित्ताला
न भितो जगात कोणाला
नि:शंक अम्ही सारे जातो गात देशगीते
आम्ही नाहि मुळी भित्रे
गांधीजींचे नाव नाचते ओठांवर नित्य
नाही कळिकाळा भीत
भारतमातेचे हो आम्ही छोटे सरदार
न रुचे खेळ, न घरदार
भारतमातेचे हो आम्ही भावी आधार
घेऊ कधी न माघार
अमुच्यामध्ये असे पहा हा सुभान त्या नाव
त्याचे तेज किति अपूर्व
लहान आहे तरि तो आहे सिंहाचा छावा
भीति न शब्द त्यास ठावा
लहान दिसतो तरि तो आहे दिव्य बालवीर
अदभुत त्याचा तो धीर
पलीकडे तो बालक दुसरा नामे शिवराम
मोठा निश्चयि अभिराम
पलीकडे तो बाळ हासतो 'साधु' त्यास म्हणती
त्याच्या निश्चयास ना मिति
प्रल्हाद, भिका, रामदास तो त्रिंबक तो चौथा
त्यांची स्मृति राहो चित्ता
कितिकांची मी सांगू नावे बालवीर सारे
काळहि त्यांच्याशी हारे
भीतीच्या ना सांगे गोष्टी आम्हां भय नाही
हृदयी देशदेव राही
गांधीजींचे नाव मुखी मग भीति कशी राही
भीती सर्व पळुन जाई
तीन रंगी हा झेंडा अमुचा तिम्ही जगी फिरवू
याला तेजाने मिरवू
लयास सारी चित्तामधली भयभीती जावी
सेवक देशाचे भावी

अम्ही भयाचे गिरवित बसलो धडे जरी आज
होइल पुढे केवि काज
स्वातंत्र्याला मिळवायाला मिळले राखाया
झिजवू आम्हि मुदे काया
नसे मोह तो आता आम्हां खाण्यापिण्याचा
मोह न उरला नटण्याचा

गाणी गावी झेंडा घ्यावा यातच आनंद
आम्हां इतर नुरे छंद
खेळायाला जरी आवडे वेळ नसे त्याला
करणे स्वतंत्र देशाला
स्वस्थ न आता अम्हां बैसवे आम्ही जरि बाळ
होऊ काळाचे काळ
बाळच होता धृव परि सोडुनी अन्यायी बाप
जाई देवाचे समिप
अढळपदावर नेउनिया बसवू
त्याला स्वातंत्र्ये नटवू
रोहिदास तो बाळच होता सोशी किती कष्ट
छळि जरि कौशिक तो दुष्ट
सत्त्व न त्याने ते हारविले तेजे तळपतसे
होऊ बाळहि आम्हि तसे
लहान होते किती लवांकुश तरि ना डगमगले
लढण्या रामाशी सजले
लहान होता चिमणा चिलया सत्त्वास्तव मेला
भूषण भारतास झाला
कड्यावरुन लोटिती घालिती जळत्या खाईत
परि तो प्रल्हाद न भीत
तप्त तैल कढईत टाकिती बाळ सुधन्वा तो
हसतो कृष्ण कृष्ण म्हणतो
मान न लववी श्रीशिव भूपति परक्या सत्तेला
नव्हती वर्षे ते सोळा
लहान होते समर्थ तरि ते त्यागिति घरदार

त्यांच्या धृतिस नाहि पार
जनकोजी विश्वासराव ते ते माधवराव
देती भीतीस न ठाव
सोळा सतरा वर्षे त्यांची सेनापति होती
लाखो लढायांत लढती
लहान आम्ही तरि ना भीती, काळाचे काळ
ना अळुनाळ न लडिवाळ
म्हणू नये की लहान आहे छावा सिंहाचा
घेइ प्राण गजेंद्राचा
म्हणू नये की लहान पिल्लू तल्लख नागाचे
चावे कडकडून साचे
स्फुलिंगकण तो लहान न म्हणा लहानशी ठिणगी
लाविल आग समस्त जगी
लहान न म्हणा त्वेषे सणणण करित जाइ तीर
तोडित रिपुचे झणि शीर
लहान म्हणुनी अम्हां भिवविता भिणार ना आम्ही
येऊ देशाच्या कामी
डी व्हॅलेरा होता म्हणती तीनच वरषांचा
तुडवी ध्वज रिपुचा वाचा
असे मॅझिनी बाल्यापासुन देशास्तव दु:खी
राहे सदोदित सुतकी
काळा पट्टा शोकनिदर्शक हातावर बांधी
वाचा गोष्ट त्याचि आधी
लहान म्हणुनी गोंजारुनी घरात ठेवून
फळ ते काय? जाउ मरुन
मरावयाचे तुम्हां आम्हां आहे सगळ्यांते
किमर्थ धरणे भीतीते
कर्तव्याचा रस्ता दिसतो आम्हांस समोर
येवो संकटेहि घोर
कर्तव्य अम्ही करणे त्यातच आम्हां आनंद
नाही रुचत इतर छंद

वृद्ध: मरावयाचे असे एक दिन जरि ते सगळ्यांते
आजच का जा मरण्याते
लहान तुम्ही, करा तयारी, धष्ट पुष्ट व्हावे
खावे प्यावे खेळावे
अभ्यास करा ज्ञाना मिळवा उतावीळ व्हा न
अजुनी बाळ तुम्ही सान
कर्तव्यच्युत व्हा न सांगतो, कर्तव्य कराया
आहे वेळ अजुनि राया!
मोठे व्हावे तनामनाने ज्ञानहि मिळवावे
मग ते कर्तव्य करावे
अपक्व बुद्धी अजुनी तुमची, तुम्हास ते म्हणती
मर्कट वानरसेना ती
खोड्या करणे, गंमत करणे, स्वभाव हा तुमचा
काळ प्रसन्न बाल्याचा
करा तयारी, धरुन हुशारी, भावी कार्याची
ठेवा स्मृति चित्ती त्याची
नका हट्टाला पेटू त्याने न घडे कल्याण
अंती रडतिल हे नयन
कमवायाची वेळ असे तनु ना गमवायाची
मिळवा जोडहि ज्ञानाची
घाई न करा सकळ नासती कार्ये घाईने
घ्यावे सकळहि धीराने
जा माघारे हात जोडतो होतिल रे हाल
माते बघवतिल न बाळ
राजस सुंदर बाळ तुम्ही रे मृदु जणु नवनीत
माझे अंतरंग भीत
फुलापरिस सुकुमार अरे कुणि येउन तुडवील
पाये तुम्हा कुसकरिल
सदगुण मिळवा, ज्ञाना मिळवा, करा निजविकास
यावे पुढती कामास
सुंदर शरिरे मने सुंदर करा आधि तुम्ही
पूजा पुढे मातृभूमी

भविष्य आहे अपार तुमच्या समोर का घाई
मन्मन कळवळोन जाई
अविचार नका करु मुलांनो वृद्धाचे ऐका
सोडा सर्व तुम्ही हेका
जा माघारे आईबाप ते अपुले हसवावे
त्यांच्या सन्निध नाचावे

नायक: पोक्त असे जरि सल्ला तुमचा न रुचे हृदयास
न पटे अमुच्या बुद्धीस
केवळ वाचुन घरात बसुनी ज्ञान ते न मिळते
ज्ञान प्रसंगानेच कळते
देशभक्तिचे धडे वाचुनी केवळ ना अर्थ
पुस्तक केवळ ते व्यर्थ
आली आहे संधि शिकाया देशभक्ति चीज
घेऊ केवि धरि नीज
वस्तुपाठ हा देशभक्तिचा समोर असताना
वाचिल कोण पुस्तकांना
प्रत्यक्षाचे ज्ञान असे जे महत्त्व त्या फार
उपयोगी न ग्रंथभार
भावी कार्या करण्यासाठी आजपासुनीच
मिरवू धडे जे महोच्च
धैर्य, धडाडी, त्याग, अभयता, बाणा सत्याचा
शिकतो ओनामा त्याचा
घरात बसुनी मोठा झाला कोणी ना केव्हा
बसता फसे, समय जेव्हा
वानर म्हणती! चेष्टा ना ती, तो ना अपमान
अमुचा तोच खरा मान
वानरांस त्या संगे घेई प्रभू रामचंद्र
जिंकी बलाढ्य असुरेंद्र
पालाखाऊ वानर करिती जगताला चकित
करुनी रावण रणि चित
पालाखाऊ वानर करिती करणीस अचाट

घाली जग तोंडी बोट
वानर होते परी तयांनी सुरवर सुखवीले
स्वयश त्रिभुवनि मिरवीले
वानर झाले पूज्य तयांचा नायक हनुमंत
झाला देव थोर संत
वानर नावाची न वाटते आम्हां तिळ लाज
करणे मातृभूमि-काज
गांधि महात्मा करितिल अमुचे प्रेमे कवतूक
अमुचे तेच सर्व सूख
लहान आम्ही तरी जागवू देशभक्ति हृदयी
सुखवू भारतभू- मायी
लहान तारा असे तरी तो चमके तेजाने
तिमिरा अल्प तरि लया ने
लहान असले फूल तरी ते करुनी छायेला
रक्षी मृदु दवबिंदुला
लहानासहि यथाशक्ति ये करावया काम
नलगे कीर्ति नको नाम
क्षमा करा हो मदवङ्चेची, हेतु असे शुद्ध
व्हावे अम्हावरि न कृद्ध
तुम्ही जाहला वृद्ध परि असे उल्हासी अमुची
वृत्ती निर्भय तेजाची
नका रोखु हो स्वदेशकार्या अडथळा न आणा
अमुचा निश्चय तुम्हि वाना
आशीर्वादा द्या आम्हाते अमुच्या हातून
होवो दूर माय-शीण
आशीर्वादा द्या भय न शिरो अमुच्या चित्तांत
देऊ मातृभूस हात
आशीर्वादा द्या की निश्चय राहो अविचलित
निर्मळ असो सदा चित्त
त्रास, हाल ही अम्हां भूषणे थोर अलंकार
सांगू काय तुम्हां फार
मनी शुभेच्छा तुम्ही बाळगा ‘स्वतंत्र हा देश

करु दे लौकर जगदीश'
जगदीशाला स्मरा अम्हाला उत्तेजन द्यावे
अमुचे कौतूक करावे
जरी आमुचे आइबाप ते विरोध करितील
आम्हां ओढुन नेतील
त्यांना वळवा कथुन शब्द ते धीराचे चार
की हे 'दिव्य बाळ वीर
घडो स्वभूमीसेवा यांचे हातुन हे हीर
देऊ यांस चला धीर'

नायक वृद्धाला हे ऐसे बोलत जो बोल
जे स्फूर्तीचे कल्लोळ
तोच तिथे तो पिता तयाचा अकस्मात आला
पकडी घट्ट नायकाला

बाप: अरे कारट्या! येथे असशी शोधुन मी दमलो
वणवण करुनी मी श्रमलो
डोळा चुकवुन अहो कारटा निसटुन की आला
नाही धाक मुळी याला
कितीदा तुला बजावले की सांड सकल फंद
असेल नकोतची छंद
नको गळ्याला लावू अमुच्या फास घरी नीघ
नीघच उचल पाय शीघ्र

नायक: बाबा! बाबा! नका असे हो बोलु नका माते
होते दु:ख मन्मनाते
कटु विष वमता मला ताडिता या वाग्बाणांनी
येते मन्नयनी पाणी
घरी न बाबा मला राहवे करु तरी काय
मारी हाक देशमाय
घरी बैसणे नरक वाटतो मला मूर्तिमंत
तगमग होते चित्तात

मारुन टाका मुलगा तुमचा, तुमचा अधिकार
जावा जरि ना बाहेर
घरी बैसण्यापेक्षा मरणे रुचे तात! माते
मारा तुमच्या पुत्राते
अनेक निघती मजसम मुलगे कसा घरी राहू
माझे तोंड कुणा दावू
बाबा! राग न तुम्ही करावा, धरितो मी पाय
सांगा मी तरि करु काय?

(गाणे)

हृदयि मम भरतभूमि 'जा' वदे मला
'जा' वदे मला
घरि बसणे हा न गमे मार्ग मज भला
मार्ग मज भला
भारतभू मारि हाक
'ये सेवेसाठि ठाक
करी मद्दास्यास खाक
पुसुन टाक मत्कलंक
उठूनिया मुला'
हृदयि मम भरतभूमि 'जा' वदे मला
'जा' वदे मला
भारतमातेच्या हाकेला ओ न कसा देऊ
कैसा घरामध्ये राहू?

बाप: तत्त्वज्ञाने तुझी नको तू मजला शिकवाया
येथून शीघ्र काढ पाया
मोठ्या गप्पा नकोत मजला येथुन चल निमुट
ऐके वदतो जी गोष्ट
बापाचा ना राग तुझ्या का ठाउक रे तुजला
चल निघ उचल पाऊलाला
खपणार मुळी नाही मजला तव वेडे चाळे

चल तू घरी ब-या बोले
गाठ असे बघ माझ्यापाशी ध्यानी धरि नीट
चल, बघ घरास तू थेट

नायक: ठार करा परि मी ना येइन घरास माघारा
तनु ही तुमची तुम्हि मारा
देहास तुम्ही माराल परी मना न माराल
तनुचे करा हालहाल
घरे सोडशुनी असली जाऊ भारतभूमीत
हिंदू स्वतंत्र अम्हि मुक्त
चला, मुलांनो! गीत म्हणा रे, मी ना जाणार
होवो जे जे होणार.

बाप: फरफटीत मी नेइन ओढुन गुरापरी तुजला
तमाशा दिसेल जगताला
घरी ये खरा थोबाड तुझे पहा रंगवीन
इंगा तुला दाखवीन
बांधुन ठेविन माळ्यावरती चार दिवस तुजला
काहि न देइन खायाला
धरुन बकोटी नेइन ओढुन काय पाहतोसी
चल बघ अपुल्या भवनासी
चल घरि, पोरा! कुठे जाशि रे पोरा! फिर मागे
आता शेवटचे सांगे

नायक: गांधि महात्मा पिता आमुचा सकळहि बाळांचा
धरितो पंथ अम्ही त्यांचा
भरतभूमि ही माय माउली आम्हां बाळांची
सेवा सदैव करु तीची
चला, मुलांनो! गीत म्हणा रे देशाचे दिव्य
करु या कृति सुंदर भव्य
चला, काय रे बघता? बाबा जातील माघारे
म्हणु या दिव्य गीत सारे

बाप: तमाशा न मी जगास इच्छित दावाया पोरा
परि करि विचार मनि सारा
पुन्हा न तुजला घरात घेइन दावु नको वदन
माझे बंद तुला सदन
मी न कुणि तुझा, तू न माझा, ऐसे समजावे
ध्यानी नीट, आणि जावे
मेला माझा मुलगा म्हणुनि साखर वाटीन
माझे बंद तुला सदन

नायक: बाबा! तुम्ही पूज्य मला जरि मज ना राहवते
जाणे भाग मला पडते
दारावरुनी झेंडा जाई तो मज बोलावी
जणु तो बोटाने खुणवी
झेंडा मजशी किती बोलतो, मारी मज हाक
माझे मलाच ठाउक
घरात आता ना माझ्याने बसवे क्षणभरही
डसती विंचु तसे होई
रागावा, ना बाबा! घ्या ना घरात, परि हृदय
राहो सदैव ते सदय
मनी तरि म्हणा, जनात न जरी 'बाळक गुणवंत
माझा धृवचिलयामित्र'
भीती तुम्हां जरि माझी वाटे, तरि सत्संबंध
सोडा असो प्रेमबंध
'मिळो न खाया परी असो हा चित्ती भगवान'
वदला तुकाराम धन्य
'मिळो न खाया मरु उपाशी सत्त्व न परि गमवू'
वदला हरिश्चंद्र राऊ
परि जाऊ दे त्या हो गोष्टी, मी ना येईन
तुमचे घर न बाटवीन
हृदयसदन परि असो मोकळे, द्यावी ही भीक
मागत मी ना आणीक
नका घेउ हा बाळक अपुल्या घरात माघारा

देऊ नका तिथे थारा
मी न तुम्हाला सतावयाला घरात येईन
घेतो चरणांची आण
सांगा आईस, बाबा! माझे प्रणाम सप्रेम
करितो मातृभूमिकाम
आईची मज आइ बोलवी काय वदू फार
येई लोचनांत नीर
मनात तुमचे कृतज्ञतेने भक्तीने स्मरण
करिन स्त्रवतिल मन्नयन
कुठे तरी मी बसेन जोवर जीवन राहील
थारा भारत देईल
विशाल अंबर वरी, धरित्री खालि पसरलेली
प्रेमे स्नेहे भरलेली
दमलेले हे मदंग, बाबा! तिजवर टाकीन
जाइन आनंदे निजून
कंदमुळे मी खाइन देतिल फळे वृक्षराज
माझी राखितील लाज
कधी कधी मी गोड कोवळ्या बोरव्या खाईन
चिंता काही न मी करिन
अडुळशाचि ती फुले तशी ती फुले अगस्त्याची
देतिल मधु मज मध साची
भारतभूमी समृद्ध सुंदर देइल खायास
फळमुळ अथवा पाल्यास
खाइन पाला कृतज्ञतेने मानिन मोदास
कंठिन सुखे जीवनास
नद्या, झरे ते देतिल पाणी स्फटिकासम छान
सांभाळितील मत्प्राण
वारा मजला वारा घालिल हरील मम शीण
पल्लव सुंदर पांघरिन
भारतमाता पडू न देइल कसलीही वाण
घरि परतून न येईल
घरात घ्यावे न मला,वाटे जरि मी अपराधी जो मी देशकार्य साधी

माघारा मज घेउ नका जरि तुमचे नुकसान
उघडे असो हृदयसदन
मातेहूनी स्वपित्याहूनी देव देश थोर
मजला देशाचा घोर
मातृभूमिची सेवा करिता तुमचीही सेवा
होते, कळे देवदेवा
मुलावरी या प्रेम असू दे, माया ठेवावी
माझी स्मृती असो द्यावी
काय किती मी सांगू, बाबा! उघडा मम हृदय
तेथे दिसेल भूमाय
हनुमंताच्या हृदयामाजी सदा रामराय
हृदयी मम भारतमाय
तुमच्यास्तवही आहे हृदयी भरलेले प्रेम
पहिले परी देशकाम
घ्या शेवटचा नमस्कार हा सविनय सप्रेम
धरितो भवत्पादपद्म
चला, मुलांनो! म्हणा गीत रे भारतमातेचे
आपण तत्सुत तेजाचे
चला, म्हणा रे ध्वजगीताते, जनता-चित्तांत
निर्मू स्फूर्तीचा स्रोत
मुले लागली गीत म्हणाया बाप बघे रागे
नायक परि न बघे मागे

'झेंडा भारतमातेचा हा आला फडफडत
झळकत तेजे विक्रांत
झेंडा उन्मत्तांना नमविल दीना सुखवील
झेंडा जुलुम संहरील
झेंडा देइल राष्ट्राला या दिव्य स्वातंत्र्य
झेंडा हरिल पारतंत्र्य
झेंडा भारतमातेचा हा भाग्यवंत आला
बोला जय भारत बोला'

मुले निघाली गात, राहिला पिता तेथ बघत
गात्रे क्रोधे थरथरत
वृद्ध तिथे तो होता तो मग पित्याजवळ गेला
बोले सौम्य वचे त्याला
"आपण झालो पिकली पाने उपयोग न अपुला
आता राम राम बोला
नवी पिढी ही पुढेच जाइल, त्यातच आनंद
मानू, घालु न निजबंध
गुलाम न करू प्रेमे अपुल्या, देऊ मोकळीक
करोत उड्डाण विशंक
आशीर्वादा त्यांना देऊ करोत सत्कार्य
आपण भारतीय आर्य
चला, फिराया जाऊ आपण दोघे म्हातारे
बोलू मनातील सारे
दिन मावळला टेकडीवरी बैसू जाऊन
झालो पिकलेले पान"

म्हातारे ते गेले, गेली मुले गीत गात
आला भाग्योदय खचित
बाळे जी जी गाणी गातिल, गोष्टी करितील
जे जे खेळ खेळतील
भविष्यकाळाचे ते असते त्यातच सदबीज
आली जवळ भाग्यबीज
स्वतंत्र होइल, सुंदर होइल भारत हा खचित
लवकर सत्य सत्य सत्य

◙ ◙ ◙

-अमळनेर, सप्टेंबर १९३१

## एकच वेड

मातृभूमि! माझ्या चित्ता एक वेड लागे
मायभूमि! चिंतनि तव गे जीव नित्य जागे
झोपबीप न सुचे माते हायहाय वाटे
हीन दीन त्वस्थिति बघुनी अंतरंग फाटे॥

काय आइ! करू मी कोठे जाउ गे त्वदर्थ
परतंत्र्य पाहून वाटे जन्म सर्व व्यर्थ
चित्त वित्त बुद्धी माझी देह हा मदीय
जरी तुझ्या कामी येती धन्य धन्य होय॥

मला सदा वाटे द्यावे सर्वही त्वदर्थ
तुला वैभवावर नेता होउ दे मदस्त
देह इंद्रिये ही सारी सर्वदा खपावी
त्वदुद्धारकार्यी आई धन्य धन्य होय॥

तुझ्या ध्यानरंगी रंगो हे मदंतरंग
मुखी वसो गोड तुझ्या सत्कीर्तिचे अभंग
हात पाय बुद्धि अखंड श्रमो त्वदुद्धारा
दूर करिन झिजुनी झटुनी पारतंत्र्यभारा॥

थोर महात्म्यांना जे जे स्फुरति गे उपाय
आचरेन न गणीन मनी संकटे अपाय
तुझा शिपाई मी आई 'का' न मी म्हणेन
पुढे घुसुन धारातीर्थी झुंजता पडेन॥

घाव घालण्याला उत्सुक, शृंखला तुझ्या मी
तोडुनी, तुला चढविन गे आइ! मोक्षधामी
तुझ्यासाठि आई! लाखो सुत तुझे खपोत

तुझ्या शृंखला भंगू दे अंगि ना खुपोत॥
विपत् तुझी जाइल विलया दैन्य हे हरेल
तेज दिव्य त्वन्मुखकंजी माउली! फुलेल
कलाज्ञानवैभवयोगे आइ! शोभशील
निकट विश्व घेशिल राष्ट्रे सर्व हर्षतील॥

धन्य तो न दिन येइल का जो असे मदायु?
न यो, त्वद्द्वारी परि मज्जन्म सर्व जाऊ
आइ! सर्व जीवन तुझिया अर्पिले पदाला
हा विचार देइल अंती शांति मन्मनाला॥

तुझ्या पोटि जन्म पुन्हा मी घेइन प्रमोदे
पुन: पुन्हा जन्मुन सेवा करुनिया मरु दे
आइ गोड सेवा तव गे अमृतमधुर मेवा
प्रभो! देइ जन्मोजन्मी मला मातृसेवा॥

मातृसेवनाविण देवा! मागणे न काही
एक मात्र आनंद असे मजसि हाच पाही
चंदनापरी मदगात्रे सर्वदा झिजू दे
अहर्निश श्रमुनी श्रमुनी शांतिने पडू दे॥

◘ ◘ ◘

-त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०

## स्वातंत्र्य दिव्यदर्शन!

अजि घुमघुमली स्वतंत्रतेची भेरी
दुमदुमली दुनिया सारी
अजि राष्ट्राने स्वतंत्रतेची केली
घोषणा धीर या काळी
अजि राष्ट्राने सर्व शृंखला अपुल्या
तोडुनिया फेकुन दिधल्या
अजि राष्ट्राने गुलामगिरिचे पाश
फेकियले दाहि दिशांस
तरि उठा उठा हो सारे
जयनादे गगन भरा रे
निज झोप सर्व झाडा रे
जयघोष करा कोण तुम्हाते वारी
दुमदुमली दुनिया सारी॥

निज राष्ट्राने आज मांडिले ठाण
घ्या हाति सतीचे वाण
व्हा सिद्ध तुम्ही प्राणार्पण करण्याते
त्यागाविण काहि न मिळते
सूं येणा-या बंदुकिच्या गोळ्यांना
सुकुमार फुलांसम माना
निज छातीला निष्कंप करा झेला
तोफेचा तीवर गोळा
डोळ्यांत विजेचे तेज
लखलखो तुमचिया आज
प्राणांचे घाला साज
त्या स्वतंत्रदेवीच्या शुभ शरिरी
दुमदुमली दुनिया सारी॥

बहुधन्य तुम्ही यशस्वी करा काज

देशार्थ मरोनी आज
अजि सुख माना धन्य आपणा माना
की देता येतिल माना
या मातेला मोक्षामृत ते द्याया
अर्पा या अपुली काया
श्रीशिव बाजी तानाजी जनकोजी
तत्त्याग दाखवा आजी
कष्टांची पर्वा न करा
हालांची पर्वा न करा
प्राणांची पर्वा न करा
ही संधी असे आली सोन्यासारी
दुमदुमली दुनिया सारी॥

हे पहा किती करुण तरणि-तेजाळ
हे सजले कोमल बाळ
हे स्वतंत्रतेसाठी सारे उठले
अभिनव-नवतेजे नटले
तुम्ही धन्य खरे धन्या तुमची माय
हर्षेल आज शिवराय
हे तरुणांनो तेजस्वी वीरांनो
बाळांनो सुकुमारांनो
पाहुनी तेज हे तुमचे
मन खचेल त्या काळाचे
ते रविकर फिक्कट साचे
व्हा आज पुढे मोक्ष येतसे दारी
दुमदुमली दुनिया सारी॥

त्या लहरींच्या लहरी पाठोपाठ
सागरात उठति अलोट
त्या ज्वाळांच्या ज्वाळा पाठोपाठ
वणव्यात नाचती दाट
त्यापरि तुम्ही टिप्परघाई खेळा

ही स्वातंत्र्याची वेळा
घरदार अता सारे राहो दूर
भारतभू करणे थोर
मरण्याला उत्सुक व्हा रे
मोक्षास्तव उत्सुक व्हा रे
हालास मिठी मारा रे
भय कोण तुम्हां दवडिल जगि माघारी
दुमदुमली दुनिया सारी॥

या ललनाही मरण्यासाठी आल्या
मर्दानी झाशीवाल्या
अम्हि ना अबला जगता हे कळवाया
देशास्तव उठति मराया
निज बांधिति त्या धैर्ये शौर्ये पदर
करिती ना कुणाची कदर
त्या पहा पहा वीरांपरि हो सजल्या
जगताच्या दृष्टी थिजल्या
पाजावे बाळा ज्यांनी
न्हाणावे बाळा ज्यांनी
प्रेमात रमावे ज्यांनी
त्या मरणाला कवटाळिति ह्या नारी
दुमदुमली दुनिया सारी॥

कवि मरणा ना भारतकन्या डरती
मरणाते मारुन जाती
ती सावित्री मरणासन्मुख ठाके
मनि यत्किंचितहि न धोके
ती असुराशी लढते भास्वर भामा
रामासम लढली रामा
ती संयुक्ता दिव्य पद्मिनीदेवी
खाईत उडी ती घेई
ती उमा लढाया जाई

ती रमा सती हो जाई
ती लक्ष्मी तळपत राही
ही परंपरा राखिति भारतनारी
दुमदुमली दुनिया सारी॥

या मातेच्यासाठी मरण्यासाठी
उठु देत बाळके कोटी
ते धैर्याने मरण मानु दे खळ
मोक्षाची आली वेळ
निज कष्टांनी स्वातंत्र्याते आणू
मोक्ष असे मरणे जाणू
ते मज दिसते दिव्य असे स्वातंत्र्य
तो भारत दिसतो मुक्त
ते दर्शन दिव्य बघा रे
सत्प्रतिभा दाविल सारे
ही दिव्य दृष्टि तुम्हि घ्या रे
ते दृश्य पहा, ऐका ती ललकारी
दुमदुमली दुनिया सारी॥

ते अवनिवरी सुरवर-मुनिवर आले
पुण्यात्मे सारे जमले
ते श्रीराम श्रीकृष्णार्जुन येती
शिबि हरिश्चंद्र ते येती
ते वाल्मीकि व्यास मुनीश्वर आले
सनकादिक ऋषिवर आले
ते बुद्ध पहा महावीरही दिसती
शंकराचार्य लखलखती
ते पृथ्विराज दिसले का
ते प्रताप तरि दिसले का
शिवछत्रपती दिसले का
ते सर्व पहा आले पुण्याकारी
दुमदुमली दुनिया सारी॥

श्रीभारतभू मंगलासनी बसली
ती अपूर्व सुंदर दिसली
रवि कोटि जणू एके ठायी मिळले
तत्तेज तसे लखलखले
किति वाद्ये ती मंगल वाजत गोड
या प्रसंगास ना तोड
किति हार तुरे मोती माणिक-राशी
मातेच्या चरणांपाशी
अभिषेक कराया उठती
स्वातंत्र्यमंत्र ते म्हणती
'ॐ समानी व आकूतिः'
ती अभिषिक्ता जननी शोभे भारी
दुमदुमली दुनिया सारी॥

ते वस्त्र पहा दिव्य अमोलिक दिधले
परिधान जननिने केले
ती रत्नांचे अलंकार ते ल्याली
भारतभू तेजे फुलली
ते सप्तर्षी नक्षत्रांचे हार
अर्पिती अमोलिक फार
त्या दाहि दिशा तत्तेजाने धवल
धवळले विश्व हे सकळ
सर्वांनी भेटी दिधल्या
मेरुपरि राशी पडल्या
सुख-कथा अपूर्वा घडल्या
ती श्रुति तेथे शांतिगीत उच्चारी
दुमदुमली दुनिया सारी॥

त्या पतिव्रता स्वर्गामधुनी येती
श्रीसीता श्रीसावित्री
त्या भारतभूमातेची शुभ भरती
प्रेमाने मंगल ओटी

शुभ शंखादी वाद्ये मंगल झडती
ध्वनी अनंत तेथे उठती
जयघोषाची एकच झाली टाळी
आनंदे सृष्टी भरली
अक्षता स्वपुण्याईची
पिंजर ती पावित्र्याची
घेऊन करी निज साची
त्या थोर सती लाविति भारतभाळी
दुमदुमली दुनिया सारी॥

मग सकळ मुले-मुली आइच्या जवळी
आली त्या प्रेमे कवळी
ती झळंबली प्रेमे मातेलागी
बिलगली आइच्या अंगी
ते देवमुनी मुलांस आशीर्वाद
देतात धन्यतावाद
सत्कन्यांची सत्पुत्रांची आई
शोभते भरतभू माई
आनंदाश्रूंचे लोट
प्रेमाश्रूंचे लोट
खळखळा वाहती तेथ
किति सुख पिकले देव भारता तारी
दुमदुमली दुनिया सारी॥

◙ ◙ ◙

-अमळनेर छात्रालय, १९३०

## भारतातील मुले

(एक अविवाहित तरुण भगिनी स्वत:ला उद्देशून म्हणते)

भारतात या नसे मुलांचा तोटा तो तिळभरी
नाही वाढविणारा परी
विचारहीनापरी वागती मायबाप बापुडे
बघति न काय मुलांचे घडे
बाळे घरात खंडीभर
नाही वस्त्रहि अंगावर
नाही खायाला भाकर
विचारमेवा दूर राहिला, रोगी अति चिरचिरी
बाळे दिसती किति घरोघरी॥

कशास तरि तू विवाह करिशी, आधिच जे बाळक
त्यांची होई तू पाळक
त्यांची होई खरीखुरी तू माता प्रेमाकरा
निर्मी निर्मळ सेवा-झरा
ठायीठायि अभागी मुले
जैशी किड्याने खाल्ली फुले
बघुनी अंतरंग हे उले
जा ते बाळक जलळी घेई प्रेमाने सत्वरी
होई त्यांची जननी खरी॥

भारतमातेच्या बागेतिल सुमने ही विकसवी
सजवी नटवी तू हासवी
खाया देई, ल्याया देई, मनोबुद्धी वाढव
यातच जावो जीवन तव
याहुन धन्य काय अन्य ते
फुलवी फुल जरि कुणि एक ते
प्रभुपद त्याला ते लाभते

हाचि धर्म गे हाचि मोक्ष गे ध्येय अंतरी धरी
या सेवेसी न दुजी सरी॥

(ती पुढील ध्येय निश्चित करते.)

गरीब कोणी कुणबी हमाल। तदीय संवर्धिन गोड बाळ
तयास मी सुंदर वाढवीन। फुलांपरी निर्मळ मी करीन॥
तयास मी घालुन न्हाण नित्य। तयास मी देइन स्वच्छ वस्त्र
तयास साधी शिकवीन गाणी। न घाण देईन पडूहि कानी॥
तयास नेईन सदा फिराया। नदीतटाकी, गिरि वा चढाया
तयासवे खेळ मुदे करीन। तयाविणे कोणि जणू मला न॥
मुलेच माझे बनतील देव। करीन तत्पूजन मी सदैव
मुलांस संवर्धुन भारताच्या। पडेन पायावरती तयाच्या॥
कळ्या मुक्या या प्रिय भारताच्या। विकासवोनी चरणी तयाच्या
समर्पुनी प्रेमभरे, मरेन। सुखे प्रभूच्या चरणी मिळेन॥

◙ ◙ ◙

-नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३

## महाराष्ट्रास!

महाराष्ट्रा! ऊठ दष्ट्रा शत्रुमर्मी रोवुनी
सिंहसा तू साज शौर्य ठाक तेजे खवळुनी॥

दिव्य गाणी विक्रमाची दुर्ग तूझे गाउनी
अंबरस्थां निर्जरांना हर्षवीती निशिदिनी॥ महाराष्ट्रा...॥

दरीखोरी खोल, गेली वीररक्ते रंगुनी
शेष ती संतोषवीती त्वद्यशाला गाउनी॥ महाराष्ट्रा...॥

अंबुराशी करित सेवा त्वत्पदा प्रक्षाळुनी
त्वत्कथेला दशदिशांना ऐकवीतो गर्जुनी॥ महाराष्ट्रा...॥

म्लानता ही दीनता ही स्वत्त्वदाही दवडुनी
स्वप्रतापे तळप तरणी अखिल धरणी दिपवुनी॥ महाराष्ट्रा...॥

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२८

## राणा प्रताप

स्वातंत्र्यसूर्य राणा। चित्ती प्रताप आणा
चारित्र्य दिव्य त्याचे। त्याचा अभंग बाणा
रजपूत पूतकीर्ती। कुळशील बाटवीत
परि थोर पूर्वजांची। राखी प्रताप नीती
तो मानसिंग तैसे। दुसरेहि अन्य मोठे
स्वार्थांध होउनीया। ठरले जगात खोटे
अभिमानशून्य झाले। रिपुगौरवास गाती
स्वकरीच पूज्य धर्मा। देतात मूठमाती
स्वार्थादि नीचवृत्ति। याचाच पंक माजे
परि त्यामधून दिव्य। रमणीय पुष्प साजे
रजपूतभूमिपंकी। कमनीय दिव्य गंध
कमल प्रताप एक। दे भूस सौख्यकंद
सर्वत्र अंधकार। भरला भयाण घोर
त्यात प्रताप शोभे। शुभकांति चंद्रकोर
रिपु-सैन्यसागरात। भूमाय तारण्याला
धैर्य प्रताप एक। नौका अभंग झाला
जयमत्त शत्रु मागे। लोटावया न कोणी
परि एकटा प्रताप। ठाके सुरेंद्रवाणी
समरात सेलिमाला। दावून दिव्य भाला
तत्तेज हारवीले। निस्तेज शत्रु केला
हळदीत खळखळाट। रिपु-रक्त वाहवीले
निज अल्प सैन्य तरिही। आश्चर्य थोर केले
केले अनंत कष्ट। रानावनात गेला
निज शत्रुशी सदैव। लढण्यात जन्म नेला
विख्यात सत्कुलाची। ती कीर्ति निष्कलंक
राहो, म्हणून मानी। झाला प्रताप रंक
घेईन ना जरी मी। मत्प्राण तो चितोड
पेंढ्यावरी निजेन। कोंडाच अन्न गोड
सुखभोग सर्व वर्ज्य। रिपु जो धरी चितोड

करुनी अशी प्रतिज्ञा। पाळी न त्यास तोड
सिंहासमान शूर। मेरुपरी सुधीर
भीष्मापरी प्रतिज्ञा। पाळीत थोर वीर
आपत्ति घोर आल्या। तरि त्या न तो जुमानी
तारामती पतीच्या। सम सत्त्व स्वत्व मानी
निजा-मायभूमि-सेवा। करिता, न ते कुटुंब
स्मरले, सदैव हृदय। भू-भक्तिने तुडुंब
स्वातंत्र्य-रक्त वीरा। रिपु-दुर्जया सुधीरा
देवी-स्वतंत्रतेच्या। कंठामधील हिरा
स्मरण प्रभावशाली। तेजस्वि त्वत्कृतीचे
देशास जोवरी रे। भय तो न ते मृतीचे
त्वन्नाम दिव्य-मंत्र। उठवील भारताला
देईल दिव्य शक्ति। अर्पील वैभवाला
स्वातंत्र्यरक्त जीवा। त्वन्नाम स्फूर्ति देई
स्वार्थादि नीच वृत्ति। सगळ्या लयास नेई
भ्याडां करील शूर। नि:सत्त्व चेतवील
उठवील धूलीपतिता। त्वन्नाम दिव्य-शील
तू लाज भारताची। तू आस भारताची
चंद्रार्क जोवरी तो। तू कीर्ती भारताची

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२८

## महात्माजींस

विश्वाला दिधला तुम्हीच भगवन् संदेश मोठा नवा
ज्याने जीवन सौख्यपूर्ण करणे साधेल या मानवा
ते वैराग्य किती! क्षमा किति! तपश्चर्या किती! थोरवी
कैशी एकमुखे स्तवू? मिरवता भास्वान् जसा तो रवी।।

आशा तुम्हि अम्हां सदभ्युदयही तुम्हीच आधार हो
ते चारित्र्य सुदिव्य पाहुनि अम्हां कर्तव्यसंस्फूर्ति हो
तुम्ही भूषण भारता, तुमचिया सत्कीर्तिची भूषणे
हे त्रैलोक्य धरील, धन्य तुमचे लोकार्तिहारी जिणे।।

बुद्धाचे अवतार आज गमता, येशूच किंवा नवे
प्रेमाभोधि तुम्ही, भवद्यश मला देवा! न ते वानवे
इच्छा एक मनी सदा मम भवत्पादांबुजा चिंतणे
त्याने उन्नति अल्प होइल, अशी आशा मनी राखणे।।

गीता माझि तुम्ही श्रुतिस्मृति तुम्ही तुम्हीच सत्संस्कृति
त्यांचा अर्थ मला विशंक शिकवी तो आपुली सत्कृती
पुण्याई तुम्हि मूर्त आज दिसता या भारताची शुभ
धावे दिव्य म्हणुनी आज भुवनी या भूमिचा सौरभ।।

तुम्ही दीपच भारता अविचल, प्रक्षुब्ध या सागरी
श्रद्धा निर्मितसा तुम्हीच अमुच्या निर्जीव या अंतरी
तुम्ही जीवन देतसा नव तसा उत्साह आम्हां मृतां
राष्ट्रा जागविले तुम्ही प्रभु खरे पाजूनिया अमृता।।

तुम्ही दृष्टी दिली, तुम्ही पथ दिला, आशाहि तुम्ही दिली
राष्ट्रा तेजकळा तुम्ही चळविली मार्गी प्रजा लाविली
त्या मार्गे जरि राष्ट्र सतत उभे सश्रद्ध हे जाइल
भाग्याला मिळवील, भव्य विमल स्वातंत्र्य संपादिल।।

विश्रांति क्षण ना तुम्ही जळतसा सूर्यापरी सतत
आम्हाला जगवावया झिजविता हाडे, सदा राबत
सारे जीवन होमकुंड तुमचे ते पेटलेले सदा
चिंता एक तुम्हां कशी परिहरु ही घोर दीनापदा॥

होळी पेटलिसे दिसे हृदयि ती त्या आपुल्या कोमल
देऊ पोटभरी कसा कवळ मदबंधूंस या निर्मळ
ह्याची एक अहर्निश प्रभु तुम्हां ती घोर चिंता असे
चिंताचिंतन नित्य नूतन असे उद्योग दावीतसे॥

कर्मे नित्य भवत्करी विवध ती होती सहस्त्रावधी
ती शांति स्मित ते न लोपत नसे आसक्ति चित्तामधी
शेषी शांत हरी तसेच दिसता तुम्ही पसा-यात या
सिंधु क्षुब्ध वरी न शांति परि ती आतील जाई लया॥

गाभा-यात जिवाशिवाजवळ ते संगीत जाले सदा
वीणा वाजतसे अखंड हृदयी तो थांबतो ना कदा
झोपे पार्थ तरी सुरुच भजन श्रीकृष्ण श्रीकृष्णसे
देवाचा तुमचा वियोग न कदा तो रोमरोमी वसे॥

वर्णू मी किति काय मूल जणु मी वेडावते मन्मती
पायांना प्रणति प्रभो भरति हे डोळ्यांत अश्रू किती
ज्या या भारति आपुल्यापरि महा होती विभूती, तया
आहे उज्ज्वल तो भविष्य, दिसते विश्वंभराची दया॥

◘ ◘ ◘

-अमळनेर, १९२६

## खरे सनातनी

मी मांडितसे विचार साधे सरळ
हे अमृत नसे हे गरळ
मी सनातनी धर्मांचा सदभक्त
मी पूजितसे ऋषिसंत
निज संस्कृतिचा अभिमान असे माते
मी पूजित भूमातेते
निज संस्कृति व्हावी थोर
ती होवो ना अनुदार
हो एकच मजला घोर
मी नम्रपणे वदतो ओतुन हृदय
तुम्हि ऐका सारे सदय॥

ज्या नवनव हो सतत पल्लव फुटती
त्या सनातन असे म्हणती
जे नवनव हो ज्ञान शुभंकर येते
तो वेदच माते गमते
तो वेद असे अनंत, हळुहळु मूर्त
होऊन दिसे जगतात
नवविचार मी घेईन
मी पुढतिपुढति जाईन
सौंदर्यसिंधु जोडीन
जो ज्ञानाला सादर सतत घेई
तो खरा सनातनी होई॥

जे नित्य नवे सनातन तया वदती
जीर्णा न सनातन म्हणती
श्रीगीतेचे नित्य नवीनच सार
ज्ञानेश्वर म्हणती थोर
ती वाढ पुरी ज्याची झाली त्याते

मरण्याचे केवळ उरते
सद्धर्म सदा वाढेल
नवनविन रंग दावील
नव अर्थ अंगिकारील
हे वाढतसे सदैव जीवनशास्त्र
तद्विकास असतो होत॥

त्या शब्दांचा अर्थ वाढतो नित्य
तो अनंत असतो अर्थ
त्या यज्ञाचा बघा तुम्ही इतिहास
किति झाला अर्थ-विकास
जन मरताती कल्पना न परि मरते
ती सतत वाढत जाते
ते विचार होती खोल
होतील कल्पना विमल
हा विकास सकक सकल
जगि चालतसे मानव जातो पुढती
मुंगीपरि जरि ती प्रगती॥

ते ठरले ना अजुनि जीवनी काही
सिद्धांत ना एकहि पाही
जगि हितकर ती हिंसा अथवा प्रेम
ना झाला अजुनि नेम
ते सत्य सदा पूजावे वा अनृत
अद्याप न मत निश्चित
हे प्रयोग सारे अजुनी
करितात महात्मे झटुनी
का बिळात बसता घुसुनी
निजबुद्धीला स्वतंत्र करुनी उठणे
नवरंगे उत्कट नटणे॥

हे बाल्यदशेमाजी जीवनशास्त्र

ना निश्चित काही त्यात
ज्याबद्दल ना शंका तिळभर कोणा
जगि ऐसे काहि दिसे ना
तो घेउनिया सादर पूर्वानुभव
संपदा ज्ञानास नव
ते पूर्वज सर्वज्ञानी
जरि म्हणाल तुम्ही कोणी
ते हसतिल तुम्हां वरुनी
ते फरक सदा होते देखा करित
ऋषि ऋषिला नाही मिळत॥

तो मागतसे देवा विश्वामित्र
मति सतेज निर्भय मुक्त
तो गायत्रीमंत्र सनातन दिव्य
मागतसे बुद्धी भव्य
तो धर्माचा पाया म्हणता वेद
वेदार्थे ज्ञानच सिद्ध
ज्ञानासम पावन नान्य
ते मिळवुन व्हा रे धन्य
परि घरात बसता घुसुन
जो घरि बसला त्यास मिळे ना काही
त्या एकच मरणे राही॥

तुम्हि उघडा रे बंधूंनो निज डोळे
ना अंध असावे भोळे
जे इतर जगी थोर विचारा करिती
जे प्रयोग नव दाखविती
तुम्हि त्याचाही विचार सादर करणे
उपयुक्त असे ते घेणे
ज्ञानाचा मक्ता न कुणा
अधिकार सर्व राष्ट्रांना
अभिमान देतसे मरणा

ते ऋषिमुनि ना केवळ येथे झाले
हे बघणे उघडुन डोळे।।

हे कलियुग ना सत्ययुगचि हे माना
प्रभुच्या न करा अपमाना
जो रवि उगवे तारा ज्या लखलखती
ते तेज न त्यांचे कमती
हे कलियुग ना गंगा पावन तीच
फळपुष्प तरु हे तेच
प्रत्येक दिवस जो दिसतो
तो अनंततेतुन येतो
पावित्र्ये तिळ ना कमि तो
तो मूर्खपणा बाष्कळपण ते सोडा
सद्विचार नवनव जोडा।।

ते ऋषिमुनि हो काय एकदा झाले
ते काय आज ना उरले
ते पुन:पुन्हा ऋषिमुनि अवतरतात
भुवनात सदा सर्वत्र
तो लेनिन तो तैसा सन्यत्सेन
हे ऋषीच जनतामान्य
नव मंत्र जगा जो देई
नव तेज जगा जो देई
वैषम्य लयाला नेई
तो ऋषि जाणा जाणा तोची संत
तुम्हि उघडा अपुले नेत्र।।

श्रीज्ञानेशे संस्कृतातले ज्ञान
सर्वांस दिले वाटून
श्रीनाथांनी चालविले ते काम
परि त्यांना छळिती अधम
ती ज्ञानाची खुली कराया दारे

झगडले संत ते सारे
तुम्हि अनंत छळिले त्यांना
परि आज देतसा माना
ह्या गोष्टी ध्यानी आणा
त्या संतांचे काम चालवा पुढती
सर्वांना देण्या मुक्ती।

ह्या भारतभूमाजी आजहि संत
आहेत करु नका खंत
हे संत खरे गांधी पावनचरित
दीनास्तव सतत झिजत
तो धर्म खरे त्यांनाच कळे सत्य
जे गीता आचरतात
अंबरांबुधीचे कळते
गांभीर्य कुणाला जगि ते
बुडि घेत उडत वा त्याते
सद्धर्माचा गाभा संतच मिळवी
तो पंडित साली चघळी।।

ती पांघरुनी शालजोडि जे बसती
प्रेमा न जगा जे देती
जगि अन्याया पाहुन जे ना उठती
जे वैषम्ये ना जळती
जगि दास्याला दंभा दैन्य बघुन
उठतात न जे पेटून
त्या जडां कळे का धर्म?
त्या मृता कळे का वर्म?
जे घोकित बसती धर्म
तो धर्म कळे आचरतो जो त्यास
ना धर्म कळे इतरांस।।

निज धर्माला ओठावर ना मिरवा

सतत्त्वे जीवनि जिरवा
तुम्हि प्रेम करा विचार करणे नित्य
जगतात बघा सर्वत्र
या देशाला दिवस चांगले आणा
नव मंगल मिरवा बाणा
बंधुता जीवनी येवो
तो विचार हृदयी येवो
ते धैर्य कृतीचे येवो
सतज्ञानाने सत्करणीने मिळवा
गेलेल्या अपुल्या विभवा॥

निजधर्माचे करा मुख तुम्ही उजळ
मति उदार होवो विमल
ज्या बंधूंचे छळण आजवर केले
पशुहून नीच ज्या गणिले
त्या अस्पृश्या हरजन पावन म्हणणे
प्रेमाने हृदयी धरणे
आचारी येवो समता
प्रेमाची वाहो सरिता
दंभाची न उरो वार्ता
तुम्हि संसारी अंध-धी न रे व्हावे
मति हृदय निज न मारावे॥

ती सोडावी क्षुद्र सकल आसक्ती
ध्येयाची लागो भक्ती
तुम्हि मानव्या उठणे पूजायास
निज मोक्षहि मिळवायास
निज कातडिला न कुणी कुरवाळावे
ध्येयास्तव सर्वहि द्यावे
सत्तेज भारती भरु दे
सदभाव भारती भरु दे
सदविचार रवि उगवू दे

ती संपू दे कार्पण्याची रजनी
राहोत कुणी ना निजुनी॥

हे सनातनी सकळ खरे होवोत
ज्ञानाते मिठि मारोत
नव ऐकुनिया विचार हे नाचोत
नव करणीस्तव जागोत
हे वैषम्या दंभा दुरि नेवोत
त्यागाने हे तळपोत
यज्ञ हे सनातन तत्त्व
ज्ञान हे सनातन तत्त्व
मोक्ष हे सनातन तत्त्व
तुम्हि त्याग करा, ज्ञान वरा, व्हा मुक्त
व्हा खरे सनातन-भक्त॥

◘◘◘

-पुणे, फेब्रुवारी १९३५

## खंडकाव्य

सत्याग्रही या नावाचे एक खंडकाव्य गुरुजींनी १९३० मध्ये त्रिचनापल्लीस असताना लिहिले होते. त्यातील जो भाग मबळ आवृत्तीमध्ये होतो तो येथे देत आहे.

थोडा संदर्भ : श्रीमंत आईबापांचा एकुलता एक मुलगा होता. त्याचे वय अठरा वर्षांचे होते. त्याचं आठ-नऊ वर्षांच्या एका मुलीशी लग्न लागलेले होते. तो सत्याग्रहात स्वयंसेवक झाला होता. तो तुरुंगात अतिसाराने मरण पावला. त्याच्या आजारपणाची तारही खेड्यात वेळेवर पोहचली नाही. मरणाचीच तार एकदम घरी गेली. आईबापांना जबर धक्का बसला. तो मृतपुत्र रात्रीच्या वेळी दिव्य वेष धारण करुन आईबापांची समजूत काढण्यास येतो. रात्रभर विचारवार्ता करुन त्यांचे समाधान करुन प्रभात होताच परत जातो.

मातेचा शोक

कैसा बाळ निमाला
न दया भगवंताला॥ कैसा....॥

‘लडिवाळा बाळा
बाळा वेल्हाळा
ये भेटायाला॥
तुजविण कोणि न मजला॥ कैसा....॥

येशिल माघारा
माझ्या पाखरा
राजस राजकुमारा
धीर असा रे धरिला॥ कैसा....॥

येशिल भेटाया
आशा ही सखया
होती मम हृदया
काळ कसा परि फिरला॥ कैसा....॥

बाळा काय करू
प्राणा केवि धरू
शोका केवि करू
शोक सखा मम ठरला॥ कैसा....॥

हे क्रूरा काळा
कैसा रे नेला
पाझर ना फुटला
घालिशि घोर घाला॥ कैसा....॥

एकुलता बाळ
माणिक बिनमोल
मोती तेजाळ
दुर्दैवी मी अबला॥ कैसा....॥

शून्य दिसे सृष्टी
माता मी कष्टी
भरते ही दृष्टि
अंत न पार न दु:खाला॥ कैसा....॥

घेउ कुणा जवळ
देउ कुणा कवळ
बोलु कुणा जवळ
तव मुखचंद्र अंतरला॥ कैसा....॥

मुख शशि न हसेल

हृदय न सुखवील
बोल ना रिझावील
राम न जीवनि उरला।। कैसा....।।

वत्साविण गाय
मोकलिते धाय
तळमळते गाय
प्राण जावया सजला।। कैसा....।।

सुख सगळे आटे
कंठ तिचा दाटे
हृदय तिचे फाटे
शरणागत ती मरणाला।। कैसा....।।

हंबरडा फोडी
सुस्कारे सोडी
बुडते हो होडी
करुणासागर भरला।। कैसा....।।

डोळे डबडबले
मानस गजबजले
अंतर गहिवरले
माता पडली धरणीला।। कैसा....।।

(माता शोकाने धरणीवर पडते. जवळच पिता असतो, त्याची स्थिती)

पित्याची स्थिती

पिता बैसलाहे शोकमग्न खिन्न
पुशीत नयन वारंवार
कालवाकालव हृदयी होतसे

सर्प जणू डसे अंतरंगी
धीर धरी परी पुन्हा येई नीर
डोळ्या लागे धार अनिवार
‘ध्यानी मनी बाळा नव्हते मरण
लौकर सुटून भेटशील
मरावयासाठी बाळ हा चालला
विचार न आला कधी मनी
मेघाची चातक चंद्राची चकोर
घनाची मयूर वाट पाहे
तृषार्तास जल क्षुधार्थास अन्न
तैसे होते मन तुझ्याकडे
तुझ्या वाटेकडे होते सदा डोळे
शतवार आले झाले बाळा
हाती रे माउली दिन ते मोजीत
घास नसे घेत अश्रुवीण
आठवण तिला क्षणाक्षणा यावी
सदगदित व्हावी वृत्ति बाळा
आशावेलीवरी वज्र रे कोसळे
हृदय हे जळे काय करु
कोणाचा आधार संसारी आम्हाला
तुझ्या या मातेला केण बाळा
कोणाला ती प्रेमे हाक मारील
हात फिरविल कोणावरुनी
बाळा कैसा काय गेलास टाकून
दोघांस लोटून दु:खपूरी
तुरुंगात माझ्या नको जाऊ बाळा
सांगितले तुला वारंवार
अश्रु मी ढाळिले पदर पसरीला
दृढनिश्चयाला वरिले तुवा
नाही तू ऐकीले तुरुंगी गेलास
होती परी आस भेटशील
भेटशील आम्हां सुखाचा सोहळा

पाहू आम्ही डोळा होती आशा
आता कसची आशा आकाश फाटले
हृदय दाटले माझ्या बाळा
आशेचे जळून झाले कोळसे
जळावीण मासे तैसे आम्ही
एक माझा बाळ तोही देव नेत
आम्हाला ठेवीत रडावया
आणि लग्न केले नुकते रे थाटाने
अभागी पित्याने बाळा तुझे
मांडोनी सोहळा मानिला आनंद
अभागी मतिमंद ठरलो परी
आठ वरुषांची लहानशी बाळा
जाणे ना मरणाला अजून जी
लग्न म्हणजे वाटे जिला एक खेळ
तोच आली वेळ वैधव्याची
वैधव्य ते काय मरण ते काय
संसार तो काय ना कल्पना
हसावे खेळावे सुखे खावे प्यावे
जनांनी म्हणावे विधवा तिला
मांडीवर जिने प्रेमाने लोळावे
जनांनी म्हणावे विधवा तिला
तिच्या जीवनाची आम्ही केली माती
कल्पना परी ती नाही तिला
तिच्या जीवनाची आम्ही केली राख
नाही ते ठाऊक परी तिला
मांडीवरी मान तिने ठेवियेली
आम्ही मुरगळिली रुढीदासी
रडताना आम्हा पाहुनी रडेल
परी न समजेल गंभीरता
मोडिली हो मान गोड या मैनेची
हृदयास जाची शल्य तीव्र
करोनीया आम्ही विवाहसोहळा

दाबियेला गळा कोकिळेचा
फुटेल जे कंठ गावया स्फुरेल
मैना ना काढील गोड शब्द
बाळ-कोकिळा ही मोठी जै होईल
मनात झुरेल अपरंपार
शोक-गीते सदा बाळा आळवील
टिपे ती गाळील टपटप
घळघळ अश्रुधार ती सोडील
हातांना जोडील जगन्नाथा
जळेल अंतरी जेव्हा का कळेल
मरणाचा खोल अर्थ तिला
जळेल अंतरी जेव्हा तो कळेल
विवाहाचा खोल अर्थ तिला
आग लागो आम्हा आग त्या रूढीला
बळी हो दिधला बाळिकेचा
काय आईबाप तिचे ते करतील
द:खाने जळतील क्षणाक्षणा
नयनांसमोर बाळेला पाहोनी
जातील जळोनी अंतरंगी
घेतील पोटाशी कन्या ती अजाण
अश्रूभरे स्नान घालितील
काय करि देवा कोठे तरी जाऊ
कोठे बाळा पाहू राजसाला
कशाला हा पैसा कशाला व्यापार
एक जो आधार तोही गेला
ज्याच्यासाठी केली आटाआटी
त्याशी ताटातुटी केली देवा
शोक-वन्हि आता जिवंत जाळील
प्राण न घेईल परी माझा
दाही दिशा ओस भरला अंधार
डोळ्यांना ही धार आता सदा
हिचे तरी केवी करु समाधान

देईल ही प्राण शोकवेडी
आम्ही दोघे आता कोणाकडे पाहू
एकमेकां दाउ दीन अश्रु
हाय काय झाले केवढा आकांत
केवढा आघात आम्हावरी'
मनी हे विचार मनी हे उदगार
मनावरी भार फार पडे
असह्य तो झाला वृक्ष उन्मळला
भार फार झाला पिता पडे
माय धरणीला पिता धरणीला
तेथ उचंबळला शोकसिंधु

(त्या उभयतांचे सांत्वन करण्यास शेजारी येतात.)

जमुनिया जन ते समजाविती
रडू नका रडणार तरी किती
जशी असेल तया प्रभुची मती
मिळतसे सकळांस तशी गती॥

रडुनि काय, विवेक मनी धरा
उपजणे मरणे न चुके नरा
अजि स्वदेशहितार्थ मरे सुत
सुकृति तो करि वंश समुन्नत॥

जरि जगी मरणे, मरणे तरी
करुनिया कृति, जी जन उद्धरी
वदति संत असे वच सतत
करुनि तेच कृतार्थ भवत्सुत॥

रडु नका मुळी, ना मळवा मुख
गिळुनि दु:ख मनी धरणे सुख
अमरता मिळवी मिरवी यश

धवळितो सुत आज दिशा दश॥

रडु नका मुळी धीर मनी धरा
अमरता न जगात कुणा नरा
सुत गुणी रुचला परमेश्वरा
धरिल तो हृदयी प्रिय लेकरा॥

करु नका हृदयी मुळी खंत ती
नुरलि की आपणाप्रति संतती
भरतभूमिमधे किति बाळक
तुम्हि बना करुणाघन पाळका॥

रडु नका मुळि अश्रु न ढाळणे
भरत-माय-मुले तुम्हि पाळणे
निजसुतानन तेथच पाहणे
मति धरुन अशी जगि राहणे॥

(लोक जातात. अंधार पडू लागतो. मातापितरे खिन्न बसतात.)

ते माय-बाप पुशिती निज लोचनांते
अश्रूच ते न उरले मुळि मोचनाते
ते बसले वरुनि शांत मनी सचिंत
ना दु:ख पुत्रनिधनासम ह्या महीत॥

राहे कुणी, सकल ते बहुतेक गेले
येतीच अश्रु फिरुनी भरतीच डोळे
आकांत ना परि अता रडणे मुक्याने
ये हुंदका मधुनि ऐकु कुणास काने॥

अंधार आज भरला भरल्या घरात
त्याहून दाट भरला भरल्या मनात
लावी कुणी तरि तदा सदनात दीप

आशा नसे तिळ परी हृदयासमीप॥

ती बैसली उभयतां पुतळेच खिन्न
आधारहीन सुमने जणु वृतहीन
भूमीवरी उभय ती पडली अशांत
डोळा क्षणैकभर लागतसे तशात॥

(बाहेर रात्र बरीच होते. जगात शांतता असते.)

रात्रीचे बाहेरचे स्वरूप

अंधार। निबिड पसरला बाहेर
आकाशी। मावळला उगवून शशी
अश्रु जसे। तारे चमकति नभी तसे
गार सुटे। वारा, पर्णध्वनि उमटे
सळसळती। पाने जणू ती तडफडती
रातकिडे। त्यांचा कानी ध्वनी पडे
फांद्यांत। वडवाघुळ ते फडफडत
वरि फिरत। पुंज तमाचा जणु उडत
शांत परी। सृष्टी होती ही सारी
जग हमले। दमुनी झोपी ते गेले
एक घरी। जागे मधुनी कुणी तरी
अश्रुसरी। पडती त्यॢ धरेवरी

(अशा त्या रात्री मृतबालक दिव्य वेष धरुन आईबापांचे सांत्वन करण्यास येतो. तुळशी वृंदावनाजवळ उभा राहून तो आई, बाबा अशी मंजुळ हात मारतो. माता दचकून उठून बाहेर येते. वगैरे.)

रात्रीच्या त्या समयि निजली शांतशी सृष्टी सारी
'आई, बाबा' कुणितरि अशी हाक मंजुळ मारी
झाले शांत क्षणि परि, जशी लाट मंदा उठोनी
शांतांभोधीवर पुनरपि जावि तेथे विरोनी॥

वृक्षच्छाखातति तुळशिच्या हालती अंगणात
अंधाराला जणु निजविण्या वृक्ष ते आंदुळीत
झाला होता जणु की अखिल प्रांत तो स्तब्धतेचा
'आई, बाबा' मृदू करुणशी ये पुन्हा ऐकु वाचा॥

"आईबाबा, पुनरपि तुम्हा बाळ भेटावयाला
वात्सल्याने विरुन तुमच्या येथ बाहेर आला
आई, बाबा! तुम्हि तुळशिच्या अंगणामाजि याना
द्यावा प्रेमे मजसि तुमचा अंतिम प्रेमपान्हा"॥

'आईबाबा' पुनरपि उठे शब्द माधुर्य-राशी
"मारी का हो" दचकुनि वदे "बाळ हाका अम्हासी?"
'आईबाबा' पुनरपि असे शब्द ती म्लान माता
ऐके, धावे, भ्रम जणु तिला दु:खदग्धा अनाथा॥

"आला आला फिरुनि अपुला बाळ आला घराला
हाका मारी, झणि तुम्हि उठा बाळ बाहेर आला"
धावे वेगे, पदर अथवा केशही सावरी न
"आले बाळा" करुण नदली गायशी माय दीन॥

"आई" 'आली, बघ बघ तुझी पाडसा माय आली'
शोकावेगे हलत वदली, मागचे दार खोली
"कोठे आहे? दिसत नयना ना कसा बाळ माझा
झाला भास क्षणिक? न दिसे राजस प्राणराजा"॥

"आई, पाही तव सुत इथे, येत कैसे न तात?"
श"आले, तेही बघ" "तुम्हि बसा शांत, ऐका निवांत"
माता धावे परि करितसे खूण तो दिव्य बाळ
बोले 'श'आई, हृदयी धरणे तो न गे आज काळ"॥

देवाचा मी, परि तुमचिया भेटीलागून येत

युष्मच्छोके गहिवरुन मी जाहलो सदगदित
आले चित्ती समजउ जरा अपुले तात माय
आलो आई म्हणुनि दुरुनी वंदितो पूज्य पाय॥

आई, माझ्यावरि जरि तुझे प्रेम आहे अपार
संसारी या अमर असला देखला ना प्रकार
भूमातेच्या प्रिय जननि गे मोचनासाठि आज
लाखो जावे मरुनि, जरि ती राहिलीसेल लाज॥

माता तू मत्प्रिय खरी परी आज सर्वाजणांची
ही भूमाता रडत बसली दास्यदारिद्रय जाची
मातांची जी परम सदया मंगला थोर माता
त्राता नाही तिजसि उरला झालि लोकी अनाथा॥

यासाठी मी त्यजुनि सगळे आइ धावून गेलो
गेलो, देवे मज उचलिले, मी तुम्हांलागि मेलो
मोहत्यागे भरतजननीकारणी लागतील
सारे बंधू, मजसि मग तू धन्य गे मानिशील॥

झाले ना गे मुळी बघ तिथे आइ थोडेहि हाल
क्लेशांची ती अम्हि मिरवितो नित्य कंठात माळ
मृत्यूला ना मुळि भरत-भूपुत्र आता भिणार
हे त्वदबाळे सकल जगता दाविले थोर सार॥

होते माते जवळ किति ते थेर स्नेहार्द्र मित्र
भूमातेचे भजक सगळे दिव्य ज्यांचे चरित्र
काही माते पडु न हधले ते उणे त्या सख्यांनी
नाही होऊ स्मरण तुमचे ते दिले, सत्य मानी॥

माझ्या ओठावरि तुळशिचे ठेविले पूज्य पान
मद्देशाचे स्मरण करुनी सोडिले शांत प्राण

माते, माझ्यास्तव न रडणे, का म्हणोनी रडावे?
देशासाठी फिरफिरुनी हे प्राण माझे पडावे॥"

(त्या मातेला हे पटत नाही. शतस्मृति तिच्या हृदयात उचंबळतात. हृदय भरून येऊन ती पुढीलप्रमाणे बोलते.)

"काय बाळा हे बोलसी कठोर
भरुनि येतो मम शोकभरे ऊर
प्रेम करुन किती तुला वाढवीले
जाशि विसरुन का सर्व बाळ बोले॥

तुला हातांचा करुनि पाळणा रे
खेळवीले झेलिले किती बारे
जरा दुखले खुपले कि जपे बाळा
स्मरण तुज उरले काय न वेल्हाळा॥

तुझा पाहुनि मुखचंद्र बाळराजा
हृदयसिंधु उचंबळुन जाई माझा
जरी मूर्ति तुझी अंगणात खेळे
दुरुनि बघति तुला हे मदीय डोळे॥

जरी जाशी क्षण दूर, हुरहुर
सुरू होई मम चित्ति हळूवार
तुझा कानी पडताच गोड सूर
पुन्हा यावा मत्सौख्यरसा पूर॥

तुला लावावी दृष्टी तिन्ही सांजा
तुला जपले मी सांगु किती राजा
असे आम्हाला एक तुझी जोड
म्हणुनी झाला संसार सर्व गोड॥

जसा वणव्यामधि भाजतो कुरंग

तसा तुजला जाचील का तुरुंग
याच चिंतेने झोप मुळि न यावी
रामनामावळि उठुन म्या जपावी॥

रामराया बाळास सुखी ठेवी
हाल सोसाया शक्ति तया देई
बाळ माझा सुखरुप घरा आणी
असे विनवित मी नयनि येइ पाणी॥

रात्र व्हावी जग सर्व हे निजावे
परी निद्रासुख नाहि अम्हां ठावे
आळवावा भगवंत जिवेभावे
तुला बाळा हृदयात आठवावे॥

दिवस होत्ये मी मोजित रे बाळा
मला ठाउक कंठिले कसे काळा
पोटि प्रेमाचा भरुनि ये उमाळा
गळति गालांवर अश्रु ते घळाळा॥

परी रडणे हे अशुभ मनी येई
पुसुनि नयना विनवित प्रभूपायी
मातृहृदय तुला ज्ञात असे रामा
ठेवशील कसा दु:खि सदा आम्हा॥

जीव माझा धरि आस, जरी झुरला
एक महिना चो फक्त अता उरला
बाळ माझा येईल धरिन पोटी
अश्रु वदतिल, वदवेल जरि न ओठी॥

सुखाचा तो पाहीन सोहळा मी
बाळ माझा येईल पुन्हा धामी
अशी आशा हृदयात खेळवीत

बाळ होत्ये रे दिवस रात्रि नेत॥

अकस्मात परी मरण आयकेन
रडत बाळा मी धाय मोकलून
कसा गेलासी टाकुनिया बाळा
कसा काळ तुला ओढित वेल्हाळा॥

किती आले हृदयात रे विचार
हृदयहादक जे शोक देति फार
कशी बाळाची जाहली असेल
स्थिती तेथे, तो कोमल जणु फूल॥

तुरुंगात तिथे एकला असेल
जवळ त्यच्या कुणि तेथ ना बसेल
कोण मातेसम दयाक्षमा दावी
आईनेच जगी शुश्रुषा करावी॥

दिली असती मृदु मांडि मी उशीला
तुला असते निजविले रे कुशीला
तुला मृदु गादी दिली असति बाळा
तुझे असते चेपले मी कापळा॥

सदोदित मी राहून उशापाशी
तुझी बाळा रे बनुन एक दासी
तुझी सेवा प्रेमार्द्र असति केली
परि काय पहा दैवगती झाली॥

जरी असते मी जवळ तुझ्या बाळा
धैर्य होते ना न्यावयास काळा
तुझे असते मी प्राण वाचवीले
परी बाळा हे काय बरे झाले।

कोण होते रे औषधास द्याया
कोण होते तव चरण चुराया
कोण होते पडताच हात द्याया
कुणी दाविल का तुरुंगात माया।।

शब्द तेथे मधु ऐकण्या न येई
कुणि न कोणाची वास्तपुस्त घेई
दुधाताकाचा थेंब नसे कोणा
जरी पडला आजारि दीनवाणा।।

सुखामाजी तू बाळ वाढलास
दहिदुधाविण तव जात नसे घास।।
जरा येइ जरि वास तो तुपास
रुसुन जाशी तू करिशि रे उपास।।

केवि कारागृह सौख्य तुला देई
बाळ जाणे रे सर्व तुझी आई
तुझा घुटमळला जीव रे असेल
घोट न दुधाचा लाभला असेल।।

कशासाठी गेलास रे तुरुंगी
सुखे असतासी मातृमृदूत्संगी
कशालागी आगीत बाळ गेला
पुन्हा भेटाया नाहि जगी उरला।।

तुझ्या आजारीपणाची कथा ती
दगड परिसुन होतील विरुन माती
बाळ कैसे मम अश्रु थांबतील
हृदय फुटते रे तुटत तीळ तीळा।।

मरण चुकले जरि नाहि जगी कोणा
मृत्यु यावा ना असा दीनवाणा

निज-प्रियजन-मधुसंगतीत यावा
मृत्यु होइल तो सह्य तरी जीवा॥
तुझी बाळा ती दूर मायबापे
तुला भेटू शकली न पूर्वपापे
तुझे दर्शन घडले न शेवटील
कसे अश्रू हे बाळ थांबवील॥

तुझे गेले असतील गाल खोल
तसे नयन तुझे तारका-विलोल
शक्ति उठण्याची उरलि ती नसेल
कसे अश्रू हे बाळ थांबतील॥

जरी उघडे ग्लानीत पडे अंग
हळुच पांघरुणा कोण घालि सांग
जरी तुजलागि लागली तहान
दिले अविलंबे जळ कुणी उठून॥

कोण केसांवरुनिया हात फिरवी
कोण मृदु बोले हृदय तुझे रिझवी
कोण प्रेमभरे मुके तिथे घेई
कोण प्रेमाने स्निग्ध तुला पाही॥

अनास्थेने मदबाळ मला मुकला
अनास्थेने मदबाळ अहा सुकला
बाळ आम्ही उभयता रे अभागी
काहि करु शकलो ते न तुझ्यालागी॥

घरी गायिगुरे केवढे खिलार
किती संपत्ती तव पिता कुबेर
घरी होती ती कशाची न वाण
परी कारागृहि जाइ तुझा प्राण॥

आम्ही घरि होतो बाळ रे सुखात
तूपसाखर जरि रडत तरी खात
तुला नव्हता सुग्रास त्याच वेळी
कसे अश्रु न गळतील बाळ गाली।।

तुझा बाळा श्रीमंत किती बाप
परी ओढवले पहा पूर्व पाप
एक पैहि न खर्चता बाळ आली
कसे अश्रु न गळतील बाळ गाली।।

कोण कुरवाळी तेथ तुझ्या अंगा
कोण दावि तिथे प्रेम-हतरंगा
कुणी मांडी का दिली प्रेमरंगा
कुणी घातली का सांग मुखी गंगा।।

बाळ जाते फाटून चित्त माझे
कसे कुसकुरले फूल मधुर ताजे
बाळ माझा ना वाचविला कोणी
मृत्युवार्ता ती फक्त पडे कानी।।

फत्तरासहि फुटतील झरे राजा
किती पडतिल हृदयास घरे माझ्या
काय समाजाविशि? बोलशी कशाला
जगी समजावी कोण माउलीला।।

भेट होउ न दिलि गायवासराची
काय पूर्विल ते पाप बाळ जाची
पुत्रनिधनासम अन्य न हृद्रोग
बाळ साहे ना क्षण तुझा वियोग।।

तुला बिलगू दे धरिन तुला पोटी
मुके अगणित घेईन देइ भेटी

निकट राही तू सदा पाखरा रे
खेळ बागड मधुरा न दूर जा रे॥"

(असे बोलून माता मुलास पोटाशी धरण्यास धावते. परंतु तो देवाघरचा सोवळा बाळ दूर होतो व आईला दूर होण्यास खूण करतो. आईचा विलाप चालला असता पित्याची मन:स्थिती कशी होती ती पहा-

पिता परी खिन्न उगीच राहे
मधेच नेत्रांतुन नीर वाहे
उदास ऐके हृदयार्द्र बोल
रुतोनि चित्ती बसती सखोल॥

संचित राही मिटि लोचनाते
तुटोनी जाई अजि पुत्रनाते
विचारकाहूर उठे मनात
निवांत राहे हृदयी अशांत॥

न दु:ख जे शब्दविभाव्य होई
मनास अत्यंत असीम दाही
तसा न अंगार तनूस जाळी
उफाळ जैसा तनुलागि पोळी॥

समुद्र जसा वडवानळाने
पिता जळे आत तसा मनाने
न बोलला शब्द-वदेल कायी
फुटे तदीयांतर जेवि लाही॥

मूकेपणा दावि तदीय शोक
गमे तया शून्य समस्त लोक
मुखावरी खिन्न दिसे निराशा
शिरे मनीही करण्या निवासा॥

मनावरी तो जरि दु:खभार
करीत होता स्वमनी विचार
विचार ते ऐकुन बाळकाचे
तरंग येती हृदयी तयाचे।।

मनात होता जरि दु:खभग्न
पिता दिसे खोल विचारमग्न
दिसावया लागत त्या स्वदेश
यदर्थ तत्पुत्र वरी मृतीस।।

(बाप मुका व खिन्न आहे असे बघून मातेला पुन्हा उमाळा येतो. ती मुलाला 'ये रे' म्हणते व 'मुलाला काही सांगा' असे पतीला विनविते)

"येई येई रे
मनोहरा
सुकुमारा सुंदरा
राजस पाडसा
स्नेहाळा
बाळा गुणगंभीरा।। येई....।।

सांगा हो तुम्ही
लवलाही
बाळ कसा तरि राही
येथे ज्या योगे
नच जाई
सुखविल दु:खी आई।। येई....।।

तुम्ही मूक कसे
पुत्रला
चार शब्द तरि बोला

मातृप्रेमाचा
ओलावा
आणा तदह्रदयाला।। येई....।।

प्रेमाचा पान्हा
पाजु कुणा
येइ न कोणा करुणा
हे करुणावंता
दयाघना
दे मज मम बाळ पुन्हा।। येई....।।

(ती माता पुन्हा पुत्राला कवटाळावयास धावते. तो स्वर्गीय पुत्र खुणावतो व दूर होतो. तो तिची पुन्हा समजूत घालतो.)

“आई नाही ह्रदय मम हे जाहले गे कठोर
आहे माते परि निशिदिनी अंतरी एक घोर
त्वत्प्रेमाची स्मृति विमल ती कैशि जाईल आई
पूज्या मूर्ती तव सतत ह्या अंतरंगात राही।।

आई वाटे तुजसि करुणा फक्त त्वदबाळकाची
दु:खी सारी खितपत परी लेकरे भारताची
वाटे पुत्रे तव कितितली सोशिले हाल कारी
पाही डोळे उघडुन परी बाळके दीन सारी।।

ना खायाला मिळत कळही ना करी पाव आणा
आपदग्रस्ता सकल जनता ना मिळे एक दाणा
राहायाला घर न उरले वस्त्र ना नेसण्याला
आई नाही उरलि मिति गे भारती आज हाल।।

कित्येकांना घरि न मिळते देतसे जे तुरुंग
होती गादी मजसि जननी तेथ लाभे पलंग
होते तेथे नियमित भिषग् औषधे द्यावयाते

केव्हा केव्हा मिळत जननी दूधही प्यावयाते॥

लाभे कोणाप्रति जननि गे तेथे ती पावरोटी
सायंकाळी कधि कधि मिळे ताकही अर्धलोटी
राहे कोणी कधिहि न तिथे एकही तो उपाशी
राहे अन्नाविण जरि कुणी येति ते चौकशीसी॥

बाहेरी ह्या परम जपता, पुत्र कोटी उपाशी
माते देता घृत मधु हधी, ना पुशी कोणि त्यांसी
हिंदुस्थानी हरहर किती जाहलीसे हलाखी
कोणा ये ना हृदयि करुणा, सर्व आई उदासी॥

श्रीमंतांचे सजति उठती बंगले ते महाल
मोटारीही उडति, बघतो बंधुचे कोण हाल
पाषाणाचेहुन अदय हे गांजिती सावकार
हाहा:कार ध्वनि उठतसे, ना दया, ना विचार॥

माझे रात्रंदिन तळमळे चित्त बंध्वापदेने
धुव्वा जावे उडवित गमे भीमसेनी गदेने
सौख्यी नांदे पतसमुख तो नित्य श्रीमंत एक
दारिद्रयी हा मरत दुसरा ना जगी या विवेक॥

एके सौख्यी सतत असणे अन्य लाखो मरावे
एकासाठी झिजुनि झिजुनि बाकीचे दीन व्हावे
श्रीमंताचे घरि झडतसे रोज ती मेजवानी
लाखो अन्नाविण मरति हे बंधु गे दीनवाणी॥

माझ्या नेत्री अविरल जळा घोर वैषम्य आणी
मच्चित्ताने विरघळुनिया आइ हे होइ पाणी
ऐके आर्तस्वर उठतसे अंबरी जाय हाय
आई नाही ह-दय सधना शुद्ध पाणाण काय?॥

आलस्याला मिळती सगळे भोग सारे विलास
कष्टे रात्रंदिन परि तया ना पुरे दोन घास
अन्याया या सहन करिती वेदवेदांतवाले
गीता ओठी परि विषमता घोर ही त्यांस चाले।।
अन्नभावे मरत असता बंधु, जाई घशात
लाडु जिल्बी, हरहर कसे चित्त लागे अशांत
कैसे झाले स्वजन कठीण-स्वांत कारुण्यहीन
बंधू लाखो तळमळती हे मीनसे वारिवीण।।

चित्ती आई लव तुम्हि विवेका करा धर्म काय
मानव्याचे निज मनि बघा उज्ज्वल ध्येय काय
विश्वामाजी किती विषमता दु:खद प्राणघेणी
झाला येथे नरक दुसरा लक्ष देई न कोणी।।

श्रीमंताच्या सदनि भरल्या रम्य गाद्या पलंग
रस्त्यामध्ये श्रमुन पडतो दीन टाकून अंग
श्रीमंताचे घरि झळकती दिव्य विद्युत्प्रदीप
अंधारी तो मजुर मरतो सर्प विंचू समीप।।

श्रीमंताचे ललितभवनी नृत्यसंगीत होत
होत प्राणांतिक कहर त्या चंद्रमौळी घरात
श्रीमंताने किति सुखि शुक श्वान मार्जार मैना
मदबंधूंची हरहर परी काय ही हाय दैना।।

श्रीमंतार्थ श्रमत असता घर्मधारा सुटाव्या
पर्जन्यी त्या जमिनित जशा उपळा हो फुटाव्या
सारा जावा दिन परि घरी काहि ना खावयाते
नाही त्याला मिळत तुकडा ना पुरे ल्यावयाते।।

थंडीवा-यामधि चिमुकली लक्ष बाळे मरावी
आईबाप व्यथितमती तदवृत्ति वेडीच व्हावी
हिंदुस्थानी गरिब विपदे अंत ना पार देखा

श्रीमंताचा तरिहि पुरवी दानवी देव हेका॥

'गंगे गोदे' वदुनि जननी अर्पिती बाळकांना
पोटामध्ये तटिनि धरिती दीन त्या अर्भकांना
खाया नाही म्हणुन किति ते आत्महत्या करीत
आई नाही मुळिच उरली भारती न्यायनीत॥

दारिद्र्याने मरत असता पोटाचे गोड गोळे
देवाला हे बघवत कसे त्यास ना काय डोळे
गेला गेला सदय तुमचा देव आई मरून
घ्यावा आम्ही झगडुन निजोद्धार आता करून॥

पाडायाते सकळ असती उद्धाराया न कोणी
मारायाते सकल उठती तारण्या नाहि कोण
साहाय्याला कुणि न, वदती शब्द ना सानुकंप
आई आता अम्हिच करणे स्वोद्धृती ती विकंप॥

राहे पायांवर निज उभा भाग्य त्यालाच लाभे
जो जो आई जगति वरितो स्वावलंबनास शोभे
ऐश्वर्याची कधी न घडते प्राप्ति आशाळभूता
होते प्राप्ति त्वरित परि ती उत्कटोत्साहयुक्तां॥

सूर्याचे ते विभव उसने घेतसे चंद्र मिंधा
अर्धा केव्हा कधि मुळिच ना डागही नित्य बंदा
तारे कैसे मिरवति परी नित्य तेजे स्वतंत्र
स्वोद्धाराते करुनि मिरवू घेउ स्वातंत्र्यमंत्रा॥

अन्नभावे तडफडत हे जोवरी आइ बंधू
मदरक्ताचा पसरिन सडा सांडुनि बिंदु बिंदु
अन्नवस्त्राविण न भुवनी जीव कोणी रहावा
त्याच्यासाठी झिजुनी झिजुनी आई मज्जन्म जावा॥

माझे बंधू अधन अधमी सावकारी पिळावे
तैसे नानाविध कर किती लागती त्यांस द्यावे
बंधूंना ना लवणहि मिळे चाटिती भूमि खरी
आई, ऐशी सुकरुण कथा चित्त माझे विदारी।।
लोकांपाशी कण न उरला तो उरे शोकापूर
बोलायाचे बळ न उरले तो उरे शोकसूर
नाही धंदा उतर उरला मृत्युवाचून आता
त्राता नाही निजजनहि ना देति साहाय्य हाता।।

खेडोपाडी दिसत सगळे लोक बेरोजगार
दारुमध्ये बुडति विपदा वर्णवे ती न घोर
दारुमध्ये धुळिस मिळती खानदानी घराणी
आई ऐशी सुकरुण कथा लोचनी पाणि आणी।।"

(मुलगा भावनाभरात भारताची दैन्यदशा वर्णन करीत असतो. परंतु मातेला पटत नाही. ती एकदम पुढीलप्रमाणे बोलू लागते.)

"मला ना कळते बाळा समजावी तुझा पिता
म्हणती खोटि स्त्रीबुद्धि ऐकेन तुमच्या कथा।।

पित्याला पटवी बोल जरि त्या पटती तरी
मला त्यातच आनंद तन्मना तुष्ट तू करी।।

तुमचा हितसंवाद बसुनी येथ ऐकते
प्रकाश पडला चित्ती अल्पसाही बरेच तो।।

तुझ्या गोड मुखा बाळा बसते येथ पाहत
तुझ्या गोड कथा बाळा बसते येथे ऐकत।।

जरि ना कळले माते त्वदबोल मज अमृत
ऐकते लक्ष लावून मुक्याचे घेउनी व्रत।।"

(पिता मुलाजवळ बोलू लागतो.)

"बाळ मी ऐकले बोल तुझे जे खोल गंभिर
ऐकता कंठही दाटे शोकाने भरतो उर॥

देशाची स्थिती ही हीन लोक सर्वहि निर्धन
समस्त दिसती दीन येते हे भरुनी मन॥

उपाय ना परी बाळा आम्हाला एकही दिसे
बघून तुमचे यत्न सारेच जग हे हसे॥

ईश्वराच्या कृपेनेच येतील दिन चांगले
अंधारामागुनी जेवी प्रकाशकर ते भले॥"

(हा दैववाद ऐकून मुलगा त्वेषाने बोलू लागतो.)

"बाबा हे बोलता काय प्रयत्नदेव तो तरे
प्रयत्नास सदा आधी धरावे हृदयी नरे॥

नरका नंदनाचे ते यत्न तो रुप देतसे
प्रयत्न करिती राष्ट्रे पृथ्वीवर पहा कसे॥

यत्न जो करि त्या देव साहाय्य करितो सदा
संकटात पुढे जातो हरि देव तदापदा॥

गोवर्धनास ते काठ्या आधि गोपाळ लाविती
मग तो लावितो बोट श्रीकृष्ण वदु मी किती॥

बोलतो फक्त मदबंधू कृतीचा शंख तो परी
करील देव तो काय बघतो कोण अंतरी॥

भावनांचा अस्त झाला विचार उरला नसे
दिसती निजलि सारे मदबंधू पशु ते जसे॥

झाले सकल मदबंधू शिश्नोदरपरायण
नारायण कसे त्यांना करि मोक्षसमर्पण॥"

(लोकांच्या मनोवृत्तीचे तो तरुण पुत्र वर्णन करतो.)

"न केवळाहि भावना न केवळाहि वल्गना
विचार भावना कृती तरीच होइ उन्नती॥

उदार भावना नसे विचार ना मनी वसे
कृती म्हणाल शून्य ती कशी घडेल उन्नती॥

मनास टोचणी नसे मती सखोल ती नसे
खुशालचेंडु बैसती कशी घडेल उन्नती॥

जिवंत भाव ना तिळ तुटे न चित्त तिळतिळ
न मान-कीर्ती-चाड ती कशी घडेल उन्नती॥

पशूसमान जीवन पशूंतही किती गुण
न सत्यवस्तुची रती कशी घडेल उन्नती॥

स्वदेश न स्वधर्म न स्वकर्म न स्वशर्म न
उगीच व्यर्थ जल्पती कशी घडेल उन्नती॥

स्ववस्त्र न स्ववस्तु न स्वशस्त्र व स्वशास्त्र न
उगीच नंदि डोलती कशी घडेल उन्नती॥

मत स्व न मति स्व न कुठेच काहि राम न
अजागळापरी गती कशी घडेल उन्नती॥

समस्त हे परभृत खरा न एक पंडित
करील आत्म-आरती कशी घडेल उन्नती॥

मदांध ग्रस्त मत्सरे प्रमत्त देत उत्तरे
घमेंड की अम्हा मती कशी घडेल उन्नती।।

सदैव वृत्ति उर्मट सदैव एक तर्कट
करी टवाळि दुर्मति कशी घडेल उन्नती।।

गंभीरता विशुद्धता न ठाउकीच उद्धटा
सदैव छद्म दाविती कशी घडेल उन्नती।।

स्ववर्तनात वक्रता स्वभाषणात आढ्यता
जगास तुच्छ लेखिती कशी घडेल उन्नती।।

जगात आम्हि शाहणे नसे जणू अणू उणे
पदोपदी परि च्युति कशी घडेल उन्नती।।

हुशार राजकारण अम्हिच जाणतो खुण
अशी करुन स्वस्तुती कशी घडेल उन्नती।।

अम्हीच डाव जाणतो अम्हास कोण सांगतो
अशी करुन स्वस्तुती कशी घडेल उन्नती।।

सदुक्ति ती पटेच ना सुबुद्धि ती असेच ना
वदे तशी नसे कृती कशी घडेल उन्नती।।

समीप बुद्धि ती नसे दिली तरी न घेतसे
मनी सदा अहंकृती कशी घडेल उन्नती।।

दिवाळखोर हा असे हसे जगात होतसे
मनी परी न लाज ती कशी घडेल उन्नती।।

स्वतास मार्ग ना दिसे परास नित्य जो हसे

न यत्न ना पुढे गती कशी घडेल उन्नती॥

टपे सदे बकापरी स्वरुप साजिरे वरी
मध्येच चोच मारिती कशी घडेल उन्नती॥
महान खरे जगदगुरु सदैव यत्पदा धरु
करी न त्या नमस्कृती कशी घडेल उन्नती॥

जगात काय चालले स्वभूत केय चालले
न हे कुणीही पाहती कशी घडेल उन्नती॥

पलंगपंडिता-करी घडेल केवि चाकरी
न जोवरी खरे व्रती कशी घडेल उन्नती॥

असावि एकतानता असावि भाव-तीव्रता
तरीच होतसे कृती कृतीविणे न उन्नती॥

परंतु काय ही दशा बघुन दु:ख मानसा
न देशभक्ति ती दिसे खुशाल खातपीतसे॥

बघून देशदुर्गती खुशाल खेळ खेळती
क्षुधार्त बंधु पाहुन सुचे तयांस भोजन॥

खुशाल नाच चालती अनंत द्रव्य ओतिती
विचार येइ ना मनी दरिद्रता किती जनी॥

सहानुभूति-बिंदु न सुखी समस्त निंदुन
न चिंधि एक देतिल परस्व मात्र घेतिल॥

न सत्य ते मुळी उरे कसा समाज हा तरे
असत्यदेव पूजिती असत्य नित्य वागती॥

न बंधुभाव अल्पही दया क्षमा न नावही

न ऐक्य ते कुठे दिसे सदैव भांडखोरसे॥

घरात रोज भामडती पथात नित्य भांडती
मनी सदैव भांडती जनी समस्त भांडती॥
मजेत खेळ मांडिती तिथेही भांडु लागती
गंभीर प्रश्न काढिती तिथेही भांडती किती॥

करंट लोक हे असे कशास भाग्य येतसे
विदीर्ण होइ मन्मन बघून आपुले जन॥

यदा सुबुद्धि येइल तदाच कार्य होइल
विचार भावना मनी कृती घडेल हातुनी॥

म्हणून म्हणतो बाबा विचारा पेटवू जरी
पेटवू जनचित्ताते कृति होईल ती खरी॥

तुरुंगी असताना मी होउनी भावनिर्भर
लिहिले गीत मी एक म्हणु का गोड सुंदर॥"

(एकदम प्रेमाने आई बोलू लागते)

"बाळ माझा कवी झाला केव्हापासून रे गड्या
लबाडा गीत तू केले सुराने म्हण रे खड्या॥

आवाज तव आकर्षी आधीच हृदया मम
त्यात स्वकृत गीतास वदता अमृतासम॥

केव्हापासून झालास कवि पंडित शहाणा
गाई ते गीत तू बाळा आनंदे भरि मन्मना॥

पहा हा थांबला वारा त्वदगीत परिसावया
सखया ते तुझे गाणे लाग रे लाग गावया॥"

(मुलगा गाणे म्हणतो)

दीनशरण्या शुभलावण्या धन्या तू माउली
होतिस तप्त जगा साउली॥

तुझ्या विचारे येते माझे गहिवरुन गे मन
येतो कंठ किती दाटुन
इतिहास तुझा क्षणैक बसता येतो नयनांपुढे
शोके पिळवटते आतडे
हृदय गजबजे दृष्टी भरते पडति अश्रुचे सडे
वाटे सकळ चराचर रडे
अनंत देखावे भरभर गे चलच्चित्रपटसम
दिसती हृदय निर्मिती तम
उदात्त वाङ्मय कुठे, कुठे त्या कला कुठे ज्ञान ते
वैभव माते! आहे कुठे?
किती तपस्या त्याग किती तव वैराग्य तुझे किती
सत्त्वा नव्हति तुझ्या गे मिति
झाला अंतर्बाह्य भिकारी पुत्र तुझा आज गे
गुलाम केवळ म्हणुनी जगे
अनुकरण करी दुस-यांमागुन मंद जातसे सदा
पूजी भक्तीने परपदा
कला असो सादित्य असो वा असो राजकारण
जाई जगताच्या मागुन
स्वयंस्फूर्तिचा झरा आटला स्वतंत्र मति ती नूरे
प्रतिभा दिव्य सर्व ती मरे
जुनी संस्कृती जिवंत नाही उरले केवळ मढे
तरि किती कवटाळिति बापुडे
नव संस्कृति ती कळली नाही विचार कुणी ना करी
दारे लावुन बसती घरी
नवीन-गंभीर-विचार-गगना उड्डाणा मारुनी
तारक येइ न कुणी घेउनी

जसा मारुती गगनि उडाला जन्मताच निर्भय
दिसता रक्तभास्करोदय
मृत्युसमीपहि नचिकेता तो ज्ञानास्तव जातसे
आजी त्वत्सुत कोठे तसे
विद्या नाही, सदगुण नाही, बसलो कर जोडुन
जाई भाग्य अम्हा सोडुन
दया नसे सद्धर्म नसे तो नुरला एकहि गुण
जाई भाग्य म्हणुन सोडुन
गुणांजवळ नांदते अखंडित लक्ष्मी चंचल नसे
चंचल जनमत माते! असे
अम्ही भांडलो म्हणुनि कष्टलो, कष्टतसो रडतसो
कृतकर्मफळे भोगीतसे
सदगुण येतिल तेव्हा होइल भाग्योदय आमुचा
तोवरि पाश राहि शत्रुचा
माते! अमुच्या दुष्कृत्यांनी रडत अहा असशिल
कसचे पुत्र मनी म्हणशिल
एक सिंह तो बरा नको हे पस्तिस कोटी किडे
जाती चिरडुन ते बापुडे
एक चंद्र तो बरा कशाला अनंत त्या तारका

ज्या ना अंधकारहारिका
विशालशाखा पसरुन उभा एक पुरे वटतरु
नलगे क्षुद्रवनस्पतिभरु
येत असे असतील तुझ्या का विचार मनि अंबिके!
विमले स्नेहाळे सात्त्विके
अम्ही करंटे दुर्गुणखाणी सुत न तुझे शोभत
बसलो श्वानासम भुंकत
परिस्थिती न आकळ कळेना सांगितले ना वळे
पडलो तरिहि गर्व ना गळे
सरपटणारे सरडे सकळहि गुरुत्मान् कुणी नसे
जो तो बिळात घुसुनी बसे
चिखलामध्ये खडे फेकितो तिथेच घेतो उड्या

घेई न कोणी सागरी बुड्या
कूपमंडुकापरि अद्यापी उगाळितो गे जुने
एकच वाजवितो तुणतुणे
जगी नगारे प्रचंड भेरी वाजत माते! किती
सुस्त त्वत्सुत परि बैसती
ध्येयवाद तो नुरला, परि जरी दिसला, करिती टर
झाले पशूच उदरंभर
हसू की रडू उदास होते निराश होते मन
येइ प्रकाश का कोठुन
चैतन्याची कळा आमिच्या अंतरंगि संचरो
दिव्य स्फूर्तीने मन भरो
उत्कटता उज्वलता येवो भव्य नव्य आवडो
ध्येयी विशाल दृष्टी जडो
अनंत तेजे ज्वलन्निव असे धगधगीत लोळसे
पेटुन करु रुढी-कोळसे
किती विषारी किती भिकारी रान गवत माजले
सगळे पाहिजेत जाळले
नव प्रकाशा पहावयाला होवो सुरु धडपड
करु दे जीवात्मा तडफड
बंदिवास हो सरो, विचारा विश्व असो मोकळे
पंखा फडफडवू दे बळे
सकळ बंधने जीवात्म्याची बुद्धीची स्फूर्तिची
तुटुनी जाउ देत आजची
विशाल सुंदर नवीन गंभिर प्रश्न किती जीवनी
जाऊ भेटाया त्या झणी
होवो विक्रम मृतवत् अस्मत् स्थिति आता पालटो
त्वन्मुखशशि नवतेजे नटो
जाउ दे जाउ दे देवा! अस्तास सर्व दुर्भाग्य
येउ दे येउ दे देवा! ते मंगल शुभ सौभाग्य
होउ दे होउ दे बंधू! त्वत्कार्य कराया योग्य
शोभो पुनरपि भारतमाता जशि पूर्वी शोभली
सत्या शिवा सुंदरा भली। दीनशरण्या....।।

(मुलाचे गाणे संपताच माता गहिवरून म्हणते)

"बाळा अतीव मधुरा कविता तुझा रे
कोणी तुला शिकविले मति ही भरे रे
गाणी परी कवण ऐकवि बाळ आता
जाशील सोडुन मला करुनी अनाथा॥

बाळा तुझी ह्दयहारि रसाळ गाणी
साधी किती सरळ सुंदर रम्य वाणी
तू आणिशी अमुचिया नयनांत पाणी
जाशील रे करुनिया मज दीनवाणी॥

त्वत्काव्यगंध मुळि ना कळला जगाला
आला कसा तुजवरी घनघोर घाला
बाळा कळीसमच जीवन जो तुझे रे
येते तुला मरण, निघृण काळ तो रे॥"

(मुलगा आईची समजूत करावयासाठी बोलतो)

"स्वातंत्र्यसंगीत तो दिव्य भगवंत निर्मीतसे मायभूमीवर
ही जीवने आमुची त्यात होतील तानापरी आइ गे सुंदर
मज्जीवनाची तिथे गुंफिली जात सत्तान झालो अमर्त्यापरी
आई नसे स्वार्थ, या भारताची प्रभा फाकु दे रम्य विश्वांतरी॥

जरि ना लिहिले काव्य काव्याचा विषय स्वता
आइ मी जाहलो आज तू मान मनि धन्यता
स्वातंत्र्य-सत्कथा निर्मू तदर्थ मम जीवन
आइ ना दु:ख ते वाटो तू शांत करि गे मन॥

मोक्षाची पावन गंगा निर्माया भारतांतरी
मज्जीवन सदबिंदु मिळाला शोक न करी॥

बाबा तेथे तुरुंगात विचार मनि खेळत
पेटवावे जागवावे हे समग्रहि भारत॥

जेधवा तीव्र वृत्तीचे उत्कट-स्वांत ते नर
उठतील हजारांनी आपल्या भारतावर॥

तेधवा तेज ये ईल देव ना सुखलोलुपा
देव येईल मागूनी मरा आधी तुम्ही खपा॥

जेव्हा राष्ट्रामधि निपजति उन्नत ध्येयवादी
त्यागी तेजोमय तरुण ते सुव्रती सत्यवादी
खेडोपाडी करितिल जरी ते विचारप्रसार
देशोद्धारा मग तुम्हि वदा काय लागे उशीर॥

खेडोपाडी झणि उडवुनी कल्पनांचे फवारे
स्वातंत्र्याचे प्रबळ भरुनी भारती दिव्य वारे
'कैसे तुम्ही मनुज असुनी राहता रे गुलाम
याच्यापेक्षा मरण बरवे या म्हणू सर्व राम॥

मेलेले ना पडुनि असणे मर्दसे हो उठावे
स्वीय स्थानाप्रति पुनरपि पौरुषे शीघ्र घ्यावे'
ऐसे लोकांप्रति कथुनिया पेटवू अंतरंग
पाशा तोडू करु उठुनिया शृंखलांचा विभंग॥

कोणी नाही धरणिवरि या आपणावीण दीन
तेजे तुर्क स्थिर मिरवतो तो उभा चंड चीन
पोलादाचे परि चिमुकला धन्य पोलंड देश
अफगाणाते नमुन असतो आंग्लभूचा नरेश॥

झाले जागे खडबडुन ते आज इजिप्त सुप्त
दावी तेज:प्रसर प्रगटी स्वीय सामर्थ्य गुप्त

ईशान्येला डुलत असतो वैभवाने जपान
छोटी मोठी कृति परि, तया अग्रराष्ट्रांत मान॥

आयर्लंड प्रथित भुवनी मेळवी स्वीय मोक्ष
भव्य क्रांती करित रशिया विस्मये पाहि विश्व
देशोदेशी सकळ जनता पेटलेली पहा ती
हिंदुस्थानी परि न उठती सर्व झोपाच घेती॥

स्वातंत्र्याने हसति खुलती राष्ट्रके सानसान
हिंदुस्थानाहुन शतपटीने जरी ती लहान
उत्कर्षाला करुन करिती चित्कलावाग्विलास
विश्वा देती, जरि लघु तरी, संस्कृतीचा प्रकाश॥

दु:खी पंगू पतित दुबळे राहिलो हो भिकारी
आता पृथ्वी दिपवु उठुनी तेज दावून भारी
शक्ती आहे जगति अतुला एक ती निश्चयाची
लक्ष्मी, ज्याला अविचल असे नित्य निर्धार, त्याची॥"

(बाप म्हणतो, "आपणात भांडणे किती धर्मही बुडत चालला. महारांना म्हणतात शिवा. आचार उरला नाही तर कसे होणार?")

काय सांगाल लोकांस लोकांमध्ये नसे बळ
ऐक्य नाही धर्म नाही कोठे दाबाल रे कळ॥

स्पृश्यास्पृश्य तसे अन्य वाद माजून राहिले
भ्रष्टता माजली सारी हलकल्लोळ माजले॥

ब्राह्मणब्राह्मन्यांची खडाजंगी असे सदा
जागा न उरली कोठे बाळा टाकावया पदा॥

हिंदू आणि मुसलमान पाण्यात बघती जसे

विश्वास लव ना उरला बाळ होईल रे कसे॥

धर्मास लागतो डाग धर्म श्रेष्ठ सनातन
आचारा बुडवितात माझे हे करपे मन॥
धर्म हा प्राण जीवाचा धर्मार्थ सर्व पाहिजे
त्याच धर्मास टाकोनी बाळा चित्तांत लाजिजे॥"

(मुलगा बोलतो)

"बाबा होत किती मदीय हृदयी कालवाकालव
अस्पृश्यापरि मानुतो तरि कसे ते आपुले बांधव
श्रेष्ठाश्रेष्ठ समस्त ढोंग, न असे अस्पृश्य हा मानव
नाही थोर विचार तात दिसतो लोकांतरंगी लव॥

देवाचे घरि पाप घोर करितो अस्पृश्य या लेखुनी
आले नाही जगात खास समजा अस्पृश्य ते होउनी
आम्ही मानव हीन दीन तरितो त्या धर्म हो मानितो
ऐसा धर्म जळो मनुष्यहृदये जो भाजण्या सांगतो॥

कुत्री पोपट डास ढेकुण तशा मुंग्या तशी मांजरे
यांनी ती न विटाळती अपुलि हो स्वप्नांमध्येही घरे
येती पक्षिपशू खुशाल बसती देवालयी निर्भर
जाता ये परि मानवास न तिथे धिक् धिक् असा हा नय॥

कोल्ही ओरडती, स्मशान-वसती, तेथे तया राखुनी
धंदे सर्व गलिच्छ जे सकळ ते प्रेमे तया देवुनी
'तुम्ही स्वच्छ बना, सुसंस्कृत बना, मालिन्य दूरी करा'
ऐसे हे वदणे गमे खुपसणे घोरव्रणी तो सुरा॥

बाबा एकही त्याजला न दिधला ज्ञानप्रकाशांशु तो
बाबा क्रूरपणा असीम बघुनी मज्जीव हा कापतो
वर्षे कैक हजार मानव परी केले तयांना पशू

नाही दाखविले कधीहि चुकुनी ते प्रेम वा ते असू।।

बाबा घोर कलंक हा अपुलिया ह्या थोर धर्मावरी
डागा मानितसो सुभूषण सदा हा! हा! कसे अंतरी
मानव्या अवमानितो मनुज तो धिक्कारितो प्रौढिने
पाषाणासम जाहलो जरि कशी ही आपुली हो मने।।

देवा मानितसा करी झणि उठा अस्पृश्यता ना उरो
त्यांचे क्लेश विपन्नता विकलता दुर्भाग्य सारे सरो
सारे बंधु बनू खरे निज मने प्रेमे अता रंगवू
मातेला कलहादिकी मुळि अता ना तात हो खंगवू।।"

(बाबा मुसलमानांस आपण सदा नावे ठेवतो परंतु ते सारेच वाईट नसतात. भलेबुरे सा-यांत आहेत." अशी विचारसरणी मुलगा मांडतो.)

"हिंदु धर्म सामनतेस शिकवी आचार उल्टा परी
इस्लामी जन वागती अधिक ते एकत्र बंधूपरी
अन्या बंधुस आगगाडिमधि तो भेटे मुसलमान जरी
बोलू लागति, एक होति, मिळती, खातील एकत्रही।।

आम्हां संकुचितांतरांस गमते की तो मुसलमान अरी
दृष्टी नाहि विशाल, तीन शतके मागे विहारा करी
देऊ घालवुनी अम्हांस गमते येथून बाहेर त्या
ज्यांच्या येथ अनेक आजवरि त्या झाल्या पिढ्या नांदत्या।।

मातेचे परशत्रु ते विसरतो, आहे मुसलमान तो
ऐसे नित्य कथांतुनी अजुनही काव्यांतुनी दावितो
पोवाडे अजुनी म्हणू गरजती कापा मुसलमान जे
राष्ट्राचे नव प्रश्न खोल बघण्या धी आमुची ना धजे।।

इस्लामी म्हणजे कठोर ठरला दुर्वृत्त पापी ठक

नाही तद्-हृदयास पाप म्हणुनी वस्तू जणू ठाउक
हिंदूंच्या बळजोरिने पळवुनी न्याव्या स्त्रिया सतत
ऐसे नित्य अम्ही जना शिकवितो की हे मुसलमान-व्रत॥

ना हे सत्य मुळी, तयातहि पहा ते नांदती सद्गुण
प्रामाणीकपणात नाहि कमती ते तात हिंदुहुन
इस्लामी गवळी न नीर मिसळी, हिंदु कसा तो असे
जो पूर्वग्रह-दूषितांतर नसे त्या सर्व काही दिसे॥

नाना गाव पहा, घरोघर तिथे ते भृत्य प्रामाणिक
इस्लामी दिसतील खेळविति जे प्रेमे मुले बाळक
जे श्रीमंत कुबेर तद्भवनिही इस्लामि ते चाकर
निष्ठापूर्वक कामधाम करिती संपादिती भाकर॥

होतो घेत समस्त एकवटुनी अन्योन्य-सत्- संस्कृती
ती रामायणभारतोपनिषदे भाषांतरीली किती
इस्लामी कविंनी, सुकाव्य लिहिले येथील भाषांतुनी
प्रेमे वाढविले कलांस नमुने उत्कृष्ट ते निर्मुनी॥

केली जी रणकंदने विसरुनी हिंदुमुसलमान जनी
माता भारत एक ही सकळिकी वृत्ती मनी आणुनी
जो जो भारतभूमिला पदतळी ठेवील तो तो रिपू
मानोनी, करण्या स्वतंत्र निजभू या तात सारे खपू॥

मोठे संकट दूर आधि करु या बारीक राहो दूरी
मातेच्या हृदयात खोल घुसली ही दास्यरुपी सुरी
होऊ या झणि एक, एक हृदयी तो राष्ट्रधर्म स्मरू
इस्लामी जन तोहि बंधू समजू वृत्ती उदारा करू॥

धर्मांचा जरि खोल पाहु तरि तो आत्मा असे एकच
आम्हालाच नको, पहा पडतसे रुढ्यादिकांचा खच
जे तुम्हां दिसतात भेद असती काळ स्थितीच्यामुळे

त्या भेदांसच मुख्य मानुन पहा हे भांडताती खुळे।।

का हा सनातन प्रथित हो, त्याचा कळे अर्थ का
रुढीच्या भजकांस तात मुळि तो नाहीच हो ठावुका
जे सतत्व कुठे दिसेल जगती जे सत्य कोठे दिसे
ते ते घेइ सनातनी जरि खरा, तदृष्टि कोती नसे।।

तत्त्वाची महती असे, न महती व्यक्तीस; सत्याप्रत
सांगो शंकर, बुद्ध, ख्रिस्त, मनु वा पैगंबर प्रेषित
ज्ञानोबा कथु वा कबीर कथु दे एका तुका नानक
जो जो धर्म सनातनी असत तो सतत्त्व-संग्राहक।।

देखा धर्मि सनातनी सगुणही आहे तसे निर्गुण
आहे यज्ञच फक्त देवहि नसे मीमांसकालागुन
बुद्धाला अवतार मानित असो, केला तया आपुला
ही संग्रहकता असे म्हणुन हो हा धर्म आहे भला।।

जैसे ते अवतार मानित असो श्रीरामकृष्णादिक
बुद्धख्रिस्तमहंमहासहि चला मानू जगत्तारक
होते सांगत सर्वदा शिकवित श्रीरामकृष्ण प्रभु
आलिंगील जगा सनातन जरी हा धर्म आहे विभु।।

(बाबा, इतर धर्मांतील उदात्त गोष्टीच आपण बघाव्या. महान धर्मसंस्थापकांची निंदा करणे बरे नव्हे.)

"जो देवास भितो असे अधिक तो, तो उच्च, तो सत्कृती
नाही वंश कुळास मान लिहिले ऐसे कुराणी किती
झाल्या थोर विभूति या जगति ज्या हे विश्व ज्या वंदिते
त्यांना तुम्हिहि मान द्या अरब हे ऐसे कुराण सांगते।।

लोखंडाहुन अग्नि थोर, जल ते अग्नीहुनी उदबळ
वारा वारिहुनी, तयाहुन असे मोठा गिरी निश्चळ

त्या अद्रीहुन थोर जे सदय जे निष्पाप जे अंतर
ऐसे या जगतास नित्य करिते श्रीमत्-कुराण जाहिर॥

आकारी प्रभु तो नसे, विभु महान ना मूर्तिमर्यादित
तुम्ही बंधु समस्त, ईश्वर मनी भावोन जा वागत
शेजा-यास जरी नसे तुझी तू देत जा भाकर
साध्या, सुंदर गोष्टि सांगत अशा शिष्यांस पैगंबर॥

बुद्ध प्रीती कथी अनंत, न असे जी वस्तुमर्यादित
युष्मत्प्रेमजलामबुधीत सगळे राहो जगत् डुंबत
कोणाला दुखवा मुळी न, न कुणा जीवास लावा ढका
आचारा मधुरा सुरम्य असल्या बुद्धोपदेशी शिका॥

पश्चात्ताप खरा मनास तरि तो घेईल विश्वंभर
प्रेमाने जवळी, जरीहि असला दुर्वृत्त पापंकर
घाली बंध्वपराध पोटि सगळे, जैसे तुझे देव तो
तत्त्वे ऐशि उदार सुंदर जगा तो ख्रिस्त हो अर्पितो॥

जे जे सुंदर सत्य हृद्य, उचलू सर्वांहि धर्मातुनी
होऊ थोर सनातनी तरि खरे थोरांस या सेवुनी
‘अकाशामधला तुझा मज असे ठाऊक तो बाप रे’
ऐसे बोलु न पूज्यनिंदन करी तो जीव कैसा तरे॥

काही अन्य म्हणोत मी करिन मच्चित्तास मोठे खरे
जे जे सत्य दिसेल ते नमुनि मी घेईन अत्यादरे
ऐशी वृत्ति सनातनी कुठुनही येवो प्रकाशप्रभा
ओलावा कुठलाहि तो मिळवुनी सदवृक्ष राहे उभा॥

ओलावा हृदयास द्या मिळवुनी ठेवा न ते कोरडे
द्वेषाने जगतात तात उपजे तो द्वेष वाढे नडे
प्रेमाते प्रकटोनिया गुण दिसे तो मुख्य मानूनिया
दूरी दुर्गुण ते करून, झगडू तो स्वर्ग निर्मावया॥

रामोपासक गाणपत्य कुणि वा श्रीकृष्णनामी रत
जैसे एक घरात आज दिसती प्रेमे सुखे नांदत
ख्रिस्तोपासक रामभक्त अथवा पैगंबराला नत
हे एक्या घरि नांदण्यास नसती का तात हो संगत॥
बाबा थोर अपाय ह्या सकळही श्रीमद्विभूती शुभा
पूजावे मनुजे तयांस मिळते जेथून ज्याला प्रभा
सन्यत्सेन असून ख्रिस्ति, बनला तो चीनराष्ट्राग्रणी
राष्ट्राच्या जनकापरी समजती त्या लोक सारे चिनी॥

तो सेनापति नोगि ख्रिश्चन जगद्विख्यात शौर्याकर
त्याते देइ जपान मान न मनी आणीत धर्मांतर
तैसे आपणही खुशाल कुठल्या धर्मास मानो कुणी
होऊ चित्ति उदार, सत्यमय तो पूजू बनोनी गुणी॥

निष्ठा राखुन आपुली, न दुखवू जी अन्यनिष्ठा खरी
अन्याच्या ह्रदया जरा दुखविणे ती होय हत्या तरी
सांभाळून परस्परांस करुनी घेऊ विकासा चला
देणे हाच धडा समग्र जगता या भारताने भला॥

राहे जीव धरुन देश अपुला कंगाल दु:खी मुका
आहे ध्येय तयास काय? पडतो चित्ति प्रकाशांशु का?
आहे हा जगला कशास जगती प्राचीन हो भारत
देवोनी टकरा अनंत टिकला काळाशि हा झुंजत?॥

स्वातंत्र्या मिळवून काय जगती सांगेल हा भारत?
दास्यी लोटिल काय अन्य जनता होऊन सत्तारत?
ऐश्वर्यी मिरवेल काय जगती मत्तोन्मदांधापरी,
विश्वाला लुटुनी जगास करुनी दुर्मिळ ती भाकरी॥

व्हावा भारत शीघ्र मुक्त तरि तो व्हावा किमर्थ वदा
नाही खास जगामधील असती त्या पोसण्या आपदा

शांताचा जगतास सत्पथ भला दावावया भारत
होतो मुक्त, म्हणून ईश्वरकृपे तो जाहला ना मृत॥

युद्धाचा जगतास वीट लढुनी येईल तो अंतरी
शांतीचा मग त्या तहान हृदयी लागेल तीव्रा खरी
तेव्हा भारत हा स्वतंत्र जगता दावावया सत्पथ
अग्रे होइल, नीट चालविल हा विश्वंभराचा रथ॥

नाना धर्म विभिन्न ते असुनिही प्रेमादरे राहती
शेजारी, शिकवील सर्व जगता ही भारती संस्कृती
हिंदु ख्रिश्चन पारसीक शिखही ते जैन बौद्धादिक
इस्लामी अणखी कुणीहि सगळे नांदोनि निर्मू सुख॥

घेऊ सर्वहि तात! थोर हृदये अन्योन्य जे चांगले
होऊ उन्नत उत्तरोत्तर गळा घालून भावे गळे
शांती शांतिविहीन युद्धनिरता दावावया भारत
आहे हा जगला, न ईश्वरकृपे तो जाहला हो मृत॥

बाबा उदार शुभ उन्नत हे विचार
सर्वत्र भारतजनी करणे प्रसार
नि:शंक निर्भय बनोनी कथावयास
यावे पुढे जनहितास करावयास॥

ते आग पेटविति सर्वहि हाय बाबा
खोटीच दाखविति ऐट आणि रुबाबा
ना भांडणे मिटविती परि वर्धमान
बाबा करोनि अजि कापिति देश-मान॥

लावावया सजति लोक समस्त आग
ना शांतिचा कुणिहि दाखविण्यास मार्ग
ओतीत तेल सगळे विझवी न कोणी
प्रत्येक देशहित हेच मनात मानी॥

लागे कधी तरि जगी मनुजा शिकाया
ना भांडणे हित असे. श्रम वेळ वाया
होऊनिया स्वमनि केणि तरी उदार
लागेच शांत करणे हलके विकार॥
ना ह्यांत तो कमिपणा मच हानि यात
होण्यात उन्नत सदा सुख थोर तात
तो देव ना हृदयि मात्र समीप ओठा
पूजीतसो सकळही अभिमान खोटा॥

जो व्यापितो सकल विश्व, तदर्थ तात
भांडावया उठति, दुर्मति वाटतात
ना देवभक्ति हृदयी अभिमान-भक्त
भांडोनिया सतत सांडिति बंधुरक्त॥

बेधूवरी कर कधी न कुणी उगारी
जो लेकरे प्रभूचि मनि मनात सारी
ना बंधु-रक्त सुखवी जगदीश्वराला
देवा न पूजिति, परी अभिमानतेला॥

होऊन सर्द मनि एक, स्वतंत्र होऊ
विश्वास विक्रम अनंत सुतेज दाऊ
स्वातंत्र्यही मिळविणे न मुळी रणाने
मारू न, आम्हि मिळवू अमुच्या मृतीने॥

न तात युद्धमार्गाने स्वातंत्र्य भारता मिळे
न अत्याचार करुनी सत्य हे मन्मना कळे॥

ऐक्याचा एकजूटीचा नि:शास्त्राचा तसा नव
संदेश द्यावया लोका हजारो लागती युव॥

विचार-जागृती मोठी यदा देशात होइल

उठतील भय-त्यागे तेव्हा स्वातंत्र्य येइल॥

तात म्या काय सांगावे उठोनी मातृभूस्तव
प्रेमे त्यागे जरी शोभू वेळ मोक्षार्थ ना लव॥

(बाप बोलतो)

विचार बाळ हे खोल जनास रुचतील का
शंका चित्तांत ही माझ्या म्हणून बसतो मुका॥

धर्माच्या कल्पना रुढ स्वातंत्र्यप्राप्तिच्या तशा
तद्विरुद्ध जना गोष्टी वद तू रुचतील का॥

(हे ऐकून मुलगा एकदम आवेशाने म्हणतो.)

ध्येयाचा एक माणूस हलवील उभी वरा
तात! गंभीर चित्तांत विचार करणे जरा॥

म्हणेल जनता मूर्ख हसेल अवमानिल
ध्येयाचा नर तो थोर पद मागे न घेईल॥

नवीन कल्पना लोका रुचते नच तत्क्षणी
उपहासास्पद ठरे कल्पनाप्रसु जो जनी॥

निश्चयाने परी ठाण मांडितो वीर तो यदा
वंदाया येति तत्पाद टाकुन स्वमनोमदा॥

धैर्याने प्रथम नभात एक तारा
ठाके नंतर उडुवृंद येत सारा,
छातीचा नरच धजे जली शिराया
येती मागुन सगळेच येति बाया॥

निर्मी जो पदसगरा तयास मान
त्याला या जगि मिळते महोच्चस्थान
लागे ही पुढति कुणीतरी घुसाया
लागेच प्रथम कुणी तरी मराया।।

कोणीच प्रथम जरी पुढे न येई
सारे प्रेक्षक, जगदुन्नती न होई
ध्येयाचे नरच वरी समाज नेती
घेऊन ध्वज पुढती सदैव हो ती।।

सद्दष्टी नच रममाण पार्थिवात
आकर्षी निशिदिन यन्मना उदात्त
श्रद्धेने मरति असे कितीक संत
ध्येयाते जगि करण्यास मूर्तिमंत।।

ध्येयाला चिकटुन नित्य राहतात
आघाता निजशिरि सर्व साहतात
ना घेती पदहि कधी भिऊन मागे
ज्योति प्रज्वलीत यदंतरंगि जागे।।

सत्याला धरुनि मनात सर्वदाही
तेजाने नरवर तो पुढेच जाई
सांगाती मिळति जरी तरी बरेच
थांबे ना पुढति निघेच एकलाच।।

मोहाला करुन दुरी असत्य सांडी
लोभाते करुन दुरी मदा विभांडी
श्रद्धेचा धरुन करी प्रशांत दीप
ध्येयाचे हळुहळु जातसे समीप।।

लोकांचा प्रबळ सुटे निरोध-वारा
दीपाते विझवि विनिर्मि अंधकारा

आशेने ज्वलित करी पुन:पुन्हा तो
पाऊल स्थिरमतिने पुढेच घेतो
सत्याचा धरुन मनी प्रचंड जोर
विघ्नांचा करुन समस्त चूर चूर
निद्रा न, तळमळ होत फार जीवा
अत्युत्कंठित बघण्या स्वध्येय- देवा॥

चित्ताची तगमग होइ, नाहि शांति
दृष्टीला दिसत अखंड दिव्य सृष्टी
कष्टा आमरण करीत, कार्यनिष्ठा
ही दिव्या उठविल अंति सुप्त राष्ट्रा॥

लोकांच्या कळकळ जिंकिते मनाला
विश्वास प्रगटवुनी, करी कृतीला
सौख्याचा अनुपम सोहळा पहाया
लागेल प्रथम जगात या मराया॥

निंदेने न खचत ना चढे स्तुतीने
अंधारी बिकट चढे कडे धृतीने
ज्यावेळी सकळहि बंधू झोपलेले
थोरांनी समयि तशाहि कष्ट केले॥

ज्यावेळी सकळहि बंधु घोरताती
हाकांनी मुळि न कदापि जाग घेती
खोली ना नयन जरीहि हालवीले
थोरांनी समयि अशाहि कष्ट केले॥

एकाकी झटति जगास हर्षवाया
एकाकी उठति तमास संहराया
एकाकी निघति विपत्ति दूरवाया
एकाकी मरति समस्त उद्धाराया॥

ध्येयाचे वरि अपुले सदैव डोळे
ठेवून स्थिर, करि काम तो न बोले
सत्याचा मम पथि अंश तो असेल
माते सद्यश तरि अंति ते मिळेल॥

ऐशी ती हृदयि अखंड वृत्ति शुद्ध
ठेवोनी, करित विरुद्धतेशि युद्ध
सत्याचा ध्रुव नयनांसमोर तारा
राखोनी करित अखंड यत्न सारा॥

एकाकी शिरत पुढे, पडोहि काया
एकाकी धजति पहाड वाकवाया
एकाकी करित कमाल शर्थ यत्न
बांधाया निज पदरात सत्यरत्न॥

लावोनि तनमनवित्त ते पणाला
ध्येयार्थी झिजवित, तात, आपणाला
ओतोनी सकल सुखावरी निखारे
कष्टांना करित सदा मरे अहा रे॥

जाताती मरुन असे जगात थोर
हालांना सहन करुन घोर घोर
मेलेली मति अजिबात ना जयांची
ते तेव्हा उघडिति दृष्टि एकदाची॥

सत्याला कसुन पहाति मृत्युपाशी
सत्त्वाला बघति कसून संकटाशी
ज्वाळांच्या मधुन घुसून वीर जाई
लाटांशी प्रबळ करीत हातघाई॥

घालोनी स्वशिरि किरीट कंटकांचा
हालाचा मिरवुन कंठी हार साचा

मृत्यूला निरखुनिही करीत चाल
भेटाया मुदित अशास विश्वपाळ॥

सोसोनी छळ करुनी अहिंस युद्ध
त्यागाते तळपति दिव्य ख्रिस्त बुद्ध
आपत्ती कितिक तया महंमदाला
आल्या त्या तुडवुन विश्ववंद्य झाला॥

ब्रूनोला हरहर जाळिले जिवंत
सॉक्रेटीसहि मरणा वरीत शांत
सोसोनी सकलहि हाल ते अपायो
प्रस्थापी स्थिरमति सत्य गॅलिलीओ॥

एकाकी प्रथम महान उठे शिवाजी
होते ना प्रथम कुणी तयास राजी
निष्ठेने जनमन तो करी स्वकीय
त्यागाने मिळवित अंति दिव्य ध्येय॥

ऐसा या भुवनि सदा असे प्रकार
ध्येयार्थी बनून जिवावरी उदार
वाटेल न बघत होइ अग्रगामी
ईक्षेने विफल करी न आयु नामी॥

मागोनी मग अनुकारशील लोक
येती हो, धरुन मनात नीट रोख
यासाठी प्रथम कुणी तरी उठावे
लागे, हे खडतर तत्त्व आयकावे॥

(ध्येयार्थी पुरुषांचे वर्णन करुन मुलगा म्हणतो की, आज ह्या भारतात कवींद्र रवींद्रनाथ व मुनींद्र महात्मा गांधी हे दोन थोर ध्येयवादी पुरुष जगाला मार्ग दाखवीत आहेत.)

आजी या सकलहि भारतात दोन
ध्येयार्थी अचल विशालधी महान
ध्येयाच्यास्तव झटती सदैव तात
अश्रांत श्रम करिती पुढेच जात॥

टागोर प्रथित तसेच थोर गांधी
पुण्यात्मे उभय प्रसिद्ध ध्येयवादी
दोघांनी बघुन जगातले प्रकार
केला हो निशिदिन अंतरी विचार॥

युद्धे ही बघुन जगातील अघोर
स्वार्थाची निरखुन लालसा अपार
सत्तेची बघुन जगातील घमेंड
दोघांचे हृदय ते विदीर्ण ते दुखंड॥

सत्तेचा कारुन विशंक दुष्प्रयोग
लोकी या सृजन अनंत दु:खभोग
तोफांनी करुन जगास या गुलाम
गर्वाने मिरवित हे खल प्रकाम॥

लोकांना लुटुन करुन स्वीय दास
शक्तीने हरुन मुखामधील घास
दावोनी अहरह पाशवी कृतीते
गर्वाने स्तविति पुन्हा स्वसंस्कृतीते॥

कल्याणा करित असो अम्ही जगाचे
टेंभा हा मिरविति, सर्व दंभ साचे
मारोनी शर, वदतात पुष्पवृष्टि
दु:खाने भरिति नृशंस सर्व सृष्टी॥

पाहोनी सकल जगामधील दंभ
दुष्टावा बघुन जगातला अबंध

स्वार्थाचे बघुन हिडीस हे स्वरुप
दोघांच्या हृदयि विचार ये अमूप॥

जीवात्म्या करित निबद्ध यंत्रशक्ति
निर्मोमी हृदयि अदम्य स्वार्थभक्ति
देहाचे सकळ गुलाम होत दास
आळा ना मुळिहि तसेच वासनास॥

मी मोठा प्रबळ जगात श्रेष्ठ मीच
तोरा हा मिरविति उद्धतांत नीच
देहाला सुखविति पुष्ट तो करोनी
जाते हे हृदय सदा परी मरोनी॥

लाभावी निजवनलागि तूपपोळी
अन्यांची करित खुशाल राखहोळी
बांधाया निज रमणीय बंगल्यास
ठेवावे करुन जगास सर्व दास॥

होवोनी सकल जगात जेवि देव
दास्या ठेवुन इतरांस सर्वदैव
ना लज्जा तीळहि मनात, थोरवीच
वाटे ही, किति तरि लोक होत नीच॥

मोटारी उडविति तेवि ती विमाने
मोठाले अमित अजस्त्र कारखाने
याला ते वदति समस्त संस्कृती की
ठेवावे खितपत मात्र अन्य पंकी॥

'मारावे इतर' वदेल संस्कृती न
चित्ताची पशुसम वृत्ति ही निहीन
सर्वांचा जरि रमणीय तो विकास
जागा ती तरिच असेल संस्कृतीस॥

तुम्हाला जरि रुचते स्वतंत्रता ती
अन्या का पकडुन ठेविता स्वहाती
पृथ्वीचा जणु दिधलाच ताम्रपट्ट
राष्ट्रांना अबल करीत नित्य गट्ट॥

गर्वांध प्रबळ बनून पाश्चिमात्य
औद्धत्या प्रगट करी सदैव व्रात्य
ना त्याला हृदय जणू नसेच भाव
चोराचेपरि लुटुनी फिरुन साव॥

'ज्याची ही प्रियकर भूमि तेथ त्याने
नांदावे, प्रगति करीत ती सुखाने
राष्ट्रे ही सकळ असोत ही स्वतंत्र
सांभाळू सकल मिळून विश्वयंत्र॥

घेऊ या करुन समस्तही विकास
दावू दे निखिल जन स्वयोग्यतेस
दावू दे अखिल जना स्व-सुंदरत्व
सर्वांना प्रकटवु दे विशिष्ट स्वत्व॥

उद्यांनी सकल फुलोत या जगाच्या
जावे ना पथि मुळिही कुणी कुणाच्या
राष्ट्रांनी करुनि अशी जगी व्यवस्था
निर्मावे मधुर अपूर्व शांतिगीता॥

घेवोनी गुणलव जो असे पराचा
साठा तो करु हृदयी अमोल त्याचा
वक्षाची पसरति दूर दूर मूळे
ओलावा मिळविति, ना म्हणून वाळे॥

तैसे या जगति करुन मानवांनी
घेवोनी किरण समीप वा दुरूनी

उत्कर्षा झटुन करीत हो रहावे
वाढोनी, जगति सुखास वाढवावे॥

सत्पुष्पे विविध फुलोत संस्कृतीची
अर्पू त्या प्रभुस मनोज्ञ माळ त्यांची
ती निर्मी मधुर जसा ध्वनी सतार
सदगंधा वितरिल हाहि दिव्य हार॥

भेटू या, ग्रहण करु परस्परांचा
आनंदे जरि दिधला सदंश साचा
ना घ्यावा ग्रह विपरीत तो करून
मोती ते मिळत बघाल जै बुडून॥

शेवाळ प्रथम वरी तुम्हां दिसेल
मोती ना वरवर खोल ते असेल
पंकाते विसरुन पंकजा विलोकी
नांदावे गुणवरणार्थ सर्वलोकी॥

लोकी या किति तरी दु:ख हो स्वभावे
भांडोनी सतत किमर्थ वाढवावे
केला या भुवनि विनाश मानवांनी
सामक्षा दिसती पहा स्वलोचनांनी॥

झाले जे विसरुन सर्व आज जाऊ
देवाला निशिदीन अंतरंगि गाऊ
निर्मू या सकल जगात बंधुभाव
वाढाया विपुल असो सदैव वाव'॥

संदेशा वितरित ह्या जगा रवींद्र
वाणीने मधुर नितांत हा कवींद्र
वाटे हा रवि म्हणजे मुकुंद-वेणु
वंदावा निजशिरि तत्पदाब्ज-रेणु॥

विश्वाला विसरविती दुराग्रहाते
सध्याची उपनिषदे यदीय गीते
आकाशी विहरत जो सदा पवित्र
मांगल्या पसरित नित्य यच्चरित्र॥

जो अंतर्बहि रमणीय निष्कलंक
मोठे यद्-हृदय गंभीर जे विशंक
जेथे ते अगणित स्वार्थ माजलेले
तेथेहि धृतिमति हे रवींद्र गेले॥

गावोनी गव हृदयंगम स्वगीते
स्थापोनी गुरुतर विश्वभारताते
एकत्र स्थिर करि पूर्व-पश्चिमेला
जो होता भ्रम विलयास आज गेला॥

गांधीही असुन असेच ध्येयवादी
स्वातंत्र्य स्वजनहितार्थ घेति आधी
होईल स्वजन यदा खरा स्वतंत्र
देता येइल जगतास शांतिमंत्र॥

गांधी हे परम पवित्र दीनबंधु
दारिद्र्यी समरस होति प्रेमसिंधु
उद्धारा कथिति नवीनसा उपाय
त्यागाने तळपति तेज ते न माय॥

फुलासमान कोमळ मुलासमान निर्मळ
विशाल अंबरासम गंभीर अंबुधीसम॥

वसुंधरेसम क्षमी गिरीपरी सुनिश्चळ
पवित्र गांगतोयसा विशुद्ध सत्य यदबळ॥

अपाप कोकरापरी सतेज केसरी जसा

अथांग प्रेमसागर तमास दूर सूर्यसा॥
अनाथ-दीन-वत्सल उदार अब्द-सदृश
सहानुभूतिनिर्झर सुधेसमान यद्यशा॥
विरक्त जो शुकापरी सहा रिपूंस जिंकिता
प्रबुद्ध वाक्पतीसम धुरीण सर्व जाणता॥
(गाणे)

धरु चरणासी। वंदु या महापुरुषासी॥
फासावरि जरि कुणि चढवील
देइल त्याला प्रेम-निर्मळ
अशुभ मनी ना कधीहि चिंतिल
मंगलराशी॥ वंदु....॥

दारिद्र्याशी समरस होत
कटिला पंचा एक लावित
अनाश-रोगग्रस्ता धरित
निजहृदयासी॥ वंदु....॥

अगणित अनुभव नानापरिचे
मेळवुनी ते बहुमोलाचे
प्रश्न सोडवीत जीवनाचे
थोर महर्षी॥ वंदु....॥

लाखो लोकांची चपल मने
घेतो वेधुन निज वचनाने
सर्वांनाही शांत ठेवणे
यत्कृति ऐशी॥ वंदु....॥

घोर समयिही पुढे जो सदा
पुढे टाकिले फिरवी न पदा
लागू देई ना मदबाधा
निजचित्तासी॥ वंदु....॥

स्वकीय दोषां उघडे करितो
दुस-याचे गुण सदैव बघतो
चूक पदरि घेउनी दावितो
थोर मनासी॥ वंदु....॥
अविरत करणे सत्यशोधन
अविरत करणे सत्यचिंतन
अविरत करणे सत्याचरण
ध्यास हा ज्यासी॥ वंदु....॥

जगा अहिंसा व्यापक शिकवी
मनानेहि जो कुणा न दुखवी
आपण करुनी इतरां करवी
कृति-शूरासी॥ वंदु....॥

नि:शस्त्राचे शस्त्र निर्मुनी
पद-दलितांचे करी देउनी
प्रयोग पही सदैव करुनी
कर्मयोग्यासी॥ वंदु....॥

क्षमा सहनशीलता अभयता
सत्यभक्ति तशि सत्याग्रहता
यांच्या जोरावरी मिळविता
स्वातंत्र्यासी॥ वंदु....॥

जगातून या तरवारीला
जगातून पाशवी बलाला
दूर कराया उभ्या राहिल्या
धृति-मूर्तासी॥ वंदु....॥

जगातून या दारिद्र्याला
जगातून या गुलामगिरिला

दूर कराया घेता झाला
संन्यासासी॥ वंदु....॥

गरिबांना जो बंधू वाटे
पतितांना जो पावन वाटे
दु:खितास जो त्राता वाटे
अहा ऐशासी॥ वंदु....॥

बुडत्याला जो तारक वाटे
बद्धांना जो मोचक वाटे
स्फूर्तिप्रद जडजीवा वाटे
चला हो त्यासी॥ वंदु....॥

हास्य जयाचे अतीव सुंदर
संकटातही शांत मनोहर
प्रेम पिकविणे या पृथ्वीवर
ठावे ज्यासी॥ वंदु....॥

लोकां कैशा मिळेल भाकर
स्वातंत्र्य कसे मिळेल लौकर
हृदयि कसा येइल परमेश्वर
चिंता ज्यासी॥ वंदु....॥

विश्वधर्म सत्याचा पाळी
विश्वधर्म प्रेमाचा पाळी
सत्यप्रेमास्तव ती जगली
मूर्ती ज्याची॥ वंदु....॥

स्वतंत्रता अर्पिणे भारता
परिहरणे ही जगत्क्रूरता
दाखवुनी प्रेमाच्या पंथा
ध्येय हे ज्यासी॥ वंदु....॥

केवळ सुखलालसा नसावी
सत्यसुंदरा कृती असावी
प्रेमाने ही सृष्टि भरावी
इच्छा ज्यासी॥ वंदु....॥
असे हे गांधि पुण्यात्मे करीत चिंतना सदा
भारतामधली माझ्या कशी ही हरु आपदा॥

सदैव ही मना चिंता लागली शांति ना असे
अंतर्ज्वलित ज्वालाद्रि तेवि तन्मूर्ति ती दिसे॥

हसे वरी जरी गोड आत ती आग पेटली
कशी मी हसवू माझी थोर भारत माउली॥

पस्तीस कोट हे बंधु दरिद्रदेव हे सखे
गुलाम, सुखशांतिला ज्ञानाला सर्व पारखे॥

संस्कृती मारिली जाते व्यसनेही बळावती
कशी मी थांबवू माझ्या राष्ट्राची ही अधोगती॥

उपाशी असती लोक शोकपीडित आर्तसे
अंधार भरला सारा यांना मी सुखवू कसे॥

तळमळे तडफडे जीव महात्मा गांधिंचा सदा
स्वातंत्र्य-सुख- ल्लाभ बंधुंना होइ तो कदा॥

लढला आफ्रिकेमाजी चंपारण्यामध्ये लढे
खेडाजिल्ह्यातही भांडे, भांडे बार्डोलिच्या मध्ये॥

हजारो करिती कष्ट नाम गेले दिगंतर
वंद्य स्तव्य महान गांधी वेधी सर्व जनांतर॥

लोकांच्या सुखदु:खाशी एक होईल जो नर
जिवाचे करुनी रान तन्मने तोचि जिंकिल॥

महात्मा गांधि हे थोर दु:खार्त-जन-तारक
मरतात जनांसाठी म्हणुनी होति नायका।
त्याग प्रेम तथा सेवा विशाल मतिही तया
उलगडी जाहले गुंते म्हणून मिळवी जया॥

ध्येयवादी असोनीही व्यवहार न सोडितो
समोर संकटे देखे ध्येय ना परि टाकितो॥

निर्भय-स्वांत शांतात्मा व्यवहार-विदग्रणी
स्फूर्ति दाता भीर्ति-हर्ता तो धुरीण बने जनी॥

ठेवून दिव्यदृष्टीही व्यवहारपटुत्वही
जनांस उठवी कार्या संन्यासी दिपवी मही॥

विशाल दृष्टि ती आहे अपार त्याग तो असे
धडाडी शांतिही आहे उणे काहीहि ते नसे॥

उदार नीतिधर्माने सत्याने जगि निर्भय
सार घेती, करोनीया सर्वधर्मसमन्वय॥

अजातशत्रूसे झाले मुक्तात्मे रिपु ना जया
परि हे दास्य दारिद्र्य पाववीन, वदे, लया॥

रूढींचा दंभपापांचा अन्याय्य- राजनीतिचा
कराया नाश हा ठाके हराय भार भूमिचा॥

भारतातील हे हाल बघून उठती आता
प्रतिज्ञा करिती घोर मिळवीन स्वतंत्रता॥

माझे नि:शस्त्र हे युद्ध असे अंतिम जीवनी
आणील मजला मृत्यु न वा स्वातंत्र्य मज्जनी।।

जिथे चिंतन ते केले सोडिती स्वीय आश्रम
भारत करण्या मुक्त निघती करण्या श्रम।।

अनवाणी दंडधारी सानुली मूर्ति ती उभी
राहिली निकरे धैर्ये दिपली धरणी उभी।।

सोडी सात्त्विक शक्तींचे फवारे भारतामधी
सत्स्फूर्ति संचरे दिव्य उठती मृत तो मढी।।

चालला विश्ववंद्यात्मा निघाला हलले जग
तेजाचे झोत ते सोडी उठले बंधुही मग।।

धर्मयुद्धार्थ ती मूर्ति निघे बाहेर उज्ज्वल
असे युद्ध कधी झाले? नि:शस्त्राचे जिथे बळ।।

धर्मयुद्ध नसे झाले असे कोठे महीवर
अपूर्व घडवी गोष्ट भारती परमेश्वर।।

तात, ते चालले गांधी पायांनी जरि ऊन ते
सत्त्वाची दिव्य शक्तीची प्रभा विश्वात फाकते।।

लाखो येऊन ते लोक घेती दर्शन मर्तिचे
अंतरी स्फूर्तिचे लोट उठती देशभक्तीचे।।

'मदीय रणविद्येत सेनानी पहिला मरे
या तुम्हां दावितो' बोले 'मरावे केवि ते खरे'।।

असे बोलून तो दिव्य धीर गंभीर उत्कट
निघतो मरण्यासाठी तेज:संदीप्त उद्भट।।

माते, रात्रंदिन तळमळे थोर गांधी महात्मा
भूमातेची बघुन विपदा तो जळे अंतरात्मा।।

वार्धक्यीही अनुपम तपे पेटवी राष्ट्र सर्व
कष्टे मोठ्या भरतभुवनी आणिती मोक्षपर्व।।
मोठ्या कष्टे जशि भगिरथे आणिली मर्त्यलोका
स्वर्गंगा, तत्कृतिसम महात्मा करी हे विलोका
आणयाते किति तरि महायास स्वातंत्र्यगंगा
तत्त्यागाला मिति न तुलना निश्चया ना अभंगा।।

आई पूर्वी सुखरत असे जे विलासी अमीर
देशासाठी त्यजुन सगळे आज होती फकीर
लोळावे गे पसरुनी मऊ गादिगिर्दी पलंगी
देशासाठी उठुन बनती आइ ते झाडु भंगी।।

जाते कारागृहि सकळ ते नेहरूंचे कुटुंब
देशप्रीती हृदयि भरली शुद्ध त्यांच्या तुडुंब
होते लाखोपति परि भिकारी जवाहीरलाल
देशासाठी श्रमति किति, ते जसे लाल बाल।।

टाकावे गे मजसम तुवा कोटि ओवाळुनिया
आई! ज्यांचेवरुन मरती देति ते स्वीय काया
मायामोहा तुडवुन अम्हां देशकार्यार्थ जाणे
प्राणा देणे गुणगुणत गे अंतरी दिव्य गाणे।।

जो जो आहे तरुण म्हणुनी त्यास ना राहवेल
सौख्ये त्याला विषसम, पलंगी तया आगलोळ
दीपी घाली उडिस निकरे त्या पतंगासमान
जावू धावू भडकलि चिता देउ देशार्थ प्राण।।

तारुण्याचे समयि असते वृत्ति नि:स्वार्थ माते
तेजस्वी जे झणि रुचत ते मोहिते अंतराते

भीती चित्ता तिळ न शिवते भावनाही उदार
माते, ऐशा तरुण युवकांचेवरी देशभार॥

देशोदेशी तरुण करिती क्रांती ताता सदैव
त्यांचे हाती जननि असते सर्वदा देश-दैव
तुर्कस्थानी तशिच रशियामाजि तैशी चिनात
केली क्रांती तरुण युवकी तत्त्व आणा मनात॥

होतो अग्रेसर तरुण जो, वृद्ध तो पाय ओढी
उन्मात्ताते तरुण नमवी, वृद्ध त्या हात जोडी
उत्साहाते तरुण वरितो, वृद्ध नैराश्यवादी
स्वतंत्र्याते तरुण वितरी, वृद्ध तो नित्य बांधी

भूमातेला सतत विपदी अस्मदाधार एक
आम्ही तीते सजवु करुनी आमुचा रक्तसेक
देशामाजी तरुण जन ज्या कल्पना बाळगीती
तैसी देशस्थिति बनतसे सांगती वंद्य मर्ती॥

'माझ्यासाठी मरतिल मुदे पुत्र माझे' जपान
बोले, तेवी वदति सगळे अन्यही देश जाण
ऐशी प्रौढी परि न वदता येइ या भारताला
आई आम्हां तरुणतरुणां लागला डाग काळा॥

भूमातेच्या बघुनि विपदा चैन ना गे पडावे
तद्दास्याला झणि चुरडण्या आइ आम्ही मरावे
आनंदाने निज तनु सुखे मातासेवेस द्यावी
काळोखी जी निजशुभयशा लागली ती पुसावी॥

तान्हाजीची कृति कशि? अम्हां काय बोलेल बाजी?
आई, सारे वरुन वदती 'प्राण द्या मातृकाजी'
आलिंगावे निज सुत तया राखणे गे घरात
आईबाबा परम अघ ते घ्या विचारा मनात॥

आई वातावरण भरले दिव्य- विद्युत्प्रवाहे
राहे गेही कवण युव तो आज गे सौख्यमोहे
नाही तो गे तरुण, दिसतो वृद्ध नामर्द षंढ
राहे स्वस्थ स्वगृहि जरि हैं पेटता यज्ञकुंड।।
यावी स्फूर्ति प्रबळ-तर ती रक्त ते सळसळावे
भूमातेच्यास्तव मृति वरावयासआम्ही उठावे
राहो ना ती अशनशयनाची स्मृती अंतरंगा
वेडावोनी अम्हि जननीच्या धावणे बंधभंगा।।

नांदे गेही जननि सुत जो आजला खातपीत
आलापीत स्वनित कवने तो पशू गे खचित
नीच प्राणी परम तदध:पात गे जन्म सात
मातेच्या उद्धृतिसमयि जो लक्ष तेहि न देता।।

आई माझ्याहुन कितिक ते कोवळे सान बाळ
हालांमध्ये हसत असती नाहि का गे कमाल?
'देशासाठी तनु झिजवु ही' बाळ ते बोलताती!
मोठ्यांच्याही वच परिसुनी अश्रु नेत्रांत येती।।

स्वातंत्र्याची घुमघुमतसे भारती आज भेरी
व्हावे जागे झणि तरि अता, झोपलो अवेरी
माते, माते अडविशि कशी पाडिशी केवि मोह?
देशद्रोहा करु म्हणशि का? मी असे घट्ट लोह।।

मायापाशी झटदिशि झुगारुन देतात बंधू
होती सिद्ध प्रमुदित मने तो जरि क्लेश-सिंधू
गेही राहू? मरण बरवे त्याहुनी ते विशंक
लावू कैसा प्रियभरतभूमायिला मी कलंक।।

प्राणत्यागे निजयश टिको, नीति ही पूर्वजांची
रोमी रोमी भरलि अमुच्या गोष्ट ही सत्य साची

देऊ प्राणां फिकिर न करु सोडु ना स्वाभिमान
सत्त्वासाठी करित असती थोर ते देहदान॥

न करा अल्पही शोक आईबाबा मदर्थ तो
दु:खाची ही नसे गोष्ट पारतंत्र्यास मी धुतो॥

उपाशी बंधु जे कोटी त्यांना अन्न मिळावाया
करिती यत्न जे थोर त्यात गेलो मरोनिया॥

धन्य या निधना माना वदवे मज फार ना
आईबाबा सुखा माना नीर आणा न लोचना॥"

(इतक्यात एकदम एक गाणे ऐकू येते. तेव्हा मुलगा विचारतो.)

"तात, कोठून हे येते गीत ऐकावया बरे
कोण गातो दिव्य गाणे मोहितो मन्मना खरे॥"

(बाप सांगतो)

"बाळ शेजारच्या गेही कवि एक रहातसे
देशाचा ध्यास त्या नित्य पहाटे रोज गातसे॥

स्वातंत्र्याची दिव्य गाणी खिडकीत बसूनिया
गातसे होत तल्लीन वृत्ति ती पावुनी लया॥"

(मुलगा म्हणतो)

"तात ते ऐकु या गीत अपूर्व मज वाटते
अधीर मम हे कान ऐकाया गान दिव्य ते॥"

(स्वातंत्र्यशाहिराचे स्फूर्तीगीत)

समुद्रलाटा अदळताती कविचित्ता ज्या सदा मोहिती
निळे मनोहर सागरपाणी अनंत रत्नांची ती खाणी
अस्तोदय ते रविचे सुंदर दिनरजनी वा प्रशांत अंबर
अनंत तारे सुरम्य इंदु तरुवेलिलता ते दवबिंदु
फुले सुगंधी मुले मनोहर विहंगगण पाखरे खेळकर
मयूर कोकिळ चकोर चातक हरिणपाडसे तैसे हंस
चक्रवाक वा भेसुर घुक गजेंद्र वा ते सिंहशावक
चंचळ चपळा अंबद काळे चपळ वायुचे वेडे चाळे
सरित्सरोवर कमळे सुंदर मिलिंद मंजुल-गुंजारवकर
वने उपवने आम्रबकूल अशोक चंपक कदली मृदुल
पुष्करिणी कारंजी निर्झर चंदनचर्चन माळा सुंदर
हिरवे हिरवे गवत चिमुकले द-या खोल ज्या भिववित डोळे
पहाड मोठे प्रचंड पर्वत नभास शिर जे देउन उचलित
प्रेमे विव्हल रमणी रमण लताकुंज ते प्रेमराधन
चुंबन अलिंगन प्रकार विषयि जनांचे हे शृंगार
काव्य सृष्टिच्या ह्या संसारी मला न गोडी भरे शिसारी
ह्या वस्तूंचा मी ना भक्त यावर मन्मन ना आसक्त
असे भिकारी खरा फकीर ह्या वस्तूंची मज न फिकीर
हृदय कवीचे परी मम आहे प्रबळ भावनावारा वाहे
प्रतिभा स्फुरते मदंतरंगी काव्य नाचते मनस्तरंगी
चिता भडकली मदीय चित्ती गीत थरथरे ओठावरती
गीत कशाचे? मद्देशाचे स्वातंत्र्याचे समानतेचे
स्वतंत्रतेची गाइन गाणी जनात अथवा निर्जन रानी
स्वतंत्रतेचे विचार-वारे वातावरणी भरीन सारे
स्वातंत्र्याचे रणसंग्राम हृदयोद्दीपक जगदभिराम
स्वातंत्र्याचे झगडे भीषण जेथे चाले मारण मरण
त्यांची गाणी विशंक गाइन तदभक्तांची गाणी गाइन
प्राण अर्पिले ज्या वीरांनी त्यांना गुंफिन माझ्या कवनी
स्वतंत्रतेचा मी शाहीर करीत आहे जगजाहीर
नसानसांतुन ओतिन जोम स्वार्थाचा मग कराल होम
सिंहाचे परि तुम्ही उठाल धीर गर्जना तुम्ही कराल
देशभक्तिचा प्रवाहपूर खळखळाट वाहवीन धीर

देशभक्तिचा सागर खोल हृदयी निर्मिल माझा बोल
कठोर हृदये मृदु नवनीते करितिल माझी नवीन गीते
मृदु नवनीता वज्र करीन दिव्य असे मी निर्मिन कवन
पाषाणाला फोडिल पाझर ऐसे निर्मिन वाक्कल्लोळ
वेदजडांची वृत्ति हलेल ऐसे निर्मिन काव्य रसाळ
षंढहि होतिल रणझुंजार ऐसा ओतिन कवनी जोर
त्यागा उन्मुख मरणा सन्मुख मानितील त्यामध्ये खरे सुख
अशी जनांची वृत्ती करीन स्वातंत्र्याची गीते निर्मुन
होय, कशाला विचारता रे स्वातंत्र्याचा असे कवी रे
हसा, हसा, परि रडाल अंती मदध्येयाची मला संगती
स्वातंत्र्याचे सरोवरात मरालिनी मत्कविता रमत
स्वातंत्र्याचे सुमंदिरात विचार माझे सदैव गुंगत
स्वातंत्र्याचे स्वर्गीमाजी सदैव चमके प्रतिभा माझी
स्वातंत्र्याचे नभोवितान तेथे घेतो मी उड्डाण
स्वातंत्र्याचे विशाल गगन तेथे घेतो विशंक तान
स्वतंत्रतेचा, मायभूमिचा प्रियकर माझ्या भारतभूचा
पवित्र माझ्या भारतभूचा उज्ज्वल माझ्या भारतभूचा
मंगलतम मम भारतभूचा स्वातंत्र्योन्मुख भारतभूचा
कवी असे मी धीर नवीन सदैव पूजिन भारत-चरण
भारतभूची मंगल धुळी सतत माझ्या भाळी
भारतमाते तव शुभ गान मजला वाटे अमृतपान
तुलाच गाइन तुलाच ध्याइन तुलाच वंदिन मी गहिवरुन
हीच प्रतिज्ञा माझी माते पुरवी प्रेमाकरे अमृते
त्वांवंदेऽहम् तवैव गेऽहम्

(गाणे संपताच माता म्हणते)

“सुंदर कितिकरि हे गाणे वेडावुन जावे प्राणे
पहा तरू हे गहिवरले टपटप गळती अश्रुजले
पहा तुटे तो नभि तारा ऐकुन गीता मनोहरा
गुप्त खालती येवोनी गीताचा ऐकत ध्वनी
बाळ, कसे रे हे गाणे वेडा जणु हा कवी मने

वेडा इतरांनाहि करी हृदयि भावनापूर भरी"

(मुलगा म्हणतो)

"चित्रकार कवि हे सारे होतिल एकसरे
भूमातेचे हे भक्त भाग्य तिचे ते वाढवित
भारतभूच्या भाग्याची तहान सर्वांना साची
देशामाजी स्वतंत्रता आणायाला उत्कटता
कवीचित्रकारांनाही दास्य तयांचे मन दाही
देशासाठी तव गेला सुत, न नवल हे, हा झाला
धर्म आइ गे सकळांचा ध्यास समस्त देशाचा"

(इतक्यात एकदम दुसरे गाणे गाणे ऐकू येते.)
कोठुन दुसरा ध्वनी येतो हळुहळु मोठा हा होतो

(आई म्हणते)
"प्रभातफेरी करावया मुले चालली रे सखया
रुचे तयांना ना शय्या निघती जागृति ती द्याया."

(मुलगा म्हणतो)
"ऐकू आई तरि त्यांचे गीत रोमहर्षक साचे"

(प्रभातफेरीचे गाणे)
उठा बंधुंनो! पहा उगवला भास्कर वेळेवरी
तमोहर भास्कर वेळेवरी
प्रकाश पसरी जिकडे तिकडे
धरणीवरि अंबरी॥

झोपेची का वेळ असे ही उघडा रे लोचन
आपुले उघडा रे लोचन
झापुन बसलो म्हणून आले आले हे दुर्दिन
झापड उडवा डोळे उघडा पहा काय चालले

सभोवती पहा काय चालले
स्वातंत्र्याच्या दिव्य विचारे राष्ट्र सर्व रंगले
गुलामगिरिचा अजुन न आला वीट तुम्हाला कसा
बंधुंनो, वीट तुम्हाला कसा
स्वातंत्र्यास्तव कष्ट कराया कंबर आता कसा
ऐशीही सोन्यासरी। संधी न पुन्हा येईल
जरी उठाल झडकरि सारे। भाग्योदय तरि होईल
प्रगटवा आपुले तेज। स्वातंत्र्य माय मिळवील
उठा, करावी अचाट करणी, झोप नसे ही बरी
बंधुंनो, झोप नसे ही बरी
उठा उठा रे मायभूमि ही मुक्त करा सत्वरी॥ उठा...॥

हिंदुमुसलमान एक होउनी स्वातंत्र्यास्तव उठा
उठा रे एक दिलाने उठा
स्वातंत्र्याचा निजसत्तेचा फडकू दे बावटा
ब्राह्मण अब्राह्मण बंधूंनो पुरे करा भांडणे
क्षुद्र ती पुरे करा भांडणे
श्रेष्ठकनिष्ठ न कोणी उठुनी देशास्तव झुंजणे
मायभूमिच्यासाठी जो ना धावे अस्पृश्य तो
समजणे मनात अस्पृश्य तो
बंधुबंधुसे उठा उठा रे भारत बोलावितो
मायभूमिसाठी आता होउनिया भाई भाई
भांडणा तुम्ही विसरावे ही स्वातंत्र्याची घाई
ही स्वतंत्र भूमी करणे आपुली भरतभूमाई
गुलाम म्हणुनी जगणे आता आपण धरणीवरी
अत:पर आपण धरणीवरी
स्वतंत्र भारत करावयाते उठा उठा सत्वरी॥ उठा बंधुंनो....॥

(मुलगा म्हणतो)
“आई पाहि हे दृश्य सर्व या भारतावरी
सर्वत्र जागृती झाली तम ना जनतांतरी॥

मुले बाळे पहा एक विचारे भारली जशी
हसेल दिव्य तेजाने भारताननसच्छशी।।

भारताचे दिव्य भाग्य मदीय नयना दिसे
आनेद शांति ती नांदे वाव ना कलहा असे।।"

(गाणे)
प्रियकर भारत, गुणमणि भारत, स्वातंत्र्या पावो
सकल विकलता
विलया जाउन
निजतेजा लाहो।। प्रियकर....।।

संहारुन संसार-विषमता
निर्मुन धरणीवरती समता
शातिपथा दावो।। प्रियकर....।।

मोहमलिनता दुरभिमानता
असुर-समरता सत्ता-रसता
जगतातुन जावो।। प्रियकर....।।

मनुज-दिव्यता विश्वबंधुता
उदया येवो मरुनी पशुता
वरति जगा नेवि।। प्रियकर....।।

धर्म सकल होवोत उदार
हंसासम जन निवडो सार
स्नेह विपुल होवो।। प्रियकर....।।

करुनि निजांतर-तिमिर-निरास
करुन घेउ दे जगा विकास
प्रतिबंध न राहो।। प्रियकर....।।

उत्साहाचा आनंदाचा
सहृदयतेचा जगदैक्याचा
पवन मधुर वाहो।। प्रियकर....।।

ज्ञानहि वाढो आदर वाढो
श्रद्धा वाढो सदगुण वाढो
परमात्मा येवो।। प्रियकर....।।

उत्तरोत्तर प्रकाश लाभुनी
पूर्णतेकडे डोळे लावुनी
प्रभुस मनुज पाहो।। प्रियकर....।।

(मुलगा हे दिव्य दर्शन पित्यास घडवितो व विचारतो, "बाबा, तुम्ही भारतमातेसाठी नाही का मरणार, नाही का झिजणार?" तेव्हा बाप म्हणतो,)

"बाळ मी सर्व देईन सेवा हातून ह्या घडो
जनांची करिता सेवा मदीय देह हा पडो।।
आम्ही दोघे जीवनाते उदात्ततर रे करू
बाळा हे गुण-लावण्य संसार लीलया तरू।।
पुत्र तू आमुचा धन्य अंजना घालुनी अम्हा
दिधली दिव्य तू दृष्टी हरुनी मोहता तमा।।
प्रकाश तो पहा येतो पसरेल महिवरी
त्यापरी सत्प्रभा येते आमुच्या सुप्त अंतरी।।"

(मुलगा म्हणतो, "खरेच बाबा, प्रभातप्रभा फाकत आहे व भाग्याची प्रभाही भारतावर फाकेल; भारतमाता स्वातंत्र्याने तळपेल.")

प्रकाश आला पहा तरी। स्वतंत्रता भारतावरी
अमरत्वाची प्रभाचशी। उषा चमकते आकाशी
सकल लोपला अंधार। सृष्टी दिसते मनोहर
पवन वाहतो

सुमगण फुलतो
परिमल भरतो
हृदयाल्हादक दिगंतरी॥ प्रकाश....॥

चराचरा ह्या विश्वाला। चैतन्याची चढे कळा
निद्रातंद्रा दुरावली। जागृति सकलांतरि आली
तरु डोलती
विहंग उडती
कलरव करिती
सुरम्य मंजूळ शुभ स्वरी॥ प्रकाश....॥

हरित-श्यामल-तृणावरी। नाचत किरणे सोनेरी
मोत्यांसम हे दंव दिसते। प्रकाश हृदयी साठविते
मऊ गलिचे
लावण्याचे
हे मोत्यांचे
सृष्टिदेवता ही पसरी॥ प्रकाश....॥

पहा पहा तो उभा रवी। विश्वाचा तो मुका कवि
काव्य ओतितो विश्वात। श्रद्धा याची हृदयात
तेजोराशी
चराचराशी
देती आशी
आशा देतो खरीखुरी॥ प्रकाश....॥

जगी लोपुनी अंधार। प्रकाश येतो बाहेर
उत्साहाचे माहेर। बना सांगतो प्रभाकर
दु:ख न राही
अश्रु न राही
प्रकाश येई
पडला उठलो पुन्हा परी॥ प्रकाश....॥

प्रकाश येतो जन उठती। बंध भराभर ते तुटती
मायामोहातुन सुटती। आशेला पल्लव फुटती
वैभव येते
भाग्य हासते
तेज फाकते
विकास येइल घरोघरी।। प्रकाश....।।

दिव्य कोंदला आनंद। शुभ मंगल परमानंद
नाचति गाणी गाऊन। हाती हाता घेऊन
विद्या येते
कला शोभते
मूर्ती दिसते
प्रभूची मज भारतांतरी।। प्रकाश....।।

(मुलगा म्हणतो, "बाबा, माझी वृत्ती सदगदित झाली आहे. भारतमातेचे ग्रहण सुटलेले दिसत आहे. पहा पहा." गाणे)

ग्रहण सुटले ग्रहण सुटले।।
माझ्या मातेचे पाश सारे तुटले।। ग्रहण....।।

पारतंत्र्याचे नाव आता कुठले।। ग्रहण....।।

आता बुद्धीवर नुरतिल पटले।। ग्रहण....।।

द्वेषकलहादि दिसतिल मिटले।। ग्रहण....।।

भारतमाताचे पांग आज फिटले।। ग्रहण....।।

प्रतिभेला हो पाझर फुटले।। ग्रहण....।।

आमच्या प्रेमाला पल्लव फुटले।। ग्रहण....।।

दैन्य नैराश्य सकळहि हटले।। ग्रहण....।।

जयजयकाराचे ध्वनि शत उठले॥ ग्रहण....॥

किति आनंद सुख किति पिकले॥ ग्रहण....॥

भारतमातेचे मुख तेजे नटले॥ ग्रहण....॥

(मुलगा आईला म्हणतो, "आई तुलासुद्धा माझ्या मरणाचे आता वाईट वाटणार नाही; भारतमातेची हजारो मुले स्वत:ची समज. मला प्रेम दिलेस ते त्यांना दे. आई, मी निष्ठुर नाही.")

"आई ना मनि आण बाळ तव हा निष्प्रेम पाषाणसा
आहे प्रेम कृतज्ञता किति मनी शब्दांत वर्णू कसा
तू स्नेहार्द्र मदर्थ ते पिकविले प्रेमामृताचे मळे
आई मी विसरेन का? पुरविले माझे सदा तू लळे॥

आई तू जपलीस सतत मला प्राणांपरी आपुल्या
आई तू श्रमलीस गे निशिदिनी ह्या वाढवाया मुला
आई ना ऋण ते फिटे कधि तव प्रेमास सीमा नसे
माझे अंतर त्वद्विचार करता वोसंडुनी येतसे॥

गंभीरांबुधिहून खोल गगनाहूनी असे विस्तृत
माते प्रेम तुझे न गे वदवते वाणी तिथे कुंठित
पृथ्वीचे अणुरेणु तारक ते ते मोजता येतिल
त्वत्प्रेमामृत-मापनी मति परी वेडावुनी जाईल॥

आई जीव मदीय सतत तुझ्या प्रेमामृते पोसला
भूमातेस तिला सुखी बसवण्या मी तो सुखाने दिला
खेदाते न करी, हसे जननिये, प्रेमे बघे मन्मुख
आता शेवटचे, पहा पसरते तेथे प्रभा सन्मुख॥

आई भूमिवरी जनास सुखवी मानी तुझी ही मुले
प्रेमस्नेह तयांस दे मज दिले जे, ल हासवी ही फुले
कर्तव्या परमादरे करुनिया, येशील भेटावया
तेथे बाळ बसेल हा तुजकडे दृष्टीय लावूनिया।।”

वदुनि वचन ऐसे जाहला सदगदीत
नयनी घळाघळा ते तेधवा अश्रु येत
परि फिरुन पुसोनी लोचना बाळ बोले
परत जरि मधूनी नेत्र होतात ओले।।

मुलगा स्वत:च्या विधवा नववधूबद्दल सांगतो)
“अजुनी जननी मला असे
वदणे एक परी वदू कसे
अविनीत मला न तू गणी
मम शब्दा परसोनिया मनी।।

कठिणा करुणा किति स्थिती
मम पत्नी अजुनी लहान ती
विधवा वदचील लोक हे
मनि येऊन मदीय धी दहे।।

अवहेलन ना तिचे करी
मुळी आबाळ तिची न ती करा
न तिला श्रमवा, करा सुखी
फुलवावी कलिका हसन्मुखी।।

न ढका हृदयास लाविजे
जननी काळजि नीट घेइजे
लतिका हळुवार वाढवा
गुण-शीले रमणीय शोभवा।।

शिकवून करा सुधी तिला

तुम्हि देणे सुविचार शक्तिला
मनुजास जरी सुशिक्षण
तरि होईल जगात रक्षण॥

सकलीहि असो परिस्थिती
सुविचार-प्रभु नित्य रक्षिती
जरि बुद्धि विनीत होइल
न पडे वक्र कधीहि पाउल॥

जरि पालक इच्छिती तिचे
तरि माहेर असो तिला तिचे
जरि ती असली कुठे तरी
तिजला होउ न दु:ख अंतरी॥

'मम भवनि हिचे पांढरे पाय आले
म्हणुनि मम सुताचे प्राण हा हाय गेले.'
जननि नच वदावे त्वां असे लोकरीती
कठिण कटु नृशंसा ही असे लोकनीती॥

'अशुभ अवदसा ही कैशि आली घरात
मिळवित सुखि माती ही करी मत्सुतान्त
परम अवकळा ही आजि आली घराला
हरहर हर सारा हा हिने घात केला'॥

वचन वदुनि ऐसे, मानसाते तदीय
तुम्हि कधि दुखवा ना, काय तद्दोष होय?
कळतवळत नाही सान बाळा बिचारी
जननि! हृदय तीचे ना कधी तू विदारी॥

मृदु मधुर त-हेने वागवावे मुलीला
सहज कधि मदीय ध्येयही सांग तीला
हसत शिकत मोठी नीट होईल जेव्हा

भवजलधिमधूनी पार जाईल तेव्हा॥

परत जरि कराया वाटला तो विवाह
तरि परम सुखाने तो करो सौख्यवाह
गमत अपरिणीता बालिका आइ माते
करुनि निजविवाहा सेवुदे सन्मुखाते॥

जरि करिल विवाहा पाप ना ते गणावे
उलट विमल धर्मा अंगिकारी म्हणावे
तुम्हि तिजसि सुखाने संमति स्वीय द्यावी
मति करपुन आई ती तदीया न जावी॥

करणे क्षम तुम्हि तन्मति
निज कर्तव्य करावयाप्रती
मग बोल तुम्हास तो नसे
जननी मी वदु काय फारसे"

(माता गदगदून बोलते)

"करि न लवहि चिंता बाळ मी वाढवीन
तव करुण वधूला सर्वदा मी जपेन
हृदय न दुखवीन प्राण गेल्याहि माझा
तुझिच शपथ माझ्या मोहन प्रेमराजा
नयन बुबुळ तेवी तीस मानीन नित्य
सुखविन शिकवीन प्रेम देईन सत्य
मुळि न मनि करावी बाळ वेल्हाळ खंत
जरि जगति मदीया अश्रुला ती न अंत
जमले जल लोचनामधी
किति हेलावुन ये हृदंबुधी
पदरे झणि ती पुशी परी
मग गांभीर्य वरी मुखावरी॥"

(आईच्या डोळ्यांत पुन्हा अश्रू जमलेले पाहून मुलगा शेवटचे सांगतो)

किति मी समजाविले तुला
न रडे देइ निरोप तू मुला
नच मोहदरीत तू पडे
परि कर्तव्यगिरीवरी चढे॥
धरि धीर मनात गाढसा
न रडावे जननी ढसाढसा
जगता सुखवी सदा सये
किति मी सांगु बरे तुला बये॥

रडणे प्रभुजीस नावडे
रडणे द्रोह तदीय तो घडे
हसुनी मज दे निरोप तो
मरणाने तव पुत्र शोभतो॥

मृति ही सदलंकृती मला
मृति देते मज किर्ति निर्मळा
सुत धन्य खराच जाहला
जननी तू करि थोर सोहळा॥

करुनी निज नेत्र कोरडे
निज कर्तव्य करावया पुढे
झणि सिद्ध विशंक आइ हो
मति मोदे तव दु:ख हे सहो॥"

(मातेचे म्हणणे)

"ठेवून हृदयी तूते स्मरुन त्वद्वचा सदा
हृदयी भगवंताच्या धरुनी पावना पदा॥

प्रेमस्नेहामृताचा मी सुकाळ धरणीवरी
करीन बाळका नित्य वाक्य हे हृदय धरी।।

येईल लोचनी पाणी त्वत्स्मृती मज येउन
कर्तव्य करण्यासाठी पुसून परि टाकिन।।

दोन ही पिकली पाने श्रमुनी गळती यदा
भेटाया तुजला येऊ बघाया प्रभुच्या पदा।।"

(मुलगा म्हणतो)

"मोहतिमिर नाशाया आला देवाचा हा बाळ
आई बाबा निरोप द्यावा देव करिल सांभाळ
येतो बाळ अता
सुखवा भारतमाता। येतो बाळ अता।।

(मुलगा आता कायमचा जाणार हा विचार मनात येऊन मातेला फार दु:ख होते. ती मुलाला सदगदित होऊन म्हणते-)

आपार पान्हा हृदयात हाटे
आपार पाणी नयनांत लोटे
पुसूनिया ती परि लोचनांस
अतीव कष्टे वदते मुलास।।

"उभा राहा नीट जरा समोर
गड्या तुला पाहिन एकवार
असे तुझे दर्शन शेवटील
पुन्हा न ते ह्या भुवनी मिळेल"।।

समोर येऊन सुपुत्र राही
तयास माता अनिमेष पाही

बघू न देती भरतीच डोळे
पुशी, पुन्हा ते बनतीच ओले॥

न बोलवे तृप्ति म ती बघून
भरेच पाणी नयनी फिरुन
पुन:पुन्हा लोचन ते पुसून
तयास ठेवी मनि साठवून॥

पिते जणू बाळकरुप आई
पिताहि साश्रु स्वसुतास पाही
उचंबळे वत्सलता अनंत
न वर्णनाला कवि हा समर्थ॥

पुन: पुन्हा बाळक-मूर्ति पाही
न तृप्ति ती मातृमनास होई
'मदीय माते! मम वेळ आली'॥
वदून ती मूर्ति अदृश्य झाली॥

टवटवीत ती तरुची पाने। विहंग गाती मंजुळ गाणे
सृष्टी सांगते दु:ख गिळावे। कर्तव्यास्तव पुन्हा उठावे॥
◙ ◙ ◙

## माझी पत्री

कुठुन आणू सुमने सुवासी
उदार माते तव पूजनासी
न बाग येईल कधी फुलून
सुपुष्प-रोपे जळती सुकून॥

जुई न जाई न गुलाब राही
न मोगरा गे निशिगंध नाही
न पारिजाते न टिके बकूल
न रोप ते एकहि गे जगेल॥

कुठून आणू बहुमोल पाने
प्रयत्न केले किति लेकराने
जगे न आई तुलसी न वेल
जळेल दूर्वांकुर ना हसेल॥

सुपुष्प नाही न पवित्र पान
सदैव खालीच मदीय मान
सदैव माझी परडी रिकामी
श्रमूनिही बाग बये निकामी॥

मदंतरांतील उदंड पाणी
अखंड देतो नयनी भरोनी
तरी न ही बाग फुलून येई
बघू किती वाट मनात आई॥

करावयाला तव पूजनाला
किती परी उत्कटता मनाला

किती तरी दाबु कितीक रोधु
किती सदा मी समजावू बोधू॥
न वाट आता बघतो कशाची
कुचंबणा ना करितो मनाची
असेल बागेत मदीय जे जे
समर्पितो ते तव पादपूजे॥

अनंत-मालिन्ययुते विशीर्णे
निरस्त-तेजे कृश हीन दीने
कशीतरी ही परडीत पाने
करून गोळा भरिली मुलाने॥

मदंतरांतील अपार पाणी
सुदीन पानांवर शिंपडोनी
करुन मी निर्मळ आणिली ही
करुन घे गोड तयांस आई॥

हसोत सारे मम पूजनाला
न तू हसावे जननी मुलाला
भिकार माझी म्हण तू न पत्री
समर्पितो जी चरणी पवित्री॥

◙ ◙ ◙

-पुणे, २७ फेब्रुवारी १९३५

## विद्वानांचे अभिप्राय

**॥एक॥**

**'पत्री' ह्या नावानेच प्रस्तुत काव्यसंग्रहाचे स्वरुप ध्यानात येते. एका श्रेष्ठ कवीने म्हटल्याप्रमाणे काव्याचा अविष्कार म्हणजे जशी झाडाला नवी पालवी फुटते, तसा असावा. श्री. साने यांची कविता झाडाच्या नव्या पालवीसारखी सहजस्फूर्त आहे. तेव्हा पत्री हे त्यांनी आपल्या कवितेला दिलेले नाव अन्वर्थक होय. दुसरे एक असे की वेळोवेळी प्रभूचा धावा करून कवीने त्रिविध तापाने होरपळलेल्या आपल्या काव्याला पत्री हे नाव पसंत केले, यात कवीची विनयशीलता दिसून येते.**

**श्री. साने यांची पुष्कळशी कविता भक्तिपर आहे. प्रभूप्रेमाप्रमाणे त्यांची देशभक्तीही उत्कट आहे. प्रभुप्रेम आणि देशभक्ती हे त्यांच्या काव्याचे दोन प्रमुख विषय. ह्याशिवाय त्यांचे फुलामुलांवरील प्रेम, निरनिराळ्या प्रसंगी त्यांना आलेले अनुभव, मित्रप्रेम हेही विषय प्रस्तुत काव्यसंग्रहात आढळून येतील. विषय कोणचा का असेना, कवी त्या विषयात रंगून जातो. विषयाशी त्याची समरसता होते. श्री. साने यांचे हृदय अत्यंत संस्कारक्षम, नवनीतीसारखे मृदू आहे. 'अश्रू' नावाच्या त्यांच्या कवितेत त्यांनी म्हटले आहे.**

**अश्रु माझा जीव**
**अश्रु माझा प्राण**
**अश्रु फुलवीती। जीवनतरु**

**असे हे हळूवार अंत:करण असल्यामुळे श्री. साने हे सर्व विश्वावर प्रेम करीत असतील, हे सांगावयास नको. विश्वावर आपण प्रेम करावे तथापी विश्वाच्या प्रेमाला सर्वस्वी आपण नालायक आहोत, 'फत्तराला कधी पाने फुटतील का?' अशी ते पृच्छा करतीत. यातही कवीची शालीनता दिसून येते.**

असो श्री. साने यांचे अंत:करण मृदू असले तरी त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा दुबळेपणा नाही. देशाची हीनदीन स्थिती पाहिली म्हणजे त्यांच्या प्रतिभेला स्फुरण चढते, त्यांचे अंत:करण भरून येते. त्यांच्या सात्विक त्वेषाला, उत्साहाला, आवेशाला सीमा राहत नाही. आपल्या सर्वस्वाचा होम झाला तरी हरकत नाही, परंतु आपण आपल्या मायभूमीचे गतवैभव तिला प्राप्त करून देऊ, अशी ती प्रतिज्ञा करतात. मार्दव, माधुर्य, लीनता या गुणांबरोबर कणखरपणा, जोम, ओज, तेज इत्यादी गुणांचा त्यांच्या काव्यात उत्कर्ष झालेला दिसून येईल.

प्रस्तुत काव्यसंग्रहातील श्री. साने यांनी प्रभूचा धावा वाचित असता आस्तिक्यबुद्धी नसलेला वाचकसुद्धा त्यात तल्लीन होऊन जाईल. कवीची आपल्या विषयाशी झालेली तल्लीनता पाहून त्याला आनंद होईल आणि आता जे त्यांच्या भक्तिपर काव्यासंबंधी सांगितले ते त्यांच्या देशप्रेमविषयक काव्यासंबंधीही खरे आहे. त्यांची देशभक्तीविषयक कविता वाचत असता देशभक्तीचा गंध नसलेला वाचकसुद्धा श्री. साने यांची विषयांशी झालेली समरसता पाहून त्यांच्या काव्याचे कौतुक करील. श्री. साने यांच्या या समरसतेमुळे काव्यात शब्दार्थांचा एकजीव झालेला दिसून येतो. भावनेचा आवेश, कल्पनेचा विलास, उपमारुपकादि अलंकार, शब्द आणि वृत्त, या बाबतीत विसंगती किंवा ओढाताण झालेली आढळणार नाही. अशा प्रकारची काव्याची एकरूपता, साहजिकता आपल्याला क्वचितच पाहावयास सापडते. श्री. साने यांच्या भाषेतील साधेपणा, प्रसाद आणि माधुर्य हे गुण कवीच्या सरळ निष्पाप मनाची साक्ष देतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे प्रस्तुत कवीच्या प्रेमळ, निस्वार्थी, त्यागशील वृत्तीची छाया त्यांच्याकवितेवर सर्वत्र पसरलेली आहे आणि या व्यक्तिनिष्ठ गुणांनीच त्यांचे काव्य सर्वांना आवडेल असा मला भरवसा वाटतो.

श्री. साने यांच्या काव्याचा एक ठळक दोष म्हणजे संयमाचा अभाव. अश्रू, लहानपणची आठवण, बालवृद्ध-संवाद इत्यादी त्यांच्या कविता आहेत याच्यापेक्षा आटोपशीर आणि

सुटसुटीत असत्या तर बरे झाले असते. काव्यातील प्रसंग चांगले, कल्पना, भावना, अलंकार आणि शब्द यांचीही वाण नाही. पण संयमाचा अभाव असेल तर रसहानी होते, वाचकांचा विरस होतो. कवीने आत्मसंयमन केले नाही तर वर्णनाचा पाल्हाळ, पुनरुक्ती, एकाच विचाराची लावलेली लांबण हे दोष काव्यात निरंतरचे ठाणे देतात. आत्मसंयम नसेल तर काव्याची रचना शिथिल, विस्कळीत होईल आणि रचनासौष्ठव हे तर उत्तम काव्याचे मुख्य लक्षण होय. श्री. साने यांचा आणखी एक दोष म्हणजे ते शब्दांची काटकसर करीत नाहीत. अगदी थोड्या वेचक शब्दांनी जर आपला अर्थ व्यक्त करता येत असेल, तर शब्दांचा पाऊस पाडू नये. एखाद्या कद्रूप्रमाणे आपल्याजवळ असलेल्या शब्दसंग्रहाचा काटेकोरपणाने उपयोग करावा. व्यक्त अर्थापेक्षा अव्यक्तार्थाची व्यंगार्थाची महती जास्त. ध्वनी हा काव्याचा आत्मा ही गोष्ट कवीने कधीही विसरता कामा नये. श्री. साने संस्कृतज्ञ आहेत. त्यांना चकोरचंद्रिका, चातक आणि मेघ इत्यादी संकेत सहज सुचतात. तथापि अशाप्रकारे संकेत त्यांनी आपल्या काव्यात वापरू नये, हेच उत्तम.

वर सांगितलेले दोष सहज टाळता येतील. यापुढील काव्यरचनेत श्री. साने हे दोष टाळतीलही. असे झाले तर त्यांच्या काव्याची शोभा जास्तच खुलून दिसेल. दोषदिग्दर्शन हे काम कटू तर खरेच. परंतु ते केल्याशिवाय गत्यंतर नाही. आणि 'यदग्रे विषमिव तत्परिणामेऽमृतोपमं भवति' या न्यायाने कटू वचनांचाही गोड परिणाम होतो. निदान श्री. साने यांच्या बाबतीत तरी हे भविष्य खरे ठरेल. कारण त्यांचे कोणी दोष दाखविले तर त्या माणसाचे ते उपकार मानीतील; चवताळून त्याच्या अंगावर धावून जाणार नाहीत.

सरते शेवटी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. ती ही की, प्रस्तुत काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्यात यशाचा हेतू नाही, धनाची अपेक्षा नाही. मानाची हाव तर नाहीच नाही. कवीच्या काही मित्रांनी पुस्तकाच्या छपाईचा खर्च आपण प्रथम तरी देऊ असे सांगितले. यामुळे प्रस्तुत पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे.

**महाराष्ट्रातील रसिक वाचक कवीच्या गुणांचे चीज करतील अशी मला खात्री वाटते.**

◘◘◘

**दि. ३-४-१९३५ -**

**--रामचंद्र कृष्ण लागू**

॥दोन॥

श्री. साने यांनी आपला 'पत्री' नामक काव्यसंग्रह मजकडे पाठविला आणि त्यावर अभिप्रायवजा थोडेसे लिहावयास सांगितले. पत्रीतील सुमारे एकशे साठ स्फुट कविता आणि 'सत्याग्रही' या खंडकाव्याचा अपुरा भाग मी बारकाईने वाचला. त्यावरुन मला जे काय वाटले तेच या ठिकाणी लिहीत आहे.

पत्रीतील आरंभीच्या सुमारे ८५ कवितांत कवीने आपणाकडे साधकाची भूमिका घेऊन आपल्या सुखदु:खाची, आशानिराशेची व कल्पनाध्येयाची करुणकहाणी. प्रभूचरणी निवेदन केली आहे. उदात्त आणि प्रसन्न विचार, निर्मळ आणि हळूवार भावना आणि पवित्र वातावरण ह्यामुळे बहुतेक प्रार्थना आनंददायक झाल्या आहेत. वाणी आणि मन ह्यांना पावित्र्य मिळावे व आत्मशुद्धी व्हावी, हा हेतू कित्येक प्रार्थनांच्या मुळाशी दिसतो. 'वसंतवारा', 'हृदयाचे बोल' व 'देवाजवळ' ही आत्मनिवेदनात्मक स्तोत्रे मधूर आहेत. 'नयनी मुळी नीरच नाही, 'सोन्याचा दिवस', 'देवा झुरतो तव हा दास', 'हे नाथ येईन तव नित्य कामी', 'काही कळेना काही वळेना' व 'भाग्याचे अश्रू' या भावगीतांतून कल्पनानाविन्य व आर्तता उत्कटतेने व्यक्त झाली आहेत.

ह्या सर्व प्रार्थनांचा एकत्रित विचार केल्यास असे दिसते की, ह्या प्रार्थना जरी निरनिराळ्या गेय वृत्तांत लिहिल्या आहेत तरी त्या सर्वांत प्रकट झालेली वृत्ती एकच म्हणजे करुणोत्कट आहे. सूक्ष्म रीतीने पाहिल्यास ध्येयाच्या आभासापासून तो ध्येयसिद्धीपर्यंतची कवींच्या मानसिक स्थित्यंतराची आंदोलने येथे दिसतात. तसेच संकटे आणि निराशा ह्यांतून मार्ग काढीत कवीचे मन आशा आणि आनंद ह्यात असे स्थिर झाले आहे, ह्याचाही प्रत्यय येतो.

स्वतंत्र विषयावरील स्फुट काव्यांपैकी 'ग्रंथमहिमा' ह्या कवितेमधील व्यापक दृष्टिकोण, 'शांती कोण आणील' यातील नवसंदेश, 'प्रेमाचे गाणे' यातील अश्वासन आणि 'हस रे माझ्या मुला' यातील सूचक प्रेमभाव अपापल्यापरी हृदयहारी व अभिनव वाटतात.

पत्रीतील दुस-या विभागात स्वदेशभक्तीपर स्फुट कवने आली आहेत. आधी केले आणि मग सांगितले हा रामदासांचा दंडक त्यांच्या कवनांस लागू पडतो म्हणूनच त्यांची राष्ट्रीय कवने वैशिष्ट्यपूर्ण उतरली आहेत. दे. भ. सावकर, से. बापट किंवा गोविंद शाहीर ह्यांनी लिहिलेल्या कवनांत जो आवेश व जी स्फूर्ती दृष्टीस पडते तिचे प्रत्यंतर श्री. साने यांच्या 'जारे पुढे व्हा रे पुढे', 'नवयुवक', 'तुफान झालो' इत्यादी कवनांतून आपणास मिळतो. 'बलसागर भारत होवो', 'भारतास' व 'स्वातंत्र्याचे गाणे' ही गीतत्रयी प्रत्येक हिंदवासियाने मुखोद्गत करावी एवढा तीत जिवंतपणा आहे. उत्कट राष्ट्रप्रेम, दुर्दम आशावाद आणि अंत:करणाची खरी तळमळ ह्यांमुळे श्री. साने ह्यांची राष्ट्रीय गीते स्फूर्तिदायक व मनोवेधक झाली आहेत, यात शंका नाही.

'सत्याग्रही' हे खंडकाव्य मला अपुरेच वाचावयास मिळाले पण हि-याची उज्वलता त्याच्या एका पैलूवरुनही दिसते, तसेच ह्या काव्याबद्दल म्हणता येईल. या खंडकाव्यास कथानक फारसे नाहीच तरी पण सतीचे वाण धारण करणा-या सत्याग्रही वीराने आपल्या देशाच्या सद्यस्थितीविषयी जे सडेतोड व भावनोत्कट विचार प्रगट केले आहेत, ते प्रत्येकास आत्मसंशोधन करावयास लावतील इतके प्रभावी आहेत.

श्री. साने हे ध्येयवादी आहेत. स्वार्थत्याग व निरपेक्ष सेवा हे त्यांचे व्रत होय. 'विचार भावना कृती, तरीच होई उन्नती' हे त्यांच्या जीवनाप्रमाणे त्यांच्या काव्याचेही रहस्य दिसते.

निर्मळ भावनेचे व ओघवती पण मधुर भाषासरणीचे 'जीवन' मिळाल्यामुळे त्यांची 'पत्री' टवटवीत दिसते हे खरे तरी पण प्रत्यक्ष कृतीवर अधिष्ठित झालेल्या त्यांच्या जीवनाच्या सूर्यकिरणांत तिची शोभा अधिक वृद्धिंगत झाली आहे, यात शंका

**नाही! थोडक्यात म्हणजे अगोदर स्वत:च ते काव्याचे विषय झाले आहेत आणि मगच त्यांनी ही काव्यपत्री शारदेच्या पायी अर्पण केली आहे. तिचे स्वागत मराठी रसिक मोठ्या आनंदाने व आदराने करतील, अशी मला पूर्ण खात्री वाटते.**

◙ ◙ ◙

**दि. ६-४-१९६५**

**-वामन भार्गव पाठक**

॥तीन॥

रा. साने यांचा 'पत्री' हा काव्यसंग्रह वाचीत असता त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाच्या वाचकांसमोर खुद्द सान्यांची मूर्तीच उभी राहते. इतकी त्यांची कविता हुबेहुब त्यांच्यासारखी आहे. हे साम्य दोघांच्या अंतरंगात व बाह्यांगातही समप्रमाणात दिसून येते. सान्यांच्या हृदयाप्रमाणे त्यांची कविता प्रेमळ, मोकळी, निर्मळ, जरा हळवी पण निश्चित ध्येयासाठी 'हाल होवोत तो चित्त ना मुळी भिते' असे ठासून सांगण्याइतपत कणखर आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या साध्या व विनीत बाह्यांगाला साजेल असेच त्यांच्या कवितेचेही बाह्यांग आहे. तिच्यात नवीन जाती-वृत्तदिकांचा डामडौल नाही, कलेचा बडेजाव नाही, पिशाप्रेमाचे नाचरंग नाहीत व कवित्वाचा अहंभाव तर नाहीच नाही. पण खुद्द साने व त्यांची कविता या दोघांनाही 'वेष असावा बावळा, अंतरी असाव्या नाना कळा' या समर्थांच्या बोलाची पक्की खुणगाठ बांधून ठेवलेली दिसते.

आपल्या परमेश्वरपर काव्यात सान्यांनी ईश्वराला हृदय पिळवटून आर्तरवाने आळविले आहे. सागरातील आपल्या होडीला वल्हविण्यास थोडी मदत मागितली आहे. अंधारात एकाददुसरा किरण याचिला आहे, पण या याचनेत शिरजोर भिका-याचा हट्ट नाही, आततताईपणा नाही की आक्रोश नाही. येथून तेथून विनयाचे बोलणे व लीनतेचे चालणे. रा. साने यांनी अश्रुंचे एक नवीन तत्त्वज्ञान या कवितेत मांडले आहे. वाचकांस त्यांच्या कवतित कवितेत निराशेचे सुस्कारे व सर्वत्र अश्रूचे पूर दिसून येतील. याचे कारण त्यांचे चित्त फार हळुवार व भावनावश आहे. पण असे भावनाप्रेरित अश्रू येणे, देशबांधवांची व धर्मबांधवांची दु:खे बघून व सुखेही देखून गहिवरुन जाण्याइतपत हृदय जिवंत असणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. म्हणून ते म्हणतात, 'अश्रू माझी आशा, अश्रू माझे बळ.'

'माझे ध्येय' या एका कवितेत सान्यांचे समग्र जीवनसर्वस्व ओतलेले दिसते. श्रम हा त्यांचा देव आहे व श्रम हे

त्यांचे पूजासाहित्य आहे. शहरींच्या तकलुबी व दिखाऊ जीवनाला कंटाळून ते खेडोपाडीच्या राहणीने गरीब पण मनाने श्रीमंत असलेल्या आपल्या शेकडो देशबांधवांशी समरस झालेले आहेत. जानपदवाङ्मयाचा एक नमुना म्हणून यातील बरीच काव्ये दाखविता येतील. त्यात खेड्यांच्या सुखदु:खाला कळवळ्याची वाचा फोडली आहे.

सदर कवितेला तिच्या साधेपणामुळे, तळमळीमुळे व कवीच्या खडतर तपस्येमुळे एक रमणीय वैशिष्ट्य आले आहे. रा. साने यांनी असले 'देशीकार लेणे' मराठीवर चढविले, याबद्दल कोणासही आनंदच होईल.

◙ ◙ ◙

दि. १०-४-१९३५

-के. ना. वाटवे

॥चार॥

रा. पा. स. साने यांनी वेळोवेळी रचिलेल्या कवनांचा संग्रह 'पत्री' नाव या संग्रहास दिले आहे, ते त्यांच्या वृत्तीशी फार जुळते आहे. ज्या दयामय देववर भरवसा ठेवून आणि ज्याच्यापुढे आपला 'इवलासा अश्रू' टपाटपा गाळून आपले हृदय हलके करण्याचा व्यवसाय साने अंतर्मुख होऊन चालवितात. त्यालाच ही 'पत्री' त्यांनी वाहिली आहे! 'पत्रं पुष्पं फलं तोयम्' या वर्गातील ही पत्री आहे. हिच्यातच साने यांचे प्रसन्न, स्वत: हसून दुस-यास हसविणारे 'निर्मळ हृदय'पुष्प सापडेल. यातच 'बांधील कारखाने शाळा उभरवील', 'संन्यास हा नवीन राष्ट्रास वाचवील' अशा प्रकारच्या नवीन संन्यासाचे मधूर फलही दिसून येईल. आणि अशी ही पवित्र पत्री साने यांनी ज्या 'अश्रूंच्या बिंदूत' माझा 'सुखसिंधू' मानिला आहे, त्या सिंधूच्या तोयात श्रद्धेने भिजविली आहे. या अश्रूचे 'माणिकमोती' या पत्रीत सर्वत्र विखुरलेले दिसतात आणि त्यांचे 'पाणी' कोणालाही क्षणभर तरी भारुन टाकल्याशिवाय राहणार नाही.

काव्याचा आत्मा रस हा मानला आहे. त्या दृष्टीने पाहिले तर साने यांच्या पत्रीत अंगचा रस आहे. व्यापत अर्थाने भक्तिरस पत्रीत भरपूर आहे. दीनांच्या विषयी अपरंपार तळमळ जागजागी दिसते. तिला शाब्दिक रुप देताना विविधता व सौंदर्य ही जर आजच्यापेक्षाही अधिक पत्रीत असती तर पत्री फारच मोहक वाटली असती. जास्त तजेला पत्रीतील अश्रू, का मजला देता प्रेम, इत्यादी दहा-वीस कवनात चमकताना स्पष्ट दिसतो. 'लहानपणची आठवण' वत्सलरसाने डवरलेली आहे. दास कवीच्या मनाची घडण मूळची कशी आहे, ते यात उत्तम प्रकारे प्रतिबिंबीत झाले आहे. 'जा रे पुढे व्हा के पुढे' हे कवन स्फूर्तीदायक उतरले आहे आणि 'स्वातंत्र्यानंदाचा जयजयकार' मनामध्ये हर्षानंदाच्या ऊर्मी उचंबळविल्याशिवाय राहत नाही.

**तळमळ, सदभावना, उच्च ध्येय, दीनसेवा, अर्पित जीवन यांचे प्रेरक सूर पत्रीतील कवनाकवनात भरलेले आढळतात. खरे आहे की तेच तेच सूर सर्वत्र भरलेले, कधी तेच तेच शब्द पुन:पुन्हा कानी पडलेले पाहून या एकतानतेमुळे कंटाळवाणेपणा वाटतो. चंचल मनाच्या भ्रामरी वृत्तीला हे रुचणार नाही. तथापि संयमी मनाला या पत्रीपासून नि:संशय सत्त्वभाव दाटून येतील. बापटांच्या चैतन्य गाथ्यानंतर त्याच जातीची ही पत्री मराठी वाङमयात आपल्या तेजाने तळपेल.**

◘◘◘

**-दत्तो वामन पोतदार**

॥पाच॥

रा. रा. पां. सदाशिव साने यांचा पत्री नामक कवितासंग्रह समग्र वाचला. पत्रीची एकंदर 'पर्ण' (पृष्ठ) संख्या सुमारे ३८० असून त्यांपैकी ३०० पृष्ठांत गीतकवजा स्फूटप्राय अशा १६१ कविता असून बाकीच्या पृष्ठांत त्यांच्या 'सत्याग्रही' या अजून अप्रकाशित अशा खंडकाव्यातील जो भाग आज प्रसिद्ध करण्यासारखा आहे, तो दिला आहे. संग्रहित केलेल्या कवितांचे लहानमोठे आकार आणि विषयांची विविधता यांच्या दृष्टीने संग्रहाचा सरसकटपणा 'पत्री' या अन्वर्थक नामात सूचित झाला असून कवीच्या कवित्वशक्तीचे अभिनव कौमार्य आणि भक्त्युत्कट ईश्वरसमर्पणबुद्धी यांचाही रम्य ध्वनी त्यांत प्रतीत होण्यासारखा आहे, असे मला वाटते.

संग्रहातील ब-याचशा कवितांचा जन्म निरनिराळ्या ठिकाणच्या कारागृहवासाच्या अवधीत झाला आहे, ही गोष्ट यांच्या शेवटी दिलेल्या स्थाननिर्देशावरुन प्रामुख्याने प्रतीत होतेव तिच्या द्वारे 'विपत्ती दे तीही हवी विकासा' या कवितेतील कवीच्या उदगारास एक प्रकारचे विशेष करुणरसपूर्ण यथार्थत्व न स्वारस्य प्राप्त झाले आहे. म्हणून प्रस्तुत संग्रह केवळ फुरसतीचा बुद्धिविलास नसून, बाह्य कष्टप्रद परिस्थितीमुळे अधिकच उत्कट चिंतनात्मक होणा-या अशा भक्तिपूर्ण, सात्विक, सुसंस्कृत व कर्तव्यनिष्ठ अंत:करणात अखंड उचंबळणा-या आणि स्वयंस्फूर्तीने व प्रबळ वेगाने काव्यरुप पावलेल्या अंतर्वृत्तीच्या उदगारजलाने निर्माण झालेले हे रम्य व सत्विक आल्हाददायक असे 'अच्छोद सरोवर'च आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यामुळेच त्यातील कित्येक कवितांचा सकृद्दर्शनी भासणारा प्रमाणरहित दीर्घविस्तार कंवळ काव्यरचनेच्या दृष्टीने कित्येकास अयुक्त वाटण्याचा संभव असला तरी 'पूरोत्पीडतडागस्य। परिवाह: प्रतिक्रिया' (जळ तुंबता तडागी फोडावा लागतो जसा पाट) या न्यायने त्या त्या वेळच्या उत्कट वृत्तींना पुरी वाट करून देण्याच्या

दृष्टीने हा विस्तार स्वाभाविक व समर्थनीय वाटेल यात शंका नाही.

सारांश, मन:पूर्वकता (Sincerity) हा जो कोणत्याही ख-या काव्याचा खरा निदर्शक असा मुख्य गुण तो पत्रीत सर्वत्र विपुलपणे निदर्शनास येतो. पत्रीतील कवितांचे मुख्य विषय ईश्वरनिष्ठा, ईश्वरप्रार्थना, स्वत:ची हीन व अगतिक स्थिती, स्वत:च्या जीवनकार्याचे चिंतन, राष्ट्राची सद्य:स्थिती, प्रिय भारतभूमीचा उद्धार व तिची स्वातंत्र्यप्राप्ती हे आहेत. या सर्वांसंबंधीही कवीच्या मनाची उत्कट तळमळ, भक्तिप्रवणता आणि सुसंस्कृत उदबोधक विचारसरणी हे गुण चांगले प्रतीत होतात आणि काव्यरचनाही त्या त्या वृत्तीस साजेशी विनम्र व उदात्त, सात्विक, आवेशपूर्ण, आशा व उत्साहप्रेरक आणि प्रसंगोपात्त अत्यंत हृदयस्पर्शी करुणरसोत्कट व मार्दवयुक्त अशी आहे.

पत्रीतील भक्तिविषयक कवितांसंबंधी जी एक गोष्ट प्रमुखपणे ध्यानात येते ती ही की त्यातील आत्माविष्कार व आत्मार्पण यांचे स्वरूप आपल्यातील श्री तुकाराम-नामदेवादिकांच्या उदगारांत येणा-या ‘सख्यमात्मनिवेदना’पेक्षा सध्याच्या कविवर्य रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, थिऑसॉफिस्ट वगैरेंच्या उदगारात दिसून येणा-या आत्मार्पणाच्या व सेवाशरणतेच्या कल्पनांशी त्यांचे जास्त साद्दश्य आहे आणि सध्याच्या परिस्थितीच्या संस्काराचे प्रतिबिंब या दृष्टीने ते अगदी स्वाभाविक आहे.

स्वातंत्र, राष्ट्राची सद्य:स्थिती व मातृभूमीच्या उद्धाराविषयीची तळमळ या संबंधाच्या कविता अलीकडच्या कित्येक पोषाखी व स्वसुखलोलूप कवींच्या कवितांप्रमाणे वरपांगी कळकळीच्या नाहीत किंवा ठरीव साच्याच्या, खोडसाळ व अतिशयोक्तीपूर्ण नाहीत, तर ज्याचा वरील गोष्टींशी जीवनकार्याद्वारा प्रत्यक्ष जिव्हाळ्याचा संबंध निगडित झालेला आहे आणि तत्प्रीत्यर्थ ज्या व्यक्तीने स्वत: देहकष्टादिद्वारा खस्ता

खाऊन, आश्रमादी जनताशिक्षणकार्याला स्वत:ला वाहून घेऊन आत्मार्पण करण्याचा सक्रीय उपक्रम चालविला आहे, अशा कवीच्या या राष्ट्रीय कविता असल्यामुळे खरे औचित्य व स्वारस्य त्यात आहे आणि म्हणूनच पत्रीतील अनेक राष्ट्रीय कवितांतून सात्विक राष्ट्रकार्ययोगाची स्फूर्ती देणारी तेजस्वी विचारसरणी व उदात्त ध्येयात्मक रम्य कल्पना व आशाचित्रे भरपूर सापडतात, यात नवल नाही.

अभिप्रायारंभीच दर्शविल्याप्रमाणे पत्रीतील कवितांची विविधता व विपुलता फार असल्यामुळे कवीच्या निरनिराळ्या गुणांच्या निदर्शक अशा निवडक कवितांचा अवतरणे देऊन थोडक्यात निर्देश करित येणे शक्य नाही. हे जरी खरे असले तरी मासल्याकरिता कवीचे जीवनध्येय व त्याची ईश्वरसमर्पणात्मक बुद्धी यांची द्योतक अशी दोनच अवतरणे खाली देऊन बाकीच्या लक्षणीय कवितांचा फक्त क्रमांकासहित नामनिर्देश करतो.

अश्रु पुसावे
जन हासवावे
याहून नाही दुजे काही ना मी
हे कवीचे जीवनध्येय आहे.
तुझ्या करांतील बनून पावा
कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा
यात ईश्वरार्पणबुद्धी गोड रीतीने दर्शविली आहे.

वेल (१४), जीवनतरू (१५), मजूर (२०), असो तुला देवा माझा सदा नमस्कार (२४), प्रभो, काय सांगू तुला मी वदोनी (२५), वेणू (२६), आई, तू मज मार मार (३७), दिव्य आनंद (३८), कैसे लावियले मी दार (३९), हस रे माझ्या मुला (४०), गाडी धीरे धीरे हाक(४४), आशा निराशा (४५), येवो वसंतवारा (४९), तुझ्या हातात (५१), रामवेडा (५६), मयसभा राहिली भरून (८३), मेघासारखे जीवन (८९), वंदन (९०), मदीय त्या नमस्कृती (९१), विपत्ती दे, तीहि हवी विकासा (९३), प्रभूप्रार्थना (१४८), राष्ट्राचे उद्यान (१४९),

भारतीय मुले (१५७), महात्माजींस (१६०), खरे सनातनी (१६१) ह्या कविता मला विशेषच आवडल्या.

रा. साने त्यांच्या अनेक लहान-मोठ्या गद्यकृतींच्या द्वारे कसलेले लेखक म्हणून महाराष्ट्र वाचकांस चांगले परिचित आहेत. पत्रीतील काव्यरचनेतही त्यांचे भाषापटुत्व चांगल्या प्रकारे दृगोचर होत आहे. तसेच यातील काव्यशैली सहजरम्य, आल्हाददायक, प्रौढ, सुश्लिष्ट व यथोचित असून, तिच्यात सहजप्रवाहिता व गायनोचित शब्दलालित्य व नादानुकूलता ही आहेत. काही ठिकाणी मात्र 'रडवेले वदन', 'पाणरलेले नयन' अशासारखे कर्णकटू किवा काव्यरसाकर्षक शब्दप्रयोग किंवा ओठांवर 'थरथरणारी' प्रार्थना अशासारखे नादलुब्धतेच्या किंवा विदेश वाङ्मयसंस्काराच्या अनिवार्य मोहवशतेचे द्योतक असे 'अ-सुभग' कल्पनाविष्कार आढळतात. पण अशी स्थळे फारच क्वचित व पत्रीतील एकंदर रचनासौष्ठवाच्या मानाने पाहता ती गालबोटवजा समजण्यास हरकत नाही.

पत्रीतील एकंदर कवितांचे वैपुल्य आणि त्यातील ब-याचशा भागाच्या रचनेने व्यापलेला अल्पकाळ यांचे व्यस्त प्रमाण प्रमाण यांचाही विचार सहजगत्या डोळ्यांपुढे उभा राहण्यासारखा आहे व त्यावरून कशाही विषम परिस्थितीत क्षणशः कणशश्चैव अशी मनाची सारखी अव्यग्र अनुसंधानपर, साधनापर व उद्योगनिरत वृत्ती ठेवल्यास अल्पकाळात आत्मानंदकारी व प्रिय मातृभाषोत्कर्षाच्या कार्यास पोषक अशी किती तरी वाङ्मयनिर्मिती होऊ शकते, याचाही आमच्यातील तरुण व होतकरू कविवर्गास रा. साने यांच्या पत्रीवरून स्फूर्तिदायक व मार्गदर्शक वस्तुपाठ मिळण्यासारखा आहे, असे मला वाटते. पत्रीच्या संकलनाच्या पाठोपाठ रम्य सौरभपूर्ण अशा पुष्पांचा संग्रहही अर्थात् कर्तव्यप्राप्तच आहे. त्यास अनुसरून यानंतर रा. साने यांच्या इतरही गद्य-पद्य वाङ्मयपुष्पांचे प्रकाशन त्यांचा तरुण सेवकसंघ करणार आहे. तो त्यांचा हेतू लवकरच सफल होवो व गुणग्राही महाराष्ट्र जनता त्याला उत्तेजन देण्याचे कर्तव्य करीलच, असा भरवसा मी प्रकट करतो. रा. साने यांचे

**जनताशिक्षणाचे व्यावहारिक प्रयत्न आणि राष्ट्रीयत्व पोषक अशा गद्यपद्यात्मक वाङमय रचनेच्या द्वारे त्यांची अखंड चालू असलेली प्रिय मातृभूमीची सेवा यांचा सदैव उज्ज्वल उत्कर्ष व प्रगती होवो, अशी अंत:करणपूर्वक उच्छा व्यक्त करतो.**

◘◘◘

**दि. १६-४-१९३४**

**-श्री. नी. चाफेकर**

**॥सहा॥**

**वस्तुस्थितीनिरपेक्ष असे निकामी काव्य भरपूर निपजते, परंतु श्री. साने हे रिकामटेकडे म्हणून कुडाला तुंबड्या लावणारांपैकी नाहीत, ही संतोषाची गोष्ट होय. त्यांच्या काव्यात अंत:करणाची तळमळ व कळकळ पदोपदी व्यक्त होत असल्याने राष्ट्रजागृतीचे कार्य ह्या काव्यग्रंथांमुळे सुलभ होणारे आहे. सद्य:परिस्थितीविषयीचे कवीचे विचार अहंकाराचा उन्माद न झालेल्या कोणालाही मानवतील. कवीच्या निर्विकार सात्विक वृत्तीमुळे काव्याला प्रौढत्व व उदारत्त्व आले आहे. गीतारहस्यापासून प्रारंभ होणा-या तुरुंगवाङमयाचा विचार केला तर तुरुंग हा प्रौढ वाङमयाचा पोशिंदा आहे, असे म्हणावेसे वाटते.**

◙ ◙ ◙

**-ना. गो. चापेकर**

**स्वभाव व गुणदोषमीमांसा**

गोपाळरावांच्या आयुष्यक्रमाकडे नजर दिली तर आपण आश्चर्यचकित होतो. केवळ दृढनिश्चय व उद्योग यांच्या जोरावर मनुष्य काय करू शकतो हे त्यांनी मूर्तिमंत दाखवून दिले. १८८७ मध्ये हरिभाऊ आपटे आणि गोपाळराव यांचा स्नेह जमला. गोपाळरावांनी हरिभाऊंस सहज प्रश्न केला की "हरिभाऊ, पुढे आपल्या आयुष्यक्रमात तुम्ही काय व्हावे असे तुम्हांस वाटते?" हरिभाऊंनी गोपाळरावांस तोच प्रश्न केला. गोपाळराव म्हणाले, "कॅबिनेट मिनिस्टर होऊन आपल्या देशाची कामगिरी करावी अशी माझी इच्छा आहे," "समाजास सन्मार्गदर्शक असा विख्यात कादंबरीकार व्हावे अशी माझी इच्छा आहे," असे आपटे म्हणाले. गोपाळरावांची मनीषा पाहून आपटयांस आश्चर्य वाटले. परंतु गोपाळरावांनी आपले ध्येय गाठले हे हरिभाऊंनी आपल्या डोळयांनी पाहिले आणि त्यांस मोठे कौतुक वाटले. साम्राज्यात जी सन्मानाची जागा त्यांनी मिळविली, देशात जे त्यांनी महत्त्वाचे लोकनायकत्व पटकाविले हे सर्व त्यांस एकदम आयते वाढून आले नाही. एकेक पायरी चढत चढत ते वर गेले. हळूहळू सर्व फुलले. एकेक पाकळी उमलत होती. सरतेशेवटी सर्व फूल फुलून दशदिशात त्याचा सुवास दरवळून राहिला. वयाच्या अठराव्या वर्षांपासून त्यांच्या कामगिरीस प्रारंभ झाला. प्रोफेसर, सार्वजनिक सभेचे चिटणीस, बेल्वीकमिशनपुढील साक्षीदार, प्रांतिक कायदे- कौन्सिलातील सभासद, राष्ट्रीय सभेचे चिटणीस व अध्यक्ष, अखिल हिंदी राष्ट्राचे पुढारी, रॉयल कमिशनवरील मेंबर, परराष्ट्रात अधिकृत वकील, अनेक संस्थांचे संस्थापक अशा प्रकारे त्यांचा तीस वर्षांचा आयुष्यपट चितारला गेला. मृत्यूच्या वेळेस त्यांचे वय फक्त ४९ वर्षांचे होते. युरोपमध्ये व अमेरिकेमध्ये लोक सार्वजनिक कामात, देशाच्या कारभारात पन्नाशी उलटल्यानंतर पुढे येतात. परंतु हिंदुस्तानात पाहिले तर बुध्दी जास्त लवकर परिपक्व होते असे दिसते. अकबर राज्यावर आला त्या वेळेस तो अवघा तेरा वर्षांचा होता. शिवाजी महाराजांनी तोरण्यावर तोरण बांधिले त्या वेळेस त्यांस मिसरूडही फुटली

नसेल. पहिला बाजीराव विसाव्या वर्षीच पेशवा झाला. आणि वीस वर्षांत आपल्या अतुल पराक्रमाने त्याने सर्वांस नमविले. पहिले माधवराव हे तर सोळा वर्षांचे असता पेशवे-पदावर अधिष्ठित झाले. आणि सर्व पेशवे मंडळात कार्यकर्ता असे नाव त्यांनी मिळविले; परंतु गाडी जोराने चालविली तर बैल थकून जातात, त्याप्रमाणे या नरवीरांचे देह लवकर थकतात, आधुनिक महाराष्ट्राकडे नजर दिली तरी हेच चित्र दिसते. चिपळूणकर, आपटे, आगरकर यांच्यासारखी रत्ने फारच लवकर दिवंगत झाली. त्यांचेच उदाहरण गोखल्यांनी गिरविले. गोखलेही हिंदुस्तानास फार दिवस लाभले नाहीत. परंतु केसरीतील मृत्यूलेखात अवतरण दिल्याप्रमाणे 'मुहूर्त ज्वलिंत श्रेयो न च धूमायितं चिरम्।।' पुष्कळ धुमसून आजूबाजूच्या लोकांस डोळे चोळण्यास लावण्यापेक्षा क्षणभर चमकावे आणि लोकांस मार्ग दाखवून द्यावा. गुलाब अल्पकाळ असतो, आणि सर्वांस रिझवितो; सुखवितो. परंतु तो कंटकासनावर असतो हे विसरुन चालणार नाही. 'न तपस्या तरि ना विकास' हे अबाधित तत्त्व आहे. टिळकसुध्दा त्यांच्यावर आलेल्या मानसिक, शारीरिक दगदगीला न जुमानता इतके दिवस जगले याचे कारण ते स्वत:च सांगत, की 'मी जात्या कठोर अंत:करणाचा आहे.' दगदगीचा मनावर व त्यामुळे देहावर ते फार परिणाम करून घेत नसत. गोखल्यांचे याच्या अगदी उलट होते. त्यांच्या मनावर फार परिणाम होईल. कार्य करीत असता, लढाया लढत असता गोखल्यांस मरण आले. त्यांच्या मृत्यूने सर्व देश हळहळला. क्षणभर सर्व लोक भेदभाव विसरून गेले. गोखल्यांनी आपल्या गुणांनी सर्वांची अंत:करणे काबीज केली. आपल्या अल्प आयुष्यक्रमांत ज्या महनीय गुणांनी त्यांनी ही अजरामर कीर्ती संपादन केली, त्या गुणांचे आपण थोडथोडे निरीक्षण करू या. या गुणांबरोबरच त्यांच्या उणिवा, त्यांचा स्वभाव, त्यांच्या कार्याची दिशा याचाही संक्षेपाने विचार करणे प्राप्त आहे.

त्यांच्या सर्व कामगिरीस पायाभूत झालेला गुण म्हणजे त्यांनी केलेला दांडगा अभ्यास. भावी कार्यास योग्य व क्षम होण्यासाठी, त्यांनी देहाची पर्वा केली नाही. सतत दहाबारा वर्षे

न्या. रानडे व रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्याजवळ त्यांनी देशातील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास केला. त्यांनी विशेषत: आकडेशास्त्राचा जोश्यांजवळ फारच कसोशीने अभ्यास केला. देशाची तरफदारी करणा-यास सर्व खडान्खडा माहिती असली पाहिजे, या दृष्टीने त्यांनी युरोपच्या इतिहासाचा फार मननपूर्वक अभ्यास केला होता. जुन्या राज्यपध्दती कशा अस्तित्त्वात आल्या आणि त्यात कसकसे फरक पडले यांचे त्यांनी काळजीपूर्वक ज्ञान मिळविले. वाच्छा म्हणतात :- "Nothing so broadenss the mental horizon in politics as History. The angle of vision is greatly enlarged. Parochial views of men and things are superseded by catholic views. The parish is forgotten and all the world becomes his country. Nothing, therefore, is more valueable than history and no accomplishment is more suited to him who aims at being a better citizen than the same subject."

गोखल्यांनी इतिहासापासून फार धडे घेतले. परंतु हे सर्व शिकून जर मांडता येत नसेल तर काय फायदा? म्हणून गोपाळरावांनी याही बाबतीत लहानपणापासून सक्त मेहनत घेतली होती. त्यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. कोठे उत्तम शब्द, उत्तम वाक्य दिसले की ते यांनी औत्मसात केलेच. बर्कसारख्या महापंडिताच्या ग्रंथांतील उतारे त्यांस तोंडपाठ असत, या सर्व तयारीमुळे इंग्रजी भाषा त्यांच्या जिव्हाग्रावर खेळू लागली. त्यांची भाषा सोपी, सहजसुंदर, परंतु जोरदार आहे. बंगाली वक्त्यांमधील अलंकार आणि मेथांच्या भाषेतील विनोद व कोटिक्रम हे गुण त्यांच्या भाषेत नाहीत. परंतु सरलता आणि मनोहरता तिच्यामध्ये आहे. मोरोपंतांनी म्हटल्याप्रमाणे 'कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषविरहिता। विराजे सिंदूरे धवलवसने भूपवनिता॥' अशी गोपाळरावांची वाग्वधू होती! गोखल्यांच्या १९०७ च्या आरंभीच्या उत्तर हिंदुस्थानातील दौ-याच्या वेळी हिंदुस्थान रिव्ह्यू त्यांच्या भाषेसंबंधी लिहितो:- "We think his speeches do not rise to the level of oratory, and speaking broadly, they are inferior, as speeches, to the efforts of Mr. Lal

Mohan Ghose, Babu Surendranath Banerjee and Sir. Pherojshah Mehta, among living Indians Mr. Gokhale's diction is chaste but one misses in it the almost classic phraseology of the Hon'ble Dr. Rash Behari Ghose. There is again no humour, no sarcasm, no lofty declamation, no piercing invective, such as characterised for instance, Mr. Lalmohan Ghosa's still famous speech on the Ilbert Bill delivered at Dacca nearly a quarter of century ago, In some respects, however, Mr. Gokhale is equalled by few and surpassed by none among his compatriots. In directness of expression and lucidity of exposition, in grasp of principles and mastery of detail, we hardly know his equal. Read his speeches full of eloquence, full of earnestness, vigorous masterpieces of sustained argument; there is hardly a superfluous word in them or any which one can easily improve. As a debator Mr. Gokhale is not equal to Sir, Pherojshah Mehta neither perhaps as a stateman. In the higher qualities of statemanship, we think he is inferior only to Sir Pherojshah." **ते आपल्या वाणीत निग्रह दाखवीत. वक्तृत्व आवेशपूर्ण असले तरी त्यात मनाचा आवरलेला भाव स्पष्ट दिसे. इंग्लंडमध्ये या मनोनिग्रहाचा त्यांस फार फायदा झाला. आकडेशास्त्रातील ज्ञान व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व यांच्या जोडीला त्यांच्या भाषणात विषयाची सुंदर मांडणी असे. एकामागून एक साखळीच्या दुव्याप्रमाणे त्यांच्या भाषणातील दुवे असत.या गुणत्रयामुळे त्यांची कायदे कौन्सिलमधील भाषणे अमोघ ठरली. आकडयांच्या सम्यक व अचूक ज्ञानाने त्यात कोणालाही खोड काढता येत नसे. ब्रिटॅनिकाकारांनी त्यांच्या भाषणाचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे**: 'His persuasive eloquence, close reasoning, accurate knowledge of the subjects discussed and instincts of statemanship won him the Indian leadership.'

◘◘◘